जातक-निधी

तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

जातकनिधीची पहिली आवृत्ति सन १९१४ मध्यें प्रसिद्ध झाली व दुसरी आवृत्ति १९२८ मध्यें प्रसिद्ध झाली. दोन्ही आवृत्तींच्या प्रति अपेक्षेपेक्षा लवकर संपल्या. १२।१५ वर्षांपासून जातकनिधीची प्रत उपलब्ध नाहीं; त्यानंतर आमचे दुसरे ग्रंथ म्हणजे 'जातक रहस्य', 'जातक निदान', 'जातक दीप' व 'गृहिणी जातक' वगैरे प्रसिद्ध झाले. आमचे सर्व ग्रंथ अखिल महाराष्ट्र व परप्रांतीय ज्योतिर्विद वर्गाच्या आदरास पात्र ठरले त्याबद्दल आम्हांस समाधान वाटतें. लोकांच्या प्रेमामुळेंच ग्रंथ निर्मितीस उत्तेजन मिळतें. जातकनिधीची तिसरी आवृत्ति फलज्योतिषशास्त्र शिकणाऱ्या नव्या विद्यार्थ्यांस उपयोगी पडावी, विद्यार्थ्यांस पायाशुद्ध रीतीनें, सोप्या मार्गानें, गणिताचें विशेष अवडंबर न करतां सोपपत्तिक फलज्योतिष शास्त्राचें ज्ञान मिळावें हा 'जातक निधीचा' उद्देश आहे. नवीन शिकणारास कुंडलीतील बारा स्थानासंबंधी अगदीं सोपे धडे दिले आहेत. पाश्चात्य पद्धतीनें दृष्टीयोग कसे काढावे व त्याची फलें कशीं पडावी ह्याचें सविस्तर वर्णन केलें आहे.

पहिल्या दोन आवृत्तींमध्यें नसलेली राहू-केतु-नेपच्यूनचीं फलें, शनीची साडेसाती वगैरे नवीन माहिती दिली आहे. दिनवर्षपद्धति गाळून त्याऐवजीं ग्रहगोचर पद्धति व गोचर भ्रमण पद्धति तत्त्वशः दिली आहे. आणि हीच पद्धति सुलभ व अत्यंत फलदायी आहे. कोणत्याही वर्षफलपद्धतीचें अवलंबन केलें तरी ग्रहगोचर पद्धति विचारांत घ्यावीच लागते.

निरयन व सायन कुंडली मांडण्याच्या रीती सहज समजण्यासारख्या मार्गानें दिल्या आहेत. या शिवाय जातकशास्त्राची अत्यंत उद्बोधक व मनोरंजक माहिती दिली आहे.

या शास्त्राचें ४६ वर्षांच्या तपानें फलज्योतिष शास्त्राचीं प्रमेयें,अनुभविक नियम व ठोकताळे जे आम्हांस ज्ञात झाले व अनुभवास आले, ते सर्व प्रांजलपणें आम्हीं वाचकांपुढें ठेवले आहेत. ते नियम शेंकडा ९० प्रमाणांत बरोबर आहेत असें आम्हीं अनुभवाच्या प्रचितीनें म्हणू शकतो. तरीही ते सिद्धान्त नाहींत ४६ वर्षांच्या अनुभवानेंसुद्धा अटळ व १०० टक्के बरोबर, गणिताइतका सत्य, सर्वकालीं अबाधित असा एकही सिद्धांत फलज्योतिषशास्त्रांत आम्हाला मिळाला नाहीं. कांहीं फलज्योतिषी आपल्या तुटपुंज्या ज्ञानावर व अल्प अभ्यासानें मोठमोठे सिद्धान्त शोधले आहेत असें म्हणतात,लिहितात,आणि वक्तृत्व करीतात व आपल्या तुटपुंज्या ज्ञानाचें प्रदर्शन करितात परंतु फलज्योतिष शास्त्र हें अनुमानशास्त्र (Inductive) आहे. या शास्त्राधारें १०० टक्के बरोबर असे सिद्धान्त कधींही काढता येणार नाहींत.असे सिद्धान्त काढणें हें काम फक्त गणितशास्त्र,पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र वगैरे निगमनात्मक (deductive) शास्त्राचें आहे. फलज्योतिषशास्त्राचे सिद्धान्त शोधले आहेत असें म्हणणारे ज्योतिषी अतींद्रीय ज्ञानाचे ऋषी असल्यास न कळे !

आमच्या ग्रंथाचें परिशीलन अभ्यासपूर्वक केल्यास घरच्या घरीं फल ज्योतिषशास्त्र शिकता येईल व स्वतःची करमणूक होईल. धंदेवाईक ज्योतिषांस आमचे ग्रंथावरून शास्त्रशुद्ध व अनुभवशुद्ध फलें, आजचे समाज रचनेस अनुसरून योग्य व अनुरूप भाषेत सांगता येतील हेंच आमच्या ग्रंथाचें वैशिष्ट्य आहे. आम्ही ग्रहांचीं फलें आत्मविश्वासानें व आत्मप्रचितीनें दिली आहेत.'पाहिलें' आणि 'सांगितलें' अशी तीं नाहींत. आमचे प्रचितीस उतरले नाहीं असें एकही विधान आमचे ग्रंथांत सापडणार नाहीं. गेल्या ४५ वर्षांपासून आम्हीं आमचे परीचित लोकांचा जो कुंडलीसंग्रह जमविला आहे, त्याचें निरीक्षण करून फलें लिहिलीं आहेत. त्यामुळेंच आमचें ग्रंथांतील फलें बरोबर जमतात.

जळगाव येथील नामवंत कायदेपंडीत व १९५४ च्या परिषदेचे स्वागताध्यक्ष ज्योतिर्विद श्री. गोविंद काशिनाथ चित्रे,बी.ए.,एल.एल.बी, ह्यांनी आमचे अनुमविक नियम वाचून उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

जातकनिधी हा ग्रंथ १९५३ मध्यें प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होता.परंतु कारखानदारांचें औद्योगिक तंटे आणि अपरिहार्य अडचणी यामुळें विलंब झाला. अशा अडचणींचे परिस्थितींतही आयुर्विद्या मुद्रणालयाचे चालक श्री. माधव धरणीधर गुर्जर यांनीं काम पुरें केलें, छपाई सुंदर व उठावदार केली याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक आभार मानतों.

शेवटीं आमचें वृद्धापकाळीं ज्या सच्चिदानंद दयाघन प्रभूच्या कृपेनें हें काम सिद्धीस गेलें त्याच्याच चरणीं लीन होऊन वाचकांची रजा घेतों.

पुणें, शुक्रवार ६५४ शके १८७६, आश्विन शुद्ध दशमी गुरुवार १९५४	अखिल ज्योतिर्विदांचा नम्र सेवक, द्वारकानाथ नारायण राजे

विषयानुक्रमणिका

जातकनिधि

: १ : कुंडली कशी मांडावी ?

क्रांतिवृत्त—क्रांतिवृत्त म्हणजे पृथ्वीचा सूर्याभोंवती फिरण्याचा मार्ग. पृथ्वी सूर्याभोंवतीं दीर्घ लंब वर्तुळांत फिरते त्यास क्रांतिवृत्त म्हणतात.

नक्षत्र—क्रांतिवृत्ताचे २७ काल्पनिक भाग केले आहेत, त्यांस नक्षत्र म्हणतात. सत्तावीस नक्षत्रें मिळून बारा राशि अथवा ३६० अंश होतात.

राशि—घड्याळाच्या तबकडीचे जसे १२ भाग केलेले असतात; तसे क्रांतिवृत्ताचे १२ भाग केले आहेत. त्या प्रत्येक भागास राशि ही संज्ञा आहे.

सूर्य प्रत्येक महिन्यास म्हणजे सरासरी ३०।११ दिवसांनीं एकेक राशि चालतो. (खरोखर सूर्य चालत नसून पृथ्वी प्रत्येक महिन्यास क्रांतिवृत्ताचा बारावा भाग क्रमण करीत आहे). जेव्हां तो एखाद्या राशीच्या आरंभीं प्रवेश करतो तेव्हां ती संक्रांत लागली असें आपण म्हणतों. सूर्य कर्क राशीच्या आरंभीं गेला म्हणजे कर्क राशीची संक्रांत लागली असें म्हणतात व त्या दिवशीं पंचांगांत " कर्केऽर्कः " असें लिहिलेलें असतें.

विषुववृत्तः— एक रवरी चेंडू व त्याच्याच बरोबर मध्यांतून जाईल असा दाभण घाला; म्हणजे गोल ही पृथ्वी व दाभण तिचा आंस होईल. ह्या आंसाच्या दोन्ही टोकांस ध्रुव म्हणतात. उत्तरेकडील टोंक उत्तर ध्रुव व दक्षिणेकडील टोंक दक्षिण ध्रुव. त्याच ध्रुवाच्या समोर आकाशांत जे दोन तारे आहेत त्यांस ध्रुवाचे तारे असें आपण म्हणतों. आपण विषुववृत्ताचे वर उत्तरेस असल्यानें, दक्षिण ध्रुव आपणास कधींही दिसत नाहीं.

पृथ्वीच्या ह्या दोन्ही ध्रुवांपासून सारख्या अंतरावर मधोमध त्या चेंडूवर एक वर्तुळ काढा. त्याच वर्तुळास विषुववृत्त असें म्हणतात. या विषुववृत्तासमोर आकाशांत एक काल्पनिक वर्तुळ काढा म्हणजे तें आकाशांतील विषुववृत्त होईल.

अक्षवृत्तें:— ह्या चेंडूवर विषुववृत्ताशीं समांतर अशीं त्याच्या उत्तरेस व दक्षिणेस वर्तुळें काढा. या वर्तुळास अक्षवृत्तें म्हणतात. अक्ष म्हणजे आंस. हीं वर्तुळें आंसाचे भाग करितात म्हणून त्यास अक्षवृत्तें म्हणतात. विषुववृत्त हें सर्वांत मोठें असें अक्षवृत्तच आहे.

विषुववृत्तापासून उत्तरध्रुव व दक्षिणध्रुव ९० अंश दूर आहेत. हीं अक्षवृत्तें एक एक अंशाचें अंतरानें काढलीं तर दक्षिण व उत्तर ध्रुव नव्वदाव्या अक्षांशांत येतील व त्यास लांबी मुळींच असणार नाहीं. तीं केवळ बिंदुमय असतील. हेच उत्तर व दक्षिण ध्रुव बिंदु होत. विषुववृत्ताचे उत्तरेस काढलेलीं वर्तुळें हीं उत्तरेकडील अक्षवृत्तें व त्याच्या दक्षिणेस काढलेलीं वृत्तें हीं दक्षिणेकडील अक्षवृत्तें होत. ह्याच अक्षवृत्ताचे समोरील जीं अक्षवृत्तें तीं आकाशांतील अक्षवृत्तें समजावीं.

आतां ह्या चेंडूवरील विषुववृत्ताचे ३६० भाग करा आणि प्रत्येक भागावरून लंबरेषेंत दोन्ही ध्रुवांतून जाणारीं अशीं दोन्हीं वर्तुळें काढा. या वृत्तांस रेखावृत्तें किंवा याम्योत्तर वृत्तें म्हणतात. ह्या सर्व वृत्तांची लांबी सारखी असेल व हे प्रत्येक रेखावृत्त पृथ्वीचे दोन समान भाग करील हें उघड आहे.

अक्षांशः— प्रत्येक जवळ जवळच्या दोन वृत्तांमधील जें अंतर त्यास अंशाश म्हणतात. विषुववृत्ताचे उत्तरेकडील अक्षांशास उत्तर अक्षांश व दक्षिणेकडील अक्षांशास दक्षिण अक्षांश म्हणतात.

रेखांशः— दोन रेखावृत्तांमधलें जें अंतर त्यास रेखांश म्हणतात.

अक्षवृत्तातलें सर्वांत मोठें जें विषुववृत्त तें एकच पृथ्वीच्या मध्यभागीं असल्यानें त्यापासून अक्षांशाची गणना करण्याची सोय स्वाभाविकच झाली आहे. परंतु रेखावृत्तांचे तसें नाहीं. सर्व रेखावृत्तें पृथ्वीच्या मध्यभागीं आहेत व त्या प्रत्येकापासून पृथ्वीचे दोन समान भाग होतात; म्हणून रेखांशाची मोजणी करण्यास कोणतेंही एक रेखावृत्त मुख्य मानिलें तरी चालतें. हिंदु लोक उज्जयनीवरून जाणारें रेखावृत्त मुख्य मानतात. इंग्रज लोक ग्रीनविचवरून जाणारें रेखावृत्त मुख्य समजतात. कोणतेंही रेखावृत्त मुख्य मानलें तरी चालतें. पूर्वेकडील रेखावृत्तांमध्यें अंतर तें पूर्वरेखांश; व पश्चिमेकडील रेखावृत्तामधलें अंतर तें पश्चिमरेखांश–रेखांशापासून १८० अंशापर्यंत असतात. मुख्य मानलेलें जें रेखावृत्त त्याचे रेखांश शून्य समजतात व त्यापासून १८० अंशावर पृथ्वीचे बरोबर दोन भाग होतात.

हिंदुस्थानांतील मुख्य शहराचे अक्षांश व रेखांश हे रेखांश ग्रीनविच पासूनचे आहेत म्हणून सर्व पूर्व रेखांश आहेत. कारण ग्रीनविच हे आपल्या देशाच्या पश्चिमेस आहे. तसेंच आपला देश विषुववृत्ताचे उत्तरेस असल्यानें पुढें दिलेले सर्व अक्षांश उत्तरअक्षांश आहेत.

स्थानिक वेळ काढण्यांत रेखांशाचा फार उपयोग होतो. पृथ्वी पश्चिमेकडून पूर्वेकडे २४ तासांत ३६० अंश जाते म्हणजे १ तासांत १५ अंश होतात, म्हणजे प्रत्येक अंशास चार मिनिटें लागतात व एक कला भ्रमण होण्यास ४ सेकंदें लागतात. ह्यामुळें पृथ्वीवर एकास्थळीं सूर्योदय झाला असेल तर त्या स्थळाचे पश्चिमेस एक अंश असलेल्या गांवीं ४ मिनिटांनीं मागाहून होईल.

मुंबई ७२ अंश ५७ कलेवर आहे व मद्रासचे रेखांश ८०।१९ आहेत. दोहोंमध्यें अंतर ७ अंश व २२ कलेचें आहे. मद्रास हें पूर्वेस

असल्यानें मद्रासपेक्षां मुंबईमध्यें २९ मिनिटें व २१ पळें मागाहून सूर्योदय होईल.

संपात—मागें जसा भूगोल दाखविणारा चेंडू घेतला तसाच दुसरा चेंडू घ्या. ह्याला आपण खगोल म्हणू. ह्या चेंडूच्या मध्यांतून जाईल अशी आरपार लोखंडाची तार घाला. ही तार खगोलाचा अक्ष किंवा आंस होईल. त्या आंसाचीं दोन्ही टोंकें ध्रुव होतील. ह्या दोन्ही ध्रुवांपासून बरोबर सारख्या अंतरावर एक वर्तुळ काढा. हें वर्तुळ आकाशांतील विषुववृत्त होईल. नंतर दुसरें एक वर्तुळ असें काढा कीं तें वरील विषुववृत्ताशीं २३॥ अंशाचा कोन करील.

क्रांतिवृत्त
२३॥ अंश
विषुववृत्त
२३॥
अंश
क्रांतिवृत्त

ह्या दुसऱ्या काल्पनिक वर्तुळास क्रांतिवृत्त म्हणतात. ह्याच मार्गानें पृथ्वी सूर्याभोंवती प्रदक्षिणा करते व ह्याच मार्गानें सूर्य आपल्या पृथ्वीभोंवतीं फिरतो असा भास होतो. क्रांतिवृत्त विषुववृत्तास दोन ठिकाणीं स्पर्श करील. ह्या दोन स्पर्श बिंदूस संपात असें म्हणतात.

त्यांपैकीं एकास वसंतसंपात अथवा मेष संपात व दुसऱ्यास तुलासंपात अथवा शरदसंपात असें म्हणतात.

कोणत्याही संपातांत ज्या दिवशीं सूर्य येतो त्या दिवशीं सर्व ठिकाणीं दिवस व रात्रीमान सारखें असतें. ह्या दोन दिवसांस 'विषुवदिन' म्हणतात. २१ मार्च व २२ सप्टेंबर हे विषुवदिन आहेत.

संपातगति—संपात स्थिर नाहीं, त्याला गति आहे. दरवर्षी क्रांतिवृत्ता-च्या ज्या बिंदूंत सूर्य आला असतां वसंत ऋतु लागतो त्याचे दुसरें वर्षी त्या बिंदूचे मागें ५० विकला सूर्य आला असतां वसंतऋतूस आरंभ होतो. यांस

संपाताची गति असें म्हणतात.' संपाताची गति किती आहे त्याबद्दल पुष्कळ ज्योतिर्विदांची भिन्न भिन्न मतें आहेत. मात्र ती गति ५० विकलेपासून १ कलेपर्यंत कांहीं तरी असेल हें खरें. गणिताचे सोईकरितां सर्वसाधारणपणें संपाताची गति ६० विकला मानतात.

अयनांशः—केरोपंताचे मतानें झिटापिशिअम तारा व वसंत संपात यामधील जें अंतर तें अयनांश होय.

ग्रह लाघवाच्या मतानें इष्ट शकांत ४४४ वजा करून बाकीस ६० नीं भागून राहतील ते अयनांश, भागाकार अंश व बाकी कला समजाव्यात.

आरंभस्थानः—संपात चल असल्यामुळें निरयन गणनेस क्रांतीवृत्तामधील एकादें आरंभस्थान मानावें लागतें. केलाखवासी केरोपंत छत्रे यांनी झिटापिशियम हा तारा आरंभस्थानीं मानला आहे. हा तारा रेवती नक्षत्रांत आहे व त्याच तारेंत शके ४४४ मध्ये संपात होता म्हणून चालू विहन शकामध्यें ४४४ उणें केले म्हणजे तितके कला अयनांश येतील.

उदाहरणार्थः—शके १८३४ मधील अयनांश काढा. १८३४—४४४=१३९० यास ६० संख्येनें भाग दिला असतां २३ अंश व १० कला अयनांश येतील. म्हणजे सायन पेक्षां निरयन पद्धतीचे ग्रह २३ अंश १० कलेनीं मागें समजले जातात.

लग्नः—एखाद्या स्थळीं क्रांतिवृत्ताचा जो भाग पूर्व क्षितिज बिंदूंत उदित असेल तें त्या वेळचें लग्न होय.

दशमः—एखाद्या स्थळीं क्रांतिवृत्ताचा जो भाग आकाशांतील डोक्यावरील बिंदूंत उदित असेल तर तो भाग त्या वेळेचें दशम होय.

भावः—लग्नापासून क्रांतिवृत्ताचे जे १२ भाग त्या प्रत्येक भागास भाव असें म्हणतात.

चतुर्थ भावः—पायाखालील आकाशांतील जो समोरचा बिंदु त्यास पाताल किंवा चतुर्थभाव असें म्हणतात. दशम भावांत ६ राशी *मिळविल्या* म्हणजे चतुर्थ भाव तयार होतो.

चतुर्थ व लग्न या मधील अंतराचे सारखे तीन भाग केले म्हणजे जो तृतीयांश होतो तो लग्नांत मिळविला म्हणजे धन भाव तयार होतो. *धन भावांत तृतीयांश मिळविला म्हणजे सहज भाव होईल व सहज भावांत* तृतीयांश मिळविल्यानें पुन्हा चतुर्थ भाव येईल.

लग्नांत ६ राशी मिळविल्या म्हणजे सप्तम. द्वितियांत अथवा धन भावांत ६ राशी *मिळविल्या म्हणजे अष्टम व तृतियांत ६ राशी मिळविल्या* म्हणजे नवमभाव तयार होईल.

लग्न व दशम ह्यामधील अंतराचे सारखे तीन विभाग करून येणारा *तृतियांश दशमांत मिळविला म्हणजे एकादश व एकादशांत* तृतियांश मिळविला म्हणजे द्वादशभाव तयार होईल.

एकादश भावांत ६ राशी मिळविल्यानें पंचम व द्वादशांत ६ राशी *मिळविल्यानें षष्ठ भाव तयार* होतो.

लंकोदय.—मेष २७८ पळें, वृषभ २९९ पळें, मिथुन ३२३, कर्क ३२३, सिंह २९९, कन्या २७८, तुळा २७८, वृश्चिक २९९, धन ३२३, मकर ३२३, कुंभ २९९, *मीन* २७८, पळें.

चर खंडें:—आपल्या गांवची पलभा घेऊन तिनें १०–८ व $\frac{१०}{३}$ या संख्येस गुणावें, जे गुणाकार येतील ते तीन ठिकाणीं मांडावे. त्यासच अनुक्रमें १ लें २ रें व ३ रें चरखंड म्हणतात.

उदाहरणः—पुण्याची पलभा ४ अंगुलें आहे म्हणून १०×४=४० हे पहिलें चरखंड झालें. ८×४=३२ हें दुसरें चरखंड $\frac{१०}{३}$×४=१३$\frac{१}{३}$ हें तिसरें चरखंड म्हणजे ही तीन चरखंडें त्या गांवाचीं झालीं.

स्वोदयः—ज्या गावाचे राशीचे उदय तयार करावयाचे असतील त्या गावचे प्रथम चरखंड मेष राशीचे लंकोदयांतून उणें करावें, दुसरें वृषभ राशीच्या लंकोदयांतून उणें करावें व तिसरें मिथुन राशीच्या लंकोदयांतून उणें करावें व तीच चरखंडें अनुक्रमें कन्या, सिंह व कर्क या राशीच्या लंकोदयांत मिळवावी म्हणजे मेष राशीपासून कन्या राशीचे स्वोदय तयार होतील. मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह व कन्या या राशीचे स्वोदय तेच मीन, कुंभ, मकर, धनु, वृश्चिक व तुला या राशीचे स्वोदय होतात. वरील रीतीप्रमाणें पुण्याचे स्वोदय खाली दिलेले येतात.

मेष, मीन २३९, वृषभ कुंभ, २६७, मिथुन, मकर ३०८'८ कर्क, धनु ३३५'३, सिंह, वृश्चिक ३३१, कन्या, तुला ३१९

वर दिलेल्या राशीप्रमाणें ज्या गावीं जन्म झाला असेल त्या गावचे स्वोदय तयार करून नंतर त्या प्रमाणें स्पष्ट कुंडली मांडावी.

स्पष्ट ग्रहः— ग्रह सायन पाहिजे असतील तर रापेलची स्पष्ट ग्रहांची पंचांगें आयती तयार मिळतील व प्रत्येक वर्षीचें पंचांगास फक्त ३ रु. पडतात. ज्यास येथतुल्य ग्रह पाहिजे असतील त्यांनीं ह्या पंचांगाचाच उपयोग करावा हे चांगलें. कारण ग्रह लाघव पद्धतीनें स्पष्ट करूं म्हटल्यास एका कुंडलीचे स्पष्ट ग्रह करण्यास ६ तास लागतील.

इतकी मेहनत ज्यास नको असेल त्यांनीं पंचांगावरून ग्रह स्पष्ट करण्यास शिकावें. पंचांगावरून येणारा ग्रह स्थूल असेल. म्हणून तो कलेपर्यंत घ्यावा पुढे घेण्यांत अर्थ नाहीं. व विकलापर्यंत स्पष्ट ग्रह करण्यांत कांहीं हंशील नाहीं. कारण इतकें सूक्ष्म फलज्योतिष्यशास्त्राचें ज्ञान कोणास असेल असे वाटत नाहीं. पंचांगांत दर पौर्णिमेच्या व आमावास्येच्या प्रातःकाळचे स्पष्ट ग्रह दिलेले असतात व त्याचे खालीच प्रत्येक ग्रहाची दैनिक गति असते. दैनिक गति जर नित्य सारखीच असती तर ह्या पद्धतीनें ग्रह अगदीं सूक्ष्म येते. परंतु ग्रहाची गति नित्य कमजास्त होत असल्यानें

इष्ट काळचे ग्रह ह्या पद्धतीनें सूक्ष्म येत नाहींत; परंतु विद्यार्थ्यांचे हातखंड्यावर भागण्यासारखें असल्यानें त्यानें पंचांगावरूनच प्रथम ग्रह स्पष्ट करण्यास शिकावें.

उदाहरणः--- एका बालकाचा जन्म शके १८३४, आषाढ कृष्ण दशमी, गुरुवार, सूर्योदयात गत घटी ५५ पळें १२ नंतर म्हणजे स्टँडर्ड टाईम ४ वाजून १५ मिनिटांनीं आहे अशी कल्पना करा. आतां ह्या वेळचें आपण पंचांगावरून स्पष्ट ग्रह करूं.

आपलीं पंचांगें मुंबई टाईमचीं असतात. म्हणून प्रथम ज्या गांवीं जन्म असेल त्या गांवचें टाईमांत किती अंतर आहे हें पाहिलें पाहिजे. उदाहृत जन्म धुळें येथें झाला आहे. धुळें व मुंबई ह्यांमध्यें ७ मिनिटांचें अंतर आहे. म्हणजे मुंबईपेक्षां धुळें येथें ७ मिनिटांनीं सूर्योदय अगोदर होतो.

आपल्या देशांत सर्वत्र स्टँडर्ड टाईम प्रचारांत आहे. स्टँडर्ड टाईम ग्रीनविच वेळेपेक्षां ५॥ तासांनीं पुढें आहे.

आतां शके १८३४ चें पंचांग हातांत घ्या. आषाढ कृ॥ १० ला सूर्योदय मुंबई टाईम ५-४० वाजतां आहे; म्हणजे याचें स्टँडर्ड टाईम ५-४०-०'३९, = ६'१९ आतां धुळ्याचा जन्म असल्यानें मुंबईपेक्षां ७ मिनिटें सूर्योदय अगोदर झाला असला पाहिजे. म्हणजे धुळें येथें स्टँडर्ड ६ वाजून १२ मिनिटांनीं सूर्योदय झाला. आपला इष्ट काळ ४ वाजून १५ मिनिटांचा आहे. म्हणून सूर्योदयापासून इष्ट काळपर्यंत किती तास होतात तें प्रथम पाहूं. तें २२ तास व ६ मिनिटें होतात. त्याला २॥ नीं गुणून घटी केल्या त्या ५५ घटी व १० पळें आल्या.

पौर्णिमेचे प्रातःकाळचे ग्रह पंचांगांत दिलेले आहेत. ते त्यांत दिले आहेत.

शके १८३४ आषाढ कृ० ३० चे प्रातःकालचे स्पष्ट ग्रह (निरयन)

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.
३	३	४	४	७	४	१	११
२५	१४	२२	५	१५	७	१०	२२
५९	५६	२६	५२	३४	१८	५२	३९
१९	२२	२७	२२	३५	१५	३	३०
५७	८५८	३७	४७	२	७४	३	३
२९	१२	३४	६	४२	५	२९	११

अमावास्येपूर्वी आपला जन्मकाल ३ दि. ४ घटिका व ५२ पळें आहे. गणिताचे सोईकरितां आपण ३ दिवस व ५ घटी धरूं, कारण फलादेश पाहण्यास विकळे पर्यंतच्या ग्रहांचा मुळींच उपयोग नाहीं. आतां रवीची रोजची गति ५७ कला व २९ विकला आहे.-म्हणजे तीन दिवसांत ५७'२९×३=२ अंश ५२ कला २७ विकला झाली. आतां फक्त ५ घटकेची सूर्याची गति यांत मिळविली म्हणजे ३ दिवस ५ घटकेची सूर्याची गति येईल.

$$६० : ५ :: \frac{११५}{२} = ४ \text{ कला } ४७ \text{ विकला.}$$

२ अंश ५२ कला २७ विकला.

+ ४		४७
२	५७	१४

अमावास्येचे रवींतून तीन दिवस ५ घटकेंत भुक्त झालेला रवि उणा केला म्हणजे इष्ट कालचा रवि स्पष्ट होईल. अमावास्येचा रवी

३-२५-५१-११—२ ५७-१४=३-२३—२ ५ ह्याच पद्धतीनें म्हणजे नैनित्वळ व्यवहारी अपूर्णांकाचे रीतीनें चंद्राखेरीज सर्व ग्रह स्पष्ट करावें. ग्रह वक्री असेल अथवा जन्म कालानंतरच्या कोष्टकावरून स्पष्ट ग्रह केला असेल तर तितक्या दिवसांची त्या ग्रहांची गति कोष्टकांतील ग्रहांत मिळावा.

मागें दिलेल्या कोष्टकावरून ह्या पंचगव्यांत बुध वक्री आहे असे दिसून येईल. म्हणूनं बुधाची तीन दिवस व ५ घटकेची येणारी गति ०-२-२५-२३ ही ४-५-५२-२२ यांत मिळविली पाहिजे.

राहु नेहमीं वक्री असतो. राहूपासून बरोबर ६ राशींचे अंतरावर केतु असतो. राहु व केतु हे ग्रह नसून फक्त दोन काल्पित छेदन बिंदु आहेत. पाश्चिमात्य लोक राहु-केतूचा उपयोग पाहितात करीत नाहीत. आपलेकडे सुद्धां फार जुन्या ग्रंथांत राहु केतूचा उल्लेख आलेला दिसत नाहीं. प्रसिद्ध आर्य ज्योतिषी वराह-मिहीर यांचे कोणतेही ग्रंथांत राहु-केतूचा उल्लेख नाहीं. यावरून वराह मिहिरापर्यंत तरी राहु-केतूचें अस्तित्व आर्य ज्योतिष-शास्त्रांत नव्हतें हें सिद्ध होतें. अलीकडे पाश्चिमात्य ज्योतिषी राहु केतुचे परिणाम मानू लागले आहेत.

जन्म दिवसानंतरच्या कोष्टकावरून राहु स्पष्ट करावयाचा असेल तर तितक्या दिवसांची राहूची गति कोष्टकांत दिलेल्या सदर्यंत मिळविली पाहिजे. राहूची गति नेहमीं सारखी असते. त्यांत केंव्हांही कमीजास्तपणा होत नाहीं.

सध्यां आपण जन्म कालानंतरचे अमावस्येच्या कोष्टकावरून राहु स्पष्ट करीत आहों. म्हणून तीन दिवस ५ घटकेची येणारी गति १ कला व ४१ विकला ही अमावास्येच्या प्रातःकाळीं असलेल्या स्पष्ट राहूत मिळविली म्हणजे जन्मकाळचा स्पष्ट राहु तयार होईल. ११-२२-३९-३०

+ १।४१

११-२२-४१-११

यांत ६ राशी मिळविल्यानें जन्मकाळचा केतु स्पष्ट होईल.
११-२२-४९-१९
+६

५-२२-४९-१९ केतु

याप्रमाणें चंद्राखेरीज सर्व ग्रह स्पष्ट करावे. चंद्राची गति फारच जलद असल्यानें वरील रीतीनें बरोबर करितां येणार नाहीं. ग्रहलाघवांत दिलेल्या रीतीनें चंद्र स्पष्ट करावयाचा असेल तर १ तास लागेल व नवीन विद्यार्थ्यांस समजणार नाहीं म्हणून चंद्र स्पष्ट करावयाची रीत दिली आहे. त्या रीतीनें विकलेपर्यंत चंद्र बरोबर येणार नाहीं. थोडा फरक पडेल परंतु फलादेशांत चंद्राच्या विकलेची जरूर नसल्यानें ह्याच रीतीनें चंद्र स्पष्ट करून घ्यावा म्हणजे वेळेचा अपव्यय होणार नाहीं.

चंद्राचा २७ नक्षत्रांत फेरा २९॥ दिवसांत होतो. २७ नक्षत्रें म्हणजे १२ राशी. तेव्हां एकराशी २। नक्षत्राची होईल. एका राशींत ३० अंश असतात. सबब एक नक्षत्राचे अंश १३ व २० कला होतील. म्हणजे चंद्रानें १ नक्षत्र क्रमण केलें म्हणजे १३।२० अंश क्रमण केल्यासारखे आहेत. एका नक्षत्राचे चार चरण असतात. म्हणून, चरण म्हणजे ३ अंश २० कला.

चंद्र स्पष्ट करण्याची रीतः—

जन्म इष्ट काली कोणतें नक्षत्र आहे तें पाहून तें एकंदर किती घटका आहे तें काढावें. नंतर इष्ट कालापर्यंत त्या नक्षत्राच्या किती घटका भुक्त झाल्या तें पहावें. एकंदर नक्षत्राचे घटीस १३⅓ अंश तर जन्मकालापर्यंत भुक्त झालेल्या घटकांस किती हें त्रैराशीक मांडून काढावें. जे अंश येतील ते त्या नक्षत्राचे भुक्त अंश समजावे.

आषाढ वद्य १० गुरुवार शके १८३४ रोजीं रोहिणी नक्षत्र २१ घटी १९ पळेंपर्यंत आहे. नंतर मृग लागतें तें शुक्रवारीं १८ घटी ४३

पळापर्यंत आहे. म्हणजे मृग नक्षत्राच्या एकदर किती घटका झाल्या त्या पाहू.

६० .		३८ ४१	
−२१	१९	+ १८ ४३	घटी पळे
३८ .	४१	५७—२४	

मृग नक्षत्र एकंदर ५७ घटी व २४ पळें आहे. जन्म इष्ट काळ गुरुवारी सूर्योदयानंतर ५५ घटी व १७ पळें आहे.

५५ ' १०	
−२१ ' १९	रोहिणी नक्षत्र
३३—५१	

३३ घटी व ५१ पळें भुक्त झाली आहेत. (मृग नक्षत्राची).

५७ घटी २४ पळाला १३ अंश २० कला तर ३३ घटी ५१ पळाला त्रैराशिक पद्धतीनें ७ अंश ५१ कला येतात.

आतां जन्म नक्षत्रापूर्वी एकदर किती नक्षत्रें चंद्रानें भोगिली तीं पाहूं. जन्म नक्षत्र मृग आहे. त्या पूर्वी फक्त ४ नक्षत्रेंच चंद्रानें भोगिली. $\frac{४\times४०}{३}=\frac{१६०}{३}$ ५३ अंश २० कला ह्या मृग नक्षत्राचे ७ अंश ५१ कला

मिळविल्या. ६१ अंश ११ कला म्हणजे मेष राशीस आरंभ झाल्यापासून जन्म इष्ट कालापर्यंत चंद्रानें ६१ अंश ११ कला आक्रमिल्या आहेत. ३० अंश म्हणजे एक राशी म्हणून वृषभ राशी पुरी करून चंद्र मिथुन राशींत १ अंश व ११ कला जन्मकालीं आला आहे. ह्या रितीनें जन्म कालचे स्पष्ट ग्रह केले ते खालीं दिले आहेत.

जन्म कालाचे स्पष्ट ग्रहः—

	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	के.
रा.	३	२	४	४	७	४	१	११	५
अं.	२३	१	२०	८	१५	३	१०	२२	२२
क.	२	११	३१	१७	२६	२९	४०	४९	४९

वरील ग्रहांत अयनांश मिळविले म्हणजे सायनग्रह येतील.

अयनांशः—शके १८३४—४४४=१३९०, १३९०÷६०= २३ अंश १० कला. इष्ट दिवसाचे सूक्ष्म अयनांश काढावयाचे असल्यास ३६५ दिवसांस ६० कला तर इष्ट दिवसास किती असे त्रैराशिकपद्धतीनें मांडावे. जन्म दिवस आषाढ वद्य १० मी आहे तर चैत्र प्रतिपदेपासून किती दिवस होतात तें पाहूं.

चैत्र २० दिवस
वैशाख ३०
ज्येष्ठ ३०
अ. आषाढ ३०
आषाढ २५
१४५

३६५ :: १४५ :: ६०=२४ विकला म्हणजे इष्ट दिवसाचे अयनांश २३ अंश १० कला २४ विकला झाले. निरयन ग्रहांत इतके अंश मिळविल्यानें सायन ग्रह सिद्ध होतील. निरयन रवि

३: २३— २— ५
+२३ १० २४
४-१६-१२—२९

हा सायन रवि झाला.

स्पष्ट लग्न कसें साधावें:—जन्म कालचा सायन रवी तयार करून त्याचे राश्यंक एका बाजूस मांडून ठेवावें. इष्ट कालापर्यंतचे भुक्त झालेले अंश ३० अंशांतून उणे करावें, म्हणजे रवीचे भोग्यांश येतील व हे जन्म काळीं असलेल्या रवीचे भोग्यांश समजावें. अंश ३०–१६. १२. २९=१३ अंश ४७ कला ३१ कला. नंतर त्या भोग्यांशास आपल्या गांवचे जे राशींचे उदय असतील त्यांनीं गुणावें, त्या गुणाकारास ३० नें भागावें म्हणजे येतील ती त्या राशींत रवि असेल त्या राशीचीं भोग्यपळें समजावीं.

नंतर जन्म घटी पळावीं एकंदर पळें करून त्यांतून वरील भोग्य पळें उणीं करावीं. बाकी राहिलेल्यांतून पुढील राशीचीं पळें वजा करावीं. अशा रीतीनें अनुक्रमें पुढील राशीचीं पळें उणीं करीत गेल्यानें ज्या राशीचीं उदय पळें उणी जाणार नाहींत तेंच त्या काळचें लग्न समजावें. राहिलेल्या बाकीस ३० नें गुणून जें लग्न आलें असेल त्या राशीच्या उदय संख्येनें भागावें, भागाकार अंशादि येईल. पुन्हा राहिलेल्या बाकीस ६० नें गुणावें, व त्या गुणाकारास त्या राशीच्या उदय पळानें भागावें. भागाकार कला येतील. राहिलेल्या बाकीस पुन्हा ६० नें गुणल्यास विकला येतील, हें सायन लग्न होईल. यांतून अयनांश उणे केले असतां निरयन स्पष्ट लग्न तयार होईल.

उदाहरणः—आपला जन्म इष्ट काल शके १८३४ आषाढ वद्य १०, गुरुवार सूर्योदयानतर ५५–१० घटी आहे.

भोग्यांश १३ अंश ४७ कला ३१ विकला, जन्म धुळें येथील आहे. म्हणून धुळें येथील राशींचे उदय तयार केले पाहिजेत, मार्गे दिलेल्या कोष्टकावरून धुळ्याचे उदय खालीं दिलेले येतात.

मेष	२३३ मीन	वृषभ २६४ कुंभ
मिथुन ३०८ मकर		कर्क ३३७ धनु
सिंह	३३६ वृश्चिक	कन्या ३२५ तूल.

आता सिंह राशीच्या भोग्यांशास सिंह राशीच्या उदयानें गुणावें. १३–४७–३१=१३.८ (दशांश पद्धतीनें) १३·८×३३६=४६३६·८ यास ३० नें भागून भागाकार १५४·५ पळें आला. ही भोग्यपळें समजावीं.

जन्मकला ५५ घटी आहे. त्याचीं पळें

५५×६०=३३००—१५४ सिंह=३१४६—३२५ कन्योदय= २८२१—३२५ तुलोदय=२४९६—३३६ वृश्चिक=२१६०—३३७ धनु=१८२३—३०८ मकर=१५१५—२६४ कुंभ=१२५१—२३३ मीन=१०१८—२३३ मेष=७९५—२६४ वृषभ=५३१—३०८ मिथुन=२१३

या राहिलेल्या बाकींतून कर्क राशीचा उदय ३३७ पळें उणा जात नाहीं. म्हणून सदरहू वेळेचें लग्न कर्क आहे. आतां या लग्नाचे किती अंश संपले आहेत तें पाहूं. बाकी २१३×३०=६३९० म्हणून

६३९० ÷ ३३७ = १८ ३२४/३३७. ३२४ × ६० = १९४४० ÷ ३३७ = ५७ २३१/३३७. २३१ × ६० = १३८६० ÷ ३३७ = ४१ ४३/३३७

स्पष्ट लग्न ३, १८, ५७, ४१ हें सायन झालें. त्यांतून अयनांश २३–१०–२३ हे उणे केले असतां निरयन स्पष्ट लग्न येईल,

३-१८-५७-४१
...२३-१०-२३
——————— निरयन लग्न
२-२५-४७-१८

जेव्हां जन्मकाल कमी असेल व रवीचा भोग्य काल जास्त असेल तेव्हां इष्टकालास ३० नें गुणून सायन रवि ज्या राशीत असेल त्या राशीने

उदयानें भागावें, भागाकार अंशादि येईल तो त्या कालाच्या स्पष्ट राशींत मिळवावा.

कल्पना करा कीं जन्म इष्टकाल सूर्योदयानंतर २ घटिकेचा आहे, व भोग्य पळें १५४ आहेत. २ घटिकेचीं पळें १२० होतात, म्हणून जन्मकालांतून इष्ट काल वजा देतां येत नाहीं. अशा वेळीं जन्मकालास ३० नें गुणिलें पाहिजे, १२० × ३० = ३६०० यांत सायन रवि सिंह राशीला आहे. म्हणून सिंह राशीच्या उदयानें भागावें. ३६०० ÷ ३३६ = १० अंश ४३ कला व ९ विकला हे अंश सायन रवींत मिळवावें. म्हणजे त्यावेळेचें लग्न तयार होईल. सायन रवि

४–१६–१२–२९
+ १०–४३– ९
४–२६–५५–३८ यांतून अयनांश

वजा देऊन येईल ते त्या वेळेचें निरयन स्पष्ट लग्न होईल.

निरयन जन्म कुंडली



इष्टकालचें लग्न साधण्याची दुसरी रीत.

जेव्हां लग्न विशेष सूक्ष्म नको असेल अथवा एखाद्या प्रश्नकालचें लग्न काढणें असल्यास खालीं दिलेल्या रीतीनें लग्न साधावें. मात्र तें लग्न स्थूल येईल, अंदाजपुढील ज्ञान त्यांत होणार नाहीं. ज्यांना मागें दिलेली रीत फार अवघड वाटत असेल त्यांनीं व नवीन विद्यार्थ्यांनीं त्यांची ज्योतिषशास्त्रांत गति होईपर्यंत ह्या रीतीनें लग्न साधावें. राशीचे साधारणमानानें उदयकाल.

मेष २३७ पळें, वृषभ २६६, मिथुन ३०८, कर्क ३३५, सिंह ३३४, कन्या ३२०, तुला ३२१, वृश्चिक ३३९, धन ३३७, मकर ३०३, कुंभ २६१ व मीन २३९.

ज्या दिवशीं सूर्य संक्रमण करील त्या दिवशीं सूर्योदयानंतर त्या राशीचें लग्न जितकीं पळें असतील त्यानंतर पुढचें लग्न लागेल. उदाहरणार्थः— शके १८१४ आषाढ शुद्ध १ ला रवि ४२ घटका व ३ पळांनीं कर्क राशींत प्रवेश करीत आहे. म्हणून आषाढ शुद्ध २ ला सूर्योदयानंतर कर्क लग्न ३३५ पळेंपर्यंत असेल, त्यानंतर पुढें ३३४ पळें सिंह लग्न येईल. ह्याप्रमाणें २४ तासांत बारा लग्नें भुक्त होतील. आषाढ शु. ३ ला सूर्योदयकाळीं पुन्हां कर्क लग्न येईल. आषाढ शुद्ध द्वितीयेला सूर्योदयापासून कर्क लग्न ३३५ पळें होतें; तें तृतीयेस फक्त ३२४ असेल. नंतर सिंह लग्न लागेल. अशा रीतीनें दररोज ११ पळें लग्न भुक्त होऊन एक सौर महिन्यानीं म्हणजे श्रावण शुद्ध ४ ला सूर्योदयाबरोबर सिंह लग्न येईल.

साधारणपणें ३० अथवा ३१ दिवसांनीं रवि एक राशीचें क्रमण करितो. म्हणून राशीचे उदय पळांस ३० नें भागावें व जो भागाकार येईल तितकीं पळें प्रत्येक दिवशीं लग्न भुक्त असें समजावें.

आपला जन्म इष्ट काल आषाढ कृष्ण १० गुरुवारी ५५ घटिका व १० पळांचा आहे. त्यावेळीं ह्या रीतीनें कोणतें लग्न येतें तें पाहूं. ५५×६०

= ३३००+१० = ३३१० पळें. रवि कर्क राशीस आषाढ शुद्ध प्रतिपदेस गेला आहे. तेव्हापासून कृष्ण १० पर्यंत २४ दिवस होतात. दररोज ११ पळें लग्न भुक्त होतें. २४×११=२६४ म्हणजे गुरुवारीं सूर्योदयाला कर्क लग्न २६४ पळें भुक्त झालें आहे. एकंदर कर्क लग्नाचीं पळें ३३५ आहेत त्यांतून २६४ पळें भुक्त झालीं. म्हणजे गुरुवारीं सूर्योदयानंतर कर्क लग्न फक्त ७१ पळें राहील.

७१ पळें कर्क+३३४ ४०५ सिंह+३२० ७२५ कन्या+३२१
१०४६ तूळ+३३९ १३८५ वृश्चिक+३३७ १७२२ धन+३०३
२०२५ मकर+२६१ २२८६ कुंभ +२३९ २५२५ मीन+२३७
२७६२ मेष +२६६ ३०२८ वृषभ.

म्हणजे सूर्योदयापासून ३०२८ पळांनीं वृषभ लग्न पुरें होऊन मिथुन लागेल. मिथुन लग्नाचीं पळें ३०८. त्यांतून वजा जात नाहीं. म्हणून जन्मकाळीं मिथुन लग्नच आहे. मिथुन लग्न किती अंतरावर आहे तें पाहूं. ३३१० – ३०२८=२८२ पळें यास ३० नीं गुणून मिथुन राशीच्या उदयानें भागावें. येतील ते अंश मिथुन लग्नाचे भुक्त झाले, असें समजावें ह्या रीतीनें मिथुनचा २७ वा अंश जन्मकाळीं उदित आहे असें दिसून येईल. परंतु आपण मागें केलेल्या सूक्ष्म रीतीनें मिथुन राशीचा २५ अंश ० नीं आहे असें दिसून येईल. इतका फरक येण्याचें कारण राशींचीं उदय पळें आपण धुळें येथील न घरतां मध्यम मानानें मुंबईचीं घेतलीं आहेत. मुंबई टाईम व धुळें स्थानिक टाईम ह्यांत सात मिनिटांचें अंतर आहे.

निरयन लग्न साधण्याची तिसरी रीत

२३ अयनांशाचें लग्नकोष्टक पुढें दिलें आहे. त्यावरून लग्न सूक्ष्म रीतीनें साधतां येईल. रोजची सूर्योदयाची गति साधारण मानानें १ अंश धरावी व इष्ट दिवशीं सूर्य कोणत्या राशीचे कितव्या अंशावर आहे तें पाहावें, नंतर लग्नकोष्टकांत त्या राशीसमोर रवीचे अंशाखालीं किती घटका व पळें

आहेत ते निराळे लिहून ठेवावें व त्यांत जन्म इष्ट घटि पळें मिळवून येणारी बेरीज कोष्टकांत शोधून काढावी. ती बेरीज ज्या राशीसमोर व ज्या अंशाखाली असेल ते त्या कालाचे तात्कालिक लग्न येईल. दोन्ही संख्येची बेरीज ६० हून जास्त येईल तर ६० उणे करून राहिलेली संख्या लग्नकोष्टकांत शोधावी.

उदाहरण— शके १८३४ आषाढ कृष्ण १० गुरुवार सूर्योदयात् गत घटि ५५-१० पळें ह्या वेळचें लग्न कोणतें येईल ?

आषाढ शुद्ध १५ रवि कर्क राशीचे २५ अंशांत आहे. दररोज १ अंश गति असल्यानें गुरुवार आषाढ वद्य १० ला रवि कर्क राशीच्या २१ अंशात असेल. आतां लग्न कोष्टकांत कर्क राशीचे २१ अंशासमोर कोणते आंकडे येतात तें पाहूं. ते २१-४५ आहेत. त्यांत जन्म इष्टघटि ५५ पळें १० मिळविलीं=७६-५५. बेरीज ६० पेक्षा जास्त आहे म्हणून त्यांतून ६० उणे केलें, बाकी १६ घटि ५५ पळें राहिली. आतां १६-५५ हा आंकडा लग्न कोष्टकांत शोधूं. मिथुन राशीचे पंचवीस अंशाखालीं आंकडा १६-५६ आहे म्हणून आपण धरलेल्या इष्ट वेळचें लग्न रा. ३ अं. २५ क. १६ वि. ५ येईल.

जन्म कुंडली व जन्मकालचे स्पष्ट ग्रह तयार असल्यावर इतर होरा, नवांश, द्वादशांश वगैरे भाराभर कुंडल्यांची जरूर नाहीं. पत्रिका लोचलचक करण्याकरितां मात्र त्यांचा चांगला उपयोग होतो. म्हणून त्या कुंडल्या तयार करण्याच्या रीती दिल्या नाहींत.

हिंदुस्थानातील मुख्य शहराचे अक्षांश रेखांश दाखविणारे कोष्टक

शहर	अक्षांश	रेखांश	शहर	अक्षांश	रेखांश
अवरंगाबाद	१९।५५	७५।२५	हैदराबाद	१७।२२	७८।३२
अहमदनगर	१९।६	७४।४९	हैदराबाद सिंध	२५।२२	६८।४१
अलीबाग	१८।३८	७२।५७	मद्रास	१३।४	८०।१९
इंदोर	२२।४४	७५।४८	ग्वालेर	२६।१५	७८।१
उज्जैन	२३।१	७५।४८	मुंबई	१८।५५	७२।५७
अमरावती	२१।२५	७६।१८	धार	२२।३६	७५।१८
एलिचपूर	२१।१६	७७।२२	दौलताबाद	१७।५७	७५।१६
अक्कलकोट	१७।३३	७६।१६	पैठण	१९।३१	७५।२५
आजरें	१७।५०	७३।१	धुळें	२०।५२	७४।४४
इचलकरंजी	१६।३८	७४।३२	मालेगांव	२०।३१	७४।३५
अहमदाबाद	२३	७४।३८	बऱ्हाणपूर	२१।१७	७६।१४
कलकत्ता	२२।२२	८८।२८	टोंके	१९।४०	७५।७
काशी	२५।३०	८३	नाशिक	१९।५७	७३।५१
कऱ्हाड	१७।१७	७४।१४	पुणें	१८।३४	७४
कोल्हापूर	१६।४१	७४।१७	जुन्नर	१९।१६	७४
गुल्बुर्गा	१७।२०	७६।५५	टेंभुर्णी	१८	७५।१६
कुरुंदवाड	१६।४१	७४।२९	सोलापूर	१७।४२	७५।५७
कल्याण	१९।१५	७३।१२	मंगळवेढें	१७।३०	७५।३०
कर्जगांव	१७।४२	७३।१३	सातारा	१७।४१	७४
खेड	१७।४३	७३।२७	वाई	१७।५५	७४
इंदापूर	१८।७	७५।०	चिंचणी	१७।३	७४।४३

शहर	अक्षांस	रेखांश	शहर	अक्षांश	रेखांश
जंजिरा	१८।१५	७३।३	हुबळी	१५।१९	७५।१२
तासगांव	१७।२	७४।३९	बेळगांव	१५।५०	७४।३४
पंढरपूर	१७।४०	७५।२४	बडोदें	२२।२१	७३।२३
मलकापूर	१६।५५	७४	भडोच	२१।४१	७३।६
निपाणी	१६।२३	७४।२६	सुरत	२१।१२	७३।२
सांगली	१६।५१	७४।३७	ठाणें	१९।१०	७३।६
शामगांव	१७।२	७४।३९	पनवेल	१८।५९	७३।१०
दमण	२०।२४	१७।५२	पेण	१८।४१	७३।७
घारवाड	१५।२६	७५।१४	महाड	१८।२	७३।२७
नागपूर	२१।१०	७९।९	जबलपूर	२३।९	७९।५३
श्रीवर्धन	१८।२	७३।४	जयपुर	२६।५६	७५।४५
रत्नागिरी	१७	७३।२१	जुनागड	२१।२९	७०।४०
वाणकोट	१७।५६	७३।७	जोधपुर	२६।२०	७३।०
मुरुड	१७।४६	७३।१०	बऱ्हाणपुर	२१।१८	७५।३४
चिखलगांव	१७।३९	७३।१४	बिकानेर	२८।१	७३।१५
दाभोळ	१७।३४	७३।१६			
पालगड	१७।४८	७३।२५			
खेड	१७।४३	७३।२५			
गुहागर	१७।४३	७३।२०			
पालशेत	१७।२६	७३।१५			
चिपळूण	१७।३१	७३।३५			
माल्गुंड	१७।१०	७३।१९			
पावस	१६।५९	७३।२३			
संगमेश्वर	१७।११	७३।३६			

शहर	अक्षांश	रेखांश	शहर	अक्षांश	रेखांश
राजापूर	१६।३९	७३।३४	उटकमंड	११।२७	७६।५०
मालवण	१६।३	७३।३१	उदेपूर	२४।३७	७३।४५
वेंगुर्ला	१५।५१	७३।४१	उमरावती	२०।५०	७७।४०
सावंतवाडी	१५।५४	७३।५३	एलिचपूर	२१।२६	७७।२९
गोंवे	१५।३०	७३।५७	कटक	२०।२८	८५।५५
अमृतसर	३१।३७	७५।०	काटमंडु	२७।४३	८५।२०
अयोध्या	२६।५८	८२।१५	कुमारी	८।६	७७।३०
अलीगड	२७।५३	७८।५	कुंभकोण	१०।५७	८३।३०
आग्रा	२७।१०	७८			

मुख्य शहरांच्या पलभा पुढें दिल्या आहेत. त्याच उपयोग स्पष्ट लग्न तयार करतांना चांगला होईल.

गांवाचें नांव	पलभा	गांवाचें नांव	पलभा
उज्जयनी	५।८	जबलपूर	५।८
उमरावती	४।३४	जंबू	७।४१
उदयपूर	५।२९	जयपूर	६।६
उटकमंड	२।२५	जागनगर	४।५७
औरंगाबाद	४।२०	जिंद	६।४४
कटक	४।२१	जुनागड	४।४४
कपुरथळा	७।१९	जोधपूर	५।५६
कलकत्ता	४।४१	जौनपूर	५।४७
कांकरोळी	५।३६	झालरापट्टण	५।४९
कांची	२।०	झांशी	५।४३
काटमांडू (नेपाळ)	६।१९	टेंकारी	५।३५
कानपूर	५।५८	टोंक	५।५४
काशी	५।४०	टोका	४।१७
काश्मीर	८।७	डुमराव	५।१४
कुरुक्षेत्र	६।५४	ढाका	५।१६
कृष्णगड	६।०	तंजावर	२।१७
कोचीन	२।७	त्रिविंद्रम	१।४७
कोटा	५।३८	दरभंगा	५।५४
कोल्हापूर	३।२६	दिल्ली	६।३३
गया	५।२३	द्वारका	४।५४
गाजीपूर	५।४५	धरमपूर	६।२
गिढौर !	५।३३	नागपूर	४।३९
गोरखपूर	६।२	नाथद्वार	५।३४

गांवाचें नांव	पलभा	गांवाचें नांव	पलभा
ग्वालेर	५।२४	नाभा सं.	७।२
चित्रकूट	५।२९	नाशीक	४।२२
चैनपूर	५।३६	निमच	५।२८
छपरा	५।४८	नैनीताल	६।४५
जगन्नाथपुरी	४।१९	पाटणा	५।४५
पतियाला स.	७।१	मिरजापूर	७।१८
पंढरपूर	३।३९	मुंबई	४।७
पुरनिया	५।४८	मोंघीर	५।४२
पुणें	४।१	मुल्तान	६।५१
पेशावर	८।६	म्हैसूर	२।३७
पोरबंदर	४।४६	रतलाम	५।११
प्रतापगड	७।२१	रत्नागिरी	३।४२
प्रयाग	५।४३	राजकोट	४।५६
फरुकाबाद	६।१३	रामेश्वर	१।५८
फरिदकोट	७।७	रायपूर	४।४०
बडोदा	४।५५	रावळपिंडी	७।५९
बरेली	६।२९	रेवा स०	५।५८
बरद्वान स.	५।१०	लखनौ	६।६
बलरामपूर	६।१४	लंदन	१५।६
बहराईच	६।१६	लाहोर	७।२३
चांदा	५।४३	लाहोरदगा	५।१२
बांसवाडा	५।१३	वटेश्वर	६।४
बिकानेर	६।२३	विजयनगर	२।५६
बदी सरयान	५।४३	शिकारपूर	६।२२
बऱ्हाणपूर	४।४१	सिमला	७।१४

गांवाचें नांव	पलमा	गांवाचें नांव	पलभा
भितया	६।२	श्रीरंगपट्टण	२।३९
भरतपूर	६।१०	सातारा	३।५२
भागलपूर	५।४०	सांगली	३।३८
भावनगर	४।७४	सपाटू	७।१२
भोपाल सं.	५।१०	सागर	५।१८
मकसुदाबाद	५।२३		
मंडा	७।२५		
मथुरा	६।१५		
मद्रास	२।४७		
मांडवी कच्छ	५।३		
मिरज	३।३८		

मुंबई इलाख्यांतील सर्व शहरांची व हिंदुस्थानांतील मुख्य शहरांचे स्थानिक वेळ दाखविणारें कोष्टक.

अक्कलकोट	१३	कालीकत	११	गोवळकोंडे	१७	तासगांव	७
अकोला	१६	कारवार	५	गया	४८	तळोदे	५
अर्काट	२६	कुरुंदवाड	७	गोहाटी	८३	त्रिवेंद्रम्	१६
अटक	२+	कागल	६	ग्वालेर	२०	तख्त इ-सुलेमान	१४+
अलीबाग	१+	कोल्हापूर	६	गंगोत्री	२४		
अहमदनगर	७	कोरेगांव	६	चित्रदुर्ग	१६	त्रावणकोर	१६
अहमदाबाद	२+	कऱ्हाड	५	चिपळूण	१	त्रिचनापल्ली	२३
अहमदपूर	७+	कलबुर्गा	१५	चोपडे	९	त्र्यंबक	३
अजमीर	११	कर्जत	३	चाळीसगांव	९	दोदाबेट	१४
अयोध्या	१७	कल्याण	१	चांदा	१६	देवगड	२
अलीगड	२१	कोपरगांव	६	जयगड	१	दाभोळ	१
असीरगड	१३	कळवण	५	जेजुरी	५	दौंड	६
अदमान	८०	कलकत्ता	६३	जालना	१२	दौलताबाद	९
अदमान (दक्षिण)	६०	कराची	२५+	जमखिंडी	१०	दिंडोरी	३
		काशी	४०	जुन्नर	३	दमण	२+
अमळनेर	९	कुचबिहार	६८	जव्हार	१	दिव	९-
अमृतसर	८	कानपूर	३०	जळगांव	१०	देवास	१२
आग्रा	२१	कनोज	२८	जामनेर	११	दिल्ली	१७
औंध	६	कटमांडू	४९	जलालपूर	०	धारवाड	८
औरंगाबाद	१०	कुरुक्षेत्र	१६	जबलपूर	२८	धुळें	७
इगतपुरी	३	खेडा	२४+	जालवण	२६	धार	९
इचलकरंजी	६	केदारनाथ	२४	जोधपूर	१०	धरमपूर	१
इंदूर	१२	कंदाहार	३०+	जयपूर	७	द्वारका	१६+
उरण	०	कपुरथळा	८	जालंदर	१२	नागापट्टण	२८
उमरावती	१९	काबूल	१६+	जाकोबाबाद	१८+	निपाणी	६

उज्जनी	११	खालापूर	२	झाशी	२०	नेवासें	८
उदेपूर	३	खांडवा	१४	ठाणें	०	नासिक	३
उटकमंड	१५	खंबायत	२+	डहाणू	१+	निफाड	५
उमरकोट	१३+	खैरपुर	१६+	ढाका	७०	नांदगाव	७
एदलाबाद	१३	खानापुर	६	डिसा	४+	नवसरी	२+
एलिचपूर	१८	खानपूर	९+	डेराडून	२०	नवापूर	३
केपकामोरिन	१८	खैबरघाट	८+	डेरागाजीखान	९+	नागपूर	२६
कोचिन	२३	गोकर्ण	६	डेराइस्माइलखान		नवसरी(गुज)	०
कांची	१३	गजेंद्रगड	१२		८+	नडियाद	०
कुंभकोणम्	२८	गोवें	४	तुतिकोरिन	२१	नशिराबाद	८
कोईमतूर	१६	गोरेगाव	१	तंजावर	२५	नंदुरबार	६
पांडेचरी	२७	भिवंडी	१	राणेबेन्नूर	११	सासवड	४
पन्हाळा	५	महगाव	९	रामदुर्ग	१०	सुधागड	१
पेठ	५	भुसावळ	११	राजापूर	२	संगमनेर	५
पंढरपूर	१०	भडोच	०	रंगुन	९३	सिन्नर	५
प्रतापगड	१	भोपाळ	१८	रत्नागिरी	१	सटाणे	५
पेण	१	महेश्वर	९	राजमहेंद्री	१५	सोनगड	२
पाली	१	भरतपूर	१९	रोहे	१	सुरत	०
पनवेल	१	भावनगर	३+	राहुरी	७	सिंदखेड	७
पारनेर	६	मदुरा	२१	रावेर	१२	सांगलेड	६
पैठण	१०	मद्रास	२९	रायपूर	३५	सुलतानपूर	३६
पाचोरे	१०	मंगलोर	७	राजकोट	९+	सिकम	६२
पारोळे	९	मालवण	२	रतलाम	८	स्थानेश्वर	१६
झांशी	६२	मच्छलीपट्टण	२३	रांची	५०	श्रीरंगपट्टण	१५
प्रयाग	३५	मिरज	७	राजमहाल	६०	श्रीनगर	२४
पाटणा	४९	मलकापूर	४	रामपूर	२४	सिकंदराबाद	
पानपत	१६	मंगळवेढे	१०	रावळपिंडी	०		२२
पतियाळा	१४	मुरुड	१	लखनौ	१२	श्रीगोंदे	७
पेशावर	६	महाड	२	विजगापट्टन	४९	शहापूर	२

फरीदपूर	६६	मुंबई	०	लुधियान	१२
फत्तेपूरशिक्री	१९	मनमाड	६	विजयनगर	१६
फत्तेगड	२६	मुधोळ	१०	वेंगुर्ले	३
फत्तेगंज	२६	मुरबाड	२	विजदुर्ग	२
फत्तेगंज	२८	मालेगांव	६	विजापुर	९
बंगलोर	१८	मांडवी	९	वाई	४
बेळगाव	७	महू	११	विजयानगर	४२
बेल्लूर	११	मांडवी(क)	१६+	वेरूळ	५
बागलकोट	११	मुर्शिदाबाद	६१	विजगापट्टण	४१
बिरवाडी	२	माणिकपूर	३४	वणी (वऱ्हाड)	२४
बाणकोट	१	मणिपूर	८४	वसई	१+
बार्शी	११	मथुरा	२०	विचूर	५
बरद्वान	५९	मुरादाबाद	२४	वर्धा	२५
बदलापूर	१	मीरत	१९	विलासपूर	३७
बुलढाणा	१४	मुलतान	६+	वृन्दावन	२०
बारडोली	१	म्हैसूर	१५	श्यारा	२
बऱ्हाणपूर	१३	यल्लापूर	७	सिरसी	७
बडोदें	१	येवले	६	सावंतवाडी	४
बुंदी	१२	यावल	११	सांगली	७
बकसार	४४	रामेश्वर	२६	सोलापूर	१२
बिकानेर	२	रंगून	६८	सातारा	४
भोर	३	लाहोर	५		

शिरपूर	८
शहादे	६
शहाबाद	१६
हुगळी	९
हैद्राबाद (दक्षिण)	२०
हैद्राबाद सिंध	२०+
हरिद्वार	२१

प्रत्येक शहरापुढील आकडे मिनिटांचे आहेत तितकी मिनिटे मुंबईचेपूर्वी सूर्योदय होतो असे समजावे. लग्न काढतांना स्थानिक वेळ घ्यावी. ज्या शहरापुढें + अशी खूण केली आहे त्या शहरी सूर्योदय तितकी मिनिटे मुंबईचे नंतर होतो असें समजावें.

उत्तर अक्षांशावरील स्थानिक वेळेचा सूर्योदय

महिने	तारखा	अक्षांश +११°	+१४°	+१७°	+२०°	+२३°	+२६°	+२९°	+३२°	+३५°
जाने.	४	६ ११	६ २४	६ ३०	६ ३५	६ ४१	६ ४८	६ ५४	७ १	७ ८
	११	२१	२६	३२	३७	४२	४९	५५	२	९
	१८	२३	२८	३३	३८	४३	४९	५५	१	८
	२५	२४	२९	३३	३८	४३	४८	५४	०	५
फेब्रु०	१	२५	२९	३३	३७	४२	४४	५०	६ ५६	०
	८	२४	२८	३१	३४	३०	४२	४६	५१	६ ५५
	१५	२३	२६	२८	३१	३४	३७	४१	४५	४९
	२२	२०	२२	२५	२७	३०	३२	३५	३८	४२
मार्च.	१	१६	१८	२०	२२	२४	२६	२८	३०	३३
	८	१३	१४	१	१६	१७	१९	२१	२३	२४
	१५	९	८	९	१०	१	११	१३	१३	१३
	२२	४	४	४	४	४	४	४	३	३
	२१	५ ५९	५ ५७	५ ५७	५ ५६	५ ५६	५ ५५	५ ५४	५ ५३	५ ५२

महिने	तारखा	अक्षांश +११°	+१४°	+१७°	+२०°	+२३°	+२६	+२९°	+३२°	+३५°
एप्रिल	५	५५	५४	५१	५०	४९	४८	४६	४५	४३
	१२	५०	४९	४७	४५	४३	४१	३८	३६	३३
	१९	४७	४४	४२	४०	३६	३४	३०	२७	२४
	२६	४४	४०	३७	३४	३०	२७	२२	१९	१६
मे०	३	४१	३७	३३	३०	२६	२२	१७	१३	८
	१०	३९	३४	३०	२९	२२	१७	१२	७	२
	१७	३८	३२	२८	२४	१९	१४	८	२	४ ५६
	२४	३७	३२	२७	२२	१७	१२	५	४ ५१	५२
	३१	३६	३१	२६	२१	१६	१०	३	५६	४९
जुन०	७	३५	३०	२५	२०	१४	८	१	५४	४७
	१४	३५	३०	२५	२०	१४	७	०	५३	४५
	२१	३६	३१	२५	२०	१५	८	१	५३	४५
	२८	३७	३२	२७	२२	१६	९	२	५५	४७

माहिने तारखा		अक्षांश								
		+११°	+१४°	+१७°	+२०°	+२३°	+२६°	+२९°	+३२°	+३५°
जूलै०	५	३९	३४	२९	२४	१८	१२	५	५८	५०
	१२	४२	३७	३२	२७	२०	१४	८	१	५३
	१९	४४	३९	३४	३०	२३	१७	११	५	५८
	२६	४७	४२	३७	३३	२७	२१	१५	९	४
ऑ०	२	४९	४४	३९	३५	३१	२६	२१	१५	९
	९	४८	४४	४०	३७	३४	२९	२४	१९	१४
	१६	४८	४५	४१	३९	३६	३२	२८	२३	१८
	२३	४९	४६	४३	४१	३८	३५	३२	२८	२३
	३०	५०	४८	४५	४३	४०	३८	३५	३२	२९
सप्टें०	६	५०	४८	४६	४४	४३	४१	३९	३७	३४
	१३	५०	४९	४७	४६	४५	४४	४३	४१	३९
	२०	५०	४९	४८	४७	४७	४७	४६	४५	४४
	२७	४९	४९	४९	४९	४९	४९	४९	५१	५१

महिने तारखा	अक्षांश +११°	+१४°	+१७°	+२०	+२३°	+२६°	+२९°	+३२°	+३५°
ऑक्टो. ४	४९	४९	५०	५०	५१	५२	५३	५४	५६
११	४९	५०	५१	५२	५४	५५	५७	५९	६ २
१८	४८	५०	५२	५५	५७	५९	६ २	६ ४	८
२५	४८	५२	५५	५८	६ १	६ ४	७	१०	१४
नोव्हें० १	५१	५५	५८	६ १	४	८	११	१५	२१
८	५४	५८	६ १	५	८	१२	१७	२१	२७
१५	५६	६ ०	४	९	१२	१७	२३	२८	३४
२२	५९	३	७	१३	१८	२४	३०	३५	४१
२९	६ १	६	११	१७	२२	२८	३४	४०	४८
डिसें० ६	४	१०	१६	२१	२७	३३	३९	४५	५४
१३	१०	१५	२०	२६	३२	३८	४५	५१	७ ०
२०	१३	१७	२४	३०	३६	४२	४९	५६	२
२७	१६	२२	२७	३३	३९	४५	५२	७ ०	७ ०

उत्तर अंक्षाशावरील स्थानिक वेळेचा सूर्यास्त

महिने व दिनांक		अक्षांश +११°	+१४°	+१७°	+२०°	+२३°	+२६°	+२९°	+३२°	+३५°
जाने.	४	१७ ४९	१७ ४४	१७ ३९	१७ ३३	१७ २७	१७ २१	१७ १५	१७ ८	१७ १
	११	५३	४८	४२	३८	३३	२६	२०	१४	८
	१८	५७	५२	४६	४३	३७	३१	२५	२०	१४
	२५	१८ ०	५५	५०	४७	४३	३८	३२	२६	२१
फेब्रु०	१	३	५८	५४	५२	४७	४३	३९	३४	२८
	८	५	१८ ३	५८	५६	५२	४७	४४	४०	३५
	१५	७	४	१८ १	५९	५६	५३	५०	४६	४२
	२२	९	६	४	१८ २	१८ ०	५७	५५	५२	४९
मार्च.	१	१०	८	६	५	२	१८ ०	५९	५७	५५
	८	१२	१०	८	७	५	३	१८ ३	१८ १	१८ २
	१५	११	१०	९	९	८	७	७	६	७
	२२	११	११	११	१२	१२	१२	१२	१२	१२
	२९	११	११	१३	१४	१५	१६	१६	१७	१८

माहिने व दिनांक		अक्षांश								
		+११°	+१४°	+१७°	+२०°	+२३°	+२६°	+२९°	+३२°	+३५°
एप्रिल.	५	११	११	१४	१५	१७	१९	२१	२२	२३
	१२	११	१३	१५	१७	२०	२२	२४	२८	३०
	१९	११	१४	१६	१९	२२	२५	२८	३२	३५
	२६	१२	१५	१८	२२	२५	२९	३२	३८	४१
मे०	३	१२	१६	१९	२४	२८	३२	३७	४१	४७
	१०	१३	१८	२२	२७	३२	३६	४१	४५	५२
	१७	१५	२०	२४	२९	३४	४०	४५	५०	५८
	२४	१६	२२	२७	३२	३४	४३	५०	५५	१९–३
	३१	१८	२४	२९	३५	३७	४७	५४	११ ०	७
जून०	७	२०	२६	३२	३७	४३	५०	५७	२	११
	१४	२२	२८	३४	४०	४६	५३	१९ ०	७	१४
	२१	२४	३०	३६	४२	४८	५५	२	९	१६
	२८	२६	३२	३७	४२	४९	५६	३	१०	१८

माहिने व दिनांक		अक्षांश								
		+११°	+१४°	+१७°	+२०°	+२३°	+२६°	+२९°	+३२°	+३५°
जुलै०	५	२७	३२	३८	४३	५०	५७	४	११	१८
	१२	२८	३३	३८	४३	४९	५६	२	९	१६
	१९	२८	३३	३८	४२	४८	५४	०	६	१३
	२६	२७	३२	३६	४०	४५	५१	१८ ५७	३	८
ऑ०	२	२४	२८	३२	३६	४२	४७	५१	१८ ५८	२
	९	२१	२५	२९	३३	३७	४२	४७	५३	१८ ५६
	१६	१८	२२	२५	२९	३२	३६	४१	४८	५०
	२३	१४	१७	२०	२३	२७	२९	३३	३६	४२
	३०	१२	१३	१६	१७	२०	२४	२६	२९	३३
सप्टें०	६	८	१०	१०	११	१३	१५	१७	१९	२४
	१३	३	४	५	५	६	७	९	१०	१२
	२०	१७ ५७	१७ ५७	१७ ५७	१७ ५८	१७ ५८	१७ ५९	१७ ५९	१७ ५९	१७ ५९
	२७	५३	५०	५२	५२	५२	५२	५२	५२	५२

महिने व दिनांक	अक्षांश								
	+११°	+१४°	+१७°	+२०°	+२३°	+२६°	+२९°	+३२°	+३५°
ऑक्टो. ४	५०	४९	४८	४८	४७	४७	४५	४५	४३
११	४६	४४	४३	४०	३९	३८	३६	३४	३२
१८	४२	४०	३७	३४	३३	३०	२८	२६	२५
२५	३९	३६	३३	३०	२७	२५	२२	१९	१४
नोव्हें० १	३७	३३	३०	२६	२३	१९	१५	१२	७
८	३६	३२	२८	२३	१९	१५	१०	६	०
१५	३५	३०	२६	२१	१७	१२	७	१ १६	५५
२२	३६	२९	२४	२०	१५	१०	४	१६–५८	५६
२९	३५	३०	२५	१९	१३	७	१	५५	४९
डिसें० ६	३७	३२	२७	२०	१४	८	२	५५	४८
११	३८	३५	२९	२२	१६	१०	३	५६	४९
२०	४२	३८	३२	२५	१९	१३	६	५९	५२
२७	४६	४०	३४	२८	२२	१५	८ १७	१	५४

रा. अं.	०	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४
० मेषः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
१ वृषभः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
२ मिथुनः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
३ कर्कः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
४ सिंहः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
५ कन्याः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
६ तुलाः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
७ वृश्चिकः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
८ धनुः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
९ मकरः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
१० कुंभः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
११ मीनः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]

रा. अं.	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९
० मेषः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
१ वृषभः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
२ मिथुनः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
३ कर्कः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
४ सिंहः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
५ कन्याः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
६ तुलाः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
७ वृश्चिकः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
८ धनुः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
९ मकरः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
१० कुंभः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
११ मीनः	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]

टीप

ज्यावेळचें लग्न पाहाण्याचें असेल त्यावेळेपर्यंत किती घटिका पळें झाली तें पाहून निराळें मांडून ठेवावें. नंतर ज्या राशीचा सूर्य त्या राशीसन्मुख जितके अंश सूर्यानें भोगले असतील त्या अंशाखालील कोष्टकांतील अंक घ्यावे. नंतर त्यास निराळे मांडून ठेवलेले अंक मिळवावे, जी बेरीज येईल ती कोष्टकांत शोधून काढावी. ज्या राशीसन्मुख येईल तेंच लग्न, ज्या अंशाखालीं येईल तितके अंश भोगले असें जाणावें.

: २ :

सायन कुंडली कशी मांडावी ?

पृथ्वी सूर्याभोवती ३६५ दिवस ६ तास १२ मिनिटें इतक्या वेळांत एक प्रदक्षिणा पुरी करिते. म्हणजे ज्योतिषशास्त्रदृष्ट्या ३६५ दिवस ६ तास १२ मिनिटें इतक्या कालानें एक वर्ष पुरें झालें असें समजलें पाहिजे. व्यवहारांत दिवसाचे अपुरे भागाचें वर्ष गणणें अडचणीचें व अव्यवहार्य असल्यानें आपण चांद्रवर्ष म्हणजे सरासरी ३५४ दिवसांचें मोजतों व ११ दिवसांचा फरक काढून टाकण्याकरितां सरासरी ३० महिन्यानें अधिक महिना घेतों. पाश्चात्यलोक ३६५ दिवसांचें वर्ष मोजतात व चवथे वर्षी फेब्रुवारी मध्यें १ दिवस वाढवून घेतात. म्हणून इंग्रजी वर्ष सौरमानाचें असल्यानें रवीची सायनसंक्रमणें फारच थोड्या फरकानें ठरीव महिन्याचें ठरीव तारखेस येतात.

२१ मार्च ही वसंत संपाताची ठरलेली तारीख आहे व त्या दिवशीं रवी सायन मेष राशींत प्रवेश करितो. उदाहरणार्थः—आपण कल्पना करूं कीं, तारीख २१ मार्च रोजी विवक्षित स्थळीं स्थानिक टाईम १२ वाजतां माध्यान्हीं क्रांतीवृत्तावर दशमस्थानीं मेष राशीचे ० अंश उदित आहेत. हा काल तास, मिनिटें, सेकंद यामध्यें मांडला असतां ० तास ० मिनिटें ० सेकंद असा होईल व ह्यालाच नाक्षत्रकाल असें म्हणतात.

आतां दुसरे दिवशीं म्हणजे २२ मार्च रोजी दशमस्थानीं मेषराशी ० अंश ० कला ० विकला कोणते वेळीं येईल, याचा विचार करूं:—

पृथ्वी आपलेभोंवती २४ तासांत एक प्रदक्षिणा करिते व तितक्याच वेळांत रवी सरासरी १ अंश पुढें जातो. विवक्षित तारखेस, दशमस्थानीं ठरीव बिंदूंत सूर्य येण्यास पृथ्वीस स्वतः ३६६ प्रदक्षिणा कराव्या लागतील.

म्हणजे ३६५ दिवसांत २४ तासांचा फरक होईल व एका दिवसांत सरासरी ४ मिनिटें फरक होईल.

मेष राशीचे ० राशी ० अंश ० कला २१ मार्च रोजीं माध्यान्हीं ज्यावेळीं दशमस्थानीं उदित असतील त्याचें ४ मिनिटांचे नंतर २२ मार्च रोजीं उदित होतील.

म्हणून २१ मार्चचा नाक्षत्रकाल ० तास ० मिनिटें ० सेकंद असेल तर २२ मार्च रोजीं नाक्षत्रकाल ० ता. ४ मिनिटें ० सेकंद येईल. तारीख २३ ला ० ता. ८ मिनिटें, ० से. असा येईल व रोज ४ मिनिटें या क्रमानें पुन्हा पुढील वर्षी २१ मार्च रोजीं माध्यान्हीं नाक्षत्र काल २३ ता. ० मि. ० से. म्हणजे ० ता. ० मि. ० से. असा येईल. रोज ४ मिनिटें हें नाक्षत्रकालाचें मध्यममान झालें. रवीची गति सारखी नसल्यानें नाक्षत्र-काल थोडा कमीअधिक प्रमाणानें होईल.

आता याच रीतीनें कोणत्याही तारखेचा सरासरी नाक्षत्रकाल आपणांस सहज काढतां येईल. दर महिन्यास २ तास याप्रमाणें १ दिवसास ४ मिनिटें.

उदाहरणार्थ—२ सप्टेंबरचा नाक्षत्रकाल काय येईल, तो पाहूं. ऑगष्ट २१ तारखेपर्यंत ५ महिने १२ दिवस होतात. ५ महिने १२ दिवस म्हणजे १० तास ४८ मिनिटें. २१ मार्चचे नाक्षत्र कालांत हे मिळविले म्हणजे २ सप्टेंबरचा माध्यान्हीचा नाक्षत्रकाल तयार होईल.

नाक्षत्रकालाचें मध्यममानाचे कोष्टक पाहिल्यास तें १० तास ४३ मिनिटें असें आहे. हा फरक रवीचें चलमान दर महिन्यांत २१ तारखेस होत नसल्यानें झाला.

४।५ मिनिटांचा फरक म्हणजे १ अंशाचा फरक. तात्काल लग्न काढण्यास वर दिलेलें नाक्षत्रकालाचें ढोबळ मान घ्यावें व जन्म कुंडली तयार करतांना सूक्ष्म नाक्षत्र काल घ्यावा हें बरें.

प्रत्येक तारखेचा सूक्ष्म नाक्षत्रकाल पुढें दिला आहे.

रोजची सूर्याची गति सरासरी १ अंश असल्यानें पृथ्वीस क्रांतीवृत्ता-मध्यें १ अंश जाण्यास ४ मिनिटें लागतात, म्हणजे एका तासांत १० सेकंदें होतील.

यावरून असें स्पष्ट दिसतें माध्यान्हानंतर पुढील प्रत्येक तासांत १० सेकंदें मिळविली पाहिजेत. माध्यान्हापूर्वीचें प्रत्येक तासांत १० सेकंदें कमी केली पाहिजेत.

उदाहरणार्थः—तारीख २८ मार्चच्या दोन प्रहरीं ४॥ वाजतां (मुंबई-टाईम) चा नाक्षत्रकाल काढा.

२१ मार्च नाक्षत्रकाल.
ता. मि. से.
०—०—०
७ दिवसांचे २८ मिनिटें ०—२८—०
०—२८—०

हा नाक्षत्रकाल २८ मार्च रोजीं १२ वाजतांचा झाला. आतां आपणास ४॥ वाजतांच, नाक्षत्रकाल पाहिजे असल्यानें त्यांत ४॥ तास व प्रत्येक तासास १० सेकंदें याप्रमाणें ४५ सेकंदें मिळविलीं म्हणजे इष्ट वेळेचा नाक्षत्र काल तयार होईल.

तास. मि. से.
०—२८—०
४—३०—४५
४—५८—४५

कुंभः—शरीरयष्टी फार उंच नाहीं व फार ठेंगणा नाहीं. शरीर बळकट व पीळदार, चेहरा लांब, वर्ण गौर, डोळे काळेभोर. कुंभ लग्नावर जन्मणारी माणसें विशेषतः स्वरूपानें चांगलीं असतात. या लग्नावर जन्मणाऱ्या स्त्रिया फार सुंदर असतात. स्वभावः–स्थिर, निश्चयी व दयाळू, शास्त्रीय विषयांचा व्यासंगी, विद्येची व अनेक प्रकारच्या खेळांची आवड असणारा, सम्य व सुस्वभावी, विद्याव्यासंगी असतो.

मीनः—बुटका परंतु लठ्ठ, चेहरा फिकट, डोळे निस्तेज, हात व पाय आखुड, पायाचे तळवे मोठे. एकंदरीत शरीरप्रकृति अशक्त व रोगट. स्वभावः–सुस्त, ऐदी, आळशी, कोणत्याही कामाची काळजी न घेणारा व आपल्या सुखापुरतें पाहणारा असतो.

सूचनाः—जेव्हां लग्नारंभीं अथवा लग्नांत कोणताही ग्रह नसेल तेव्हां वर दिलेलें वर्णन बरोबर लागूं पडेल. परंतु लग्नारंभीं अथवा लग्नांत एखादा ग्रह असेल तर वर दिलेलें वर्णन बरोबर लागूं पडणार नाहीं. कारण लग्नीं असणाऱ्या ग्रहाचा शरीरावर परिणाम घडेल.

प्रत्येक राशिपरत्वें ग्रहांचा शरीरावर परिणाम

मेष

रविः— शरीर मजबूत, डोळे थोडे पिंगट, केस विरळ, दांत थोडे, कपाळ भव्य व थोडें पुढें आलेलें, बांधा मध्यम.

हर्षलः—ह्या राशींत असेल तर जन्मणारा थोडा उंच होतो. शरीर निकोप परंतु रोडकें असतें. डोळे मोठे, वर्ण काळा, शरिर सुदृढ, महत्वाकांक्षी, अभिमानी व लवकर रागवणारा.

शनिः—ह्या राशींत असेल तर बांधा मध्यम, वर्ण काळा, केस काळे डोळे लहान. स्वभावः–भांडाळ.

गुरुः—बांधा मध्यम, परंतु सडपातळ, वर्ण गौर, चेहरा वाटोळा, डोळे तेजस्वी, व मोठे. स्वभावः–परोपकारी व सभ्य.

मंगळः— बांधा मध्यम, शरीर कसलेलें, हाडें मोठीं, चेहरा थोडा तांबुस, दृष्टी चंचल, चेहरा भव्य. लग्नीं ह्या राशींत मंगळ असणाऱ्या लोकांस राग फार जलद येतो. तालमीचा शोक असतो. सूर्य मेष राशींत असेल तर साधारण उंची कमी परंतु शरीर काटक व बांधीव, वर्ण गौर व तेजस्वी, केस तांबुस, स्वभाव फारच उदार, शत्रूशीं देखील दिलदार पराक्रमी व विश्वासास पात्र असतो.

शुक्रः—ह्या राशींत असेल तर बांधा मध्यम, शरीर सडपातळ, वर्ण गौर, डोळे काळेभोर व पाणीदार. स्वभावः–चपल, अस्थिर, लग्नीं मेष-राशींत शुक्र असलेले लोक बाहेरख्याली निघतात आणि थोडे अविचारी असतात.

बुधः—ह्या राशींत असेल तर थोडा उंच, मान लांब, तोंड लांबट वर्ण काळा. स्वभावः–अस्थिर परंतु महत्वाकांक्षी, खोटें बोलणें, अप्रामाणिक

पणाच्या संवयी असतात. मोडाळ, वितंडवादी असणारा, प्रतिभासंपन्न व विनोदी, उत्तम वक्ता व नट. आंग्ल कवि शेक्सपीयर यांचे कुंडलींत लग्नारंभी बुध मेषराशींत होता.

चंद्रः—ह्या राशींत असेल तर थोटा उंच, तोंड वाटोळें, वर्ण गोर स्वभावः–चंचल, व अस्थिर प्रवासाचा व फिरण्याचा फार शोकी असतो.

वृषभ

हर्षलः—ह्या राशींत असेल तर शरीरबांधा ठेंगणा परंतु लठ्ठ. डोळ्याची पोटें मांसल, चेहरा फिकट, वर्ण काळा,मान आंखुड, डोळे खोल, विषयी, वृथाभिमानी व घातकी, लग्नीं वृषभ राशींना हर्षल असणारे लोकांशीं जपून वागावें. स्वभावः–चैनी व आनंदी. ह्या राशींत शनि असेल तर वर्ण काळा, शरिराची कातडी खरखरीत, उंची मध्यम, पाय व हात बेढब सुस्त व मंद, अतिशय कपटी, मत्सरी, वरपांगी गोडगोड बोलणारा व आंतून सूड घेण्याची व दुसऱ्याचा नाश करण्याची इच्छा धरणारा.

गुरुः—ह्या राशींत असेल तर शरीरबांधा मध्यम, शरीर पोळदार, वर्ण गोरा, मान आंखुड, स्वभाव.–मनमिळावू उदार व निश्चयी.

मंगळः—ह्या राशींत असेल तर शरिरबांधा मध्यम, परंतु मेदयुक्त, चेहरा वाटोळा, वर्ण साधारण गोर, तोंडाची ठेवण रुंद, दुर्गुणी, आधाशी व उन्मत्त, स्वतः चैनी, निर्दय व वाईट स्वभावाचा असतो.

रविः—ह्या राशींत असेल तर बुटका, शरीर तालीमबाज, नाक मोठें व डोके मोठें, गर्विष्ठ, धीट व उतावळा व प्रत्येक कामांत स्वतःचें मत पुढें करण्याची मोठी हौस असते.

शुक्रः—ह्या राशींत असेल तर जन्मणारा रूपवान होतो. शरीर साधारण लठ्ठ असते. स्वभावः–आनंदी, वर्ण गोर, दुसऱ्यास वश करणारा, लग्नीं वृषभ राशीचा शुक्र असणारे लोक स्त्रियांना वश करण्यांत

पटाईत असतात. त्यांची शयकांमध्यें थोड्या वेळांतच ओळख होऊन यट्टामस्करी सुरु होते.

बुधः—ह्या राशींत बुध असेल तर बांधा मध्यम, वर्ण काळा, डोळे पाणीदार, अतिशय बोलका, आपल्याच पुरते पाहणारा, अविचारी आणि व्यसनी असतो.

चंद्रः—ह्या राशींत असेल तर शरीर बळकट, ठेंगु, चेहरा फिकट, स्वभाव शांत व परोपकारी, सर्वांस पूज्य व विलासी असतो.

शनिः—बांधा मध्यम, शरीर लठ्ठ व मेदयुक्त, निश्चयी, अत्यंत मतलबी मुत्सद्दी, गर्विष्ठ, सूड घेण्याची वृत्ती.

मिथून

हर्षलः—मिथुनराशींत हर्षल असेल तर शरीर उंच व रोडकें करितो. डोळे निस्तेज, चपल, हुषार, शास्त्रीय विषयांचा शोकी, सुस्वभावी परंतु वागणूक लहरी, उदार व कल्पक.

शनिः—मिथून राशींत शनि शरीर उंच करितो. चेहरा लांबट, डोक्यास केंस पुष्कळ, मंद व सुस्त, डोळे निस्तेज, वर्ण काळा, उत्तम कल्पनाशक्ति व विद्याव्यासंगी.

गुरुः—ह्या राशींत गुरु असेल तर शरीर सुंदर व वर्ण गौर. स्वभावः—मनमोकळा, निष्कपटी शास्त्रीय विषयाचा शोकी व समाजप्रिय.

मंगळः—शरीर उंच व बळकट, वर्ण गौर, स्वभाव उत्तम, हाडें मोठीं, हात लांब, उदार व मनमोकळा, अविचारी व उतावळा, अभिमानी व महत्वाकांक्षी.

रविः—शरीर बांधीव, वर्ण गौर, डोळे मोठे, स्वभाव उत्तम, वागणूक सभ्य व सर्वांस प्रिय, परोपकारी, वचनाचा दृढ असतो.

शुक्रः---बांधा मध्यम, सडपातळ परंतु सुंदर, वर्ण फार गौर, डोळे तेजस्वी स्वभाव --नम्र, शांत व मनमोकळा, सर्वांशी दयाळू व सर्वांस प्रिय व पूज्य.

बुधः---उंच, रोडका, शरीराची ठेवण सुंदर, नाक उंच, हात बाहू व हातांची बोटें लांब, फार चपल व हुषार, शास्त्रांचा मोठा अभ्यासी, शास्त्रपारंगत, उत्तम वक्ता. वाङ्मयाचा व्यासंगी, स्वभाव उत्तम असतो.

चंद्रः---बांधा सुंदर, शरीर थोडें उंच. चेहरा सुंदर परंतु थोडा फिकट लोकप्रिय व बोलका, फार कल्पक परंतु थोडा चंचल व कपटी (चंद्रावर फक्त शनीचीच दृष्टी असेल तर).

कर्क

हर्षलः---बुटका व लठ्ठ, चेहरा फिकट, आनंदी व चैनी, व्यसनात्मक [दारु वगैरेचा] लहरी, रागीट, नेमुर्वत व व्यसनी.

शनिः---बांधा मध्यम, शरीर रोडकें, केंस काळेभोर, रागट व नेहमीं आजारी, वागणूक कपटी व आपमतलबी, दारुबाज, एकदरींत दुर्दैवी व दरिद्री असतो.

गुरुः---शरीराचा बांधा मध्यम, चेहरा फिकट व लांबट, परोपकारी व सभ्य, नेहमीं आनंदी, प्रकृति अशक्त व रोगी परंतु सतेज असते.

मंगळः---जन्मतः शरीरामध्यें व्यंग व कुरूपता, चेहरा फिकट व व्रण असलेला, स्वभाव दुर्गुणी, चौर्य कर्मांस प्रवृत्त होणारा व घातकी, चेहऱ्यावर लूण असते.

रविः---बांधा ठेंगु व रोगी, चेहरा फिकट, अंगावर तीळ अथवा मस फार, केंस जरा तांबूस, विषयी, सुखासक्त परंतु मनमोकळा व उदार, थंमली पदार्थांचें सेवन करणारा असतो.

शुक्रः—शरीरबांधा बुटका व लठ्ठ, मेदयुक्त, चेहरा वाटोळा, वर्ण निस्तेज. फर्क राशींत शुक्र असणारे लोक सुंदर निपजतात. स्वभावः—विनयशील, मोकळ्या मनाचा व अविचारी, निष्काळजी व चैनी, वाहेरख्याली असतो.

बुधः—बांधा ठेंगु, चेहरा व वर्ण फिकट व थोडा काळा, डोळे लहान स्वभावः–घटकोघटकी बदलणारा, अविश्वसनीय, चंचल बुद्धीचा, असत्य भाषण करणारा.

चंद्रः—बांधा मध्यम, शरीर बांधेसुद व मेदयुक्त, वर्ण गौर, चेहरा वाटोळा, स्वभाव नम्र, सम्य, स्नेहास लायक, दयाळू, निरुपद्रवी व लोकमान्य होतो.

सिंह

हर्षलः—शरीर उंच व ताठ, खांदे रुंद व बळकट, मिशाने केस पिंगट, जलद चालणारा. स्वभावः–उदार, मन मोकळा व लहरी, मर्दानी खेळाचा शोकी, थोडा गर्विष्ठ व स्वाभिमानी.

शनिः—उंच हाडें; खांदे मोठे, रुंद व बळकट, परंतु शरीर रोडकें, चेहरा कठोर. स्वभावः–अति कामी, घातकी, दुरभिमानी व दुराग्रही.

गुरुः—शरीराची ठेवण उत्तम, उंच, वर्ण गौर, डोळे मोठे, प्वाल धिमी असते. स्वभावः–शौकीन, उदार, चेहरा शूर, मर्दानी खेळांची आवड असणारा.

रविः—शरीर फार मजबूत, वर्ण गौर व तेजस्वी, चेहरा भव्य, डोळे मोठे, प्रामाणिकपणा व विश्वासू, महत्वाकांक्षी व उद्योगी, गर्विष्ठ, कोणा- कडून अपमान सहन न करणारा.

शुक्रः—शरीर मोठें, उंच व बळकट, चेहरा वाटोळा, डोळे तेजस्वी, वर्ण गौर, चेहरा निर्मळ, शौकीट परंतु उदार, मित्रनिष्ठेने वागणारा, सर्वांशी दयाळू परंतु थोडा गर्विष्ठ व हट्टी असतो.

बुधः—शरीर उंच परन्तु रोडकें, डोळे मोठे व डोळ्याची पोटेही मोठी, वर्ण काळा, चेहरा वाटोळा, नाक रुंद व उंच. स्वभावः—उतावळा, तिरसट, गर्विष्ठ व अभिमानी.

चंद्रः—बांधा उंच, शरीर मजबूत, हाडें मोठीं, वर्ण गौर, डोळे मोठे व पाणीदार, विचार प्रगल्भ, दृढ निश्चयी व उद्योगी आणि अभिमानी.

मंगळः—तामसी, उदार, उंच, गर्विष्ठ.

कन्या

हर्षलः—शरीरबांधा सुटका, डोळे काळेभोर व पाणीदार, शरीर रोडकें, शरीराचे अवयव लहान. स्वभावः—लहरी, नवीन वस्तु व गूढविद्या यांचा नादी, अभ्यासी, शास्त्रीय विषय पारंगत परंतु व्यवहारांत फारच कद्रु व मतलबी.

शनि—शरीर उंच परंतु सडपातळ, वर्ण काळा, चेहरा गंभीर, उदासीन, राग फार परंतु बाहेर न दिसणारा, विचार चमत्कारीक, विद्येचा व शास्त्रीय विषयाचा फार नादी असतो.

गुरु—उंच, चेहरा निमगोरा. स्वभावः—तिरसट, महत्वाकांक्षी, गर्विष्ठ व अविचारी.

शुक्रः—मध्यम बांधा, शरीराची ठेवण नीटनेटकी, चेहरा निमगोरा व वाटोळा. स्वभावः—अतिशय रागीट, तिरसट, उतावळा, खुनशी, चैनी व रंगेल, उधळ्या, विषयी.

रवि—उंच परंतु सडपातळ, वर्ण गौर, कल्पक, बुद्धिमान, आनंदी व विद्याव्यसनी.

बुधः—उंच व सडपातळ, चेहरा लांब, डोळे लहान परंतु काळेभोर, चपळ, शास्त्रीय विषयांचा अतिशय नादी, पुष्कळ मान्य जाणणारा उत्तम वक्ता, स्वतःचे मतलबाकरितां झटणारा

चंद्रः—मध्यम बांधा, फिकट चेहरा, लौकिकासाठी झटणारा, वाचाळ, अतिशय लोभी, दुसऱ्यावर छाप ठेवणारा.

मंगळः— मध्यम बांधा, चेहरा वाटोळा, तिरसट व चिडखोर, उतावळा व दांभिक.

तूळ

हर्षलः—अतिशय उंच, शरीर कसलेलें व बळकट, चेहरा वाटोळा, वर्ण सतेज, उद्योगी व मानी, लवकर राग येणारा. स्वभावः—लहरी व संन्हेयाईक.

शनिः—उंच व सुस्वरूप, केशकलाप पुष्कळ, चेहरा लांबट, नाक मोठें, कपाळ पुढें आलेलें, गर्विष्ठ व वादविवाद करण्याची आवड असणारा.

गुरुः—शरीर बळकट परंतु थोडें उंच, नेत्र पाणीदार व मोठे, वर्ण गौर व सतेज. स्वभावः—मनमोकळा व उदार आणि परोपकारी.

मंगळ—शरीर पिळदार व उंच, चेहरा लांबट, लवकर राग येणारा, महत्वाकांक्षी व खेळाडू.

रविः—मध्यम बांधा, चेहरा लांबट, आनंदी, डोळे पाणीदार, उधळ्या व धीट आणि अतिशय उदार व गर्विष्ठ.

शुक्रः—उंच व सौंदर्यवान, वर्ण गौर, डोळे पाणीदार. स्वभावः—उमदा व परोपकारी, व्यवहारांत सभ्य, सर्वांस प्रिय.

बुधः—शरीरबांधा मध्यम परंतु कठ, वर्ण काळा, कल्पक, फाटकतोरी रीतभात सभ्य व सर्वांस प्रिय, उत्तम वक्ता, विद्याव्यासंगी व वाचनप्रिय.

चंद्र—शरीराची ठेवण उत्तम, वर्ण थोडा गौर, सुस्वरूप, सभ्य, लोकप्रिय, आनंदी व चैनी, समाजप्रिय व सर्वांस पूज्य.

वृश्चिक

हर्षलः—बुटका व लठ्ठ, खांदे रुंद, वर्ण काळा, मत्सरी, कपटी, लबाड, व्यसनासक्त, वर्तन निंद्य.

शनिः—बांधा बुटका व लठ्ठ, शरीर मजबूत, खांदे रुंद, डोळे बारीक, मत्सरी, उलाढाली व चौर्य कर्मास प्रवृत्त होणारा, नेहमीं अडचणींत येणारा. धूर्त, मुत्सद्दी, कपटी असतो.

गुरुः—मध्यम बांधा, केंस पुष्कळ व काळे, चेहरा मोठा, परंतु खिन्न व मंद. स्वभावः—मगरूर, गर्विष्ठ, अभिमानी, महत्वाकांक्षी, उद्योगी व चपल.

मंगळः—शरीरबांधा मध्यम, चेहरा रुंद, वर्ण गोर, अतिशय कामी, खुनशी, उतावळा, महत्वाकांक्षी, प्रत्येक कामांत प्रवीण.

रविः—शरीर बुटकें व लठ्ठ, चेहरा भव्य, तोंड रुंद, वर्ण काळा, शरीर मेदयुक्त. स्वभावः—कल्पक, गंभीर, व महत्वाकांक्षी, उत्तम वैद्य, डॉक्टर अथवा रसायनशास्त्रज्ञ असतो.

शुक्रः—शरीराची ठेवण उत्तम, वर्ण गोर परंतु निस्तेज, चेहरा मणयुक्त, हलकट लोकांशीं स्नेह करणारा, व्यसनासक्त, अतिकामी.

बुधः—बांधा बुटका; खांदे रुंद, वर्ण काळा, चौर्यकर्म, खोटें बोलणें, अनीतीचें वर्तन व दुसरे अनेक दुर्गुणयुक्त. उत्तम डॉक्टर व रसायनशास्त्रज्ञ असतो.

चंद्रः—सुंदर, वर्ण गोर परंतु लठ्ठ व बोजड. स्वभावः—कपटी, धूर्त, चैनी, बाहेरख्याली व अतिशय कामी.

धनु

हर्षलः—उंच, शरीर धिप्पाड, वर्ण गोरा, कपाळ उंच. स्वभावः—उदार, मनमोकळा, व्यायाम व मर्दानी खेळाची आवड असणारा.

शनिः—शरीर उंच व अशक्त, वर्ण काळा, बोलणें कमी परंतु दुसऱ्यास उपयोगी पडणारा व लवकर राग न येणारा, गंभीर.

गुरुः—शरीर उंच व दाठ; चेहरा भव्य, वर्ण गोर, तोंड लांबट, सुंदर व मोहक. स्वभावः—स्वार्थी, उदार व गंभीर, नीच कृत्यांचा व हलकट लोकांचा मनापासून द्वेष करणारा, शारीरिक खेळ व व्यायामाचा शोकी असतो.

मंगळः—थोडा उंच, शरीराची ठेवण उत्तम, वर्ण जरा तांबुस, डोळे चंचल व तेजस्वी. स्वभावः—उतावळा परंतु उदार व दिलदार, विशेषतः गुरेंढोरें व घोडे वगैरे चतुष्पाद जनावरांचा शोकी व त्या धंद्यात यशस्वी असतो.

रविः—उंच, शरीरबांधा उत्तम, चेहरा गोल, वर्ण गोर, विचार फार प्रगल्भ, महत्वाकांक्षी, अतिशय अभिमानी, मोठमोठ्या कामांत पडण्याची, व कीर्ति मिळविण्याची हांव धरणारा, मनमोकळा व उदार असतो.

शुक्रः—शरीराची ठेवण सुंदर, वर्ण चांगला, चेहरा गोल व भव्य. स्वभावः—उदार व चांगला परोपकारी, सुखासक्त, व्यायामाचा व तालमीचा शोकी.

बुधः—उंच, हाडें मोठीं, चेहरा व नाक मोठें, राग लवकर येतो परंतु थोडे वेळानें शांत होतो. प्रत्येक कृत्यांत उतावळा.

चंद्रः—सुंदर, शरीरबांधा चांगला, चेहरा वाटोळा, वर्ण गोर, स्वभाव—मनमिळाऊ व उदार, रागीट, परंतु राग विसरून क्षमा करणारा, महत्वाकांक्षी व अभिमानी.

मकर

हर्षलः—बांधा मध्यम, मान आखुड, कपाळ उंच, डोळे निस्तेज, गर्विष्ठ व गंभीर, मकर राशी हर्षल असतां स्तुति करण्यासारखे असे थोडेच गुण अंगी असतात.

शनिः—शरीर सडपातळ, फार उंच नाहीं असें, वर्ण काळा, शरीरानी कांतही खरखरीत, डोळे लहान, वर्ण फिकट व रोगट, चेहरा व डोकें लहान, प्रकृति अशक्त व दुबळी, तिरसट व निराश, नेहमीं संकटग्रस्त असतो.

गुरुः—शरीरबांधा बुटका व रोडका, वर्ण गोर, डोकें लहान, चेहरा निस्तेज, कल्पक व धीट, दूरदर्शी व निश्चयी.

रविः—बांधा बुटका, वर्ण फिकट, चेहरा गोल, शरीर रोडकें, स्वभाव-न्यायी व विनोदी त्यामुळें सर्वांस प्रिय.

शुक्र—बांधा बुटका, वर्ण फिकट व रोगट, चेहरा सुंदर, स्वभाव-सभ्य, परोपकारी, कामासक्त व त्यामुळें स्वतःचा नाश करून घेणारा होतो.

बुधः—बुटका बांधा, डोकें लहान, वर्ण काळा, पायामध्यें थोडा वाकडेपणा, लग्नामध्यें बुध मकर राशीचा असून शनि, मंगळ व हर्षल यांनें पीडित असेल तर पायामध्यें इजा असते व पाऊल व चाल वाकडी पडते. स्वभावः—चंचल, तिरसट पण बुद्धि फार उत्तम.

चंद्रः—बांधा बुटका, वर्ण साधारण गोर, शरीर सडपातळ, गुढघे अशक्त, अंगामध्यें चपलता कमी, व्यभिचारी व दुष्ट कृत्यें करणारा असतो

मंगळः—धीर, धाडशी, पराक्रमी, बांधा उंच, निश्चयी.

कुंभ

हर्षलः—बांधा मध्यम, चेहरा रुंद व सुंदर, अतिशय कल्पक, शास्त्रीय विषयांचा व नवीन व गूढ विचारांचा शोकी. लहरी व सुस्वभावी.

शनिः—बांधा मध्यम, डोळे मोठे व तोंड मोठें, गंभीर व दूरदर्शी शास्त्रीय विषयाचा शोकी व उद्योगी व दृढ निश्चयी.

गुरुः—शरीर बांधा मध्यम, वर्ण गोर, नेहमीं आनंदी व विनोदी, सर्वांवर उपकार करणारा, ह्यामुळें सर्वांस प्रिय, कोणाचेंही नुकसान न करणारा, न्यायी, दयाळू व खेळाचा शोकी.

मंगळः–बांधा मध्यम, तोंडावर व्रण, तीळ किंवा मस, वर्ण काळा, स्वभाव त्रासदायक व कोणास न जुमानणारा, वादविवाद करण्याची हौस व निश्चयी.

रविः–बांधा मध्यम, चेहरा वाटोळा, स्वभाव न्यायी, आनंदी व परोपकारी परंतु जरा गर्विष्ठ.

शुक्रः—सुंदर शरीर, बांधा उत्तम, वर्ण अतिशय गौर, स्वभावः— मोकळा, मनमिळाऊ, दयाळू व सर्वांत प्रिय.

बुधः—शरीरबांधा मध्यम, कधीं कधीं थोडा उंच, वर्ण गोरा, स्वभावः–मोकळा, दयाळू, कल्पक, शास्त्रीय विषय व अनेक ललित-कलांचा व्यासंगी, नवीन कल्पना बसविणारा, अनेक नवे नवे शोध करण्यास तत्पर, विनोदी व अतिशय बुद्धिमान.

चंद्रः–कुंभराशींत चंद्र असलेल्या मनुष्याचा शरीरबांधा मध्यम, शरीराची ठेवण उत्तम व वर्ण अतिशय गोरा असतो. स्वभावः—असा मनुष्य कल्पक, सभ्य, निरुपद्रवी, चपल व शोधक असतो.

मीन

हर्षलः—शरीरबांधा मध्यम, चेहरा फिकट, रोगट, चाल वाकडी किंवा त्यांत कांहीं दोष. स्वभावः–कपटी व सुस्त, उदास, सर्वांस प्रिय.

शनिः—बांधा मध्यम व बुटका, वर्ण फिकट, डोकें व डोळे मोठे. स्वभावः–मत्सरी व द्वेषी, विश्वास ठेवण्यास नालायक, अप्रामाणिक.

गुरुः–मध्यम बांधा, बुटका व लठ्ठ, वर्ण निमगोरा, डोळ्यांचीं पेटें जाडीं व पुढें आलेलीं. स्वभावः–दुर्व्यसनांनीं युक्त, तिरसट व मतलबी, आळशी, कलागतखोर, दुसऱ्यामध्यें तंटा लावून मौज पाहण्याची हौस असते.

रविः–शरीरबांधा साधारण मध्यम, चेहरा रोगट, फिकट, स्त्रियांचा शोकी, दुराचारी व दारुबाज, उधळ्या व चैनी असतो.

शुक्रः–मध्यम बांधा, शरीर मध्यम, बुटके, लठ्ठ व ओबडधोबड, वर्ण गौर. चेहरा गोल. स्वभावः–सुखमायी व प्रेमळ, व्यवहारांत न्यायी, लोकांमध्यें मानमान्यता असलेला असतो.

बुधः—शरीरबांधा बुटका, चेहरा किरकोळच, रोगट, एकदरींत शरीरावर केंस जास्त. स्वभावः—उदास, तिरसट, कपाळास नेहमीं आठ्या असलेला, दारुबाज.

चंद्रः—वर्ण गौर, परंतु फिकट, चेहरा वाटोळा, स्वतःचे सुखापुरतें पाहणारा, स्त्रियांचा शोकी व व्यभिचारी.

मंगळः—बांधा बुटका परंतु स्थूल, व्यसनी, आळशी, विषयी, दुराचारी.

नेपच्यून

लग्नीं नेपच्यून असतां जन्मणाराचे शरीरावर काय परिणाम होईल हें अद्याप बरोबर समजलेलें नाहीं. कारण ह्या ग्रहाचा शोध नुकताच म्हणजे सन १८४६ त लागला आहे. त्याची गति फारच मंद आहे. एक राशि आक्रमण्यास त्याला १४ वर्षे लागतात. म्हणजे सर्व राशीचक्राचा फेरा करण्यास ह्या अतिमंद ग्रहास १६८ वर्षे लागतील. ह्याचा शोध झाल्यापासून अद्याप ६ राशीही पुऱ्या झाल्या नाहींत. तथापि साधारण प्रत्येक राशीपरत्वें लग्नीं तो काय फल देऊं शकेल याचा थोडक्यांत खुलासा देत आहे.

मेषः—शरीर उंच, वर्ण काळा, डोळे लाल, व मान लांब.

वृषभः—मध्यम बांधा, शरीर दृढ, वर्ण निस्तेज व फिकट, डोळे काळे.

मिथुनः—उंच, वर्ण काळा.

लग्नीं नेपच्यून असेल तर स्वभावः—अनिश्चित, चंचल, स्वास्थ्यरहित, संशयी व चौकस होतो. पारमार्थिक व गूढ विद्येकडे लक्ष विशेष असतें.

कर्कः—व्यसनी, विषयी, दर्यावर्दी, शरीर बुटकें, पाण्यापासून भीति असते.

सिंहः—शरीरबांधा उंच व भव्य, चेहरा भव्य, राजकीय उलाढालींत पडणारा. स्वभावः—धीरोदात्त, गंभीर, विचारी.

कन्याः—शरीरबांधा बुटका, चेहरा सुस्त, ऐदी, अतिशय मतलबी, लोभी व कपटी असतो.

तुलः–उंच, वर्ण गौर, शरीरबांधा मजबूत. स्वभावः–विलासी, चैनी, शोधक, कल्पक.

वृश्चिकः–शरीरबांधा बुटका परंतु शरीर मजबूत, निकोप, शरीर बोजड. स्वभावः–गर्विष्ठ, खुनशी, अतिशय कपटी.

धनुः–उंच, वर्ण गौर व तेजस्वी, स्वभाव अभिमानी, रंगेल, विचार प्रगल्भ जबर महत्त्वाकांक्षा.

मकरः–रोगी, नेहमी आजारी, विलक्षण आजार उत्पन्न होतील,मन दुर्बल, व्यसनी, तऱ्हेवाईक व जगाशीं न पटणारा.

कुंभः–शरीरबांधा उंच, पाय व पोटऱ्यावर शिरा स्पष्ट दिसतील. अतिशय कल्पक शोधक, नवीन शोध लावणारा.

मीनः–उंच परंतु सडसडीत, चेहरा फिकट, मान लांब. मीनराशी नेपच्यूनचे स्वगृह आहे. अर्थात् कन्या राशींत नेपच्यून निर्बली असतो.

ग्रहांचीं स्वगृहें व बलिष्ठ स्थानें.

मेष आणि वृश्चिक	मंगळ
वृषभ आणि तुला	शुक्र
मिथुन आणि कन्या	बुध
धनु आणि मीन	गुरु
मकर आणि कुंभ	शनि
कर्क	चंद्र
सिंह	रवि
कुंभ	हर्षल

ह्या राशि त्यांचे पुढील दिलेल्या ग्रहांचीं स्वगृहें समजावी. जेव्हां एखादा ग्रह आपले राशीमध्यें असतो तेव्हां तो विशेष बलवान असतो. लग्नीं असलेल्या राशीचा स्वामी कुंडलींतील मुख्य ग्रह अथवा कारक ग्रह समजावा. मेषलग्न उदीत असेल तर अशा मनुष्याचे कुंडलींत कारक ग्रह मंगळ होईल व त्याचा अंमल मनुष्यावर जास्त दिसून येईल. धनु असेल

तर गुरु या प्रमाणें इतर राशींचें समजावें. मेष व वृश्चिक राशींचा स्वामी मंगळच का असावा ? याचें कारण निसर्गतः मेष व वृश्चिक राशींचा गुणधर्म साधारणपणें मंगळाच्या धर्माप्रमाणें असतात म्हणून मंगळास वरील दोन राशींचे स्वामित्व मिळेल. उदाहरणार्थ—मेषलग्नावर जन्मलेला मनुष्य धीट, शूर, धाडसी, हट्टी निघतो व मंगळाचाही धर्म इतर ग्रहांचा त्याच्याशीं योग अगर दृष्टि संबंध नसता तसाच आहे. वृश्चिक राशी मत्सरी, कपटी, उद्धट, निर्दय, व खुनशी आहे व त्याचप्रमाणेंच कुंडलींत बिघडलेला असल्यास तसेंच गुणधर्म उत्पन्न करितो. शुक्र बिघडला असता जें फल मिळेल, त्या प्रकारचेंच फल वृषभ राशीचें आहे, तूळ राशि, शुक्र बलवान असल्याप्रमाणें फल देते, कर्क राशीचा स्वामि चंद्र आहे कारण ही चर राशी असून चचलता आणि आर्द्रता या राशीमध्यें फार आहे. ज्यां कर्क राशि उदित असतां जन्मणाचें अशीं निश्चय नसतो. चद्र हा सर्व ग्रहामध्यें अतिशय जलद चालणारा व चंचल व जलतत्वकारक आहे म्हणून त्याला कर्क राशीचें स्वामित्व मिळालें. सूर्य हा सर्व ग्रहांचा राजा व पृथ्वीचा चालक आहे म्हणून राशीचक्रांतील सर्वांत उत्तम राजकीय निश्चयी व शूर राशी सिंह तिचे त्यास स्वामित्व मिळालें. स्वग्रहाने खेरीज अशा कांहीं प्रत्येक ग्रहांच्या राशी आहेत कीं त्यांत स्वग्रहाचें खालोखाल बलिष्ठ असतात. त्या राशीस त्या ग्रहाची उच्चस्थानें म्हणतात त्याचा क्रम खालीं दिली आहे. मेष.—सूर्य, वृषभः—चंद्र, कर्कः—गुरु, कन्या.—बुध, तुलाः—शनि, वृश्चिकः—हर्षल, मकर.—मंगळ, मीनः—शुक्र, राहुः—मिथुन.

उच्चस्थानापासून सातवें स्थान हें त्या ग्रहाचे नीच स्थान होय व स्वग्रहापासूनचें सातवें स्थान हें त्या ग्रहाचे डेट्रिमेंट (Detriment) अथवा बलहीन स्थान समजावें. नीच व डेट्रिमेंट असलेले ग्रह अतिशय अपाय करणारे होतात. उदाहरणार्थ—वृषभ व तुला हा राशी मंगळाची बलहीन स्थानें होतील. कारण मंगळाची स्वगृहे मेष व वृश्चिक यांचे विरुद्ध बरील राशी येतात.

राशी	स्वगृह	उच्चांश व उच्च राशी	नीच	(डेट्रिमेंट) बलहीन
मेष	मंगळ	रवि १९	शनि	शुक्र
वृषभ	शुक्र	चंद्र ३	हर्षल	मंगळ
मिथुन	बुध	०	०	गुरु
कर्क	चंद्र	गुरु १५	मंगळ	शनि
सिंह	सूर्य	०	०	हर्षल
कन्या	बुध	बुध १५	शुक्र	गुरु, नेपच्यून
तुला	शुक्र	शनि २१	रवि	मंगळ
वृश्चिक	मंगळ	हर्षल	चंद्र	शुक्र
धनु	गुरु	०	०	बुध
मकर	शनि	मंगळ २८	गुरु	चंद्र
कुंभ	हर्षल व शनि	०	०	रवि
मीन	गुरु,नेपच्यून	शुक्र२७	बुध	बुध

ग्रहांच्या बलाचा विचार करितां आमच्यामतें स्वगृहास ६० गुण दिले तर उच्चराशीस ४५ गुण द्यावे. मित्रग्रहास ३० व समग्रहास १५ व नीच स्थानीं असलेल्या ग्रहांस ० गुण द्यावे.

वरील कोष्टकावरून प्रत्येक ग्रहाचें स्वगृह, उच्च व बलहीन स्थान कोणतें, तें तारतम्यानें करून येईल.

स्वगृहाखेरीज प्रत्येक ग्रहाच्या दुसऱ्या कांहीं राशी असतात, त्यांत ते स्वगृहाचे खालोखाल बलिष्ठ असतात. उदाहरणार्थ :— बुध हा मिथुन, कन्या, तुला व कुंभ ह्या राशींत उदीत असतो. कारण ह्या वायवीय राशी असून बुधाचेही मुख्य धर्म तसेच आहेत. शुक्र आर्द्रतत्त्व व जलतत्त्व राशि ज्या मीन व कर्क ह्यामध्यें बलिष्ठ असतो.

सूर्य व मंगळ हे अग्नितत्त्व मेष, सिंह आणि धनु ह्यांत बलिष्ठ असतात. गुरु हा सौम्य व सत्वगुण प्रधान राशि ज्या कर्क व मीन त्यांत आणि तसेंच तुला, कुंभ राशीही गुरूला चांगल्या आहेत. कुंभ व तुला ह्या दोन राशि शनीला प्रिय आहेत. हर्षल, वृष व वृश्चिक राशींत आनंदांत असतो. नेपच्यूनला शुक्राच्याच राशी प्रिय असतात. (वृषभ–तूळ).

राशीतत्त्वानें इतकी माहिती कुंडलींतील फलें पाहण्यास पुरेशी आहे. ह्याखेरीज जास्त भेद पाहण्याची जरूरी नाहीं. कारण त्याचा फारसा उपयोग होत नाहीं.

कांहीं स्थानीं सायनकुंडली वरून आपणांस असें दिसून येईल, दोन राशींचे मिळून २८ अंश आहेत व कांहीं स्थानीं ३२ अंश व कांहीं स्थानांत ३० अंशच येतात. लग्नाचा अंश कर्कराशींत ११ आहे व शेवट म्हणजे द्वितीय स्थानाचा आरंभ सिंह राशींत १७ अंश आहे. म्हणून तनुस्थान २८ अंशांचें झालें. पचमस्थानाचा आरंभ वृश्चिक १५ अंशांत आहे व शेवट धनु १७ अंशांत आहे. म्हणजे पंचम ३२ अंशांचें झालें. चतुर्थस्थानांत फक्त ३० अंशच आहेत.

आपलें जन्मस्थळ विषुववृत्तापासून जितकें वरती जाईल त्या मानानें कुंडलीतील द्वादशभाव कमीजास्त होतील. आपले देशांत एकादा भाव जास्तींत जास्त ३५ अंशाचा व कमींत कमी २५ अंशाचा होऊं शकेल. इंग्लंड विषुववृत्तापासून पुष्कळ दूर असल्यानें तेथें एका भावांत ४५-४६ अंश येऊं शकतात व दुसऱ्या एकाद्या भावांत १४-१५ अंश येतील.

आपलें जन्मस्थळ ज्या अक्षवृत्तावर असेल त्या स्थळापासून अक्षवृत्ताचे बारा भाग केले तर त्या बारा स्थानांत क्रान्तीवृत्ताचे कमी जास्त भाग पडतील. ख स्वस्तिकापासून क्रान्तीवृत्ताशीं काटकोन करणारी रेषा काढली तर ती रेषा क्रान्तीवृत्ताला ज्या बिंदूंत मिळेल तो बिंदू कुंडलीतील दशम स्थान होय. आपल्या अक्षवृत्ताचे बारा भाग समोरील ख स्वस्तिकापासून क्रान्तिवृत्ताशीं काटकोन करणाऱ्या रेषा काढल्या तर त्या त्या रेषा क्रान्तिवृत्ताच्या ज्या ज्या बिंदूंना मिळतील ते बिंदू म्हणजे भावारंभ होय. जेव्हां एकादा भाव ३० अंशाच्या आंत असतो तेव्हां कधीं कधीं एकच राशींत दोन भावारंभीं असूं शकेल.

ग्रहांचें तात्कालिक बल

एखादा ग्रह केंद्रांत अगर त्रिकोणांत म्हणजे ५ ९ ह्या स्थानीं असतां तो बलिष्ठ समजावा. केंद्रामध्यें लग्न व दशम हीं स्थानें फार महत्त्वाचीं असतात. कारण लग्नाच्या योगानें जन्मकालापूर्वी क्षितिज-बिंदु समजतो. व दशमस्थान जन्मकालचें ख स्वस्तिक आहे. १ आणि १० स्थानानंतर ७ ११ आणि ४ हीं स्थानें उत्तरोत्तर कमी महत्त्वाचीं आहेत.

कुंडलींत सर्वांत षष्ठस्थान हें बलहीन असतें. कारण त्या स्थानांत ग्रह असल्यास त्यांचेपासून फायदा न होतां उलट नुकसानच होतें. सूर्य, चंद्र, आणि मंगळ हे दशम स्थानांत उदीत असतात. शनि व बुध हे लग्नांत बलिष्ठ असतात. तृतीयस्थानही बुधाला चांगलें असतें. शुक्राला पंचमस्थान व हर्षलास नवमस्थान चांगलें असतें.

ग्रहाचे नैसर्गिक शत्रु-मित्रत्व

जन्मकुंडलींत ग्रह परस्परांचे मित्र, उदासीन (सम) व शत्रु असतात. शत्रुमित्रत्व ग्रहांच्या नैसर्गिक गुणावर (तत्त्वावर) अवलंबून असतें. उदाहरणार्थ रवि अग्नीतत्त्व आहे; शनि शीततत्वाचा ग्रह आहे. म्हणून शनि रवीचा शत्रु झाला. जन्मकुंडलींत ग्रहांचे बल पाहतांना शत्रुमित्रत्व पाहणें अत्यंत आवश्यक असतें.

ग्रहांचे नैसर्गिक शत्रु मित्रत्वाचें कोष्टक

ग्रह	मित्र	शत्रु	सम (उदासीन)
रवि	चंद्र, मंगळ, गुरु	शनि, शुक्र	बुध
चंद्र	रवि, बुध	राहु	मंगळ, गुरु, शुक्र, शनि
मंगळ	रवि, चंद्र, गुरु	बुध, राहु	शुक्र, शनि
बुध	रवि, शुक्र, राहु	चंद्र	मंगळ, गुरु, शनि
गुरु	रवि, चंद्र, मंगळ	बुध, शुक्र	शनि, राहु
शुक्र	बुध, शनि, राहु	रवि, चंद्र	मंगळ, गुरु
शनि	शुक्र, बुध, राहु	रवि, चंद्र, मंगळ	गुरु
राहु	बुध, शुक्र, शनि	रवि, चंद्र, मंगळ	गुरु

कुंडली कशी असावी ?

मागील भागांत सांगितलेल्या रीतीप्रमाणें जन्मकुंडली स्पष्ट तयार करावी. जन्मलग्नीं कोणत्याही राशीच्या पहिले २°,३° अंशाचाच आरंभ असेल अगर जन्म लग्नारंभींच एकाद्या राशीचे शेवटचे २°,३° अंश असतील तर जन्मकाल सूक्ष्म असावा. कारण थोड्या वेळांतही कुंडलीचें लग्न बदलेल व लग्नावर तर जन्मणाराचें शारीरिक सुख, स्वरूप व मानसिक स्थिति अवलंबून असते, लग्न जरा चुकलें असेल तर पुढील भविष्य जमणें कठीण. एकाद्या

मनुष्याचा जन्म मिथुन राशीचे अखेरच्या अंशीं असेल व दुसऱ्याचा त्यानंतर थोड्या वेळानें म्हणजे ५–१० मिनिटांत झाला असेल व त्याच्या लग्नारंभा कर्क राशीचे पहिले १२ अंश उदीत असतील तर दोघेही थोड्या अंतरानें जन्मलेले असूनही दोघांच्या स्थिति व प्रकृति अगदीं भिन्न भिन्न असूं शकतील.

अशा लग्न संधींत जर एकाद्याचा जन्म झाला असेल तर दोन्ही लग्नांचें वर्णन व त्याच्या शरीरावर व स्वभावावर होणारा परिणाम, त्याचें वर्णन करून त्यांपैकीं, जन्मणारास कोणतें पटतें तें विचारून जन्मकाल नक्की ठरवावा; लग्नारंभ ५।६ अंशापुढें व २५ अंशाचे आंत असेल तेव्हां ५।१० मिनिटांचें फरकानें कुंडलींत बदल होणार नाहीं. तरीहि होता होईतोंपर्यंत जन्मकाल बिनचूक असावा हें इष्ट असतें.

लग्न ठरविल्यानंतर जन्मकुंडलींत लग्नावर कोणत्या ग्रहांचा दृष्टियोग झाला आहे; कुंडलींत कोणकोणत्या ग्रहांचे कसे व कोणत्या स्थानांत दृष्टियोग झाले आहेत त्याची यादी करावी. कित्येक ग्रह स्वगृहीं, मित्र अगर शत्रु गृहीं आहेत किंवा काय हें पहावें. इतकें सर्व झाल्यानंतर कुंडलींतील फलें सांगण्यास आरंभ करावा. कुंडलीचें नीट मनन केल्याशिवाय फल सांगण्याचें साहस करूं नये.

जन्मलेलें बालक अल्पायुषी आहे किंवा काय ?

ज्योतिषशास्त्रामध्यें आरंभींच मोठा महत्वाचा प्रश्न आहे. मुलाचें आयुष्य आईबापाचे कुंडलीवर व त्याचे स्वतःवर अवलंबून असतें. प्रथम आई-बापाचे कुंडलींतील संतति–स्थानें पहावीं. संततीस अनिष्ट योग असतील तर मूल अल्पायुषी म्हणून समजावें. आईबापाचे कुंडलींत संततिस्थानें बिघडलेली नसतील तर जन्मलेल्या बालकाचे त्याचे ग्रह जन्मकालीं फारच बिघडलेले नसतील तर भीति नाहीं. आईबापांच्या कुंडल्यावरून फक्त

काहीं अपत्यांना नाश झाला असें दिसलें व संततिस्थानें फारशीं बिघडलेलीं नसतील अगर त्याच्या संबंधिस्थानाबद्दल निश्चित मत ठरविता येत नसेल तर मुलांच्या आयुष्याबद्दल खालीं दिल्याप्रमाणें विचार करा.

प्रथम लग्न लग्नस्वामी चंद्र व अष्टम स्थानाचा स्वामी याचा विचार करावा. जर एखादा पापग्रह लग्नाजवळ असेल किंवा लग्नाचा व अष्टमाधिपाचा अशुभ दृष्टियोग असेल व त्याच वेळीं चंद्र, रवि, शनि अथवा मंगळानें दूषित झाला असेल तर जन्मलेलें मूल फार अशक्त समजावें. लग्न स्वामी षष्ठ स्थानांत असून त्याच्यावर अशावेळीं गुरु अथवा शुक्र बलिष्ठ असतील तर मूल मोठ्या प्रयासानें वाचेल. जन्म कुंडलींतच वाईट ग्रह असतील तर त्याच्या दुष्परिणामामुळें मुलें तीन वर्षांचे आंतच मरतात. पुढें ग्रहाच्या परिभ्रमणानें व जन्मकुंडलीशीं भ्रमणकालाच्या ग्रहाच्या वाईट योगानें, मुलांना मरण येण्याचा संभव असतो. कर्क, मकर, व मीन ह्या लग्नीं जन्मलेल्या मुलास जीवनशक्ति फार कमी असते व ती इतर लग्नापेक्षां दुबळी निपजतात. अशा मुलांना केवळ गोचरी पद्धतीनें ग्रह बिघडले असतील तरीहि अपाय होण्याचा संभव असतो. .वृषभलग्नीं जन्म असेल व कुंडलींत कुयोग असेल तर दांत येण्याच्या सुमारास फीटस् वगैरे येऊन त्यांना मृत्यु येण्याचा संभव असतो. सिंह, कन्या, व धनु लग्नावर जन्मलेलीं बालकें सशक्त व काटक असतात, त्यांच्या खालोखाल मेष, मिथुन, तुला, वृश्चिक व कुंभ लग्नावरील मुलें उत्तरोत्तर कमी अशक्त असतात. ज्या दुखण्याच्यायोगानें सिंह, तुला, व धनु लग्नाचे मुलांस विशेष अपाय होऊं शकणार नाहीं तेच आजार कर्क, मकर मीन लग्नावर जन्मलेल्या बालकास अल्पायु करूं शकतात. जगांत एकंदर सिंह, कन्या, तुला, वृश्चिक, व धनु ह्या लग्नावर ज्यास्त मुलें निपजतात. कारण २४ तासांपैकीं, १४ तास ह्या पांच लग्नांनीं अडविलें

आहेत व लोकसंख्येची वाढ होण्यास खरोखर हींच लग्नें कारण आहेत. मुलांच्या मृत्यूचा बरोबर दिवस सांगणें अशक्य आहे. फक्त मूल अल्पायुषी आहे किंवा काय याचा खुलासा मात्र त्याचे व आईबापाच्या कुंडल्यावरून करिता येण्यासारखा आहे.

सूर्याचा इतर ग्रहांशीं योग व दृष्टिसंबंध

सर्व ग्रहांत सूर्य अतिशय बलिष्ठ आहे. त्याच्या वांचून जग चालणार नाहीं. जन्म कुंडलींत रवि लग्नीं असेल तर जन्मणारा दृढनिश्चयी, उदार, उदात्त विचारांचा, गर्विष्ठ परंतु थोर मनाचा असतो. त्याचीं कृत्यें त्याच्या बोलण्याप्रमाणें होतात.

अग्निराशींत लग्नीं रवि असेल तर स्वभाव महत्त्वाकांक्षी असतो व राग लवकर येतो; प्रत्येकावर आपलें वर्चस्व असावें आणि प्रत्येक मनुष्यानें आपल्याला मान द्यावा अशी त्याची इच्छा असते. मनानें गंभीर, बोलणें थोडें, पण कृति जास्त.

पृथ्वीराशींत लग्नीं रवि असेल तर मनुष्य गर्विष्ठ व हट्टी असतो; आणि न समजणाऱ्या गोष्टींतही मत देण्याची त्याची इच्छा असते.

वायुराशींत रवि असेल तर तो न्यायप्रिय, उदार स्वभावाचा असतो व त्यास शास्त्रीय विषयांची गोडी असते.

जल राशींत रवि असेल तर तो शास्त्रीय विषयाचा फार नादी असतो.

वृश्चिक राशींत रवि असेल तर तो उत्तम डॉक्टर अथवा वनस्पतिशास्त्रज्ञ होऊन त्यायोगानें कीर्ति मिळते. रवि लग्नांत असणें संपत्तीलाही बरें.

द्वितीयस्थानीं रवि असणें हा एकप्रकारचा दरिद्रयोग आहे. कारण असा मनुष्य फार उदार व पैशाबद्दल फार निष्काळजी असतो. व त्याचा खर्च वेडावांकडा होऊन पैशाची उधळपट्टी होते. परंतु द्वितीय स्थानाच्या

सूर्याचा इतर ग्रहांशीं योग व दृष्टिसंबंध

सूर्याचा शुक्राशीं योग किंवा त्यावर कोणतीही शुभ दृष्टि असेल तर संगीताची आवड अथवा सुखाची लालसा व विषयासक्त असेल. कापसाचा अगर जवाहिऱ्याचा व्यापार केला तर फायदा होईल. तबला, पेटी वगैरे वाद्यांचा शोकी असेल, गाण्याची आवड असेल, परंतु हा योग अथवा दृष्टिसंबंध कर्क किंवा वृश्चिक राशींत होईल तर वाईट संगत लागेल व दारूचें व्यसन लागेल, स्वभाव तिरसट होईल. जर सूर्य शुक्राचा दृष्टि-संबंध २-५ किंवा ७ ह्या स्थानांत होईल तर मनुष्य चैनींत व बाहेर-ख्यालींत पैसा खर्च करील. दशमांत होईल तर नोकरीमध्यें बढती फार लवकर मिळेल. *चतुर्थ स्थानांत होईल तर धंद्यांत यश मिळेल.*

शुक्र सूर्यापासून ४८ अंशापेक्षा कधींही पुढें नसतो. म्हणून तो फक्त ३० आणि ४५ अंशाची दृष्टि करूं शकेल अथवा रविशीं युति करूं शकेल.

जन्मकुंडलींत सूर्य–बुधाचा योग असेल तर मनुष्य महत्वाकांक्षी व दक्ष होईल. विद्या फार लवकर प्राप्त होईल. रवि–बुधाचा योग गणित-शास्त्री करतो. मात्र वरील योग विशेषतः १–३–९ आणि १० स्थाना-मध्यें झाला पाहिजे. सूर्य बुधाचा *मीन राशींत* योग असेल तर जन्मणाराचें ज्ञान थोडें पण ढोल फार असेल आणि तुटपुंज्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्याची मोठी हांव असेल. सूर्य बुधाचा योग मीन राशींत असणाऱ्या लोकांना प्रत्येक विद्या शिकावीशी वाटते. परंतु कोणतीहि विद्या अथवा कला त्यांना पूर्ण अवगत होत नाहीं. त्यांची "एक ना धड भाराभर चिंध्या" *अशी स्थिति होते ! ह्या योगावर लोक (मीन राशींत)* दांभिक व ढोंगी असे निपजतात.

वृश्चिक राशींत हा योग होईल तर नामांकित डॉक्टर अगर वैद्य होईल. बुध सूर्यापासून २८ अंशापेक्षा कधींही जास्त नसतो. म्हणून त्याची सूर्या-वर कोणतीच दृष्टि नसते.

कुंडलींत सूर्य चंद्राचा योग अगर शुभ दृष्टीसंबंध असेल तर आयुष्य सुखावह जाईल, बढती लवकर मिळेल, मोठ्या लोकांचा आश्रय मिळेल. ज्यांच्या कुंडलींत सूर्य चंद्राचा शुभ दृष्टीसंबंध आहे; त्या लोकांना नोकरी मिळण्याचे कामीं फारच श्रम पडत नाहींत. चंद्र सूर्याची एकमेकांवर दृष्टी स्त्री पुरुषांचे प्रकृतीसही चांगली असते. पुरुषाचे कुंडलींत चंद्र सूर्याचा शुभ दृष्टीसंबंध असेल तर त्याचें लग्न कुलीन व मोठया घराण्यांतल्या व सुस्वभावी स्त्रीशीं होईल.

चंद्र-सूर्याचा अशुभ दृष्टीसंबंध असेल तर पैशासंबंधीं फार अडचणी येतील, नोकरी लवकर मिळणार नाहीं, सट्यांत तोटा येईल व स्त्रियांकडून नुकसान होईल. शिवाय अशा मनुष्याची प्रकृति चांगली राहणार नाहीं फार दिवस ठिकाणीं दुखणीं येतील. सर्दीचे व तापाचे विकार होतील.

चंद्राचीं भावगत फलें

चंद्र लग्नामध्यें द्विस्वभाव अथवा चर राशीत असेल तर फिरण्याचा फार शोक असेल व मन चांगलें असेल. चेहरा लाल असून तेज विशेष असेल. स्त्रियांचा शोकी असून त्यांच्याकडून चांगला मान मिळेल, स्वभाव प्रेमळ व मनमिळाऊ, मित्रास प्रिय व सुसंगतीची आवड असेल. चंद्र लग्नांत असतो तेव्हां आपलेपेक्षां कमी दर्जाचे लोकांवर उपकार करण्याची नेहमीं इच्छा असते. स्वभाव फार मिश्र असतो. लग्नीं अग्निराशीत चंद्र असला तर मोठेपणा मिळविण्याची हांव असते. मन अस्थिर असते. लग्नीं मेष राशीत चंद्र, राहू, किंवा शनीनें दृष्ट असेल तर मनुष्य भ्रमिष्ट होतो. वृश्चिक राशीत तींच फळें मिळतील.

वृश्चिक अगर मकर राशींत चंद्र असतां मनुष्याला वाईट व हलकट संगत लागते. अनेक व्यसनें जडतात व भाषणांत बीभत्स शब्द येतात.

मिथुन, कन्या, तूळ अथवा कुंभ राशींत चंद्र असेल तर, शास्त्रीय विषयांची आवड असते. ज्योतिषशास्त्रांत चांगली प्रगति होते. कर्क अगर मीन राशींत चंद्र असेल तर मनुष्याचा स्वभाव फार उदार व दयाळु असतो. ज्यांच्या कुंडलींत वरील राशींत लग्नीं चंद्र असतो, तीं माणसें सर्वांस प्रिय असतात; व लोकांकडून त्यास चांगला मान मिळतो.

लग्नीं वृषभ राशींत चंद्र असतां मनुष्य विम्मा परंतु उद्योगी व फार मेहनती होतो व हीं लक्षणें सर्व चंद्र बलिष्ट असतां, विशेष दृष्टोत्पत्तीस येतील चंद्र लग्नीं असणाऱ्या माणसाचा स्वभाव साधारणपणें दयाळू, आणि निरुपद्रवी असतो. त्यांना भांडणतंटे आवडत नाहींत. मात्र चंद्र क्षीणबली नसावा, धन प्राप्तीस अनुकूल समजावा.

द्वितीयस्थानीं वृश्चिक व मकर राशीखेरीज चंद्र असतां संपत्तीची वृद्धि असते, कौटुंबिक सौख्य चांगलें लाभतें. वृश्चिक व मकर राशींत चंद्र असेल तर पैशासंबंधीं फार अडचणी येतील व अनेक प्रसंगीं फार नुकसान होईल.

तृतीयस्थानीं चंद्र असतां लहान सहान प्रवास करावे लागतात. शास्त्रीय विषयांची आवड असते. विशेषतः गूढ विद्या आवडतात. या स्थानीं चंद्र बलिष्ठ असेल तर भाऊबंद व शेजारी यांच्यापासून फार मदत होईल.

चंद्र सुख स्थानीं असतां घरें नेहमीं बदलावी लागतील. शेतींत फायदा होईल. या स्थानीं चंद्र फारच बलिष्ठ असेल तर आयुष्य फार सुखावह जाईल व स्वसंपादित इस्टेट मिळेल.

पंचमस्थानीं चंद्र असतां जुगाराचा नाद असतो. नेहमीं सुखांत निमग्न असावें असें वाटतें. या स्थानीं चंद्र जल राशींत असेल तर संतति फार होईल. २–६–९ चंद्र असतां जुळीं मुलें होण्याचा संभव असतो. पंचम

स्थानीं चंद्र असणारी माणसें आपले संततीवर अतिशय प्रेम करितात. कित्येक वेळा फाजील लाडानें मुलास बिघडवितात.

षष्ठस्थानीं चंद्र प्रकृतीस चांगला नसतो. विशेषतः नायकाचें कुंडलीत फार वाईट परिणाम करितो. या स्थानीं चंद्र द्विस्वभाव राशींमध्यें असेल तर मूत्राशयाचे विकार किंवा खोकला उत्पन्न करितो. या स्थानीं चर राशींत चंद्र असेलतर अपचन होऊन पोटांतील इतर रोग होतात. चंद्राची अनिष्ट फलें जेव्हां तो पाप ग्रहाच्या दृष्टींत असेल, तेव्हां समजावी. चंद्र शुभ ग्रह असल्यानें तो षष्ठस्थानीं एकटा असल्यास अनिष्ट परिणाम करूं शकत नाहीं. क्षीण बली चंद्र रोगकारक असतो.

सप्तमस्थानीं चंद्र जल राशींत असेल तर विवाह लवकर होईल व वैवाहिक सौख्य चांगलें मिळेल. मागीचे व्यापारांत किंवा दिवाणी दाव्यांत फायदा होईल. वारंवार प्रवास करावेसे वाटतील व प्रवास करण्याची आवड असेल. वृषभ, कर्क, तूळ, धनु, कुंभ अथवा मीन राशींत या स्थानीं चंद्र शनीचे शुभ दृष्टींत असेल तर पत्नि फार प्रेमळ, मेहनती व संसारदक्ष मिळेल व असा मनुष्य स्वतः सुद्धां संसारांत फार दक्ष असेल.

अष्टमस्थानीं चंद्र विशेष महत्वाचा नाहीं. तो शुभ राशींत असेल तर लग्नसंबंधापासून द्रव्य मिळेल. या स्थानीं चंद्र, शनि अगर मंगळ यांचे अशुभ दृष्टींत अगर त्यांनीं युक्त असेल तर एकदम मृत्यु येईल. ह्या स्थानीं चंद्र असलेले अधिकारी ते कोणत्याही दर्जाचे असोत, लांचखाऊ निश्चित असतात.

नवमस्थानीं चंद्र असेल तर पुष्कळ प्रवास होतील. शास्त्रीय अध्ययनाची गोडी लागेल, हातून मोठमोठीं कृत्यें होतील व त्या योगानें नांव अजरामर होईल. धार्मिकपणा असणार नाहीं. स्वभाव सन्देहाईक व लहरी होईल. या स्थानीं चंद्र बलिष्ठ असेल तरीही बायकोकडून संपत्ति मिळेल.

दशमस्थानीं चंद्र असणें संपत्तीस व ऐश्वर्यास चांगलें. या स्थानीं चंद्र असतां भरपूर पैसा मिळतो. व्यापार धंदा असतो.

एकादशस्थानीं चंद्र बलिष्ठ असेल तर मित्र मिळतील, परंतु तो हीनबली असेल तर त्यांच्यापासून सुख न होतां त्रास होईल.

द्वादशस्थानीं चंद्र असतां प्राप्तीपेक्षां खर्च जास्त होतो. परंतु या स्थानीं चंद्र असणें संपत्तीस चांगलें नसते. वृश्चिक अगर मकर राशीला चंद्र या स्थानीं असेल तर मनुष्य रोगी, लबाड असतो, हलक्या व कुलहीन स्त्रियांचे संगतीनें पैशाची हानि होते.

मंगळाची भावगत फलें

लग्नामध्यें मंगळ अग्निराशीस असेल तर मनुष्य शूर, निश्चयी, मेहनती, दुराग्रही, उदार, रागीट व हट्टी होतो. तो पृथ्वी राशीमध्यें लग्नीं असता लोभी, अपमतलबी, दुसऱ्याचा द्वेष करणारा, स्वतःचे कामाबद्दल फार तत्पर, धंदा बदलण्याची आवड असणारा व एका विषयांत कधींही मन न घालणारा असा होतो. लग्नीं जलराशीमध्यें मंगळ असेल तर असा मनुष्य उत्तम पोहणारा असतो व दर्यावर्दीपणांत निपुण असतो; परंतु त्यास अनेक दुर्गुण जडलेले असतात. विशेषतः कर्क व मीन राशींत या या स्थानीं मंगळ असेल तर जन्मणारा अगदीं नीतिभ्रष्ट व व्यभिचारी निघतो.

वृश्चिक राशींत या स्थानीं मंगळ असेल तर उत्तम डॉक्टर किंवा वनस्पतिशास्त्रज्ञ होतो. मंगळ स्वभावतः फार शूर, धाडशी, स्वतंत्र, महत्वाकांक्षी व हेकेखोर आहे. लग्नीं मंगळ असतां बहुतकरून तोंडावर अगर डोक्यावर कांहीं तरी व्रण अथवा चिन्ह असतें. स्वभाव तामसी असतो.

धनस्थानीं कोणत्याही राशींत मंगळ असतां मनुष्य फार निष्काळजी व फार उधळ्या निघतो. अशा मनुष्याचे हातीं केव्हांहीं पैसा टिकत नाहीं.

त्यास नेहमीं खर्चाची पंचाईत असते. या स्थानीं मंगळ बलिष्ट असेल तर पैसा पुष्कळ मिळेल परंतु शिल्लक रहाणार नाहीं.

तृतीयस्थानीं मंगळ असता वारंवार प्रवास करावे लागतील. येथें मंगळ अग्निराशीत असेल तर प्रवासांत अपघात होतील. तृतीयस्थानीं मंगळ असता स्वभाव फारच हट्टी असतो. त्यामुळें शेजाऱ्यापाजाऱ्याशीं मुळींच पटत नाहीं.

चतुर्थस्थानीं मंगळ असेल तर वृद्धापकाळीं फार हाल सोसावे लागतील. चतुर्थस्थानाचा मंगळ म्हणजे एक दारिद्र्ययोगच आहे. मातृसुख चांगलें मिळणार नाहीं. चतुर्थस्थान हें मंगळास फार अनिष्ट असतें. या स्थानीं मंगळ असता त्याची नुकसान करण्याकडे जास्त प्रवृत्ति दिसून येते. नेहमीं असमाधान असते.

पंचमस्थानीं मंगळ असता संतति दुर्गुणी निपजते. त्याच्यापासून आई-बापांस त्रासच सोसावा लागतो. या स्थानीं मंगळ असणाऱ्या लोकांचीं अपत्यें लहानपणीं बरींच मरतात. पंचमांत मंगळ असेल तर ऐषआराम.मांची आवड असते. जुगाराचा नाद असतो व त्यामुळें नुकसान होतें. स्त्रियांचे कुंडलीत या स्थानीं मंगळ पापग्रह असेल तर त्यांचे पाऊल वाईट मार्गांत पडण्याचा फार संभव असतो. निदान विषयेच्छा जास्त असते.

षष्ठस्थानीं स्थिर राशींमध्यें मंगळ असेल तर घशामध्यें दर्द होतें. गुतखडा होण्याचा संभव असतो. द्विस्वभाव राशींत मंगळ असेल तर क्षयरोग होण्याची भीति असते. शिवाय अशा माणसाची छाती व फुप्फुसें फार अशक्त असतात. चर राशीमध्यें मंगळ असेल तर जळण्या-पोळण्याची फार भीति असते. या स्थानांत मंगळ असणाऱ्या माणसाला सुख मिळत नाहीं. नोकर चोरटे व उद्धट मिळतात. शस्त्रक्रियेचे प्रसंग येतात.

सप्तमांत मंगळ असेल तर वैवाहिक सुख मिळणार नाहीं. एकं वेगळे रहावयाचे प्रसंग येतील. नेहमीं उभयतांमध्यें भांडणें धंद्यामध्यें उघड शत्रु फार होतात, कोर्टांतील कामांत अपयश मार्गीचे धंद्यांत नफा होत नाहीं.

अष्टमांत मंगळ असणाऱ्या मनुष्यास मुद्दाम भांडण उकरून त्याची सवय असते. त्यामुळें त्याचें नुकसान होतें. स्त्रियांच्या कुंडलींत अष्टमांत असेल तर वरील प्रकार दिसून येतो

अष्टमांत मंगळ असेल तर लग्नांत हुंडा वगैरे कांहीं मिळणार पत्नी फार उथळी मिळण्याचा संभव असतो

नवमामध्यें मंगळ असेल तर हेकेखोर, दुसऱ्याचा द्वेष करणारा खोटें बोलणारा मनुष्य निघतो. त्याची धर्माकडे मुळींच प्रवृत्ती न मोठ्या प्रवासांत अपघात होण्याचा संभव असतो विशेषत जलरा नवमस्थानीं मंगळ असेल तर प्रवासांत अपघात होण्याचा संभव आहे.

दशमांत मंगळ असला तर मनुष्य फार शूर व धाडसी होतो मोठा अधिकार मिळतो, लोकांवर वजन असतें सारासार विचार असते मात्र स्वभाव फार निर्दयी असतो हा सत्ताधिकाराचा असतो.

एकादशस्थानीं मंगळ असला तर दोंगी व लफंगे मित्र भेटत त्यांचेकडून पैसा आणि अन्न यांची हानी होते हा स्थानांत म असणाऱ्या लोकांनीं आपले मित्राबद्दल सावध असावें.

द्वादशस्थानांत मंगळ असेल तर गुप्त शत्रुपासून फार त्रास होतो. लुटारू व हिंस्र पशू यांच्यापासून भीति असते. हा स्थानीं मंगळ शा दृष्ट असणें हा कैदेचा योग आहे

मंगळाचा इतर ग्रहांशीं योग व दृष्टिफलें.

कुंडलींत " मंगळ-सूर्याचा " योग असेल तर जन्मणारा धीट अविचारी, दृढनिश्चयी, हट्टी, लवकर रागवणारा, उदार व स्वातंत्र्यप्रि असतो. जलराशींत " मंगळ-सूर्याचा " योग झाला तर दारूचें व्यसन लागतें. शिवाय नेहमीं हिंवताप आणि सर्दीचे विकार होतात. तरीपण साधारणपणें जलराशींत " मंगळ-सूर्याचा " योग शरीर बळकट करितो.

कोणत्याही ग्रहाचा इतर ग्रहाशीं योग त्याचे अशुभ दृष्टीपेक्षां फार चांगला असतो. अशुभ दृष्टीनें जितकें नुकसान होतें तितकें वाईट ग्रहाचे योगानेंही होत नाहीं. बायकांचे कुंडलींत " सूर्य-मंगळाचा " योग चांगला नाहीं. त्यांना पति आडदांड आणि मूर्ख मिळतो व त्याचा स्वभाव फारच वाईट असतो. कोणत्याही उपायानें त्याची मर्जी सांभाळणें अशक्य असते. अशा बायकांना संसारांत सुख लाभत नाहीं. सूर्य मंगळावर शनीची दृष्टी असेल तर नवऱ्याला अकस्मात मृत्यू येईल.

मंगळावर रवीची दृष्टी असेल (३०, ६० अथवा १२० अंशांची) : जन्मणारा उदार व शूर होतो. शारीरिक सामर्थ्य फार असतें, प्रकृति कोप असून दीर्घायु होतो. त्याला त्याच्या अधिकाऱ्याकडून मान मिळतो बढती लवकर होते.

स्त्रियांचे कुंडलींत वरील प्रकारच्या मंगळाचा व सूर्याचा शुभ दृष्टीसंबंध ल तर त्यांना पति ऐश्वर्यवान् व सुस्वभावाचा मिळतो.

" मंगळ शुक्राचा " योग किंवा अशुभ दृष्टीसंबंध (अशुभ दृष्टी .-९०-१३५-१५० व १८० अंशांची) कुंडलींत " मंगळ चा " योग अथवा अशुभ दृष्टी संबंध असेल तर मनुष्य नीतिभ्रष्ट , व सुखासक्त असतो. त्याचे विचार फार कोते व दुष्टपणाचे असतात.

अशा मनुष्याचा पैसा चैनींत व नाईरखयालींत फार जातो. दारूचें व्यसन लागतें व त्यामुळें शरिराची हानी होते.

स्त्रियांचे कुंडलींत असा योग असेल तर त्यांना वाईट संगत लागून त्यांचें जन्माचें मातेरें होतें.

कुंडलींत मंगळ शुक्राचा शुभदृष्टी संबंध असला तर मनुष्य टापटीपीनें रहाणारा, ऐटबाज, आपलें व्यंग कोणास कधींही न दाखविणारा, विषयी होतो. स्त्रियांकडून त्यास मान मिळतो. अशा मनुष्यांना बायकामध्यें बसून गप्पा मारण्याची मोठी आवड असते, स्वभाव बेफिकीर असतो. स्त्रियांचे कुंडलींत " मंगळ शुक्राचा " शुभ दृष्टीसंबंध असला तर त्याचा परिणाम अशुभ दृष्टीप्रमाणेंच अनिष्ट समजावा. अशा स्त्रिया नटव्या असतात.

" मंगळ–बुधाचा " योग अथवा अशुभ दृष्टीसंबंध—हा योग कुंडलींत असणारीं माणसें फार चलाख, अतिशय चतुर असतात. त्यांना वादविवाद करण्याची फार आवड असते. खोटी साक्ष देणें, खोट्या बातम्या पसरविणें आणि खोटें दस्तऐवज करणें अशा कित्येक भयंकर गोष्टी त्यांच्या अंगवळणी पडलेल्या असतात. दुसऱ्यावर टीका करण्याची फार आवड असते चांगल्या अथवा वाईट कामांत आपण पुढारी असावें ही त्यांची इच्छा असते. वरील दुर्गुण काढून टाकले असतां बाकी मंगळ बुधाचा योग वाईट नाहीं. या योगावर जन्मलेलीं माणसें फार कुशल निपजतात.

" मंगळ–बुधाचा " शुभ दृष्टीसंबंध असेल तर मनुष्य गणिती व फार बुद्धिमान होतो. बोलण्यांत अतिशय चतुर व मार्मिक असतो. मात्र राग फार लवकर येतो शिल्पकला आणि वनस्पतिशास्त्र यांची आवड असते. व ज्या कला हस्तकौशल्यानें साध्य होण्यासारख्या असतात त्या त्याला अवगत होतात. अशा माणसास आळस मुळींच आवडत नाहीं, कांहींना कांहींतरी करावेंसें वाटतें. असे लोक उत्तम खेळाडू होतात

" मंगल–चंद्र " योग किंवा अशुभ दृष्टीसंबंध असेल तर मनुष्य माथेफिरू, अविचारी व मूर्ख होतो. कोणतेही चांगलें अथवा वाईट कृत्यांत विचार न करितां मन घालतो. अशा मनुष्यास बाहेरख्यालीपणाचें व्यसन लागून उपदंशादि भयंकर रोग जडतात आणि पैशाचा अपव्यय होतो. " चंद्र–मंगळाचा " योग असणारीं माणसें शूर, उदार, मेहनती परंतु खोटें बोलण्यांत पटाईत असतात. पुरुषाचे कुंडलींत हा योग असला तर लग्नापासून सुख होणार नाहीं. पत्नी मचाळ मिळेल. स्त्रियांचे कुंडलींत चंद्र मंगळाचा योग अथवा अशुभ दृष्टीसंबंध असेल तर त्याची प्रकृति चांगली नसते. वारंवार दुखणीं होऊन शरीर क्षीण होतें. स्वभाव भाविक असतो.

चंद्र–मंगळाचा शुभ दृष्टीसंबंध असेल तर मनुष्य शूर, धाडसी, निश्चयी होतो. व्यवहारांत चतुर असतो व दुसऱ्यापासून फायदा कसा करून घ्यावा ही हातोटी चांगली साधलेली असते. कधीं कधीं ऐषाराम करावासा वाटतो. इंद्रियसुखांत दिवस घालवावेसें वाटतें; पण तशी स्थिती फार थोडे दिवस रहाते. स्त्रियांचे कुंडलींत मंगळ चंद्राची शुभ दृष्टी त्यांचे प्रकृतीस फार चांगली असते. प्रकृति निकोप असून विचार प्रगल्भ असतात. शरीर चपळ असतें. मनापासून काम करण्याची हौस असते.

बुधाचीं भावगत फलें

लग्नामध्यें बुध असेल तर मनुष्य बोलण्यांत फार चतुर होतो. बुध अग्नि राशींत असेल तर हुशार परंतु अस्थिर असतो. लवकर रागावणारा, नाटकाचा शोकी, चांगला वक्ता आणि उत्तम गणितज्ञ. कल्पनाशक्ति अगाध असते. अग्निराशीपैकीं बुधाला, धनुराशीपेक्षां मेष व सिंह अधिक चांगल्या असतात. धनुराशीमध्यें बुध असेल तर मनुष्य फार उतावळा व बोलभाट होतो. त्याच्या बोलण्यांत काहीं अर्थ नसतो. वृषभ अगर मकर

राशींत बुध असेल तर चचल मनाचा, ढोंगी व दुसऱ्याचा द्वेष करणारा होतो. असा मनुष्य फार आपमतलबी असतो आणि त्याचे सर्व विचार स्वत:पुरते असतात. दुसऱ्याचे सुखाची त्यास मुळींच पर्वा नसते.

मिथुन, कन्या, तूळ किंवा कुंभ राशींत बुध असेल तर बुद्धी फार तीव्र असते आणि प्रतिभाशक्ति चांगली असते. शास्त्रीय विषयाची आवड असते. वक्तृत्व फार, बोलणें मार्मिक व प्रतिपक्षास वर्मी लागणारें असतें. वृश्चिक राशींत बुध असेल तर उत्तम डॉक्टर होतो. अनेक प्रकारच्या प्रयोगाची आवड असते. स्वभाव मात्र वाईट असतो. वृश्चिक राशींत बुध असणाऱ्या मनुष्याशीं फार जपून वागावें.

कर्क किंवा मीन राशींत लग्नीं बुध असेल तर जन्मणारानें मन फार चचल असते. विचार फार कुजट असतात. मनाचा कोतेपणा असतो. अशा माणसाचे जिभेला हाड नसते. तोंडांत येईल तें बोलून टाकतो. बोलतांना मागचा पुढचा विचार करीत नाहीं. मीन राशींत लग्नीं बुध असणाऱ्या माणसास स्वत:चे ज्ञानाबद्दल फार घमेंड असते. मीन राशींत लग्नीं बुध असणाऱ्या माणसावर कधींहि विश्वास ठेवूं नये.

द्वितीयस्थानीं बुध विशेष महत्त्वाचा नाहीं. फक्त वाचाळता उत्पन्न करितो व तो जर शुभ राशीस व शुभ ग्रहदृष्ट असेल तर संपत्ति मिळते.

तृतीयस्थानीं बुध असेल तर ज्योतिष व वैद्यकीची आवड असते व प्रत्येक अद्भुत कला शिकावीशी वाटते. (विशेषत वायुराशींत असेल तर) शिवाय प्रवास फारच होतात. या स्थानीं बुध, कर्क किंवा मीन राशींत असेल तर मनाला स्वस्थता कधींही मिळणार नाहीं त्यावेवर शनीची दृष्टि असेल तर मात्र त्याचे विरुद्ध फल दृष्टोत्पत्तीस येईल.

चतुर्थस्थानीं बुध असेल तर अत:करण दयार्द्र असते. विद्येचा व्यासग असतो आणि सुखाचे दिवस मनुष्याचे आयुष्याचे अखेर येतात. या स्थानीं बुध महत्त्वाचा नाहीं.

पंचमस्थानीं बुध बुद्धिमत्ता चांगली ठेवतो. विद्येंत यश देतो. विचार प्रगल्भ असतात. संसारांत ऐहिक सुख साधारण बरें मिळतें. संततीसुखाला या स्थानांत बुध अनुकूल असतो.

षष्ठस्थानीं बुध आरोग्याचे बाबतींत मानसिक आजार निर्माण करतो. मज्जातंतु दुर्बल असतात. आरोग्यासंबंधीं कांहींतरी कुरकुर असते. आरोग्या-खेरीज इतर बाबतींत षष्ठस्थानांत बुध बरा असतो. नोकर इमानी मिळतात. नोकरी कारकुनी दर्जाची मिळते. किरकोळ उद्योगधंदे, कमिशन एजन्सी वगैरे धंदे यशस्वीरीतीनें चालविता येतात.

सप्तमस्थानीं बुध असल्यास विवाह साधारणपणें लवकर होतो. पत्नी बुद्धिमान मिळते. परंतु वैवाहिक सुखास सप्तमस्थानांतील बुध शुभ फळें निर्माण करीत नाहीं. किरकोळ प्रवास पुष्कळ होतील. उद्योगधंदे, व्यापार भागीदार पद्धतीनें केले जातील व त्यांत यश मिळेल.

अष्टमस्थानीं बुध असेल तर त्याचें कांहींच महत्त्व नाहीं. लहानपणीं मात्र बरींच दुखणीं काढावीं लागतील.

नवमस्थानीं बुध असेल तर मनुष्य फार हुशार, आनंदी, शास्त्रीय विषयाचा शोकी व धार्मिक असा होईल. अद्भुत व गूढ विद्या शिकाव्याशा वाटतील. या ठिकाणीं बुध चर राशीला असेल तर प्रवास होतील.

दशमस्थानीं बुध असेल तर ग्रंथ लिहून पैसे मिळतील. व्यापार केला असता फायदा होईल. बुद्धी फार तीव्र, बोलणें मार्मिक व स्पष्ट असेल. वायु राशींत बुध असला तर चांगला वक्ता होईल.

एकादशस्थानीं बुध असेल तर मोठमोठ्या विद्वान लोकांची मैत्री संपादन होईल व त्यावर शुभ ग्रहांचीदृष्टि असेल तर त्यांचेपासून मदत होईल. या ठिकाणीं बुध अशुभ ग्रहदृष्ट असेल तर मित्रांपासून तोटाच होईल.

द्वादशस्थानीं वृषभ, वृश्चिक किंवा मकर राशींत बुध असेल तर शत्रु गुप्तपणानें नाश करण्याचा प्रयत्न करतील. इतर राशींमध्यें बुध या स्थानीं असला तर चांगला असतो. धंद्यामध्यें यश मिळतें आणि वाणी अस्खलीत असते.

बुधाचा इतर ग्रहांशीं योग व दृष्टिफलें

चंद्र-बुधाचा योग किंवा शुभ-दृष्टिसंबंध असेल तर मनुष्य बुद्धीनें फार चलाख व कर्तृत्ववान असतो. विशेषतः हा योग वायुराशीमध्यें झाला पाहिजे. बुधाला १-३-९-१० हीं स्थानें फार चांगलीं असतात. लग्न मिथुन, कन्या, तूल, धनु अथवा कुंभ असेल तर मनुष्यास अनेक भाषा येतात व तो परक्या भाषेंतसुद्धां चांगलें बोलूं शकतो.

चंद्र-बुधाचा अशुभ दृष्टिसंबंध असेल तर दुसऱ्याची पाठीमागें निंदा करण्याची सवय असते. खोटें बोलणें आणि दुसऱ्याची निंदा करणें हे मुख्य दुर्गुण आढळून येतात परंतु बुद्धि फार चांगली असते. चंद्र बुधाचा अशुभ दृष्टिसंबंध असून त्यांचेवर एकावर शनीची दृष्टि असेल तर मनुष्य अप्रामाणिक होतो व तो आपले बुद्धीचा व्यय वाईट कामांत करीत असतो.

शुक्राचीं भावगत फलें

लग्नामध्यें शुक्र असेल तर मनुष्य सुखभावाचा, नेहमीं आनंदी, विषयी व स्त्रीलंपट, भाग्यवान् व चैनी होतो. स्वभाव उदार असतो. शुक्राला वृषभ, तूल, कुंभ, मकर आणि मीन ह्या राशी चांगल्या असतात. मेष, कन्या, धनु ह्या राशींत शुक्र बलहीन असतो. विशेषत वृश्चिक राशींत शुक्र असणारी माणसें ठकबाज, दारूबाज आणि नीतिभ्रष्ट असतात. त्यांवर मंगळाची दृष्टि असेल तर वरील फलें चांगलीं अनुभवास येतील. इतर राशींमध्यें शुक्र असून त्यावर मंगळाची दृष्टि असेल तर मनुष्य

उत्तम पेंटर, चांगला गाणारा आणि उत्तम नट होतो. आवाज फार मधुर असतो. नाटकाचे धंद्यांत त्याला यश येते. इतर लोकांना वश करून त्यांचेपासून कसा फायदा करून घ्यावा हें चांगलें साधतें. शरीरप्रकृति चांगली नसते, कारण अशा माणसास नियमितपणा ठाऊक नसतो.

द्वितीय स्थानीं शुक्र असणें विद्येत व संपत्तींत चांगलें असते परंतु या स्थानीं शुक्र असतां अत्तरें, कपडा, दागदागिने वगैरेकडे पैशाचा फार व्यय होतो. स्वभाव फार कामी असतो. उधळेपणाची संवय असते. म्हणून या स्थानांत शुक्र बलिष्ठ असून शुभग्रहदृष्ट असेल तरच मनुष्य श्रीमंत होईल. गायनाची आवड असते.

तृतीय स्थानीं शुक्र असेल तर नातेवाईकांकडून मदत मिळेल. रेल्वेच्या प्रवासांत सुख होईल. स्वभाव उल्हासी असेल. कविता करण्याचा फार नाद असतो.

चतुर्थस्थानीं शुक्र असेल तर मनुष्याचा पुढील भाग सुखदायक होतो. या स्थानीं शुक्र बलिष्ठ असेल तर वडिलोपार्जित इस्टेट मिळते.

पंचमस्थानीं शुक्र असेल तर मनुष्य फार सुखासक्त व स्त्रियांचे संगतींत आनंद मानणारा असा होतो. नाटकें व तमाशे पाहण्याची आवड असते व त्यामुळे प्रकृति बिघडते. पंचमस्थानीं शुक्र असतां कुटुंब मोठें असतें व मुली फार होतात. संतति सुस्वरूपच आज्ञाधारक असते व त्यापासून जन्मणारास सुख होतें. या स्थानीं शुक्र बलिष्ठ असेल तर व्यापारांत फार प्राप्ति होते, सट्टे, वायदे यशस्वी होतात.

षष्ठस्थानीं शुक्र असणें प्रकृतीला बरें असतें. नोकर हुशार व आज्ञाधारक मिळतात व त्यांचेपासून सुख मिळते.

सप्तमस्थानीं शुक्र वैवाहिक सौख्य देतो. स्त्री स्वरूपवान मिळते. [वृश्चिक अगर मकर राशींत शुक्र नसला तर]. वृश्चिक अगर मकर

राशीत शुक्र असेल तर व्यभिचार-सुख चांगलें मिळतें. सप्तमस्थानीं शुक्र असेल तर धंद्यात यश मिळतें. भागीचे व्यापारांत नफा राहतो.

अष्टमस्थानीं शुभ राशीस असेल तर हुद्दा वगैरे मिळेल व गुप्त द्रव्य मिळेल. स्त्रीधन व वारसा मिळेल.

नवमस्थानीं शुक्र असेल तर प्रवास सुखकारक होतील, कर्मठपणा अंगीं विशेष असेल. स्वभाव आनंदी होईल, काव्य करण्याची आवड असेल व सासऱ्याकडून मदत मिळेल

दशमस्थानीं शुक्र असेल तर आयुष्य सुखांत जातें. पितृसुख चांगलें असतें. लोकांत मानमान्यता होते नोकरींत लवकर लवकर प्रमोशन होतें स्वभाव फार शांत आणि मनमिळाऊ असतो. अशा योगावर जन्मलेल्या मनुष्यास भांडणतंट्याचा कंटाळा असतो. दशमस्थानीं शुक्र बलवान असतां स्त्री मोठ्या कुलांतील व श्रीमंत मिळते

एकादशस्थानीं शुक्र असेल तर चांगले मित्र मिळतील, मित्रमंडळींत मान मिळेल, व त्यांचेकडून वेळीं प्रसंगीं मदत मिळेल, पैशाची अडचण पडणार नाहीं.

द्वादशस्थानीं शुक्र असणें फार महत्वाचें नाहीं. तरीही या स्थानांतील शुक्र संपत्तीला प्रतिकूल नसतो मात्र अशा माणसास गुप्त शत्रु फार असतात. शुक्रावर शनीची पाप दृष्टि असेल तर फार जपावें लागतें कारण विश्वासघातानें नुकसान होण्याची भीति असते. चैनीमध्यें पैशाचा अपव्यय होतो

शुक्राचा इतर ग्रहांशीं योग व दृष्टिसंबंध

जन्म कुंडलींत शुक्र-बुधयोग अगर शुभ दृष्टिसंबंध असेल तर मनुष्य फार चैनी, गायनाचा शोकी, काव्य करणारा, शास्त्रीय विषयाचा नादी असतो. हा योग लग्नांत होईल तर अशा मनुष्याचे अंगीं कलेत चांगलें

असतें. ३–९ किंवा १० स्थानांत हा योग होईल तर वाचनाची गोडी असते. साहित्यशास्त्र व काव्य यांची विशेष गोडी असते. शुक्र व बुध हे एकमेकांपासून ७६ अंशांवेक्षा जास्त अंशावर नसतात, म्हणून ते एकमेकांशी ३०–४५–६०–७२ अंशांचे दृष्टियोग करूं शकतील. शुक्र-चंद्राचा योग अथवा शुभ दृष्टिसंबंध असेल तर मनुष्य फार टापटीपीनें राहणारा, पोषाखाची फार काळजी घेणारा, अत्तराचा व फुलाचा शोकी होतो. त्याची राहणी फार व्यवस्थेशीर असते. लग्न लवकर होतें, व स्त्री स्वरूपमान मिळते. शुक्र चंद्राचा योग कुंडलींत असेल तर आयुष्यांतील बहुतेक दिवस सुखांत जातात. स्त्रियांचे कुंडलींत असा योग असतां त्यांचें अंगीं टापटीप व व्यवस्था चांगली असते. अशा बायका फार सुज्ञ व व्यवहारचतुर असतात. ज्या राशींत हा योग घडेल त्या राशीचे गुणधर्मा-वरून या योगाचें कमीजास्त महत्व समजावें.

जन्म कुंडलींत चंद्र शुक्राचा अशुभ दृष्टिसंबंध असेल तर गलिच्छ, आळशी, मलीन कपडे घालणारा व अशक्त होतो. बहुतकरून अशा लोकांस दारूचें व्यसन असतें. स्त्रियांचें कुंडलींत चंद्र शुक्राचा अशुभ दृष्टिसंबंध होईल तर त्यांची प्रकृति अशक्त राहील. अशा स्त्रियांना प्रदर व पीडीतार्तवाची व्यथा असण्याचा संभव असतो.

शनीचीं भावगत फलें

जन्मकालीं लग्नांत शनि असेल तर जन्मणारा भित्रा पण धोरणी व बेविश्वासू असतो. त्याला फार बोलणें आवडत नसतें. दुसऱ्याचा द्वेष करण्याची व सूड घेण्याची इच्छा असते. लग्नीं शनि असलेला मनुष्य लोभी असतो. त्याला दुसऱ्याचा उत्कर्षसहन होत नाहीं. अग्निराशींत शनि असेल तर त्याचे स्वभावांत फार अंतर पडेल. अग्निराशींत शनि असलेला मनुष्य मोकळ्या मनाचा व सरळ स्वभावाचा असतो. त्याचा व्यवहार

प्रामाणिकपणाचा असतो. मात्र दुसऱ्याशीं भांडण व वादविवाद करण्याची संवय असते. पृथ्वीराशींत विशेषतः वृषभराशींत शनि असेल तर मनुष्य तऱ्हेवाईक, मद, धिम्मा व द्वेषी असतो. पञ्चमामध्यें लग्नीं शनि असेल तर फार चोकस असतो. लग्नामध्यें शनि असतां डोळे लहान असतात.

मकरराशीमध्यें लग्नीं शनि असेल तर जन्मणारा मनुष्य वादविवादांत प्रवीण, दांभिक, लबाड, अपमतलबी व मेहनती होतो. वायुराशीमध्यें शनि फार उत्तम फलें उत्पन्न करतो. या राशींत लग्नीं शनि असेल तर मनुष्य विचारी, अभ्यासी व पैशाचे व्यवहारांत चोख आणि संचारदक्ष, धार्मिक, महत्त्वाकांक्षी होतो. परंतु स्वार्थाकडे त्याचें विशेष लक्ष असतें.

तुलाराशीपेक्षा सुद्धां मिथुन व कुंभ ह्या राशी शनीला फार चांगल्या असतात. कारण तुलराशीमध्यें शनि असतां मनुष्य फार गर्विष्ठ असतो. त्यामुळें समाजाला त्याच्या विद्वत्तेचा फारसा उपयोग होत नाहीं. कर्क व मीनराशीमध्यें लग्नीं शनि असेल तर बुद्धीनें जड, निराश व उद्विग्न झालेला, आळशी व अमंगळ मनुष्य असतो. मात्र धर्मावर अंधःश्रद्धा असते. लग्नीं वृश्चिक राशींत शनि असेल तर मनुष्य फार कावेबाज असतो. अशा माणसावर केव्हांहि विश्वास टाकू नये.

बहुतकरून शनीचा स्वभाव लाजाळू, एकांतप्रिय व मनाशींच विचार करणारा, उदासवृत्तीचा व लबाड असतो. स्वतःचें कृत्याबद्दल शंका कुशंका येतात. राहणी फार गबाळी असते; धार्मिक मतें, तऱ्हेवाईक आणि तिरसट आणि विचित्र असतात. कल्पनाशक्ति चांगली असते. पृथ्वी अगर वायु-राशी खेरीज इतर राशीमध्यें शनि असला तर वाणीमध्यें अडखळण्याचा दोष असतो. स्वतःचे कामांत तत्पर, दुसऱ्याबद्दल कळकळ न बाळगणारा, कोणत्याहि सुधारणा करण्याची आवड नसते.

द्वितीयस्थानीं शनि असेल तर सांपत्तिक अडचणी येतील. धंद्यांत किंवा व्यापारांत यश मिळणार नाहीं. या स्थानीं शनि शुभराशींत असला

तरी निर्वाहाकरितां फार मेहनत करावी लागेल. धनस्थानीं शनि वाईट राशीला असेल तर केव्हांहि सांपत्तिक स्थिति सुधारणार नाहीं; नेहमी ओढाताण होईल. अशुभ शनि या स्थानांत दारिद्र्य दर्शवितो.

तृतीयस्थानीं शनि असेल तर प्रवासांत नुकसान आणि अपघात दर्शवितो. प्रवास सुखकर होणार नाहीं. भाऊबंदांत कलह लागून नुकसान होईल.

तृतीयस्थानीं शनि असणारा मनुष्य विचारी, ज्योतिष जाणणारा असा होतो.

चतुर्थस्थानीं शनि असेल तर जन्मतः मातेस आजार किंवा लहानपणीं मातेचा मृत्यु होईल. या स्थानांत शनि असतां मनुष्याचें आयुष्य काळजींत आणि दारिद्र्यांत जातें. परंतु तो जर तूल, मकर अथवा कुंभ राशींत असेल तर जमीनजुमला मिळेल. शेती व गुरेंढोरें यांचेपासून फायदा होईल -आयुष्य सुखकर होईल. मात्र असा माणूस फारच लोभी असतो. मरेपर्यंत -त्याला पैशाची हाव सुटते.

पंचमस्थानीं शनि, मिथुन, कन्या, तूल अथवा मकर राशींत असतां संततीचा अभाव समजावा. इतर राशींत असेल तर संतति होईल, परंतु त्यापासून सुख होणार नाहीं. मुलें व्यसनी, मूर्ख व आईबापास न जुमानणारीं अशीं होतील, त्यांचेपासून सुख मिळण्याऐवजीं दुःखच प्राप्त होईल. पंचमस्थानीं कोणत्याहि राशींत शनि असतां बहुतकरून मुलें रोगट व अल्पायुषी होतात.

षष्ठस्थानीं शनि शुभ ग्रह दृष्टिरहित असेल तर वाईट असतो. त्यामुळें मोठमोठे आजार होतात. स्थिरराशीमध्यें शनि असेल तर खोकला, दम व छातीचे रोग होतात. द्विस्वभाव राशीमध्यें असेल तर क्षय, दमा होतो. गुदस्थानामध्यें इजा होतात व मूत्राशयाचे विकार होतात. चरराशीमध्यें शनि असेल तर लिव्हर बिघडते. नोकर वाईट मिळतात व त्यांच्यापासून 'दुःख होतें.

सप्तमस्थानीं शनि असेल तर मनुष्यास स्त्रीकडून सुख मिळणार नाहीं. स्त्री उदास, दुःखी, निराश आणि मुक्तस्तन असते. द्विस्वभाव राशींत या स्थानांत शनि असेल तर द्विभार्या योग समजावा. एखादे वेळीं तिसरें लग्नही करण्याचा प्रसंग येतो. शनि तूळ, मकर आणि कुंभ राशींत असेल तर स्त्रीधन मिळेल. एकंदरींत शनि सप्तमस्थानीं चांगला नाहीं. नवराबायकोमध्यें प्रेम नसतें. दोघांचीं मतें एकमेकांबद्दल बाधक असतात. या स्थानांत शनि असतो तेव्हां उघड शत्रु फार असतात. भागीचे धंद्यांत अगर कोर्टाचे कामांत यश येत नसतें. कोणाचाहि आपलेवर विश्वास नसतो.

अष्टमस्थानीं शनि शुभग्रहदृष्ट असल्याखेरीज हुंडा वगैरे मिळणार नाहीं. मृत्युपत्राबद्दल व इतर वारसाचे बाबतींत तंटे होतील. या स्थानीं शनि आयुष्यवर्धक असतो.

नवमस्थानीं शनि असेल तर मनुष्य धर्माचा कट्टा अभिमानी असतो. स्वतःचे मताबद्दल व स्वतःचे विचाराबद्दल जास्त अहंकार असतो. अध्यात्म-विद्या, जादुटोणे, ज्योतिष वैद्यकी वगैरे शिकण्याची आवड असते. जल-प्रवासांत भीति असते. स्त्रीचे नातेवाईकांकडून नुकसान होतें. या स्थानीं शनि असणाऱ्या लोकांनीं परदेशांत जाऊं नये, कारण तेथें नुकसान होण्याचा संभव असतो. पितृसुख चांगलें नसतें. निदान बापाशीं पटत नाहीं.

दशमस्थानीं शनि असेल तर धंद्यांत किंवा नोकरींत भरभराट होते. अधिकाऱ्याची मर्जी असते. परंतु शेवटीं व्यापारांत ठोकर लागते व नोकरीमध्यें ठपका येऊन शेवटीं अब्रु जाते. दशमांत शनि असणारे नोकरांनीं सावधगिरीनें वागावें. प्रथम होणारे अकल्पित लाभ किंवा मोठ्या बढत्या, खड्डा खणून ठेवित असतात, हें पक्कें लक्षांत ठेवावें.

एकादशस्थानीं शनि असेल तर लबाड व ढोंगी मित्र मिळतात व त्यांचेकडून अतिशय नुकसान होऊन शेवटीं नाश होतो. या स्थानीं शनि

असणाऱ्या लोकांनीं कोणाला पैसे उसने देऊं नयेत अथवा जामीन होऊं नये. या स्थानांत शनि असेल तर मुलांचें सुख मिळणार नाहीं.

द्वादशस्थानीं शनि असेल तर गुप्त शत्रु फार असतात व त्यांचा गुप्तपणें नाश करण्याचा प्रयत्न सुरूं असतो. वरून मात्र ते मैत्रीचें प्रदर्शन करितात. या स्थानीं शनि वाईट राशीला व पापग्रह-दृष्ट, विशेषतः मंगळ किंवा हर्षल यांचे अशुभ दृष्टींत असेल तर खोटे आरोप येऊन त्याचे योगानें कैद होते अथवा विषप्रयोग होण्याची भीति असते.

टीपः—शनीचें फल पाहतांना त्याच्या राशीकडे लक्ष द्यावें. शनि बलिष्ठ असेल तर त्याचे वाईट परिणाम बरेच कमी होतील, जर तो पापग्रह-युक्त अथवा पापग्रहाचे अशुभ दृष्टींत असेल तर त्याचेपासून फारच नुकसान होईल. चांगलें फल विशेष अनुभवास येणार नाहीं. (अशुभ शनि पापग्रहदृष्ट किंवा शत्रुराशींत असलेला.)

शनीचें इतर ग्रहांशीं योग व दृष्टिफलें

शनि व गुरु यांचा योग अथवा शुभ दृष्टिसंबंध असेल तर संपत्ति मिळेल, अचानक द्रव्यलाभ होईल. गुरु हा कुंडलींत सप्तमाचा स्वामी असेल तर सासऱ्याकडून संपत्ति मिळेल. हा योग अथवा दृष्टिसंबंध द्वितीय-स्थानीं घडेल तर प्राप्ति चांगली होईल व प्रत्येक कृत्यांत यश येईल. नवमस्थानांत होईल तर तीर्थयात्रा होतील, धार्मिक कृत्यें हातून होतील. दशमामध्यें हा योग होईल तर नोकरीमध्यें मान व अधिकार मिळेल. व्यापारी लोकांची पत वाढेल. शनि गुरूचा योग अथवा दृष्टिसंबंध कुंडलींत असेल तर आर्थिक स्थिति फार चांगली असते. मनुष्य पैसे धोरणानें व विचारानें खर्च करितो. शनि-गुरूचे योगाचीं माणसें मोठया पदावर असतात. फक्त हा योग पूर्णांशानें असेल तर संतति मुळींच होत नाहीं आणि वंशच्छेद होतो.

शनीवर गुरूची अशुभ दृष्टि असेल तर भाऊबंदामध्यें कलह होऊन सर्व मिळकत भांडणात खर्च होते. अशा माणसास मानगडी करण्याची आवड असते आणि त्यांत त्याला ठोकरी लागतात. शनि किंवा गुरु सप्तमाचा स्वामी असेल तर श्रीमंताची मुलगी करावी अशी मनुष्याची मोठी इच्छा असते परंतु त्यांत त्याला यश येत नाहीं. धर्मावर श्रद्धा उत्तम असते परतु धद्यांत यश येत नसते. मुलें लहानपणीं मरतात. शनि गुरुचा अशुभ दृष्टिसबध कुडलींत असेल तर श्रीमत होण्याची आशाच करू नये. शनि–मगळाचा योग किंवा अशुभ दृष्टिसबध कुडलींत असेल तर स्वभाव फार रागीट, तिरसट व खुनशी असतो. कैदेचे प्रसग येतात व मनुष्याचे अगीं लबाडी फार असते. अशा योगावर जन्मलेलीं मनुष्यें क्वचितच प्रामाणिक असतात. वरील अशुभ फलें शनि किंवा मगळ १–३–९–१० या स्थानीं असतां विचारांत घ्यावी. या योगावर जन्मलेल्यास जबर दुखापती होतात. उचावरून पडून हाडें मोडण्याची भीति असते. ज्या स्थानांत व राशींत शनि मगळ एकत्र असतील तर त्या शरीराचे भागास दुखापत होते.

शनि मगळाचा शुभ दृष्टियोग असेल तर मनुष्य शूर व धीट होतो. असा मनुष्य शिपाईगाण्याचा असून स्वत चे शरीरावर त्याचा पूर्ण भरवसा असतो. स्वभाव फार शांत व मेहनती असतो. शनि, मगळाचा योग अथवा अशुभ दृष्टिसबध कुडलींत असेल तर त्याचा शरीरावर फार वाईट परिणाम होतो. (विशेषत हे ग्रह उदीत भागांत असतील तर). द्विस्वभाव राशींत हा योग असेल तर सर्दीचे विकार व क्षय होईल. छाती व फुफ्फुसें फार अशक्त असतात. कर्क अथवा मकर राशीमध्यें हा योग अथवा दृष्टिसबध होईल तर दमा होण्याची भीति अधिक असते स्थिर राशीमध्यें हा योग अथवा दृष्टिसबध असेल तर प्रवासांत अपघात होतील. उचीवरून पडून त्यापासून शरीराचे भागास कायमची इजा होईल. अशा योगावर जन्मलेल्या

माणसास पाण्याची भीति असते. मूत्राशयाचे रोग होतात. चरराशींत हा योग होईल तर धंद्यामध्यें अपयश व बेअब्रू होते. कोणाचा विश्वास नसतो व शरीरावरही वाईट परिणाम होतात.

स्त्रियांचे कुंडलींत शनि–सूर्याचा योग असेल तर लग्न लवकर होत नाहीं. लग्न जमण्याचे कामीं अडचणी येतात व लग्न होईपर्यंत अडचणी व संकटें किती येतील याचा नेम नसतो. परंतु हे सर्व ज्या राशींत योग झाला असेल त्यावर अवलंबून असतें. कर्क, कन्या व मीन राशींत स्त्रियांचे कुंडलींत हा योग होईल तर नवरा सुस्त व आळशी, दरिद्री आणि मलिच्छ मिळेल. शिवाय लवकर वैधव्य येण्याची भीति असते. स्त्रियांचे कुंडलींत कोठेंहि शनि–सूर्याचा योग झाला तर बहुतकरून बीजवराशीं लग्न होतें. निदान नवऱ्याचें वय वरेंच असतें. अशा बायकांना पतीपासून सुख मिळत नाहीं. कारण तो फार निर्दय व अप्पलपोट्या असतो. स्त्रीस मारहाण करणें व धाकांत ठेवणें हीं नवऱ्याचीं कर्तव्यें आहेत अशी त्याची समजूत असते. शनि–सूर्याचा शुभ दृष्टिसंबंध असेल तर मनुष्य शांत, धीट मेहनती व निर्व्यसनी असा असतो. मोठ्या लोकांचा त्याला आश्रय मिळून त्यांचेकडून लाभ होतो.

स्त्रियांचे कुंडलींत हा योग असेल तर लग्न उशीरा व ज्यास्त वय झालेल्या मनुष्याबरोबर होतें. शनि जर तूळ, मकर किंवा कुंभ राशींत असेल तर नवरा श्रीमंत मिळेल. परंतु तो फार कद्रु व हलकट असेल. त्याचेपासून सुख होणार नाहीं.

शनिशुक्राचा योग अथवा अशुभ दृष्टिसंबंध असेल तर स्त्री सुंदर मिळेल परंतु तिची प्रीति नसेल. कुंडलींत शनि शुक्राचा योग असणारीं माणसें बाहेरख्याली असतात. गुप्तपाप अशा लोकांचे हातून होतें. बोलणें फार बीभत्स व सडेतोड असते. असा माणूस लबाड व ढोंगी असतो. बाहेरून फार धार्मिकपणाचा डौल आणतो. त्याचीं कृत्यें फार नीच असतात.

शनि-शुक्राचा शुभ दृष्टिसंबंध असेल तर त्यापासून सुख होतें, नवराबायकोंची एकमेकांवर प्रीति असते. अन्तःकरण पावन कोमल असून मनुष्य फार मेहनती, काळजीपूर्वक काम करणारा असतो. स्त्रियांच्या कुंडलीत शनि-शुक्राची शुभदृष्टि विशेष चांगली असते कारण त्या योगानें स्त्रियांचे अंगीं विनय, दक्षता, कौशल्य, सत्य व पातिव्रत्य हे धर्म आढळून येतात.

शनि-बुधाचा योग अथवा अशुभ दृष्टिसंबंध कुंडलींत असेल तर मनुष्य फार गूढ विचाराचा परंतु वाईट स्वभावाचा असतो. निरर्थक दुसऱ्याचा हेवा करण्याची प्रवृत्ति असते वाणीमध्यें कांहींतरी दोष असतो. असा मनुष्य बहुतकरून अप्रामाणिक व लबाड असतो. त्याच्या यावर कोणीहि विश्वास ठेवू नये. शिवाय त्यास दारूचें व्यसन लागतें.

शनि-बुधाचा योग अथवा अशुभ दृष्टिसंबंध ३ किंवा ९ स्थानांत होईल तर शास्त्रीय विषयाचा नाद असतो. वेदांचा, विशेषतः गूढविद्या शिकण्याची उत्कंठा असते. पण त्यांत यश येत नाहीं. स्नानसंध्यादि कृत्यें हातून होतात, परंतु ती मनापासून नसून ती दांभिकपणाची असतात. अशा मनुष्याची कोणाशीहि खरी मैत्री नसते. स्वतःचे फायद्यासाठीं दुसऱ्याशीं स्नेह असतो.

शनि बुधाचा कुंडलींत शुभदृष्टिसंबंध असेल तर वर्तणूक सभ्यतेची, स्वभाव सरळ व शांत असतो. कोणतेंहि काम फार काळजीपूर्वक करितो. शरीरप्रकृति निकोप असते. शास्त्रीयविषयाची आवड असून विचारशक्ति चांगली असते. परंतु ज्या राशींत शनि-बुधाचा योग होईल त्या राशीवर ह्या योगाचा कमी अधिकपणा अवलंबून असतो. शनि-बुध योग जल राशीपेक्षां वायुराशींत अधिक चांगला असतो. १ ३-१ १ स्थानांत ह्या योगाचे परिणाम उत्तम दिसून येतात. इतर स्थानांत हा योग महत्त्वाचा नसतो.

कुंडलींत शनि–चंद्र योग असेल तर सर्व आयुष्यभर पैशाच्या अडचणी येतील. पैसा हातात आला असता त्याचा विनियोग चांगला होणार नाही. संतापी, तिरसट व संशयी असतो. अतिशय निष्काळजीपणामुळें लबाड व खोटे मित्र यांच्यापासून नुकसान होतें. धंद्यामध्यें अपयश येतें. शनि चंद्राचा योग असणारी माणसें एका धंद्यास चिकटून रहात नाहीत. वारंवार धंदे बदलावेसे वाटतात. मन चंचल असतें. लग्नापासून सुख होत नाहीं. स्त्री निष्काळजी व मूर्ख मिळते. शनि-चंद्राचा योग द्विस्वभाव राशीमध्यें होईल तर द्विभार्या योग समजावा. हा योग उदित भागांत होईल तर प्रकृति नादुरुस्त राहील. अनुदित भागामध्यें हा योग होईल तर अपघात होतील. शनि–चंद्राचा योग अथवा दृष्टिसंबंध संसारामध्यें मुळींच सुख मिळू देत नाहीं. स्त्रियांचे कुंडलींत हा योग होईल तर त्यांची वर्तणूक फार घाईट असते. पतीची त्यांचेवर प्रीति नसते. शनि–चंद्राचा जन्मकुंडलींत योग असणाऱ्या स्त्रिया दुर्गुणी असतात. शनि चंद्राची युति ९।१०।११ स्थानीं असल्यास मात्र मनुष्य लक्षाधीश बनतो.

शनि–चंद्राचा शुभदृष्टिसंबंध असेल तर मनुष्य गंभीर व मेहनती होतो. धंद्यांत यश मिळेल. स्त्रियांचे कुंडलींत शनि चंद्राचा शुभदृष्टिसंबंध असेल तर त्यांची प्रकृति उत्तम राहते व त्या मेहनती व संसारदक्ष असतात.

गुरुचीं स्थानगतफलें व दृष्टिफलें

लग्नामध्यें गुरु अग्निराशींत असेल तर जन्मणारा धीट, सुस्वभावी, धंद्यांत यशस्वी, मैत्री करण्यास योग्य, आणि शत्रूंशी देखील उदार असा होतो. थोडा गर्विष्ठ. अनेक कसरतीचे खेळाची आवड असते. दृढ-निश्चयी, विश्वासू, स्थिरमनाचा असतो.

पृथ्वी राशींत असेल तर गूढ विचाराचा, स्वार्थी, दांभिक आणि कोत्या विचाराचा होतो.

वायु राशींत गुरु असेल तर न्यायी, उदार, लवकर न रागावणारा, विश्वासू, प्रत्येकावर उपकार करण्याची इच्छा असलेला असा होतो.

जल राशींत गुरु असेल तर खेळाडू, रंगेल, चैनी, आणि पैशाची काळजी न करणारा होतो. बहुतकरून स्त्रीं जलराशींत गुरु असणारी माणसें भाग्यवान असतात. जल राशीमध्यें वृश्चिकपेक्षा कर्क व मीन राशींत असेल तर फार चांगला. वृश्चिक राशींत गुरु असेल तर जन्मणारा क्षयमतलबी होतो. सर्वसाधारण गुरूचा धर्म म्हटला म्हणजे स्वातंत्र्याची आवड असणें, शूर, उदार, विश्वासू व दूरदर्शी, न्यायी, प्रामाणिक व धार्मिक, मान व लौकिक यांकरितां प्रयत्न करणारा, दुष्ट व नीच माणसाचा द्वेष करणारा.

द्वितीयस्थानीं गुरु संपत्ति व अभ्युदयास कारण होतो. जगामध्यें अतिशय यशस्वी आणि भाग्यवान माणसांचे कुंडलींत बहुतकरून गुरु द्वितीय अगर दशम स्थानामध्यें असतो. मात्र वरील स्थानांत गुरु राशी बली आणि शुभग्रहदृष्ट असला पाहिजे.

तृतीयस्थानीं गुरु असेल तर लहान व सुखकर प्रवास घडतील. भाऊबंद आणि शेजारी यांच्यापासून वारंवार मदत होईल. विद्याव्यासंगी व मनानें मोठा असतो.

चतुर्थस्थानीं गुरु असेल तर घरामध्यें यश व वृद्धापकाळीं सुख होईल. तो शुभ ग्रह दृष्ट असून चांगल्या राशींत असेल तर दारिद्र्यामध्यें जन्म कधींहि काढावी लागणार नाहीं.

पंचमस्थानीं गुरु असेल तर संतति आज्ञाधारक व सुस्वभावी होईल व त्यांचेपासून सुख होईल. पंचमस्थानीं गुरु बलिष्ठ असेल तर शर्यतींत अगर लॉटरींत पैसे मिळेल.

पञ्चस्थानीं गुरु अशुभ ग्रहदृष्ट व नीच राशींत नसेल तर प्रकृति साधारण बरी असेल. मिथुन आणि कन्येमध्यें असेल तर छातींत अगर पोटांत इजा होण्याचा संभव असतो. Dyspesia (अग्निमांद्य) होईल.

सप्तमांत गुरु असेल तर वैवाहिक सुख मिळेल. कोर्टांतील खटल्यांत जय मिळेल. भागीचे व्यवहारांत फायदा होईल. मात्र जर तेथें कन्या राशींत गुरु असेल तर वरील फलें दृष्टोत्पत्तीस येणार नाहींत. कारण ह्या राशींत गुरु अगदीं बलहीन आणि चांगलें फल देण्यास असमर्थ असतो.

अष्टमांत गुरु असेल तर सासऱ्याकडून द्रव्य मिळेल किंवा मृत्युपत्रापासून अगर अकस्मात लाभ होईल. परंतु ह्या स्थानीं गुरु शुभ राशींत असून त्यावर शनीची शुभदृष्टि असते.

नवमस्थानांत गुरु असेल तर मनुष्य धार्मिक, सत्य बोलणारा, नीतिमान, विचारी, सन्माननीय होतो. सासऱ्याकडून फायदा होईल, लांबलांबचे प्रवास होतील व प्रवासांत सुख होईल.

दशमस्थानीं गुरु असेल तर नोकरीमध्यें बढती लवकर होईल. सरकारांत मान मिळेल. दशमांत गुरु असलेले लोक मोठे हुषार असतात; मोठ्या योग्यतेस चढतात.

एकादशस्थानामध्यें गुरु असेल तर चांगले व विश्वासू मित्र मिळतील. त्यांचेकडून चांगला सल्ला मिळेल आणि फायदा होईल. या स्थानांत गुरु असणें संततिसुखास चांगलें असतें आणि कौटुंबिक सुख चांगलें मिळतें.

द्वादशस्थानांत गुरु असेल तर गुप्त शत्रु फार असतील. पण त्यांचेपासून विशेष त्रास होणार नाहीं. स्वभाव खर्चिक होईल. विद्वान परंतु यश कमी असतें.

गुरुचा इतर ग्रहांशीं योग व दृष्टिसंबंध

गुरुचा व मंगळाचा योग अगर अशुभ दृष्टि संबंध असेल तर अशा योगावर निपजणारी माणसें फार उधळीं, फाजील उदार, हट्टी, हेकेखोर,

व्यवहारांत मूर्ख, असमंजस आणि नेहमीं अडचणींत असणारीं अशीं होतात. गुरु मंगळाची एकमेकांवर अशुभ दृष्टि म्हणजे ४५°, ९०°, १३५° आणि १५०° अंशांची असेल तर पैशाचें कामांत, शर्यतीचें धंद्यांत अगर दोंगी मित्राकडून मोठ्या ठोकरी लागतील आणि चोरापासून व आगीपासून नुकसान होईल. कुंडलींत गुरु मंगळाचा योग असेल तर संतती वांचणार नाहीं.

गुरु-मंगळ एकमेकांचे शुभ दृष्टींमध्यें म्हणजे ३०°, ६०°, १२०°, अंश दृष्टींत असतील तर जन्मणारा शूर, स्वतंत्र विचाराचा, उदार होईल. व दुसऱ्यावर नेहमीं उपकार करण्याची इच्छा असेल. गुरु-मंगळाची एकमेकांवर कोणतीही दृष्टि संपत्ति मिळण्याचें कामांत निरुपयोगी आहे. मात्र अशुभ दृष्टि असेल तर शक्तिबाहेर नुकसान होईल व शुभ दृष्टि असेल तर पैशाची उधळपट्टी होईल इतकेंच.

गुरु व सूर्य यांचा योग किंवा शुभ दृष्टि (३०°, ६०°, आणि १२०°) असेल तर यश व संपत्ति मिळेल. उत्तम मित्र मिळून त्याचेपासून पैसा मिळेल. शरीर निरोगी होईल व मनुष्य दीर्घायु होईल.

सूर्य व गुरु यांचा पूर्ण योग असेल तर अपस्मार होऊन त्याचे योगानें अंत होईल. (१-६-८ स्थानीं अग्नीराशींत असेल तर.)

स्त्रियांचे कुंडलींत गुरु-सूर्याची एकमेकांवर शुभदृष्टि असेल तर उत्तम स्थळ मिळेल आणि पति नांवलौकिकास असलेला मिळेल. विशेषतः गुरु बलिष्ठ व सूर्य अशुभ ग्रह दृष्टिरहित असले पाहिजेत.

गुरुवर सूर्याची अशुभ दृष्टि असेल तर संपत्तीचा नाश होईल व आयुष्यामध्यें बरीच आपत्ति काढावी लागेल. अशा योगावर जन्मलेल्या लोकांनीं इतरांस पैसे उसने देण्याच्या व जामीन होण्याच्या भानगडींत पडूं नये. अशा मनुष्याविरुद्ध अनेक सरकारी भानगडी उपस्थित होतात व कोर्टांतील खटले त्याचेविरुद्ध होतात व त्यामुळें जवळ असलेला पैसा व

जमीनजुमला नाहींसा होतो. त्याचेजवळ असलेली सर्व इस्टेट जाऊन आयुष्याचें अंतीं दारिद्र्यांत दिवस काढावे लागतात.

स्त्रियांचे कुंडलींत असा योग असेल तर तिला सुशील व विद्वान परंतु दरिद्री नवरा मिळेल.

गुरु-शुक्राचा योग व शुभ दृष्टिः—हा योग फार महत्वाचा नसतो, तरी पण अशा योगावर जन्मलेलीं माणसें यशस्वी असतात. लोकांचा त्याचेबद्दल चांगला ग्रह असतो. गुरु शुक्राचे योगावर जन्मणारीं माणसें कपड्याचे व दागिन्याचे शोकी असतात व त्यांचा पैसा चैनींत बराच खर्च होतो. विलास हा ह्या युतीचा मुख्य परिणाम आहे.

स्त्रियांचे कुंडलींत गुरु-शुक्राचा योग किंवा शुभ दृष्टि असेल तर फार चांगलें, अशा योगावर स्त्रिया सद्गुणी व पतिव्रता होतात.

गुरु-शुक्राचा अशुभ दृष्टिसंबंध असेल तर चैनीचे पदार्थांत पैशाची उधळपट्टी होते. बाहेरख्यालीपणाचा नाद असतो. नेहमीं कर्जबाजारीपणा असतो. अशा योगावर जन्मलेले लोक फार गर्विष्ठ असतात व स्वतःबद्दल जास्त प्रौढी वाळगणारे असतात.

गुरु-बुधाचा योग अथवा दृष्टिसंबंध असेल तर मनुष्य विचारी, फार न्यायी, अभ्यासी, साहित्यशास्त्राचा विशेष व्यासंगी, ग्रंथकर्ता होतो. लेखक व ग्रंथकार ह्या योगावर जन्मलेले आढळून येतात. अशा मनुष्याचे विचार स्वतंत्र असून स्वभाव फार शांत व मनमिळाऊ असतो. कोणतेंही संकट आलें असतां डगमगत नाहीं. शिवाय हा योग मनुष्याचा अभ्युदय करण्यास व संकट निवारण्यास फार चांगला असतो.

गुरु-बुधाचा अशुभ दृष्टिसंबंध असेल तर मनुष्य अविचारी असतो. प्रत्येक वस्तूची फक्त वाईट बाजू त्याला दिसत असते, मन फार चंचल असते. जुगारीचा नाद असतो. अधर्माकडे विशेष प्रवृत्ति असते. अशा योगावर जन्मलेल्या लोकांनीं आपले वागणुकीबद्दल विशेष सावध असावें

कारण कायद्याच्या कचाटीत सांपडून नुकसान अगर शिक्षा होण्याचा संभव असतो.

गुरु-चंद्र योग अथवा शुभ दृष्टि —हा योग अथवा शुभ दृष्टि फारच चांगली असते. त्याचे योगानें संपत्ति व यश संपादन होऊन आयुष्य फार सुखावह जातें. कोणत्याहि गोष्टींची ददात येत नाहीं. स्त्री सुस्वरूप व सुशील मिळते.

नायकाचे कुंडलींत असा योग असेल तर त्याची वर्तणूक फार चांगली असते. संपत्ति व ऐश्वर्य यांचा लाभ होतो.

गुरु चंद्राचा अशुभ दृष्टिसंबंध असेल तर जन्मणारा आपली संपत्ति उधळतो व आपल्या मूर्खपणामुळें स्वतःचा नाश करितो. अशीं मनुष्यें अपयशी असतात म्हणून त्यांनीं कोणताही धाडसाचा धंदा करूं नये

मंगळ, बुध, शुक्र व त्यांचे दृष्टीचा व युतीचा परिणाम दृष्टीला आरंभ होण्यापूर्वी ६° अंश व दृष्टि संपल्यावर ८° अंश पर्यंत असतो म्हणून इतके अंशावर ग्रह असल्यास ते त्या दृष्टींतच अगर युतीकक्षेंत आहेत असें समजावें

सूर्य व चंद्र यांच्या कक्षा इतर ग्रहांपेक्षां मोठ्या असल्यानें सूर्य दृष्टि अगर युतिपूर्वी १२° अंश व नंतर १७° अंश व चंद्र अनुक्रमानें ८°–१२° अंश समजावा.

हर्शलाचीं भावगत फलें आणि दृष्टिसंबंध

लग्नीं अग्निराशींत हर्शल असेल तर जन्मणारा अविचारी, हट्टी, मायेरहित उतावळा व महत्वाकांक्षी होतो. मन अस्थिर असतें. चमत्कारिक वस्तु आणि शोध यांची आवड असते. ज्योतिषविद्येचा अभ्यास करण्याची आवड असते. मोठमोठीं कामें करण्याची हाव असते. कल्पनाशक्ति व बुद्धि

उत्तम असते. विशेषतः लग्नीं हर्षल असलेले लोक वादविवाद करण्याचे मोठे शोकी असतात. चक्रमपणा हा मुख्य धर्म आहे.

पृथ्वी राशीत लग्नीं हर्षल असेल तर मनुष्य दुराग्रही, हट्टी व मत्सरी होतो. त्याचे मनोविकार व वृत्ति फार तीव्र असते; स्वभाव फार घातकी, आघाती, ढोंगी असतो. वायुराशीमध्ये लग्नीं हर्षल असेल तर चंचल बुद्धीचा, विद्वान, चाणाक्ष व नवीन कल्पना दाखविणारा असा असतो. सर्व शास्त्रीय विषयांची विशेषतः गूढ व अशेयशास्त्र जाणण्याची फार इच्छा असते. सत्यवक्ता व थोडासा गर्विष्ठ. जल राशींत हर्षल असेल तर व्यसनी, मद्यपी, ढोंगी, स्वाड व हलकट लोकांची संगत करणारा, अतिकामी, दुराग्रही व द्वेषी. अशा मनुष्याचे अंगीं सद्गुण कमी असतात. त्याचे विचार फार कोते व कमी समजुतीचे असतात, रीतभात त्याला मुळींच माहीत नसते, स्वतःचे स्वार्थासाठीं सावध व तत्पर असतो सर्वसाधारणपणें हर्षल लग्नीं असेल तर मनुष्य तन्देवाईक, दुराचारी, ढोंगी, परंतु फार कल्पक आणि बुद्धिमान्, बोलका, गर्विष्ठ व दुसऱ्याचा द्वेष करणारा असतो. त्याचा स्वभाव व वर्तन क्षणोक्षणीं बदलतें. अशीं माणसें लवकर लुप्त होत नसतात व स्वतंत्र विचाराचीं असतात. त्यांचीं कृत्यें अभ्यास धरून फारशीं नसतात. मनांत येईल तें करण्याची अशा लोकांस संवय असते. क्षुल्लक कारणावरून आपल्या प्रिय मित्रांशींसुद्धां शत्रुत्व करण्यास असले लोक मागें पुढें पहात नाहींत.

लग्नीं हर्षल असलेले लोक आपले कुटुंबापासून व आप्तइष्टांपासून वेगळे झालेले असतात. त्यांना एकेठिकाणीं बरोबर राहण्याची संवय नसते.

द्वितीयस्थानीं हर्षल असेल तर अकस्मात् लाभ अगर नुकसान होईल पैशासंबंधीं पुष्कळ अडचणी येतील. अनेक खर्च उद्‌भवून द्रव्यहानी होईल. कुटुंबांत अकस्मात् मृत्यु होतील.

तृतीयस्थानीं हर्षल असेल तर शास्त्रीय विषय, ज्योतिष व इतर गूढ-विद्या यांचा व्यासंगी होईल. चमत्कारिक व नवीन वस्तु खरेदी करण्याची मोठी आवड असेल. वारवार बिऱ्हाडें बदलावीं लागतील. धंदा पत्करावा कीं नाहीं ह्याबद्दल निश्चय लवकर होणार नाहीं. प्रवासाची आवड असेल. विचार स्वतंत्र व बाणेदार असतील. हस्ताक्षर चांगलें असणार नाहीं. शेजारी व मित्र यांच्यापासून त्रास होईल. स्वतःच्या लेखानें कधीं कधीं स्वतःचें नुकसान होईल.

चतुर्थस्थानीं हर्षल असेल तर आईबापांशीं पटणार नाहीं. इस्टेटीसंबंधीं तंटे उपस्थित होतील वृद्धापकाळीं त्रास, संकटें, दारिद्य येण्याचा संभव असतो. ही स्थिति हर्षल येथें अशुभ राशींत अथवा पापग्रहदृष्ट असेल तरच येईल. हर्षल येथें स्वगृहीं असेल अगर दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें बलिष्ठ असेल तर वृद्धापकाळ बरा जाईल.

पंचमस्थानीं हर्षल असेल तर संतति होत नाहीं किंवा झाल्यास अल्पायुषी होते. अथवा मुलांचे मृत्यु कांहीं विलक्षण रीतीनें होतात. पंचमस्थानीं हर्षल असल्यावर संततीचें सुख मिळणार नाहीं. सट्टयाच व्यापार आणि जुगार यांत नुकसान होईल. पंचमस्थानीं हर्षल असलेला मनुष्य चैनी व खेळाडू असतो.

स्त्रियांचे कुंडलींत पंचमस्थानीं हर्षल असणें फार वाईट. तरुणवयांत त्यांची अपकीर्ति होते. विशेषतः वृश्चिक, कर्क अगर मीन राशींत लग्नीं उदित असेल आणि पंचमांत हर्षल असेल तर अशा स्त्रिया नीतिभ्रष्ट होण्याचा संभव असतो.

षष्ठस्थानीं नोकर, मजूर व इतर हाताखालील लोक यांचेपासून त्रास होईल व ते विश्वास ठेवण्यालायक मिळणार नाहींत. शिवाय घटस्फोट होण्याचें भय असतें. वृषभ, वृश्चिक राशींत षष्ठस्थानीं हर्षल असतां असे रोग होतात कीं, त्यांत वैद्याची मति कुंठित होते योग्य निदान होत नाहीं.*

सप्तमांत हर्षल असणें फार वाईट. दांपत्यसुखांत ह्या स्थानाचा हर्षल फारच व्यत्यय करितो असें जाणावें. स्त्रीपुरुषांची वारंवार ताटातूट होते. दिवाणीदाव्यांत अतिशय नुकसान व अपयश येतें. समाईक भांडवलाचे धंदे चांगले चालणार नाहींत. म्हणून ह्या दोन्ही गोष्टी सप्तमस्थानीं हर्षल असलेल्या माणसांनीं वर्ज्य कराव्या. हर्षल या स्थानीं अशुभ राशींत अगर पापग्रहदृष्ट असेल तर अधिक वाईट. या स्थानांतील हर्षल प्रबल शत्रु उत्पन्न करितो. एकंदरींत सप्तमांत हर्षल असणें घातुक आहे.

अष्टमांत हर्षल असेल तर नवरा अगर बायको दरिद्री असेल. पैशाची उधळपट्टी होईल. एखादा वारसा मिळावयाचा असल्यास त्यांत भानगडी अतिशय होतील. सरतेशेवटीं नुकसानच होईल. या स्थानीं हर्षल पापदृष्टींत असेल तर आत्महत्येची प्रवृत्ति असेल. मृत्यु आकस्मिक होईल.

नवमस्थानीं असलेला हर्षल, ज्योतिष व त्यांसारख्या दुसऱ्या गूढ-विद्येचा नादी बनतो व सर्व तऱ्हेच्या शास्त्रीय विषयाची व लेखन-व्यवसायाची गोडी असते. त्यांत कधीं कधीं यश मिळतें, वारंवार प्रवासाचे प्रसंग येतात, धार्मिक समजुती कांहीं विलक्षण असतात. स्वभाव स्वतंत्र निश्चयी, हट्टी व दुराग्रही असतो. पत्नीचे नातेवाईकांकडून नुकसान होतें.

दशमस्थानीं हर्षल असतां यश अगर अपयश येईल. दोन्ही भिन्न भिन्न फलें तो या स्थानीं असतां उत्पन्न करूं शकतो. अधिकाऱ्यांशीं तंटे होतील. वारंवार नोकरी अगर धंदा बदलावा लागेल. नेहमीं प्रवास होतील, निंदा अपकीर्ति व आप्तइष्टांकडून त्रास होईल. स्वभाव स्वतंत्रबाण्याचा व निश्चयी असेल. चांगले वाईट दोन्ही अनुभव येतील.

एकादशस्थानीं हर्षल असतां मित्राकडून मदत घ्यावी लागेल किंवा त्यांना करावी लागेल. ओळखीपासून फायदा न होतां नुकसान होईल. ओळखी जितक्या थोड्या होतील तितक्या चांगल्या असतात.

द्वादशस्थानीं हर्शल असेल तर पुष्कळ शत्रु असतील. ते मत्सरी, द्वेषी व चंचल मनाचे ठग असतील व आपला नाश करण्यास झटत असतील. ह्या स्थानांतील हर्शल, मंगळाचे अशुभ दृष्टिसंबंधात असेल तर ह्या योगावर जन्मलेल्या मनुष्यानें चोर व दरवडेखोरांबद्दल विशेष काळजी घेतली पाहिजे. पैशाचें नुकसान होऊन शिवाय शरीरास इजा होण्याचा संभव असतो.

हर्शलाची इतर ग्रहांशीं युति आणि दृष्टिसंबंध

हर्शल व मंगळ यांची युति असेल अगर अशुभदृष्टिसंबंध असेल तर मनावर वाईट परिणाम होतो. हा योग पहिलें स्थानांत होईल तर मनुष्य लबाड, चंचल मनाचा, द्वेषी, खुनशी व सूड घेणारा होईल.

द्वितीयामध्यें हा योग होईल तर पैशासंबंधीं फार नुकसान होईल व नेहमीं दारिद्र्यांत दिवस काढावे लागतील.

तृतीयस्थानांतील ह्या योगानें ज्योतिष व इतर गूढविद्येची आवड उत्पन्न होईल, भाऊबंदांपासून नुकसान होईल.

चतुर्थस्थानीं तूळ, मकर व कुंभ राशींखेरीज इतर राशीमध्यें हा योग होईल तर आयुष्यांत शेवटचीं वर्षें दारिद्र्यांत व दुःखांत जातील.

पंचमस्थानीं मुलांची हानी होईल.

षष्ठस्थानीं मोठमोठीं दुखणीं होतील. नोकर बेइमान मिळतील.

सप्तमस्थानीं दिवाणीदाव्यांत नुकसान व अपयश येईल. व्यापारांत नुकसान होऊन दिवाळें काढावें लागेल. वैवाहिकसुख चांगलें मिळणार नाहीं.

अष्टमस्थानीं हा योग होईल तर हुंडा किंवा स्त्रीधन मुळींच मिळणार नाहीं.

नवमस्थानांतील योग शास्त्रीयविषयांची आवड उत्पन्न करील. मानसिक उन्नति चांगली होईल. धार्मिक श्रद्धा कमी असेल.

दशमस्थानीं हा योग होईल तर अपकीर्ति होईल, सरकारी कामांत नुकसान येईल व मारा होईल. कदाचित् कैदेचाहि प्रसंग येईल.

एकादशस्थानांत मित्रवर्गाकडून त्रास होईल.

द्वादशस्थानांत गुप्त शत्रू पुष्कळ उत्पन्न होतील व ते द्वेष करतील.

जन्म कुंडलींत हर्षल गुरु यांची युति असेल तर अकस्मात लाभ होईल, किंवा वारसा मिळेल. विशेषतः ही युति अगर दृष्टीसंबंध द्वितीय अगर अष्टमस्थानीं व्हावी. व्यापारांत यश येतें. धार्मिक कृत्यें करण्याची आवड असते. मानमरातबाची कामें करावीं अशी हाव असते.

हर्षल शनि यांचा शुभदृष्टिसंबंध असेल तरीहि विशेष चांगला अनुभव येणार नाहीं. मात्र हा योग असतां वाईट फलें उत्पन्न करूं शकणार नाहींत.

हर्षल-गुरुच्या कुंडलींत अशुभ दृष्टिसंबंध असेल तर दिवाणीदाव्यांत नुकसान होईल. इस्टेटीबद्दल तंटे होतील. भाऊबंदकी चालेल. हा योग धंद्यास अनुकूल नसतो. अकस्मात पुष्कळ नुकसान होण्याचा संभव असतो. हा योग असतांना कोणताहि व्यापार करूं नये. नोकरी पत्करून राहणें हाच उत्तम मार्ग समजावा.

जन्मकुंडलींत हर्षल आणि मंगळ यांची युति असेल अगर अशुभ दृष्टीसंबंध असेल तर स्वभाव फार मत्सरी, धाडशी व खुनशी होतो. चौर्यकर्म करण्याची मनाची प्रवृत्ति होते व त्यामुळें बंदीवासाचे प्रसंग येतात. हा योग ३–९–१०–१२ ह्या स्थानांत झाला असेल तर मार्गे सांगितलेलें फल उत्पन्न करील. हा योग सप्तमस्थानांत होईल तर फारच वाईट. नवरा–बायकोचा विरह होईल. अगर दोघांपैकीं एकास भयंकर दुखापत होईल.

कधीं कधीं खुनापर्यंतहि मजल जाईल. हा योग मागीचे व्यापार दिवाणी दावे यांसहि वाईट असतो.

हर्शल व मंगळ यांचा शुभ दृष्टीसंबंध असेल तर मनुष्य धीट व स्वाभिमानी होतो, परंतु रागीट व हट्टी असतो. जन्मतः हर्शल मंगळाचा शुभदृष्टीयोग असलेली माणसें शूर व उदार असतात. शस्त्रक्रियेंत अगर शिपाईगिरीला असले लोक लायक असतात व त्या धंद्यामध्यें त्यांना कीर्ति मिळते.

जन्मकुंडलींत हर्शल व रवि यांची युति अगर समकोन, लग्नांत असेल तर जन्मणारा शूर, धारिष्टवान, निर्मळ अंतःकरणाचा व सर्वांस प्रिय असा असतो. हा योग द्वितीय अगर दशमस्थानीं झाला असेल तर मनुष्य कांहीं वेळ फारच यशस्वी होतो; परंतु कांहीं दिवसांनीं त्यावेवर अनेक संकटें येऊं लागतात. एकंदर आयुष्यक्रमांत अनेक प्रकारची संकटपरंपरा येते. आयुष्य-क्रमांतील हकीकत चित्तवेधक बनते. स्त्रियांचे कुंडलींत हा योग असेल तर फार वाईट अशा योगांत जन्मलेल्या स्त्रिया आपलेपेक्षां वयानें लहान असलेल्या पुरुषाशीं व्यभिचारकर्म करितात व नवऱ्यास सोडूनहि जातात. स्त्रियांचे कुंडलींत हर्शल सूर्याचा कोणताहि दृष्टीसंबंध होणें वाईट असते. विशेषतः केंद्रयोग आणि प्रतियोग हे दृष्टीसंबंध फारच वाईट असतात.

जन्मकुंडलींत रवि हर्शल यांचा अशुभ दृष्टीसंबंध असेल तर अनेक संकटें येतील, अपयश येतें व वरिष्ठ शत्रुपासून, सार्वजनिक संस्थेकडून किंवा रेल्वे कंपनीकडून नुकसान होतें. त्याचे सर्व व्यवहारांत नेहमीं नुकसान व निराशा नशिबीं ठेवलेली असते. हा योग लग्न, द्वितीय किंवा दशमस्थानीं होईल तर अधिक वाईट समजावा. स्त्रियांचे कुंडलींत हा योग वाईट असतो.

हर्शल व सूर्य यांचा अशुभदृष्टीसंबंध असेल तर विन्हाईत मनुष्याकडून फायदा होईल. कोणत्याहि धंद्यांत विशेषतः सार्वजनिक संस्थेंत अगर

सरकारी नोकरींत यश येईल. सरकारी अधिकाऱ्याचे कुंडलींत हा योग झालेला आढळून येतो.

जन्मकुंडलींत हर्शेल व शुक्र यांची युति अगर समक्रांति असेल व ती लग्न, तृतीय व नवमस्थानात असेल तर जन्मणारा चांगला गाणारा अथवा उत्तम वक्ता असतो. व प्रत्येक ललितकलेची त्यास थोडी तरी माहिती असते. असे लोक चैनी व बाहेरख्याली असतात. हा योग लग्नाखेरीज इतर स्थानीं असेल तर लग्नांत भानगडी होतील व नीति चांगली राहणार नाहीं. सप्तमस्थानीं हा योग असल्यास स्त्री नवऱ्यावर खरें प्रेम करणार नाहीं.

हर्शेल व शुक्र यांचा अशुभदृष्टिसंबंध असेल तर अनेक वेळां लग्न बिनसेल, स्त्री प्रेम करणार नाहीं व स्वतः असा मनुष्य हलकट स्त्रियांचें नादीं लागून द्रव्यहानी करील. हा योग लग्न द्वितीय, पंचम व सप्तम स्थानांत होईल तर विशेष बलिष्ठ समजावा.

जन्मकुंडलींत हर्शेल व शुक्र यांचा शुभदृष्टिसंबंध असेल तर असा मनुष्य अत्यंत कामी होईल. बायकांना कसें वश करावें ही कला त्याला चांगली अवगत असेल. हर्शेल अगर शुक्र चांगल्या राशींत असेल तर उत्तम गाणारा होईल.

हर्शेल व बुध यांची युति अगर समक्रांति लग्नांत असेल तर अशा योगावर जन्मलेला मनुष्य मोठा विद्वान होतो. वाङ्मय व कित्येक कलांमध्यें प्रवीण असून त्याच्यामुळें त्याची चांगली कीर्ति होते. हा योग तृतीय अगर नवमस्थानांत होईल तर ज्योतिष व दुसऱ्या गूढविद्येचा नाद लागेल. स्वभाव तऱ्हेवाईक होईल. मात्र लोक त्याचेवर कित्येकवेळा कडक टीका करून त्याचा उपहास करण्याचा प्रयत्न करतील हा योग मीनराशींत होईल तर अशा योगावर जन्मणारा ढोंगी, मतलबी होईल. त्याचे शब्दाची त्यास किंमत नसेल. त्याचीं कृत्यें व बोलणें विश्वास ठेवण्यालायक

नसेल. त्याप्रमाणेंच हा योग कर्कराशीत होईल तर असेंच समजावें. बुध व मंगळ यांचा अशुभदृष्टीसंबंध असेल तर स्वभाव तिरसट, लहरी, व निंदक बनतो. दुसऱ्याच्या प्रत्येक कृत्यांत दोष आहे असें वाटतें स्वभावेंची सेवा करण्याची त्याची महत्वाकांक्षा असते व त्याचे हातून कांहीं ग्रंथ होतात. परंतु अशा मनुष्याच्या लेखाबद्दल किंवा ग्रंथाबद्दल लोकांचें अनुकूल मत नसतें व चोहोंकडून त्याचेवर टीकेचा भडिमार होतो. एकदरींत अशा योगावर जन्मलेले लोक सार्वजनिक कामांत पुढें येत नाहींत.

हर्शल बुधाचा शुभदृष्टीसंबंध असेल तर त्यास साहित्यसेवेंत यश येतें. बुद्धि तीव्र असते. मन अभ्यासी असतें. चमत्कारिक व विलक्षण अथवा कांहीं नवीन गोष्टी आपले हातून व्हाव्या ही महत्वाकांक्षा असते. हा योग शास्त्रीयराशींत व १–३–९ या स्थानीं तर विशेष बलिष्ठ समजावा. ग्रंथ निर्मिती हातून होईल.

जन्मकुंडलींत हर्शल व चंद्र यांची युति व समसप्ति असेल तर बहुतकरून ह्याचा परिणाम वैवाहिक सुखावर व स्त्रीवर होईल. स्त्रियांचे कुंडलींत हर्शल रवि यांचा अशुभदृष्टीसंबंध असताना जे परिणाम होतात तेच परिणाम पुरुषाचे कुंडलींत हा योग असतांना होतात. लग्न झाल्यानंतर असा मनुष्य बहुतकरून वाईट फंदांत पडतो आणि पुढें दोघांचें मुळींच पटेनासें होऊन ते वेगळे राहतात. अशा मनुष्यास प्रवासाची व वारंवार बिऱ्हाडें बदलण्याची मोठी हौस असते.

हर्शल व चंद्र यांचा शुभ दृष्टीयोग कुंडलींत होईल, तर लग्न झाल्यावर मनुष्य बाहेरख्याली होईल. मात्र स्वतःचे स्त्रीवरहि त्याचें प्रेम असेल. चंद्र अथवा हर्शल ३–९–१० ह्या स्थानांत असेल तर मनुष्य एके ठिकाणीं फार राहणार नाहीं. पुष्कळ प्रवास होतील.

शरीरबांधा, उंची व शरीरसौष्ठ

जन्मकुंडलीत उदीत असणारी राशि व तिचा स्वामी यांचा शरीरबांधा उंची व शरीरसौष्ठव यांवर परिणाम होतो. जन्मलग्नांतील राशीचे परिणाम कसे होतात याचा मागील भागांत विचार केलेला आहे. आतां लग्नांतील ग्रहांचा शरीरावर व शरीरसौंदर्यावर काय परिणाम होतात तें पाहूं.

मेषलग्न उदीत असतां व विशेषतः पहिल्या १०° त तें असेल तर बांधा बुटका असतो ११° ते २९° पर्यंत, मध्यम बांधा असतो. या लग्नाची कमींतकमी ५ फूट ३ इंच व जास्तीतजास्त ५ फूट ५ इंच उंची असते.

वृषभ लग्नाची माणसें मध्यम बांध्याची; परंतु चेहरा वाटोळा असून शरीरानें जाडजूड असतात. मान आखूड व जाड असते. कपाळ रुंद.

मिथुन राशीचे लोक उंच असतात. शरीरप्रकृति बांधेसूद असते. सर्व साधारणपणें या लोकांची गणना उंचामध्यें करतां येते. कमींतकमी उंची ५ फूट ४॥ इंचापेक्षां जास्त असते. हात जाड नसतात व बोटें लांब असतात. चेहरा बुद्धिमान दिसतो. सर्व व्यवहारांत चापल्य, हा गुण हें या लग्नाचें वैशिष्ट्य होय.

कर्क राशीच्या लोकांचा बांधा बुटका, शरीरप्रकृति दुर्बल, लहानपणीं शरीर किरकोळ, मध्यमवयांत शरीर मेदयुक्त, कमरेच्या खालच्या भागापेक्षां कमरेच्या वरील भाग लांबीला जास्त, अत्यंत बुटके लोक कर्क व मीन लग्नावर जन्मास येतात.

सिंह राशीवर जन्म असतां उंची भरपूर असते. सर्वसाधारण उंची ५' ५" पेक्षां जास्त असते. शरीर मजबूत व हाडें रुंद असतात. चेहऱ्यावर गुर्मी, रंगेलपणा, दिसून येतो. डोकें मोठें असतें. वर्ण किंचित् तांबूस; काळा असणार नाहीं. भुंवया भरदार व केसयुक्त-केशाळ.

कन्या राशीच्या लोकांचें शरीर बारीक असतें. बांधा मध्यम. केसाळ व कमानदार. आवाज बारीक. हे लोक आपल्या वयापेक्षा दिसतात.

तुला लग्नाचे लोक उंच असतात. ५।५ पेक्षां कमी असणार न मान उंच असते. तूळ लग्नाचे स्त्रीपुरुष दिसायला सुंदर असून वर्ण असतो व डोळे तेजस्वी असतात. मध्यम वयांत डोक्यास टकल पड

वृश्चिक लग्नाचे लोक मध्यम बांध्याचे, शरीरानें मजबूत, लठ्ठ हाडें रुंद. चेहरा रुंद परंतु लांबट नसतो. आखूड मान व कुरळे के वृश्चिक लग्नाचें वैशिष्ट्य आहे. वर्ण काळा नसतोच परंतु फार ग असत नाहीं.

धनु लग्नाचें शरीर अत्यंत बांधेसूद असतें सौंदर्यवान स्त्रीपुरुष लग्नावर जन्मास येतात. उंची ५।६ च्या वरती नाक मोठें, तेजस्वी, भेदक व अर्थपूर्ण असते.

मकर लग्नाचे लोक मध्यम बांध्याचे असून शरीर दुर्बल असते. प चाळीशीनंतर शरीरप्रकृति सुधारते. चेहरा बारिक असतो व दाढीचे विरळ असतात.

कुंभ लग्नाचे पहिल्या १०° तील लोक मध्यम बांध्याचे परंतु १ पुढील अंशाचे लोक उंच असतात. चेहरा सुंदर असतो.

मीन राशीचे लोक ठुटके असतात. पण शरीर बेजड व लठ्ठ अ हात व पाय हे थोडे लहान असतात व बोटें आखूड असतात. हे म लग्नाचें वैशिष्ट्य आहे. हातापायाच्या बोटांवरुन मीन लग्न ले लवकर ओळखूं येतात. मध्यमवयांत हे लोक शरीरानें जाड होतात. विरळ व रेशमासारखे चकचकीत व मऊ असणें हा मीन लग्नाचा वि गुण आहे.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मिथुन, सिंह, धनु, कुंभ ह्या उंची देणाऱ्या राशी आहेत. वृषभ, कर्क, मकर व मीन ह्या राशी ठेंगणेपणाच्या आहेत व बाकीच्या राशी मध्यम बांध्याच्या आहेत.

(१) लग्नेश व चंद्र राशीच्या शेवटच्या अंशांत असून (२५° पुढें) चंद्र अनुदित भागांत असेल तर बांधा बुटका असतो.

(२) लग्नीं कोणत्याही राशीचे (१० अंशापर्यंत) आरंभीचे अंश असतील व लग्नेश उदीत भागांत असेल तर शरीरबांधा उंच असतो.

प्रत्येक राशीनें शरीराचा कोणता भाग दर्शविला जातो हें आम्ही मागें दिलेलेंच आहे. लग्नेश ज्या राशींत असेल ती राशी, भावारंभीची राशी, षष्ठेश ज्या राशीचा असेल ती राशी व जन्मचंद्राची राशी याचे योगानें शरीरावरील तीळ, जन्मखूण व मोळ वगैरे सांगतां येतात. वर दिलेल्या राशीनें शरीराचे कोणते भाग दर्शविले जातात हें पाहून शरीराच्या त्या त्या ठिकाणीं कांहीं जन्मखूण, मस अगर तीळ आहे असें समजावें. अशा राशी विषम असतील तर उजव्या बाजूला खूण असेल असें समजावें व राशी सम असतील तर डाव्या बाजूला खूण आहे असें समजावें. या राशींचे स्वामी उदित भागांत असतील तर त्या राशीनें दर्शविलेल्या भागास पुढील बाजूस खूण आहे असें समजावें व हे ग्रह अनुदित भागांत असतील तर खूण मागील बाजूस आहे असें सांगावें. ग्रह पहिल्या १०°त असतील तर त्या राशीनें दर्शविलेल्या भागास [illegible]चे बाजूस तीळ असेल. ११ ते २० अंशांत ग्रह असतील तर त्या राशीनें दर्शविलेल्या अवयवाचे मध्यभागीं व २१ ते २९ अंशापर्यंत ग्रह [illegible]ल तर त्या अवयवाचे खालचे बाजूस तीळ आहे असें सांगावें. हे [illegible]म अनुभवजन्य आहेत व शेंकडा ९०।९५ बाबतींत चुकत नाहींत.

मातृपितृविचार

चतुर्थस्थान हें मातृसुखाचें कारक आहे व दशमस्थान हें पितृसुखाचें कारक आहे.परंतु पाश्चिमात्य ज्योतिषी व कांहीं मद्रासकडील ज्योतिषी दशमस्थान मातृस्थान मानतात व चतुर्थस्थान हें पितृस्थान मानतात. आपण आपले पूर्वाचार्यांच्या मताचें अवलंबन करून चतुर्थस्थान मातृसुखकारक व दशमस्थान पितृसुखकारक समजूं.

दिवसा जन्म असतां पितृकारक रवि व रात्रीं जन्म असतां शनि समजावा. त्याचप्रमाणें दिवसा जन्म असतां शुक्र व रात्रीं जन्म असतां चंद्र मातृकारक समजावा. रवि, शनि आणि दशमेश व दशमांतील शुभाशुभ ग्रह यावर वडिलांच्या आयुष्याचा निर्णय होतो. हीं केंद्रें बलिष्ठ राशींत व शुभग्रहदृष्ट असतील तर पितृसुख पुष्कळ वर्षें मिळेल असें समजावें. रवि, दशमेश व दशमस्थानीं क्रूर ग्रह असतील तर पितृसुख फार मिळणार नाहीं. लग्नेश, दशमेशाबरोबर अगर रवि व शनि याबरोबर शुभदृष्टियोग करील तर पितापुत्राचें उत्तम पटेल. लग्नेशाबरोबर वरील ग्रहांचे अशुभ दृष्टियोग होतील तर वडील पुष्कळ वर्षें हयात असूनही पितापुत्राचें पटणार नाहीं. त्याप्रमाणेंच मातृसुखाचा विचार करतांना चंद्रशुक्र व चतुर्थेश यांचेबरोबर लग्नेशांचे संबंध कसे आहेत तें पहावें. चतुर्थस्थानावरून वडिलांची परिस्थिति समजते. या स्थानीं रवि, गुरु असतील किंवा कोणताही ग्रह उच्चराशीचा किंवा स्वराशीचा असेल तर वडिलांची सांपत्तिक स्थिति व दर्जा उत्तम असतो व त्याचा फायदा जन्मणारास मिळतो. जन्मकुंडलींत रवि, शनि हे शुक्रचंद्रापेक्षां बलवान असतील तर मातेपेक्षां वडील जास्त वर्षें जगतील. चतुर्थस्थानीं गुरु, चंद्र, रवि, शुक्र, बुध यांपैकीं कोणतेही दोन किंवा तीन ग्रह असतील तर जन्मणारास गृहसौख्य उत्तम मिळतें. आयुष्यांत दुःखद घडामोडी फार होत नाहींत.

त्याचे उलट मंगळ, राहु, केतु, शनि, हर्षल, नेपच्यून यांपैकी दोन किंवा तीन ग्रह असतील तर असा मनुष्य कोणत्याही दर्जावर असो; त्याची सांपत्तिक स्थिति कितीही उच्च असो त्याला मानसिक स्वस्थता व शांतता लाभणार नाहीत. आयुष्यांत अत्यंत दुःखद घटना होतील.

मातृसुखकारक योग

चंद्र स्वगृहीं, उच्च अगर मित्रगृही रवि, गुरु, शुक्र नेपच्यून यांचे शुभदृष्टीत असेल, कर्कराशी कोठेही असो त्यावर गुरु, चंद्र यांचे शुभयोग असणें, चंद्र १।४।७।१० या स्थानीं शुभग्रहावर दृष्टीत असणें, मातृसुखास पोषक योग समजावेत. त्याप्रमाणेंच दिवसा जन्म असतां शुक्राचा चंद्राप्रमाणेंच विचार करावा.

बालपणीं मातृनाश होणारे योग

(१) शनि-चंद्र १।४।७।१० स्थानीं एकत्र असणें, चतुर्थस्थानीं राहु, मंगळ, हर्षल, नेपच्यून यांपैकीं कोणतेही दोन ग्रह असून त्यावर शनीचा अशुभ दृष्टियोग होणें. ६।८ स्थानीं चंद्र असून सातवे स्थानीं पाप-ग्रहयुक्त मंगळ असेल तर.

(२) चंद्र अथवा शुक्र यांचे द्विर्द्वादशस्थानीं पापग्रह असेल तर.

(३) चंद्राचे पासून सातवें स्थानीं शुक्र पापग्रहयुक्त असेल तर.

(४) चंद्र आणि मंगळ ९।१० स्थानीं असतील तर.

(५) लग्नामध्यें गुरु, द्वितीयस्थानीं शनि व तृतीयस्थानीं राहु असतील तर.

(६) ३ किंवा ७ स्थानीं रवि, लग्नांत मंगळ असेल तर.

(७) चतुर्थस्थानीं शनि, मंगळ, राहु, हर्षल अगर नेपच्यून असेल तर. यापैकीं कोणताही योग असेल तर मातृसुख बालपणींच नाहींसें होईल असें समजावें.

पितृनाशकारक योग

(१) सिंहराशीमध्यें किंवा नवम दशमस्थानीं जन्मतः पापदृष्टी.

(२) सूर्य राशीच्या रवि, शनि, मंगळ, राहु, केतूनें युक्त ६।८।१२ या स्थानीं.

(३) सिंह राशीमध्यें शनि, राहु किंवा हर्षलयुक्त.

(४) ९ अगर १० स्थानीं (चंद्राचे) शनि, राहु व हर्षल किंवा मंगळयुक्त.

(५) लग्नापासून ९।१० स्थानीं शनि, राहु, मंगळ अगर हर्षलयुक्त.

(६) लग्न, रवि किंवा चंद्र यांचे नवमस्थानीं वृश्चिक राशी असून तेथें पापग्रह असेल तर.

(७) दशमेश नीच राशीस असून ३।६।८।१२ स्थानीं पापग्रहयुक्त.

(८) दशमस्थानीं दशमेश बलहीन असून त्या ठिकाणीं कोणतेही पापग्रह असतील तर.

वरील सर्व योग बालपणीं पितृनिधनाचे आहेत.

बुद्धिसामर्थ्य

बुद्धीविषयीं कुंडलींत पाहणें असल्यास प्रथम लग्न, रवि, चंद्र आणि बुध या सर्वांच्या स्थितीकडे लक्ष दिलें पाहिजे.

लग्नारंभीं मिथुन, कन्या, तुळा व कुंभ यांपैकीं राशि असेल तर जन्मणाऱ्यास वाचनाची अभिरुची असते. तसेंच बुद्धि तीव्र, कल्पनाशक्ति चांगली व भाषण अस्खलित असतें.

लग्नीं मेष, सिंह अगर धनु राशि असेल तर मनुष्य महत्त्वाकांक्षी, मोठेपणाची आवड धरणारा व रागीट असतो. मेषराशीपेक्षां सिंह अथवा धनु

राशि लग्नीं असणें चांगलें. कारण मेष लग्नावर जन्मणारा मनुष्य चंचल विचाराचा असतो. त्याचा स्वभाव एकांतप्रिय व सर्वांस अप्रिय असतो. बहुतकरून अशा मनुष्यास दुसऱ्यास खूष करण्याची हातोटी साधत नाहीं.

कर्क अगर मकर लग्नीं जन्मणारे लोक राजकीय उलाढालींत फार लक्ष देतात. विशेषतः कर्क लग्नावर जन्मलेले लोक राजकीय उलाढालींत फार पडतात.

वृश्चिकलग्नीं जन्मणारे लोक रसायनशास्त्र व वैद्यकी जाणणारे असतात परंतु ह्या लग्नावरील लोक कपटी व धूर्त असतात. अशा लोकांवर कधींहि विश्वासून राहूं नये.

वृषभ व मीन लग्नांवर जन्मणारे लोक आनंदी, चैनी व स्वतःचे सुखापुरते पाहणारे असतात. प्रायः असले लोक ऐषाराम भोगण्याची इच्छा करितात. वृषभलग्नाचीं माणसें साधारणतः धिमी परंतु त्यांचे विरुद्ध असणाऱ्याशीं खुनशी स्वभावाचीं बनतात.

ग्रहमालेंत बुद्धीचा कारक बुध आहे. म्हणून कुंडलींत बुधाची स्थिति जास्त लक्षांत घेतली पाहिजे. बुधाला सर्वांत वाईट राशी म्हणजे मीन होय. मीन राशींत बुध असणारीं माणसें चंचल मनाचीं, कोत्या विचाराचीं व तोंडाळ असतात. बहुतकरून अशा माणसांना दारूचें अथवा अन्य कोणतें तरी व्यसन असतें.

मीन राशीचे खालोखाल कर्क राशी ही बुधाला वाईट आहे. या राशींत बुध असणारीं माणसें फार उपद्व्यापी असतात.

धनु राशींत बुध असेल तर तीं माणसें मूर्ख, उतावीळ, गर्विष्ठ व ढोंगी असून अत्तरें व इतर सुगंधी पदार्थांचे शोकी असतात. "बुद्धि थोडी, गर्व फार."

मेषराशीत बुध असलेली माणसें फार चौकस असून, त्यांची बुद्धिमत्ता, भाषणशैली चांगली असते. मात्र ती माणसें अधीर स्वभावाची व रागीट असतात. मेषराशीतले बुध असणारे लोक बोलण्यांत पटाईत असतात. वादविवादाची आवड असते.

वृषभ, वृश्चिक अगर मकर या राशींत बुध असेल तर ती स्वार्थी, लोभी, दुसऱ्याचा मत्सर करणारी, द्वेषी व फार लबाड असतात. अशा माणसांशी फार जपून वागावें.

वृश्चिक अगर मकर राशीच्या बुधाचे लोक बुद्धिमान असतात.

सिंहराशीत बुध असलेले लोक सरळ मनाचे व ठाम मताचे असतात.

मिथुन, कन्या, तुला अथवा कुंभ राशींत बुध असेल तर ती माणसें फार चलाख, स्वतंत्र विचाराची, उत्तम लेखक व वक्ते असतात.

जन्मकुंडलींत मंगळ बुधाचा योग असेल तर जन्मणाराची बुद्धि फार तीव्र असते, परंतु तिचा उपयोग चांगले अगर वाईट कृत्यांत होईल हें सांगणें कठीण आहे. मंगळ, बुध ह्या दोन ग्रहांची जन्मकुंडलींत युति असेल तर जन्मणारा फार चपल, फार रागीट, नेहमी खोटें बोलणारा, अधर्मी व दांभिक असतो. मात्र तो गुणवान असतो.

जन्मकुंडलींत बुध गुरूचा योग असेल तर मनुष्य प्रामाणिक होईल. मनुष्याचा स्वभाव रवि व चंद्र यांचेवर अवलंबून असतो. जर जन्मकुंडलींत सूर्यचंद्रावर गुरूची दृष्टि असेल तर मनुष्य विशेष उदार नसतो. या योगावर जन्मलेले लोक ज्या कामामध्यें त्यांचें नांव पुढें येईल अशाच कृत्यांत आपलें औदार्य प्रगट करितात. सूर्यचंद्रावर शुक्राची दृष्टि असेल तर जन्मणारा फार उधळ्या निघतो.

जन्मकुंडलींत शनि-बुध एकत्र असतील तर अशा योगावर जन्मलेला मनुष्य फार धूर्त व स्वार्थलोलुप असतो.

आरोग्य

कुंडलींत पहिली महत्वाची गोष्ट पहाणें म्हणजे आयुष्यमर्यादा व शारीरिक सौख्य, ह्या दोहोंवांचून मनुष्यास इतर सर्व सुखें अनुकूल असूनहि त्याचा विशेष उपयोग नाहीं. शरीर रोगानें ग्रस्त झालेल्या मनुष्याजवळ अलोट संपत्ति असली तरी त्याला स्वतःस तिचा कितीसा उपयोग होणार!

मनुष्यास भविष्यकाळीं होणाऱ्या रोगांची सूचना देणें मोठ्या धन्वंतऱ्यासहि अशक्य आहे. हें अद्भुत सामर्थ्य फक्त फलज्योतिष-शास्त्रांतच आहे यांत शंका नाहीं.

जन्मकुंडली पुरुषाची असली तर रवीची स्थिति आपणास लक्षांत घेतली पाहिजे व स्त्रीची असल्यास चंद्राकडे पाहिलें पाहिजे. सूर्य अथवा चंद्र षष्ठस्थानांत असतां त्याचा परिणाम विशेष दिसून येतो. जन्मकुंडलींत रवि, शनीनें दूषित असेल व तो रवि, दशमस्थानापासून चतुर्थस्थानापर्यंत कोठेंहि असेल तरी शरीरावर वाईट परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. अशा मनुष्यास असाध्य व वर्षानुवर्षे बरें न होणारे रोग जडलेले असतात.

जन्मकुंडलींत रवि मंगळाचा योग अथवा कोणताहि दृष्टिसंबंध असेल तर शरीर सदृढ, निरोगी असतें. परंतु रवि-मंगळाची पूर्ण युति अथवा प्रतियोग असेल तर अपघात व थोडे दिवस टिकणारीं परंतु भयंकर दुखणीं होतात. अशा लोकांना आकस्मित मृत्यु येण्याचा संभव असतो. रवि-गुरूचा केंद्रयोग म्हणजे परस्पर चतुर्थ दशम योग असतां किंवा प्रतियोग होत असेल तर अपस्मार अगर यकृताचे रोग होण्याचा संभव असतो.

रवि, चंद्र एकत्र असतील अगर समोरासमोर असतील तर प्रकृति नेहमीं अशक्त असते. अशा योगावर जन्मलेलीं माणसें क्वचितच दीर्घायुषी निपजतात. अमावास्येला जन्मणारीं बालकें इतर योग कुंडलींत बलिष्ट

नसतील तर बहुतकरून अल्पायुषी होतात. (रवि–चंद्र २।६।८।१२ स्थानीं असतील तर.)

मंगळ–शनि सूर्याला दूषित करीत असतां जितका वाईट परिणाम होतो तितका रवीजवळ मंगळ असतां होणार नाहीं. कारण मंगळ शरीर सदृढ व काटक करितो. परंतु अशा लोकांचा शेवट एखाद्या सार्थाच्या रोगानें अथवा अपघातानें होतो.

वरीलप्रमाणें जर सूर्य, मंगळ, शनि यांचे योग चतुर्थापासून दशमा पर्यंत होत असतील तर असाध्य रोग व वर्षानुवर्षे टिकणारे आजार यांपासून शेवट होईल.

रवि शनि षष्ठस्थानीं एकत्र असतील अथवा षष्ठ द्वादशस्थानीं असतील किंवा त्यांचा केंद्रयोग होत असेल तर शरीरप्रकृतीस ग्रहस्थिति फार अनिष्ट म्हणून समजावें. अशा योगावर जन्मलेले लोक नेहमीं आजारी असतात

जन्मकुंडलींत रवि, गुरु, चंद्र व मंगळ यांचे एकमेकांशीं नवपंचम योग होतील, तर आरोग्यास फार चांगलें असतें. मात्र रवि ६ व्या किंवा ८ व्या स्थानांत नसावा.

स्त्रियांचे कुंडलींत चंद्राच्या स्थितीकडे लक्ष दिलें पाहिजे. रवीचे ऐवजीं चंद्राचा इतर ग्रहांशीं संबंध पाहून पुरुषाचे कुंडलींतील ग्रहयोगाप्रमाणें फल पहावें.

स्त्रियांचे कुंडलींत शुक्र पापग्रहानें दूषित असेल तर अशा योगावर जन्मलेल्या स्त्रिया फार अशक्त असतात शारीरिक दुर्बलतेमुळें, संसारगाडा चाहण्यास त्या असमर्थ होतात.

कोणत्या मनुष्यास कोणता रोग अथवा आजार होईल हें षष्ठस्थानाच्या राशीवरून अथवा पापग्रहाचे राशीवरून ओळखावें. उदाहरणार्थ —

स्थिर राशि, काळजाचे विकार, गळा व मूत्राशय यास होणारे रोग, मुतखडा व खोकला इत्यादि दर्शवितात. द्विस्वभावराशि, क्षयरोग, रक्त ओकणें, बद्धकोष्ठता, जलोदर व रक्ताच्या कमतरतेनें होणारे इतर आजार दर्शवितात. चरराशि अपचन, पोटासंबंधी रोग, मानसिक व्यथा, ज्वर व यकृत मूत्राशयापासून होणारे विकार दर्शवितात. प्रत्येक राशीपरत्वें होणाऱ्या रोगांची साधारण माहिती पुढें दिली आहे.

मेषराशि पष्ठस्थानारंभी असतां अथवा या राशींत बरेच पापग्रह असतां मानसिक व्यथा, भोंवळ अगर चक्कर येणें इत्यादि ज्यांत डोक्याचा संबंध आहे असे रोग होतात.

वृषभराशीचा अंमल मानेवर आहे म्हणून गंडमाळा, खोकला, इत्यादि रोग होतात.

मिथुनराशीचा अंमल बाहु, हात व खांदे, फुप्फुसें यांवर आहे, म्हणून त्या भागास इजा होण्याचा अथवा सांधे दुखण्याचा संभव असतो.

कर्कराशि पोटाचे व पचनक्रियेसंबंधी विकार दर्शविते. पोटांत वायु धरतो. मेदवृद्धि होते.

सिंहराशि पष्ठस्थानांत असेल तर हृदय व पाठ यांना कांहीं आजार होण्याचा संभव असतो. तुला राशीचा अंमल शिरा, यकृत, कमर व मूत्राशय यांच्यावर आहे. ह्या राशींत शनि, मंगळ असतील तर यकृताचे विकार खात्रीनें होतात.

कन्याराशीचा अंमल कमरेवर व धनुराशीचा मांड्यावर, मकरेचा गुढघ्यावर व मीनराशीचा पायावर आहे. ह्या राशींत बरेच पापग्रह असतील तर त्या त्या शरीराचे भागास इजा जाणावी.

मेष, कर्क, तुला व मकर ह्या राशि एकमेकापासून चतुर्थ, सप्तम येतात, म्हणून मकर राशींत असलेले पापग्रह मेष, कर्क व तुला या राशींनीं

नसतील तर बहुतकरून अल्पायुषी होतात. (रवि–चंद्र २।६।८।१२ स्थानीं असतील तर.)

मंगळ–शनि सूर्याला दूषित करीत असतां जितका वाईट परिणाम होतो तितका रवीजवळ मंगळ असतां होणार नाहीं. कारण मंगळ शरीर सदृढ व काटक करितो. परंतु अशा लोकांचा शेवट एकाद्या साथीच्या रोगानें अथवा अपघातानें होतो.

वरीलप्रमाणें जर सूर्य, मंगळ, शनि यांचे योग चतुर्थापासून दशमापर्यंत होत असतील तर असाध्य रोग व वर्षानुवर्षे टिकणारे आजार यांपासून शेवट होईल.

रवि शनि षष्ठस्थानीं एकत्र असतील अथवा षष्ठ द्वादशस्थानीं असतील किंवा त्यांचा केंद्रयोग होत असेल तर शरीरप्रकृतीस मंदस्थिति फार अनिष्ट म्हणून समजावें. अशा योगावर जन्मलेले लोक नेहमीं आजारी असतात

जन्मकुंडलींत रवि, गुरु, चंद्र व मंगळ यांचे एकमेकांशीं नवपंचम योग होतील, तर आरोग्यास फार चांगलें असतें. मात्र रवि ६ व्या किंवा ८ व्या स्थानांत नसावा.

स्त्रियांचे कुंडलींत चंद्राच्या स्थितीकडे लक्ष दिलें पाहिजे. रवीचे ऐवजीं चंद्राचा इतर ग्रहांशीं संबंध पाहून पुरुषाचे कुंडलींतील ग्रहयोगाप्रमाणें फल पहावें.

स्त्रियांचे कुंडलींत शुक्र पापग्रहानें दूषित असेल तर अशा योगावर जन्मलेल्या स्त्रिया फार अशक्त असतात. शारीरिक दुर्बलतेमुळें, संसारगाडा चालविण्यास त्या असमर्थ होतात.

कोणत्या मनुष्यास कोणता रोग अथवा आजार होईल हें ग्रहस्थानाच्या राशीवरून अथवा पापग्रहाचे राशीवरून ओळखावें. उदाहरणार्थः—

पाहिजे पाहिजे. या स्थानांत सूर्य, चंद्र, गुरु अथवा शुक्र असेल तर जन्मणारास आयुष्याचे उत्तर मार्गी संपत्ति व सुख मिळेल परंतु ते ग्रह चतुर्थ स्थानांत स्थानवली अथवा राशिवलि असले पाहिजेत. तसें नसतां यांचा फारसा उपयोग होत नाहीं. या स्थानीं पापग्रह असेल तर आयुष्यांतील बहुतेक भाग दारिद्र्यांतच काढावा लागेल. जर या स्थानांत शनि असेल तर तो संपत्तीवर परिणाम करीत नाहीं. परंतु संसारसुख कमी मिळतें. बहुतकरून अशा मनुष्याला नेहमीं चिंता असते व धातेष्टांकडून सुख मिळत नाहीं. चतुर्थस्थानीं मकर अगर कुंभ राशीचा शनि असेल तर मात्र वाईट अनुभव येणार नाहीं.

शनि अथवा गुरु हे सप्तमाचे स्वामि असून जन्मकुंडलींत ते नवपंचम असतील तर जन्मणारास सासऱ्याकडून द्रव्य मिळेल. एका राशींत बरेच ग्रह असणें हें भाग्याचें अथवा भटराविषे दारिद्र्याचें लक्षण आहे. श्रीमंती अथवा दारिद्र हें ग्रहाचें स्थान व राशी यांजवर अवलंबून राहील.

द्वितीयस्थानीं शनि असणें हा दारिद्र्ययोग आहे. अशा योगावर जन्मलेल्या मनुष्यास प्रत्येक पैसा निढळाच्या घामानें मिळवावा लागतो. त्याच्या चरितार्थास श्रम केल्याशिवाय गत्यंतर नसतें. द्वितीय स्थानाच्या शनीस जर चंद्र येऊन मिळेल तर मग फजितीस पारावर नाहीं. अथवा य दारिद्र ही जोडी त्यांच्या नशीबीं ठेवलीच म्हणून समजावी. मात्र अशा शनि–चंद्रापासून गुरु, सूर्य अगर शुक्र नवपंचम असतील तर शनि चंद्राचा अशुभ परिणाम बराच कमी होईल.

जन्मकुंडलींत गुरु, शुक्र एकत्र असतील तर तो मनुष्य फारच खर्चिक व शौकी निघेल.

सूर्य अगर मंगळ धनस्थानीं असतील तर पैसा अवळ राहणार नाहीं. जन्मकुंडलींत सूर्य, मंगळाचा प्रतियोग असेल तर दिवाणीकज्यांत पैशाचा अपव्यय होईल. चराड व ठक लोकांकडून मनुष्य फसला जाईल.

मेष, वृषभ, सिंह, तुला, धनु व कुंभ ह्या राशि संपत्तिदायक आहेत. इतर राशि संपत्तीस चांगल्या नाहींत. दारिद्र्यदर्शक राशींवर जन्मलेले सर्व लोक दरिद्री होतील असें समजू नये. ग्रहयोगांचा विचार करावा लागेल.

जन्मकुंडलींत दारिद्र्ययोग असून त्यांत जर दारिद्र्यदर्शक राशी असेल तर अधिक वाईट. मनुष्याची लोकप्रियता व कीर्ति जन्मकुंडलींतील त्रिकोण स्थानांवर अवलंबून आहे. त्रिकोणांत जर चरराशि असतील तर मनुष्य चांगल्या अगर वाईट कामांत तरी प्रसिद्धीस येईल.

दशमस्थानांतील शनि अधिकार व पैसा देतो परंतु तो नुकसान केव्हां करील याचा भरंवसा नाहीं. दशमस्थानीं मंगळ असेल तर विशेषतः स्त्रियांचे कुंडलींत अपकीर्ति होण्याचा संभव आहे. त्रिकोणांत द्विस्वभाव राशि असलेले लोक फार करून उदयास येत नाहींत. अशा लोकांवर दुसऱ्याचें वजन पडत नाहीं.

पाश्चिमात्य ज्योतिषी संपत्तीचा विचार करितांना जन्मकुंडलींत (Part of fortune) " धनसहम् " कोठें आहे, आणि त्यावर शुभदृष्टि आहे किंवा काय हें पाहतात. जन्मतः " धनसहम् " उदित भागांत असून त्यावर शुभ ग्रहाची दृष्टि असेल तर संपत्तियोग जन्मतः चांगला आहे असें मानावें.

" धनसहम् " तयार करण्याची रीतः—जन्मलग्न + जन्म चंद्र–जन्म रवि. उदाहरणः—मागें दिलेल्या कुंडलींत " धनसहम् " कोठें आहे तें पाहू. सायन जन्मलग्नः—

	रा.	अ.	क.
	३	१८	५७
जन्म चंद्रः—+	२	२४	२१
	६	१३	१८
जन्म रविः——	४	१६	१२
	१	२७	६

सायनजन्मकुंडलीत " धनसहम् " वृषभ राशीस २७ अंश ६ कलेंत आलें. जेव्हां " धनसहम् "वरून शुभ ग्रह जातील तेव्हां तो काल सांपत्तिकदृष्ट्या उत्तम जाईल.

नोकरी किंवा धंदा

नोकरीसंबंधीं पाहणें असेल तर दशमभावलग्न व सूर्याजवळ असलेला ग्रह पहावा; व एकंदर ज्या राशींत ग्रह जास्त असतील त्या मानानें धंद्याचें अनुमान करावें.

बारा राशींची खालीं दिल्याप्रमाणें विभागणी करितां येईल.

मेष, वृषभ, सिंह व मकर ह्या राशी धातुकाम, घरें बांधणें वगैरे, शिल्पकला, लोहार, कासार वगैरे धातुकाम करणारे धंदे व यंत्रकला यांसंबंधीं धंदे दर्शवितात. कर्क, वृश्चिक व मीन ह्या राशी दर्यावर्दी लोक, खलाशी, कोळी, व्यापारी, मद्यार्क विकणारे लोक आणि छापखानेवाले यांचे धंद्याचें द्योतक आहेत. वृश्चिकराशी वनस्पतिशास्त्रज्ञ व उत्तम वैद्य उत्पन्न करिते. कन्या व धनु ह्या राशी पोष्ट व तारायंत्र वगैरे संदेशवाहक धंदे करणारे लोक, किरकोळ व्यापारी, पुस्तकें विकणारे, खोदकाम करणार व साधारण हस्तकौशल्य करणाऱ्या लोकांच्या धंद्याच्या द्योतक आहेत विशेषतः वृषभ, कन्या, मकर राशींचा संबंध शेतकीकडे आहे. मेष, सिंह व धनु ह्या राशी मोठमोठे कारखाने, लष्करी व इतर मोठे अधिकारी, धाडसी कामें दर्शवितात. मिथुन, तुला व कुंभ ह्या राशी शास्त्रीय शोध, यंत्रकला व दुकानदारी वगैरे दर्शवितात.

जन्मकुंडलींत जर जलराशींमध्यें बरेच ग्रह असतील तर (विशेषतः ह्या राशींत शुभग्रह असतील तर) त्यांच्या लोकांशीं व्यापार केला असतां फायदा होईल. शास्त्रीयराशींत बरेच ग्रह असतील तर शेतकी, घरें बांधणें, विटा अगर कौलांच्या कारखान्यापासून विशेषतः ज्या धंद्याचा संबंध

मातीशीं आहे अशा धंद्यापासून फायदा होईल. अग्निराशींत वरेच ग्रह असतील तर लोहार, सोनार, अग्नीशीं संबंध असणारे धंदे, मोठमोठे कारखाने व यंत्रकलेची ज्यामध्यें गरज आहे अशा धंद्यांत भाग्योदय होईल. अग्निराशींत वरेच ग्रह असणाऱ्या लोकांनीं पोलीस अगर लष्करांत नोकरी केल्यास त्यांत त्यांचा भाग्योदय खास होईल व सर्वांत बलिष्ठ असलेल्या ग्रहांचा मुद्दा धंद्याशीं फाराच संबंध आहे. 'बुध' लेखक, ग्रंथकार, कारकून, अकाउन्टन्ट, शिक्षक, स्टेशनरी विकणारे लोक, बुकसेलर्स व जे लोक निव्वळ पगारावर अवलंबून असतात अशा लोकांच्या धंद्याचा कारक आहे.

दारू विकणारे, कपडे व दागिने विकणारे, फुलें, अत्तरे व अनेक चैनीचे व ऐषारामाचे पदार्थ विकणारे लोक व त्यांचे धंदे शुक्रावरून दर्शविले जातात. शिपाईगडी निर्माण करणारा ग्रह मंगळ होय. लोखंड व अग्नि यांच्या साह्यानें होणाऱ्या धंद्यास मंगळ कारण आहे. 'गुरु' वकील, मुत्सद्दी, कौन्सिलर, उपाध्ये, धर्मगुरु, शिंपी, रेव्हेन्यु अधिकारी, न्यायाधिश व सार्वजनिक लोक निर्माण करितो. 'शनि' छापखानेवाले व शेतकरी यांचा कारक आहे. शनीचा गुरुशीं शिरसंवादयोग अगर त्रिकोणयोग असल तर तो धर्मगुरु व पवित्र माणसें निर्माण करितो. हर्षल हा ज्योतिषी, गुप्त विद्येचे शोध करणारे लोक आणि ज्यांना गूढ व चमत्कारिक विद्येची आवड आहे असे लोक उत्पन्न करितो. बुध, मंगळ व शनि हे मुख्य रूलिंगप्लॅनेट असतील (कुंडलींत अतिशय बलिष्ठ असतील) व एकमेकाशीं योग करतील अगर अशुभदृष्टि संबंध करतील तर चोरी, ठकबाजी, बनावट दस्तऐवज करणें, दुसऱ्याच्या सह्या बनावट करणें वगैरे बेकायदेशीर कृत्यें करून त्यांपासून उपजीविका चालते. शुक्र, हा मंगळ अगर बुधाशीं योग करील तर खोदकाम करणारे लोक, नक्षीकाम करणारे चित्रकार, उत्तम फोटोग्राफर आणि शिल्पकलाभिज्ञ लोक निर्माण

करील. शनीची अथवा हर्षलाची रवीवर शुभदृष्टि असेल तर सरकारी नोकरी मिळेल, सत्ता व अधिकार मिळेल. अशा लोकांना सरकारी नोकरी न मिळाल्यास निदान ते मोठ्या खाजगी संस्थेचे चालक होतील. धंदे हजारों प्रकारचे असल्यानें अमुक ग्रहयोग असला तर अमुकच धंदा मिळेल हें सांगणें अशक्य आहे. परंतु ग्रहांच्या गुणधर्मांवरून धंद्याची अगर नोकरीची दिशा सांगतां येईल.

धंदा अगर नोकरीची योग्यता व महत्व म्हणजे त्यापासून मोठें ऐश्वर्य अगर अतिशय संपत्ति मिळेल किंवा कसें हें रूलिंगप्लॅनेट वरून पाहावें. तो जर उदित भागांत असेल तर नोकरींत अगर धंद्यांत चांगला पैसा मिळेल म्हणून समजावें. बरेच ग्रह चर राशींत असतील तर तसेंच समजावें. रूलिंगप्लॅनेट अथवा बरेच ग्रह अनुदित भागांत असतील तर नोकरींत अगर धंद्यांत फारशी कमाई मिळणार नाहीं. अनुदित भागांत बरेच ग्रह असणाऱ्या लोकांस, सर्व जन्मभर दुसऱ्याचें सुखाकरितां उद्योग करावा लागतो. अशा लोकांना प्रथम महत्वाकांक्षा कमी असते व त्यांना मोठेपणाची हाव मुळींच नसते. त्यामुळें दुसऱ्याची विश्वासुपणें नोकरी करण्यास असे लोक लायक असतात. जन्मकुंडलींत सूर्य व चंद्र एकमेकांशीं द्विरद्वादश योग अथवा त्रिकोण योग करीत असतील तर त्या मनुष्यास धंद्याची अगर नोकरीची उणीव कधींही पडणार नाहीं. परंतु तेच जर एकमेकाशीं केंद्रयोग अथवा प्रतियोग करतील तर अशा मनुष्यास नोकरी अगर धंदा मिळणें फार दुरापास्त होईल. शनिचंद्राचा योग अगर अशुभ दृष्टिसंबंध असेल तर अशा मनुष्यानें स्वतःचे जबाबदारीवर केव्हांहि व्यापार करूं नये. कारण त्यांना नोकरींतच अधिक फायदा होईल. तसेंच सूर्य मंगळाशीं द्विरद्वादश योग अगर त्रिकोण योग करील तर नोकरींत अगर धंद्यांत लवकर भरभराट होईल. परंतु मंगळ सूर्याशीं केंद्रयोग अथवा प्रतियोग करील तर अशा मनुष्याचे आपल्या धन्याशीं क्वचित् पटेल.

स्वतंत्र धंदा किंवा नोकरी?

प्रत्येक मनुष्य शिक्षण संपल्यानंतर किंवा वयांत आल्यावर आपण नोकरी करावी का स्वतंत्र धंदा करावा असे विचारतो आणि हें जन्मकुंडलीवरून ठरविणें अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक मनुष्यानें आपल्या नैसर्गिक गुणांचा उपयोग नोकरींत अगर स्वतंत्र उद्योगधंद्यांत होईल हे आपल्या जन्मकुंडलींतील ग्रहांवरून ठरवावें आणि हें समजून घेण्यांतच फलज्योतिषशास्त्राचें मुख्य रहस्य आहे. प्रत्येक बाबतींत कोणाही माणसाला प्रयोग करून पहातां येणार नाहीं. कारण तसें करण्यांत आयुष्याचा बराचसा भाग व्यर्थ खर्च होईल. कल्पना करा कीं एखादा मनुष्य ग्रहांच्या गुणानुसार नोकरींतच भाग्यशाली आहे असें असूनही त्यानें उद्योगधंद्यास सुरवात केली तर कांहीं वर्षांनीं आपण उद्योगधंद्यास लायक नाहीं असें त्यास समजून येईल व त्याचा द्रव्यनाश होईल. आयुष्य व्यर्थ खर्च होईल. नोकरीचें वय निघून जाईल. नोकरीला अवश्य लागणारें शिक्षण घेतलें जाणार नाहीं व नोकरींतही भाग्य नाहीं व व्यापारांतही भाग्य नाहीं अशी त्याची स्थिति होईल. म्हणून प्रत्येकानें आपला भाग्योदय कशांत होईल हें सूज्ञ ज्योतिषाकडून समजून घेऊन तसें वागावें.

शनि व गुरु हे व्यापारी ग्रह आहेत. कोणताही धंदा मोठ्या प्रमाणांत करण्यास शनि, गुरु अनुकूल असावे लागतात. म्हणजे ते बलहीन राशीला शत्रु राशींत नसावेत. शनि व गुरुबरोबर राहु, केतु, मंगळ या ग्रहांची युति असूं नये. गुरुबरोबर रवि, चंद्र, शुक्र, नेपच्यून या ग्रहांची युति चालेल परंतु हे ग्रह शनीच्या युतींत असूं नयेत. शनि, गुरु यावर पापग्रहांचे प्रतियोग नसावेत. शुभग्रहांचे केंद्रयोग गुरुला झाले तर ते भाग्यदायकच असतात. शनीबरोबर केंद्रयोग मात्र उद्योगधंद्यांत प्रथमतः अडथळे, नुकसान आणतील परंतु शनीबरोबर, त्याचे शत्रुग्रह रवि, चंद्र,

मंगळ यांचे केंद्रयोग वायुराशींत असतील तर ते अत्यंत नुकसान दर्शवितात. शनीबरोबर कोणत्याही ग्रहाचा प्रतियोग हा अशुभ फलदायी समजावा. गुरूबरोबर शुभ ग्रहांचे प्रतियोग उद्योगधंद्यांत स्पर्धा, उघड शत्रुत्व, भाग्योदयाचे कार्मी विलंब दर्शविला जातो. परंतु शेवटीं शनि गुरू-बरोबर अशुभ ग्रहांचे प्रतियोग असल्यास उद्योगधंदा कधींही सुरळीत चालणार नाहीं व नुकसानीमुळें धंदे सोडावे लागतील. व्यापारी लोकांचे कुंडलींत शनि, गुरु यांचेमध्यें अशुभ दृष्टियोग असूं नयेत व हे दोन्ही ग्रह वक्री असूं नयेत व शिवाय ३।६।८।१२ या स्थानांमध्यें शनि व गुरु हे दोन्ही ग्रह नसावेत. त्यापैकीं एक असला तर चालेल. उद्योग-धंद्यांत २।६।१० ह्या पृथ्वीराशी अत्यंत उत्तम असतात. या लग्नाचे लोक क्रयविक्रयाचे कामीं कुशल असतात. पृथ्वीराशीचे खालोखाल वायुराशि म्हणजे ३।७।११ या राशि व्यापारधंद्यास अनुकूल समजाव्या. त्यानंतर जलराशि म्हणजे ४।८।१२; त्यापैकीं वृश्चिक राशि ही व्यापारधंद्याला कांहीं अंशीं बरी असते. परंतु वृश्चिक राशि अत्यंत धूर्त, मतलबी असल्यानें या राशींत गुरु, शनि, बुध अगर लग्न असलेले लोक अत्यंत धूर्त असतात. ते केव्हांही फसले जाणार नाहींत. परंतु या लोकांचे पैसे मिळविण्याचे मार्ग कांहींसे भिन्न असतात व लोकांचा त्यांच्यावर विश्वास नसतो. वृश्चिक लग्नाचे व्यापाऱ्यांना लोकांचीं मनें आकर्षून घेण्याचें सामर्थ्य नसतें. प्रत्यक्ष क्रयविक्रयाचें कार्य त्यांच्याकडून होणार नाहीं.

कर्क व मीन लग्नें व या राशींत गुरु, शनि चंद्र असतील तर त्यांचे उद्योगधंदाकडे लक्ष नसतें. उद्योगधंदा त्यांना आवडतच नाहीं. कर्क लग्नाला नेहमीं नाविन्याची आवड असते. ज्या धंद्यामध्यें नाविन्य नाहीं, व ज्यामुळें एकेच ठिकाणीं रहावें लागतें असे धंदे आवडत नाहीं. कर्क लग्नाचें लोकांना फिरत्या एजंटचीं कामें दिल्यास ते तीं चांगलीं करतील. मीन लग्न

व मीन राशींतील ग्रह, व्यापाराचें कामीं महत्त्वाचे नाहींत. कारण ह्या लोकांने अंगीं चिकाटी, दृढनिश्चय व अंगमेहनत करण्याची पात्रता नसते.

अग्निराशी म्हणजे मेष, सिंह, धनु ह्या व्यापाराचे कामीं निरुपयोगी असतात. या राशि अत्यंत बुद्धिमान व तडफदार आहेत. यांना सत्ता व राज्यकारभार आवडतो. ज्या कामास सत्ता, अधिकार, वर्चस्व नाहीं असे कोणतेही धंदे आवडत नाहींत व त्यांनीं ते करूं नयेत हें बरें. नवीन योजना आंखतील, कोणत्याही उद्योगधंद्याची योजना हे करूं शकतील. मेष व धनु या राशी व्यापारधंद्याला निरुपयोगी असतात. सिंह ही राशि मोठ्या प्रमाणांत उद्योगधंदे चालवू शकेल, परंतु किरकोळ धंदे व लहान-सहान व्यापार सिंह राशि लग्नीं व दशमस्थानीं असणाऱ्या लोकांकडून होणार नाहीं किंवा सिंह राशींत गुरु, शनि चंद्र असतांना व्यापारधंदा होणार नाहीं.

रवि, चंद्र यांचेमध्यें त्रिकोण अगर द्विर्द्वादश योग असेल किंवा रवि अगर चंद्र गुरु-शुक्रांशीं त्रिकोण योग करील तर अशा योगावर जन्मलेले व्यापारी पुष्कळ संपत्ति मिळवितील. हे दृष्टियोग असून शनीरोबर कांहीं ग्रहांचे अशुभयोग असतील तर नुकसानही येईल, पण नुकसानीपेक्षा नफा जास्त प्रमाणांत असेल. महाराष्ट्रांतील एका कोट्याधीश व्यापाऱ्याचें कुंडलींत शनिचंद्राची युति दशमस्थानीं असूनही चंद्र-गुरु व शनि-गुरु यांचे १० २ स्थानीं त्रिकोणयोग झाल्यानें हे अत्यंत मध्यम स्थितींतून कोट्याधीश व्यापारी झाले. लग्नीं रवि, शुक्र वृश्चिक राशीचे आहेत. दशमस्थानच्या शनिचंद्राच्या युतिनें वयाच्या ६० वर्षांनंतरचीं वर्षें उद्योगधंद्यास अडचणीचीं जातील. कांहीं धंदे (Liquidate) गुंडाळावें लागतील.

शनि चंद्राची युति होणें हा योग पैसा देणारा असतो. पुष्कळ कर्तबगार माणसें, राजकारणधुरंधर माणसें व मोठे व्यापारी हे शनिचंद्राच्या युतीवर

जन्मास आलेली असतात. ते आपल्या कपटनीतीनें जगांत पुढें येतात. परंतु आयुष्याच्या शेवटी त्यांच्या कार्यांत बराच विध्वंस झालेला त्यांना दिसून येतो व मानसिक शांतता त्यांना केव्हांही मिळत नसते. शनि चंद्राचे युतीनें शांतता मिळत नसली तरी अलोट पैसा मिळूं शकेल. शनि चंद्राची युति असण्यापेक्षां चंद्रापासून शनि १२ वा असणें अधिक वाईट असते. १२ वा शनि असल्यानें कार्याचा व्याप वाढत नाहीं, अनेक अडचणी येतात, पैशाचें नुकसान सोसावें लागतें. चंद्रापासून शनि २ रा असल्यास चालेल परंतु १२ वा नसावा. जन्मकुंडलीमध्यें शनिचंद्राचे अशुभ दृष्टियोग असतील म्हणजे अर्धकाटकोन योग, काटकोनयोग व प्रतियोग व समकोनि योग असेल व शनि अगर चंद्रावर गुरु, मंगळ, नेपच्यून यापैकीं एकाही ग्रहाचा शुभदृष्टियोग होत नसेल तर अशा लोकांनीं व्यापारधंद्यात केव्हांही पडूं नये. जन्मकुंडलींत द्वितीयस्थानीं २ किंवा ३ क्रूर ग्रह बलहीन राशीला असतील किंवा रवि–शनि, मंगळ-शनि, शनि-राहु, केतु-शनि, केतु-रवि, हर्षल-शनि इत्यादि क्रूर ग्रहांची युति शत्रूराशींत असेल व त्यावर गुरु, चंद्र, मंगळ, नेपच्यून यांचा एकही त्रिकोणयोग नसेल तर अशा लोकांनीं उद्योगधंद्यात पडूं नये. पंचमस्थानीं २ किंवा ३ क्रूर ग्रह असतील तरीही व्यापारधंदा करूं नये. कारण त्यांना विपरीत बुद्धि होऊन व्यापारधंद्यासंबंधानें त्यांचे सर्व अंदाज चुकतील. अष्टमस्थानीं रवि, शनि, हर्षल, मंगळ यापैकीं कोणतेही दोन ग्रह असले तरी अशा लोकांनीं उद्योगधंदा करूं नये. नवमस्थानीं शनि, मंगळ, हर्षल यापैकीं कोणतेही २ ग्रह असतील व द्वादशस्थानांत कोणतेही २।३ ग्रह असून ते ग्रह नवमस्थानांतील ग्रहांशीं केंद्रयोग करतील तर अशा व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघतात. धंदे बुडतात व राजकीय संकटें येऊन बंधनयोग येतात. दशमस्थानांत कोणतेही शुभ व अशुभ ग्रह असणें उद्योगधंद्याचे बाबतींत उत्तम असते. परंतु दशमांतील ग्रहाबरोबर शनि,

मंगळ, हर्षल, राहू यांचे केंद्रयोग असू नयेत व एकादश स्थानांतील शुभ अशुभ ग्रह द्रव्यप्राप्तीस चांगले असतात. परंतु अशा व्यापाऱ्यांना लाभ, हानि या दोन्हीही गोष्टींचा अनुभव घ्यावा लागतो. शुभ ग्रहानें फायदा होतो व अशुभ ग्रहानें हानि होते. परंतु एकादशस्थानीं असलेले ग्रह सरहोल बुडविणार नाहीत. द्वादशस्थानीं शुभग्रह व्यापारधंद्याचे कामीं कांहीं मदत करणार नाहीत. अशुभ ग्रह मात्र कर्जबाजारीपणा वाढवतील. येथें असलेल्या ग्रहांवर अष्टमांतील शुभाशुभ ग्रहांचा त्रिकोणयोग होत असेल तर मात्र काळा बाजार, सरकारी कायद्याचें उल्लंघन करून, अनीतीनें व अप्रामाणिकपणानें पैसा भरपूर मिळेल. कांहीं कोट्याधीशांच्या कुंडलींत हे योग दिसून येतात.

शनि, गुरु, हर्षल, नेपच्यून यांचेमध्यें द्विरद्वादश अगर त्रिकोणयोग होत असतील तर अशा लोकांचे अंगीं मोठमोठे उद्योगधंदे फर्तेबगारीनें चालविण्याची पात्रता असते. शनि आणि चंद्राचे शुभयोग पैसा जमविण्याचे कामीं फार उपयोगी असतात. असे लोक काटकसरीनें पुष्कळ पैसा जमवितात. चंद्र बुधाचे शुभयोग असतां क्रयविक्रयाची उत्तम हातोटी देतो. अशा योगावर जन्मलेले लोक धोणत्याही धंद्यांत उत्तम विक्रेते (Salesman) होऊं शकतात. चंद्र, बुध आणि मंगळ यांच्यात शुभयोग असलेले व्यापारी कोणताही सौदा पटविण्यांत प्रवीण असतात. कठीण वाटणारे सौदे हे लोक उत्तम रीतीनें जमवितात. दशमांतील गुरु तृतीयस्थानांत अगर नवमस्थानांत रवि शुक्र युति ही व्यापारधंद्याला यशकारक असते.

धनसप्तम् २।५।९।१०।११ स्थानीं असणें हा धनयोग आहे व याच स्थानांत धनसप्तमची रवि, चंद्र, गुरु शुक्रासरोबर युति असणें धनसंचय दर्शवितो. मात्र ह्याचवेळीं रवि, चंद्र, गुरु, शुक्र यांवर शनिमंगळाचे केंद्र, युति, प्रतियोग असू नयेत.

रविशनिची युति अगर अशुभ दृष्टियोग नुकसान दर्शवितात. गुरु-चंद्राचे व रविगुरुचे अशुभ दृष्टियोग मांडवलामध्यें फार पैसा अडकवावा लागेल असे दर्शवितो व जाहिरात, दुकानदारी, इमारती व नोकरवर्ग यामध्यें फार खर्च दर्शवितो. शनिचंद्राचे अर्धकाटकोन, केंद्रयोग व प्रतियोग अभागीपणा दर्शवितात व अशा लोकांना उद्योग-धंद्यांत नेहमीं अपयश व नुकसान येतें.

प्रत्येक धंद्याचे कारक ग्रह कोणते, जन्म-ग्रहानुसार कोणता धंदा कोणी करावा व त्यांत त्याचें भाग्य किती फलद्रुप होईल, याचा सविस्तर विचार आम्ही जातकनिदानचे द्वितीय आवृत्तीमध्यें करणार आहोत. प्रसिद्ध झाल्यावर तो ग्रंथ अवश्य वाचावा.

विवाह

दांपत्यसुखाबद्दल पाहणें असेल तर पुरुषाचे कुंडलीत चंद्र व शुक्र, स्त्रियांचे कुंडलीत रवि व गुरु पहावा. हे ग्रह जर बलिष्ठ असतील आणि शनीचे पापदृष्टींत नसतील तर, विशेषतः हे ग्रह ओरिएन्टल म्हणजे ४ पासून १० स्थानापर्यंत असतील तर लग्न लवकर होईल. शनि, सूर्यास अगर शुक्रास दूषित करील तर लग्नास विलंब लागेल. वरील ग्रह निर्बली असतील व शनि बलिष्ठ असेल आणि लग्न व पंचमामध्यें धेर्यराशि असतील तर लग्न होणें कठीण आहे. झालेंच तर फार विलंबानें होईल. पुरुषाचे कुंडलीत चंद्राश, शुक्र युति, केंद्रयोग, प्रतियोग या योगानें दूषित करील तर द्विभार्यायोग लवकरच होईल. हाच योग मिथुन, धनु, अथवा मीनराशींत पडेल तर बहुभार्यायोग होतो. म्हणजे अशा मनुष्यास एके-वेळीं एकापेक्षा अधिक भार्या असतात. वरील राशींत सदरहू ग्रह असून चंद्र लवकरच एकापेक्षा अधिक ग्रहाशीं युति करील तर बहुभार्या योग होईल.

स्त्रियांचे कुंडलींत चंद्राऐवजी सूर्य पहावा. शनि-शुक्राश दूषित करीत असेल तर लग्नांत वरीच विघ्नें येतील. अनेक प्रसंगीं लग्न जमून नंतर विवाह होईल. ऐनवेळीं आयत्यांत संकटें येऊन फिसकेल. शुक्रास हर्षलचा अशुभदृष्टिसंबंध असेल तर अकल्पित संकटें येतील, चंद्र, सूर्याला दूषित करील तर लग्न वरेंच लांबणीवर टाकावें लागेल.

लग्न, पंचम व सप्तम ह्या स्थानांत जलराशी असतील तर लग्न लवकर होईल. या स्थानांत वंध्याराशी असतील तर विवाह लवकर होणार नाहीं. चंद्र पंचमांत अथवा सप्तमांत असून रवीचा दृष्टियोग करील तर लग्न फार लहानपणीं होईल.

दांपत्यसुख चंद्र, शुक्र, रवि, हर्षल व विशेषतः सप्तमस्थान यांवर अवलंबून आहे. सप्तमस्थानांत हर्षल, शनि, अथवा मंगळ असेल तर उभयतांस विवाहापासून फारच थोडें सुख मिळेल. नवराबायकोंत खरें प्रेम राहणार नाहीं. वरील ग्रह सप्तमांत अतिशय बलवान असतील तरी विशेष दांपत्यसुख देण्यास ते समर्थ होत नाहीत. उभयतांत नेहमीं कलह सुरू राहणारच. वरील ग्रहांपैकीं, एखादा ग्रह सप्तमांत असून त्याजवर पाप-ग्रहाची नजर असेल तर विवाहापासून कोणतेंहि सुख न होतां उलट दुःखच प्राप्त होईल. स्त्रियांचे कुंडलींत रवि हर्षलाकडून बिघडलेला असेल तर स्त्रियांचें पाऊल वाईट मार्गांत पडण्याचा संभव आहे. कांहीं प्रसंगीं अशा स्त्रिया नवऱ्यास सोडूनहि जातात. स्त्रियांचे कुंडलींत रवि-मंगळाचा अशुभदृष्टिसंबंध असेल तर त्यांना पति अगदीं निर्दय व आडदांड मिळतो. सूर्य शनीनें दूषित होईल तर निरुपयोगी, वाचाळ, आळशी पति मिळेल. पुरुषांचे कुंडलींत असा योग असला तरी वाईट. दोन्ही स्थितींत दांपत्यसुख मुळींच मिळणार नाहीं. हर्षल सूर्याशीं अशुभयोग करीत असला तरी स्त्रिया बिघडण्याचा संभव असतो. विशेषतः वृश्चिक, कर्क अथवा मीन लग्न असून असा योग होईल तर स्त्रिया बिघडण्याचा

जास्त संभव असतो. पुरुषाचे कुंडलींत वरील योग चंद्राशीं पहावे. जर चंद्र हर्शलाशीं युति, केंद्रयोग, किंवा प्रतियोग करील तर अशा योगावर जन्मलेला मनुष्य परस्त्रीशीं व्यभिचार करील. चंद्र, हर्शलाचा द्विरार्धांतर योग असला तरी मनुष्य व्यभिचारी निघेल. हर्शल, शुक्र यांची जन्म-कुंडलींत युति असेल अगर अशुभ दृष्टिसंबंध असेल तर असा मनुष्य तरुण विधवेशीं पापरत होईल. स्त्रियांचे कुंडलींतहि असा योग होणें वाईट असतें. वरील योग असून त्यापैकीं एखादे ग्रहावर मंगळ किंवा शनीची दृष्टि असेल तर फार बोभाटा होईल व सर्व लोकांत त्याची नीति-भ्रष्टता दिसून येईल. परंतु शुक्र, हर्शल यांचा वरील योग होत असूनहि त्यापैकीं एकावर जर गुरूची दृष्टि असेल तर त्यांचे दुर्वर्तनाची गंध-वार्ताहि लोकांस लागणार नाहीं. हर्शल अगर शुक्रावर शनीचा द्विरार्धांतर योग किंवा त्रिकोण योग होत असेल तर अशा मनुष्याचें पाप फार गुप्त राहील. शुक्र व शनि यांचा शुभ दृष्टिसंबंध असेल तर उभयतांमध्यें चांगली प्रीति असते. गुरु अथवा शुक्र सप्तमांत असतील तर गृहसौख्य उत्तम लाभेल. सूर्य किंवा चंद्र येथें असतील तरीहि दांपत्यसुख बरें मिळेल. मात्र तें चंद्र सूर्य यांच्याशीं इतर ग्रहांच्या होणाऱ्या दृष्टिसंबंधावर अवलंबून असतें.

चंद्र प्रथमतः जन्मकुंडलींत ज्या ग्रहाशीं योग करील त्या ग्रहाच्या मुख्य धर्मावरून पत्नीचा स्वभाव व स्वरूप ओळखावें. सप्तमस्थानारंभीं जर एखादा ग्रह असेल तर प्रथम तो विचारांत घ्यावा. कारण चंद्रापेक्षां सप्तम भावारंभीचा ग्रह भावासुखास फार कारणीभूत आहे. तेथें ग्रह नसेल तर मात्र चंद्रावरून विचार करावा.

जन्मकुंडलींत चंद्र जर शुक्राशीं योग करील तर पत्नी प्रेमळ व संसारदक्ष मिळेल. बुधाशीं योग करील तर ती चतुर, हुशार, चपळ परंतु फार वाचाळ मिळेल. चंद्र मंगळाशीं योग करील तर पत्नि फार धीट, दांडगी,

बेमुरवत आणि नवऱ्याची परवा न करणारी आणि अतिशय तामसी मिळेल. चंद्र प्रथम गुरूशीं योग करील तर पति न्यायी, आनंदी, कृपाळु आणि गुरुभावाची मिळेल. चंद्र शनीशीं योग करील तर गंभीर, उदास थोडी गलिच्छ, एकलकोंडी, तुसडी परंतु कर्तव्यदक्ष मिळेल. चंद्र प्रथम सूर्याशीं योग करील तर उदार, कुलीन, मोठ्या मनाची, सरळ स्वभावाची, पण निश्चयी मिळेल. चंद्र हर्शलाशीं योग करण्यास जाईल तर चमत्कारिक व तऱ्हेवाईक, हट्टी, धाडसी, स्वतंत्र विचाराची व बेपर्वा मिळेल. चंद्राचा शुभग्रहाशीं योग होत असूनहि चंद्रावर इतर अशुभ दृष्टिसंबंध असेल तर शुभफलें कमी प्रमाणानें अनुभवास येतील. चंद्र व शुक्र कोणत्या राशींत आहेत, हें पहाणेंसुद्धां महत्त्वाचें आहे. चंद्र शुक्र हे त्रिकोण योग (नव पंचम) करीत असून जर हा योग तुला राशींत होईल, तर जशी पत्नि मिळेल त्याचेपेक्षां तोच जर मकर, मेष, अगर कन्या राशीमध्यें होईल तर त्याचें महत्त्व पहिल्या योगापेक्षां पुष्कळच कमी ठरेल. त्याप्रमाणें इतर ग्रहांचें पहावें.

स्त्रियांचें कुंडलीत रवि विचारांत घ्यावा. स्त्रियांच्या कुंडलीत ७ किंवा ८ स्थानांत गुरु रवि असेल अथवा तेथें गुरु असून त्यावर शनीची शुभदृष्टि असेल तर श्रीमंत मनुष्याबरोबर लग्न होईल. त्याप्रमाणेंच शनि किंवा गुरु सप्तमाचे स्वामी असून शुभ दृष्टीमध्यें असतील तर समजावें. सूर्य हा मंगळ, शनि किंवा हर्शलनें बिघडलेला असेल तर तो एक मोठा उधळेपणाचा योग आहे अथवा लग्न झाल्यानंतर पतीवर अनेक अपरिहार्य संकटें तरी येतील. त्याप्रमाणें पुरुषाचे कुंडलींत चंद्र बिघडलेला असेल तर द्विभार्यायोग समजावा. चंद्र हा मिथुन, धनु व मकर या राशींत असून मंगळ हर्शल व शनीशीं अशुभयोग करील तर पहिले बायकोचा लवकर मृत्यु होईल.

संतति

जन्मकुंडलींत ५ आणि ११ हीं संततिस्थानें. एकादशस्थान सप्तमस्थानापासून पांचवें येतें व सप्तमस्थानावरून पतिपत्नीचा विचार होतो. सप्तमापासून एकादशस्थान पांचवें आहे. म्हणून एकादशस्थान हें संततिस्थान मानिलें आहे. ह्या दोन स्थानांत अथवा स्थानारंभीं जर स्त्रीराशि किंवा प्रसवराशि असतील तर संतति पुष्कळ होईल. चंद्र, शुक्र व गुरु हे संतति देणारे ग्रह आहेत. सूर्य, मंगळ, शनि, हर्शल व राहू हे संततीस अवरोध करणारे ग्रह आहेत. पांच किंवा अकरा स्थानांत त्या राशीच्या नैसर्गिक गुणाप्रमाणें हे ग्रह संततीचा नाश करण्यास कारण होतात. मेष ही अल्प वंध्या राशि आहे. ही राशि फार तर १ अथवा २ मुलें देते. वृषभ ३ किंवा ४. मिथुन २–३. कर्क ५–६. सिंह वंध्या राशि आहे. कन्या वंध्या २ किंवा ३. तुळा ३–४. वृश्चिक ७–८ धनु ३ अथवा ४. मकर ९–१०. कुंभ, निम वंध्याराशी. मीन ७ किंवा ८ मुलें देते. जेव्हां पंचम अगर अकराव्या स्थानांत ग्रह नसतील तेव्हां वर दिलेली संततीची संख्या अनुभवास येईल. सूर्य, बुध, राहु वगैरे पापग्रह पंचमांत असतील तर संख्या कमी करतील. चंद्र, शुक्र किंवा गुरु असेल तर वर दिल्यापेक्षां संतति जास्त होईल. पंचम स्थानीं वृश्चिक, धन किंवा मीन राशीत चंद्र असेल तर संतति फार होते. कधीं कधीं जुळीं होतात. त्याप्रमाणेंच कर्क राशींत पंचमांत चंद्र असेल तर जुळें होण्याचा संभव आहे.

पंचमस्थानांतील ग्रहांवर ज्या मानानें इतर ग्रहांचा दृष्टिसंबंध असेल त्या मानानें संततीची संख्या अधिक होईल. त्या ग्रहांचा इतर ग्रहांशीं पापदृष्टिसंबंध असेल तर संततीची संख्या कमी होईल.

चंद्र, गुरु अथवा शुक्र पंचमस्थानांत असेल तर मुलें आज्ञाधारक व कर्तव्यदक्ष निपजतील व त्यांचेपासून आईबापांस फार सुख मिळेल. ह्या

स्थानांत पापग्रह असतील तर आईचा मात्र मुलापासून फार त्रास होईल. मुलें रोगट व हट्ट निपजतील. ह्या स्थानीं शुभग्रह असून त्यावर पापग्रहांची दृष्टि असेल अगर शुभग्रह एकादशस्थानीं असून तो पापग्रहांनीं दृष्ट असेल तर कांहीं अपत्यें लहानपणींच मरण पावतील. पांचव्या स्थानावरून पहिल्या अपत्याचा विचार करावा. सातव्या स्थानावरून दुसऱ्याचा, नवव्यावरून तिसऱ्याचा, अकराव्यावरून चवथ्याचा, पहिल्यावरून पांचव्याचा, व तिसऱ्यावरून सहाव्याचा विचार करावा. पुन्हां पांचव्या स्थानावर सातव्या अपत्याचा व मागील क्रमानेंच त्यापुढील संततीचा विचार करावा. जन्मकुंडलीवरून कांहीं मुलें अल्पायुषि होण्याचा योग असेल व नवमस्थान बिघडलेलें असेल अथवा त्याचा स्वामि पापग्रहाच्या दृष्टींत असेल तर तिसरें मूल अल्पायुषि समजावें. पापग्रह सप्तमांत असतील तर दुसरें मूल लवकर मरेल. जर अकराव्या स्थानांत पापग्रह असतील व त्याचा स्वामी बिघडलेला असेल तर नववें मूल अल्पायुषि होईल. ही पद्धत बरेच अंशीं अनुभवानें खरी ठरली आहे. स्त्रीराशीमध्यें बरेच ग्रह असतील तर मुलापेक्षां मुलींची संख्या जास्त होईल व पुरुषराशींत बरेच ग्रह असतील तर मुलें जास्त होतील. पंचमभावारंभीं पुरुषराशि असेल व त्या भावाचा स्वामि पुरुष असेल तर मुलगे जास्त होतील म्हणून समजावें. परंतु उलट-पक्षीं जर त्या भावारंभीं स्त्रीराशि असून त्या स्थानाचा राशिस्वामि स्त्रीग्रह असेल तर मुलींची संख्या जास्त होईल. पत्नीच्या कुंडलींत पंचमभाव व त्याचा स्वामि पतीचे कुंडलीपेक्षां अधिक बळकट असेल तर मुलापेक्षां मुली जास्त होतील.

पंचमस्थानावरून संततीचें उत्तम सुख आहे असें दिसत असेल व एकादश स्थानावरून संततीबद्दल अनिष्ट दिसत असेल तर कांहीं मुलें लहानपणींच गमावतील असें समजावें. ह्याच्या उलट परिस्थितींतहि तसेंच फळ मिळेल. पंचमाचा स्वामि शुभदृष्टींत असून स्वगृहीं असेल तर पहिलें

मूल फार भाग्यवान् आणि प्रसिद्धीस येईल म्हणून समजावें. त्याप्रमाणेंच पंचमस्थानाचा स्वामि योग्य ठिकाणीं असेल अगर उदित भागांत असेल तर मुलें भाग्यवान होतील. परंतु संततिदायक ग्रह निर्बली असून अनुदित भागांत असतील अथवा इतर ग्रहांच्या पापदृष्टींत असतील तर मुलें कमनशिबी व विशेष पुढें न येणारीं अशीं होतील. मंगळ व गुरु यांचा योग व प्रतियोग असेल अथवा शनि-गुरूचा अशुभ दृष्टिसंबंध असेल तर बरींच मुलें लहानपणीं गमावतात. माजी महाराणी परलोकवासी व्हिक्टोरिया यांचे कुंडलीत गुरु शनि यांचा अर्ध काटकोन दृष्टियोग होता म्हणून त्यांचीं तीन मुलें लहानपणीं वारलीं.

प्रवास

तृतीय आणि नवम हीं प्रवासस्थानें आहेत. चंद्र व शुक्र हे प्रवासकारक ग्रह होत. वरील स्थानांत चर किंवा द्विस्वभाव राशीचा पुढील अर्धा भाग असेल आणि चंद्र व शुक्र चर किंवा द्विस्वभाव राशीच्या दुसऱ्या अर्धांत असतील तर जन्मणारास पुष्कळ प्रवास व कांहीं जलपर्यटणें होतील म्हणून समजावें. तिसरें स्थान हें रेल्वेनें होणारे व इतर लहानसहान प्रवास दर्शवितें. नवमस्थान हे दूरदूरचे प्रवास आणि जलमार्गानें होणारे प्रवास दर्शवितें. चंद्रावर हर्षलची शुभदृष्टि असेल व तो १-३-९ या स्थानांत असेल तर पुष्कळ प्रवास होतील. चंद्र अथवा मंगळ ३-९-१२ या स्थानांत असून त्या स्थानीं कर्क अगर मीन राशी असेल तर जलप्रवास होतील. जन्मकुंडलींत शनि बलिष्ठ असेल तर मनुष्यास घर सोडावेंसें वाटणार नाहीं. त्याप्रमाणेंच रवि बलवान असेल तर समजावें. हर्षल, मंगळ, बुध अथवा चंद्र हे ग्रह स्थलांतर करण्यास अथवा होण्यास योग्य असतात. वरील ग्रह कुंडलींत अगर प्रवास-स्थानांत असतील तर जन्मणारास एकेठिकाणीं क्वचितच रहावें लागेल. गुरु आणि शुक्र फार

बलिष्ठ असतील तर प्रवास कामकाजाकरितां अगर रहाणें येथीलपेक्षां परदेशांतर होईल.

आपला भाग्योदय कोणत्या दिशेस होईल हें पहावयाचें झाल्यास चरेन ग्रह कुंडलींत कोणत्या दिशेस आहेत तें पहावें. चरेन शुभग्रह दक्षिण दिशेस असतील तर आपल्या जन्मभूमीपासून दक्षिणेकडे गेल्यास भाग्योदय होईल. उदाहरणार्थः—कुंडलींत चरेन ग्रह वृश्चिक अगर धनुराशींत असतील तर त्या मनुष्याचा भाग्योदय कर्नाटक वगैरे अगदी दक्षिणेकडील भागांत होईल. जर नवमस्थानांत चरराशी असून शुभग्रह असतील तर अशा योगावर जन्मलेल्या मनुष्याचा भाग्योदय घरीं राहून होणार नाहीं. त्यानें देशांतर केल्यास त्वरित त्यास यश येईल. तसेंच, प्रवासकारक ग्रह १–१०–१२–६ या स्थानांत असतील तर भाग्योदय परक्या देशांत अगर प्रांतात होईल. कोणत्या मनुष्याचा भाग्योदय कोठें होईल याचें सविस्तर व तिनचूक वर्णन देणें शक्य नाहीं. हें अनुमान प्रत्येक ज्योतिषानें धारासार विचार करून आपापल्या धोरणानेंच घ्यावें. प्रथमतः सूर्य कोणत्या दिशेस आहे तें पहावें सूर्यापाठीच बुध आणि शुक्र असणार कारण ते ग्रह सूर्यापासून २८ आणि ४८ अंशांपेक्षा जास्त अंतरावर असत नाहींत. नंतर गुरु पहावा गुरुवर मंगळाची अशुभदृष्टि असेल अथवा तो कन्याराशींत असेल तर तो स्थलांतरास अनुकूल नाहीं असें समजावें. जे ग्रह जास्त बिघडलेले असतील त्या ग्रहांकडून दाखविल्या जाणाऱ्या दिशेस कधींहि नोकरीकरितां अगर धंद्याकरितां जाऊ नये. त्या दिशेस गेल्यास नेहमीं त्रास होईल अथवा शरीरप्रकृति चांगली राहणार नाहीं व दिवस दारिद्र्यांत कंठावे लागतील. मेषराशी ही जन्मभूमीपासून पूर्वेकडील मुलूख दर्शविते, वृषभ व मिथुनराशी हा ईशान्येकडील मुलूख अगर प्रांत दर्शवितात. कर्कराशि जन्मभूमीचे उत्तरेकडील प्रांत दाखवील. चरेन ग्रह सिंह, कन्या किंवा तुला राशींत असतील तर वायव्यदिशेस जन्मणाराचा भाग्योदय

होईल. जन्मकुंडलींत जर तृतीय व चतुर्थस्थानें बलिष्ठ असतील तर आपला जिल्हा सोडून जाण्याचें कारण नाहीं. गेल्यास पश्चात्ताप होईल.

घर कोणतें पसंत करावें

भाग्योदय होणें, आरोग्य असणें, संतति, संपत्ति मिळणें, कुटुंबात प्रेम नांदणें वगैरे बऱ्याच गोष्टी उत्तम घर मिळण्यावरहि अवलंबून असतात. एखादे नवीन जागीं आपणास हाल सोसावे लागतात, नवीन नवीन संकटें येतात. नेहमीं कुटुंबामध्यें कोणीना कोणीतरी आजारी असतें व अनेक तऱ्हेचे शारीरिक व मानसिक क्लेश सोसावे लागतात. अशा प्रसंगीं हें घर आपणास लाभत नाहीं असें आपण म्हणतों आणि कर्मधर्मसंयोगानें दुसरें घर घेतल्यास वक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणें जिकडे तिकडे सुख व शांति नांदू लागते. तेव्हां बऱ्याच गोष्टी घर पसंत करण्यावरहि अवलंबून असतात असें म्हणावें लागतें. हें विधान कदाचित् फार धर्मभोळेपणानें व दैववादीपणाचें दिसेल परंतु वरील गोष्टीचा मात्र आमचे वाचकांपैकीं बऱ्याच जणास अनुभव आला असेल यांत शंका नाहीं. पुढें दिलेल्या भागात कोणत्या राशीचे मनुष्यानें कोणतें घर पसंत करावें याबद्दल विचार केला आहे.

आपणास नेहमीं असा अनुभव येतो कीं, एखादे ठिकाणीं आपली कालक्रमणा सुखाची जाते व तें घर बदलताच पूर्वीची स्थितीहि बदलते. घरात कोणीना कोणी तरी आजारी होतें. अनेक अडचणी येतात व कुटुंबात मृत्यूहि होतात. यावरून एकादें घर आपणास सुखदायक होईल किंवा नाहीं हें सुद्धा आपले कुंडलीवरून ठरविलें पाहिजे. ज्या घरांत एखादे मनुष्यावर संकटपरंपरा येतें त्याच घरांत दुसरा मनुष्य राहण्यास गेल्यावर त्याची त्याच जागेंत फार भरभराट होते असें आपण नेहमीं पहातों. एकच जागा दोन मनुष्यांस वेगळाली परिस्थिति उत्पन्न करूं शकते. यावरून त्यात त्याच्या जन्मग्रहांचा कांहीं संबंध असला पाहिजे.

कुंडलींत प्रथम केंद्राचा विचार करावा. केंद्रांत जर चरराशि असतील तर घर जेथें अनेक रस्ते मिळतात अशा ठिकाणीं असावें. कोपऱ्यांत असावें. स्थिरराशि असतील तर सडकेच्या अगर रस्त्याच्या मध्यभागीं घर असावें. कोपऱ्यांत किंवा जेथें दोन अथवा दोहोंपेक्षां जास्त रस्ते मिळतात तेथें घर असूं नये. केंद्रांत द्विस्वभाव राशि असतील तर घर सडकेच्या अगर रस्त्याचे शेवटीं असावें, मात्र कोपऱ्यांत असूं नये.

मेष व कर्कराशि सडकेवरील अगर कोपऱ्यांतील पहिलें घर दर्शवितात. तुला व मकरराशि शेवटचें घर दर्शवितात. कल्पना करा कीं, एका सडकेच्या बाजूस एकंदर ३० घरें आहेत तर मेष, कर्क राशि पहिलें घर दर्शवितात व तुला मकर हे तिसावें घर दर्शवितील. स्थिर आणि द्विस्वभाव राशि बाकी राहिलेलीं घरें दर्शवितात. विशेषत. स्थिरराशि २ ते १५ पर्यंत व द्विस्वभावराशि १६ ते २९ पर्यंतचीं घरें दर्शवितील.

केंद्रस्थानांत विशेषत १ आणि ४ हीं स्थानें पहावीं. ह्यापैकीं एकांत चरराशि व दुसऱ्यांत द्विस्वभावराशि असेल व ह्या राशि दक्षिणेकडील असतील तर रस्त्याचे शेवटीं घर घ्यावें व त्या राशि उत्तरेकडील असतील तर रस्त्याचे आरंभीं घर घ्यावें. मेषः–पूर्व, कर्कः–उत्तर, तुलाः–पश्चिम, मकरः–दक्षिण. लग्न व चतुर्थ यांत अनुक्रमें मेष व कर्कराशि असतील तर घर वायव्य दिशेस घ्यावें. म्हणजे घराचा एक दरवाजा उत्तरेकडे व दुसरा दक्षिणेकडे असावा. लग्न व चतुर्थस्थानांत किंवा त्या स्थानाचे आरंभीं तुला व मकर राशि असतील तर घराचा एक दरवाजा दक्षिणेकडील व दुसरा पश्चिमेकडे असावा. याप्रमाणेंच इतर राशींचा विचार करावा. मेषपासून कर्क राशि ईशान्य दिशा दर्शवितात. कर्कपासून तुलापर्यंत वायव्य दिशा दर्शवितात. तुला ते मकर नैर्ऋत्य आणि मकर ते मीन आग्नेय दिशा दर्शवितात.

केंद्रांत चरराशि असतील तर गांवांत उंच ठिकाणीं घर घेऊं नये. खेड्यामध्यें राहणाऱ्या मनुष्याचे कुंडलींत जर चरराशि केंद्रांत असतील तर यानें जेथें दोन रस्ते मिळतात तेथें रहावें. याशिवाय द्विस्वभावराशि केंद्रीं असलेल्या मनुष्यानें प्रमुख ठिकाणीं राहण्याची इच्छा धरूं नये. स्थिरराशि केंद्रीं असलेल्या लोकांनीं यामधील स्थिति पत्करावी.

आपला भाग्योदय कोठें होईल ? घर सोडणें इष्ट आहे कीं काय ? हें समजणें सुद्धां महत्त्वाचें आहे. जर चतुर्थस्थानांत एखादा पापग्रह असेल किंवा त्या स्थानीं असलेले ग्रह निर्बली असतील अथवा अशुभ दृष्टीत असतील तर अशा मनुष्यानें आपले गांवीं राहूं नये. कारण चतुर्थस्थान हें आपल्या जन्मभूमीचें दर्शक आहे. ह्या स्थानांत पापग्रह असून जर ते स्वगृहीं असतील अगर दुसऱ्या कांहीं कारणानें ते बलिष्ट असतील तर आपले गांवीं राहण्यास कांहीं हरकत नाहीं. जर कुंडलींत तृतीय स्थान बलिष्ठ असेल तर आपल्या जन्मभूमीपासून थोड्या अंतरावर जावें. ह्या स्थानांत जी राशी असेल त्या राशीच्या दिशेस जावें. तृतीय स्थानांत कर्कराशि असेल तर जन्मभूमीपासून थोडे उत्तरेस गेल्यावर भाग्योदय होईल. ह्याप्रमाणेंच इतर राशींचा विचार करावा. मात्र तृतीय स्थानावरून होणारे स्थलांतर फार दूरचें नसतें, तृतीयस्थान बलिष्ट असलेल्या लोकांनीं आपल्या जन्मभूमीपासून ५० मैलांपेक्षां जास्त दूर जाऊं नये.

जर जन्मकुंडलींत नवमस्थानीं ग्रह असून ते बलिष्ट असतील तर आपल्या जन्मभूमीपासून जितकें दूर जाववेल तितकें दूर जावें कारण तें अधिक फायदेशीर होईल. नवमस्थानांत असलेल्या राशींच्या दिशेकडे भाग्योदय होईल असें समजावें.

वर सुचविल्याप्रमाणें गेल्यास जन्मभावावर खात्रीनें ग्रहांचा शुभ परिणाम भाग्यवृद्धि होईल.

लग्नीं अथवा दशमस्थानीं रवि वरिष्ठ असतील तर कोठेंहि जा अपयश येणार नाहीं. मात्र त्या स्थानांत असलेल्या राशीच्या अगर ग्रहाच्या दिशेच्या अनुरोधानें जावें. उदाहरणार्थः—लग्नीं धनराशी उदित असतां दक्षिणेकडे जावें, अथवा मेषराशी उदित असतां पश्चिम दिशेस जावें मात्र वेडेपणाचें होईल.

मित्र आणि शत्रु

एकादशस्थान हें मित्रसुख व सप्तमस्थान हें उघड वैर दर्शवितें. बाराव्या स्थानावरून गुप्त शत्रूंचा विचार होतो. रवि, गुरु, अथवा शुक्र एकादशस्थानांत वरिष्ठ अथवा शुभदृष्टींत असतील तर मित्र पुष्कळ मिळतील व त्यांच्यापासून मदत होईल. तसेंच चंद्र व बुध तेथें स्वगृहीं अथवा उच्च असतील तर समजावें. परंतु तेच जर शत्रुगृहीं असतील अथवा अशुभ दृष्टींत असतील तर मित्रांपासून नुकसानच होईल. शनि, मंगळ अथवा हर्शल एकादशस्थानांत असतील तर मित्रांपासून जन्मणारास त्रास होईल. नेहमीं त्यांच्यामुळें नुकसानींत यावें लागेल.

कोणतेहि राशींत व कोणत्याहि स्थानीं चंद्र शनीनें दूषित असेल तर ढोंगी व खोटे मित्र भेटतात व त्यांच्याकडून त्रास होतो. सप्तमांत पापग्रह असून विशेषतः मंगळ असेल तर उघड उघड फार शत्रु असतील. कोर्टाचें कामांत व दिवाणी कज्जांत नुकसान होईल. ह्या स्थानांत असतील व ते जर लग्नीं असलेल्या ग्रहाशीं प्रतियोग करीत नसतील तर दिवाणी दाव्यांत जन्मणाराचा फायदा होईल.

उदाहरणार्थ.—लग्नीं मंगळ उदित असलेल्या मनुष्याचे कुंडलींत सप्तमस्थानांत रवि असून तो जर मंगळाशीं प्रतियोग करीत असेल तर मोठ्या योग्यतेच्या व मोठ्या श्रीमंताकडून जन्मणारास त्रास होईल.

त्याच्याशीं वैर उत्पन्न होईल. स्त्रीनें उत्पन्न होणारे शत्रु आपल्यापेक्षा जास्त योग्यतेचे असतात व त्यांच्याकडून जन्मणाराचें नुकसान होतें व त्याचा नाश करण्याचा ते प्रयत्न करीत असतात.

चंद्र, बुध यांचा शुभ अशुभ परिणाम, त्यांचें स्थान, बल आणि दृष्टिबल यावर अवलंबून राहील.

शनि, मंगळ किंवा हर्शल हे द्वादशस्थानीं असतील तर पुष्कळ गुप्त शत्रू होतात आणि जन्मणाऱ्याचा नाश करण्याचा प्रयत्न करितात.

द्वादशस्थानात चंद्र असेल तर स्त्री-शत्रू असतात. द्वादशस्थानात रवि, गुरु किंवा शुक्र असेल तर शत्रू थोडे पण गुप्त रीतीनें द्वेष करणारे असतात. बुध ह्या स्थानात पापग्रह युक्त असेल तर पुष्कळ शत्रू असतात.

मैत्री अथवा शत्रुत्व दोन मनुष्यांचे, कुंडलीवर व त्यांच्या लग्नीं उदित असलेल्या राशीवर अवलंबून राहील. उदाहरणार्थः—एका धर्मांच्या राशिसमुच्चयावर जन्मलेल्या लोकांची मैत्री असेल. मग कुंडलींत ग्रह कोठेंहि असोत. लग्नीं एकाच धर्मांच्या राशी असून, कुंडलींत बरेच ग्रह एकाच राशींत व एकाच स्थानीं असतील तर फार चांगलें. अशा माणसांची मैत्री कायमची टिकेल. मेष लग्नीं जन्मणाऱ्या लोकांची सिंह व धनु लग्न असणाऱ्या लोकांशीं मैत्री लौकर होईल. मग कुंडलींत ग्रह कोठेंहि असोत. लग्नीं एकाच धर्मांच्या राशी असून कुंडलींत बरेच ग्रह एकाच राशींत व एकाच स्थानीं असतील तर फार चांगलें. अशा लोकांची मैत्री कायमची टिकेल. मेषलग्नीं जन्मणाऱ्या लोकांची सिंह व धनु लग्नाच्या लोकांशीं मैत्री लौकर होईल. वृषभ लग्नाच्या लोकांची मकर व कन्या लग्नाच्या लोकांशीं मैत्री जुळेल. परंतु दोन मनुष्यांच्या लग्नीं असणाऱ्या राशि एकमेकांशीं षडाष्टक असतील, अथवा त्या एकमेकांपासून

सप्तम असतील तर अशा मनुष्यामध्यें स्नेह जमणें कठीण. कोटकोनापेक्षां सप्तम असणें अधिक वाईट. मेषलग्नावर जन्मलेल्या मनुष्याचें कर्क, तुला व मकर लग्नाच्या मनुष्याशीं पटणार नाहीं. नंतर चंद्र, सूर्य यांचा विचार केला पाहिजे. रवि व चंद्र दोन मनुष्यांचे कुंडलीत एकाच राशींत असतील किंवा एकमेकापासून शुभदृष्टींत येत असतील तर मैत्री लौकर होते. परंतु एकाचे कुंडलींतील रवि सप्तम अथवा चतुर्थस्थानीं असेल तर त्यांच्यांत वैर उत्पन्न होईल व नेहमीं भांडणतंटे होतील. दोन मनुष्यांचे कुंडलींत चंद्र व रवि समक्रांतींत असतील तर दोघांचा स्नेह लवकर होईल.

कुंडलींतील इतर ग्रहयुती योगे पाहिले पाहिजेत. एकाच्या कुंडलींत जेथें सूर्य असेल तेथें दुसऱ्याच्या कुंडलींत शनि असेल तर ज्याच्या कुंडलींत शनीचे जागीं रवि आहे त्याला दुसऱ्या मनुष्याचे मैत्रीपासून फायदा होईल, दुसऱ्या मनुष्याचे पहिल्यापासून नुकसान होईल असें नाहीं, मात्र शनि फार बिघडलेला असेल तर पहिला मनुष्य त्याला कारूळक करण्याचा प्रयत्न करील. स्त्री व पुरुष यांच्यामधील स्नेह किंवा प्रीति पाहणें असल्यास शुक्र, मंगळ पाहिला पाहिजे. स्त्रियांचे कुंडलींत मंगळ, पुरुषाच्या कुंडलींत शुक्र ज्या राशींत असेल त्या राशीस आल्यास अशा दोन स्त्रीपुरुषांमध्यें लवकर प्रेमसंबंध जडतो. हीं स्त्रीपुरुष पति-पत्नि असतील तर त्यांची एकमेकावरील प्रीति कधींहि कमी होणार नाहीं. परंतु एका कुंडलींत मंगळ दुसऱ्या कुंडलींतील शुक्रापासून नवव्या अथवा सातव्या स्थानीं असेल तर दोघांमध्यें वैर व मत्सर आणि अप्रीति उत्पन्न होईल.

मृत्यु

जन्मकुंडलींत रवि अथवा चंद्र ज्या ग्रहाकडून दूषित झाला असेल, अथवा हे ग्रह ज्या स्थानांत अथवा राशींत असतील त्या ग्रहांच्या अथवा राशींच्या गुणधर्मांप्रमाणें मृत्यु कोणत्या तऱ्हेनें येईल हें पाहण्यास अष्टम-

स्थानहि पाहिलें पाहिजे. कारण ह्या स्थानावरून आजारीपणाचा बोध होतो. हर्शल विलक्षण आणि असाधारण रीतीनें मरण आणतो. जे मृत्यू साधारणपणें अकल्पित व चमत्कारिक म्हणून वर्तमानपत्रांत येतात अशा मृत्यूस हर्शल कारण असतो. हर्शलकडून होणारा मृत्यू अकल्पित व अचंबा वाटण्यासारखा असतो. आत्महत्या, आगगाडीखालीं सांपडून मरणें, प्रवासांत भयंकर अपघातापासून मरण येणें ही सर्व हर्शलाचीं लक्षणें आहेत.

शनि हा थंडी, क्षय, हिंव, ताप, स्ट्रीन विषबाधेपासून होणारे रोग, जलोदर, शरीर क्षुजण व विशेषतः फार दिवस टिकणाऱ्या दुखण्यापासून मृत्यू दर्शवितो. मंगळ, ज्वर, मुतखडा, रक्त ओकणें, जखम होणें, काळजाचे रोग, जळून अथवा भाजून मरणें, गर्भपात होणें, अति रक्तस्राव होणें, सांध्यांचे रोग, देवी, इतर कोणतेहि थोडे दिवस टिकणार आजार यांजपासून मृत्यू दर्शवितो.

बरेच ग्रह कोणत्या राशीमध्यें आहेत तें पहावें-आणि त्या राशींच्या अनुरोधानें मृत्यूची स्थिति लक्षांत घ्यावी. षष्ठ अथवा अष्टमस्थानीं स्थिर राशि असतील तर मृत्यू गुदमरून अथवा छाती व काळीज यांना होणाऱ्या रोगानें अथवा खोकला, मुतखडा, पाठीच्या कण्यास इजा होऊन मृत्यू होईल म्हणून समजावें. ह्या स्थानीं चरराशि असतील तर हिंव, ताप, संधिवात, आमवात (Gout), काळपुळी, अपचनापासून होणारे विकार, सर्व तऱ्हेचे पोटाचे विकार, चक्कर, मोंवळ वगैरे मूत्राशय व लिव्हर बिघडल्यास होणारे आजार, अथवा मायेयूल यांचेपासून मृत्यू येईल.

जन्मकुंडलींतर रवि किंवा चंद्रमंगळाशीं प्रतियोग करतील अथवा काटकोन दृष्टींत असून मंगळ उदित असेल तर मृत्यू अकल्पित येईल असें समजावें, पुन्हा हा रवि किंवा चंद्राशीं १-७-८ किंवा १० स्थानीं युति करीत असेल

तर व विशेषतः शनि अथवा हर्शल यांच्याशीं अशुभ दृष्टियोग करीत असेल तर मरण एकाएकीं अपघातानें येतें. दशमस्थानीं शनि, रवींचे प्रतियोगांत असेल तर घरावरून अगर शिखरावरून पडून मरण येईल. अशा स्थितींत शनि व मंगळ कोणत्या राशींत आहेत, यांचा विचार केला पाहिजे. कारण प्रत्येक राशीपरत्वें त्यांचे शुभ अशुभ परिणाम कमजास्त होतील. चर राशि मृत्यु वाईट रीतीनें म्हणजे बंदुकीच्या गोळीपासून, वीज पडून, भाजून, अथवा रेल्वेअपघात वगैरे पासून दर्शवितात. स्थिर राशि बुडून व गुदमरून मरण दर्शवितात. द्विस्वभाव राशी आत्महत्या, कैद, जहाज बुडणें, श्वासोश्वासाचे क्रियेसंबंधीं विकारानें मृत्यु दर्शवितात. शनि दशमांत असून रवीशीं प्रतियोग करील तर इमारतीवरून पडून मृत्यु येईल. हर्शलानें होणारा मृत्यु चमत्कारिक असून लोकांमध्यें खळबळ उडवितो.

नेपच्यूनचीं (वरुणाचीं) स्थानगत फलें

राशीचक्राचें पूर्ण भ्रमण हा ग्रह १६४ वर्षांनीं करतो. म्हणजे प्रत्येक राशीला नेपच्यून १४॥–१५ वर्षे रहातो. म्हणून राशी गुणधर्मांचें महत्त्व न मानतां या ग्रहाचीं स्थानगत फलें विचारांत घ्यावीं. या ग्रहाचे परिणाम जड शरीरावर विशेष होत नाहींत. मन, बुद्धि, व भावना यावर परिणाम जास्त होतात म्हणून अशिक्षित, रानटी व निर्बुद्ध मनुष्यावर नेपच्यूनचे परिणाम होणार नाहींत. हा शुभ ग्रह आहे. गुरूचीं उच्चतम फलें नेपच्यून उत्पन्न करतो. शुक्र, मंगळ, शनि, राहु, हर्शल या ग्रहांचे अशुभ दृष्टिकोन असल्यास नेपच्यूनचे वाईट परिणाम दिसून येतात. या खेरीज इतर ग्रहांबरोबर होणारे शुभदृष्टिकोन अध्यात्मिक, मानसिक, नैतिक बाबतींत अत्यंत परिणामी असतात. नेपच्यूनचे शुभ परिणाम म्हणजे काव्य, गायन, अध्यात्मिक ज्ञान, गूढविद्या, मंत्रशास्त्र व ज्या क्रियेमध्यें

स्फूर्तिजन्य ज्ञानाची जरूर असते अशा सर्व विद्या. गुरू नेपच्यून युति किंवा शुभयोगावर जन्मलेले लोक अलौकिक बुद्धिमत्तेचे असतात. विश्वविद्यालयाच्या परीक्षेत हे लोक पहिल्या श्रेणींत येतात व त्यांचेकडून मानवजातीच्या कल्याणाचे शोध लागतात. नेपच्यून बलहीन राशीमध्यें असेल किंवा पापग्रहाच्या अशुभ दृष्टींत असेल तर अशा लोकांचे विचार गुन्ह्याला प्रवर्तक असतात. अशा लोकांकडून घातपात, कट, गुन्हेगार टोळ्या यांचें नेतृत्व स्वीकारलें जातें. लोकांना आपल्या बुद्धिमत्तेनें फसविणें, नवीन नवीन कल्पना काढून चोऱ्या करणें, लॉइड्स् बँकवरले दरोडे, सौराष्ट्रांतील भूपतची लूटालूट, बँकदरोडा अशी सर्व कार्यें अशुभ राशीतील पापग्रहदृष्ट नेपच्यूनचीं आहेत. स्त्रियांचे कुंडलींत जन्म शुक्र नेपच्यूनचे युतींत अगर अशुभदृष्टींत असेल तर अशा स्त्रियांच्या विषयवासना विपरीत असतात. अशा स्त्रियांच्या कुंडलींत शुक्र जलराशींत द्वादशस्थानीं असून त्यावर नेपच्यूनची युति अगर अशुभ दृष्टि होत असेल तर पालकांनीं अशा मुलीवर विशेष नजर ठेवावी व तिचा विवाह १६।१७ व्या वर्षीच करावा हें चांगलें म्हणजे दुष्परिणाम टळतील.

नेपच्यून जलराशींत अत्यंत बलवान असतो. कर्क ही त्याची स्वगृहीची राशि आहे. जल राशीचे खालोखाल पृथ्वीराशींत नेपच्यून बलिष्ठ असतो. वायू व अग्नि राशीमध्यें निर्बली असतो. अग्नि राशीमध्यें नेपच्यूनचे अशुभ परिणाम दिसून येतात.

(१) बांधा मध्यम, धर्मश्रद्धा जास्त, अध्यात्मज्ञानाची आवड, बुद्धि तीव्र; मात्र स्वभाव अनिश्चित. कल्पनासृष्टींत भराऱ्या मारतात. शृंगाररसाने भोके. गायन, वादन, तंतुवाद्य यांची आवड असते. नेपच्यून वायु अगर अग्नि राशींत असेल तर होटेंत धरळण्याची संवय असते. गायनवादनाची आवड निर्माण होते. आवाज मधुर असतो. धनयोग चांगला असतो. प्राप्ति चमत्कारिक व असाधारण मार्गानें होते.

(२) घनस्थानांतील नेपच्यूनवर रवि, गुरु अगर चंद्राची शुभ दृष्टी असेल तर अकस्मिक प्राप्ति होईल. अशा लोकांना सट्टे, शर्यती, जुगार, कॉसवर्ड यामध्यें यश येते.

(३) तृतीयस्थानीं नेपच्यून वाङ्मयाची आवड उत्पन्न करतो. प्रतिभाशक्ति व कल्पना जास्त प्रमाणांत असते. या नेपच्यूनवर शुक्रबुधाची युति अगर शुभदृष्टि असेल तर अशा मनुष्यावर नामांकित कादंबऱ्या व सुरस लघुकथा लिहिल्या जातात. गुरुची युति अगर शुभ दृष्टियोग असेल तर गूढ व चमत्कारिक शास्त्र शिकण्याची आवड असते. जलराशींत शुक्र नेपच्यून असेल तर परदेशा देशांत प्रवास होईल. चर राशीचा नेपच्यून असेल तर विद्याभ्यासाकरितां परदेशांत जावें लागेल.

(४) चतुर्थस्थानीं नेपच्यून स्थावर इस्टेट, बागाईत, जमीन, शेती, गुरेढोरें वगैरेपासून फायदा देईल. परंतु येथें नेपच्यून राहु, केतु, शनि अगर मंगळ यानें युक्त असेल तर वडिलार्जित जुन्या घरांत रहाणें केव्हांही सुखावह होणार नाहीं. अशा लोकांनीं आपली जन्मभूमि सोडून दुसरीकडे उद्योगधंदा केला तरच त्यांना शांतता व गृहसौख्य मिळेल. यल्हीन राशींत नेपच्यून कोणत्याही ग्रहाच्या अशुभ दृष्टींत असेल तर घरांत अनेक अडचणी, चमत्कारिक अनुभव येतात व आयुष्याचा शेवटचा काल दुःख व आपत्ति यात जातो.

(५) पंचमस्थानीं नेपच्यून वैवाहिक सुखा संबंधानें चमत्कारिक कल्पना निर्माण करतो. अशुभदृष्ट नेपच्यून वैवाहिकसुख समाधानकारक देत नाहीं. जलराशीत नेपच्यून संतति भरपूर देईल. वंध्या राशींत (१,५,६) नेपच्यून संतति मुळींच देणार नाहीं. पंचमस्थानीं नेपच्यून असणाऱ्या पुरुष व स्त्रिया कृत्रिम रीतीनें संतति निर्माण करतात. पापग्रहयुक्त नेपच्यून संतति लुळीपांगळी, अशक्त, दुर्बल व व्यंग असलेली निर्माण करतो. विकृतविषयवासना हें पंचमस्थानांतील नेपच्यूनचें विशिष्ट फल आहे.

विद्येचे बाबतींत पंचमस्थानीं नेपच्यून उत्तम असतो. गायन, सिनेमा, नाटक वगैरे लोकरंजनाचीं व आकर्षक कामें करणाराचें कुंडलींत ५ व ९ स्थानीं असावा. क्रिकेटिअर, मल्ल, खेळाडू, नट, सिनेमास्टार्स यांचें कुंडलींत नेपच्यून पंचमस्थानीं असला तर त्यांचा खेळ व कामें आकर्षक होतात.

(६) या ठिकाणचा नेपच्यून असाध्य असा आजार निर्माण करतो, ते आजार चिकित्सा करण्यास कठीण असतात. षष्ठस्थानीं नेपच्यून असणाऱ्या लोकांचे आजार मानसोपचार, दैवी उपाय, मंत्र तंत्र, विद्युत् व रेडियमचे उपाय यांनीं बरे होतात. पोटांत औषध घेऊन आजार बरे होत नाहींत. अशा लोकांना मानसिक उपचाराचीच जरूरी असते.

(७) या स्थानीं नेपच्यून वेश्या राशींत (३, ५, ६) असेल तर विवाह अति विलंबानें होईल किंवा होणारही नाहीं. वैवाहिक सुखासंबंधीं असमाधान हा ह्या स्थानांतील नेपच्यूनचा मुख्य धर्म आहे. पत्नि किंवा पति विजोड मिळतो. या ठिकाणीं नेपच्यून, शुक्र, हर्शल, शनि व मंगळ यांनीं युक्त अगर अशुभदृष्ट असेल तर नीतिमत्ता चांगली नसते. स्त्रियांच्या कुंडलींत असा योग असतां वैवाहिकसुख कधींही चांगलें मिळणार नाहीं. कदाचित् घटस्फोटाचा प्रसंग येईल.

(८) या ठिकाणीं शुभदृष्ट अगर शुभग्रहयुक्त नेपच्यून आकस्मिक व अकल्पित द्रव्यलाभ देईल. आयुष्यांत अघटित घटना व चमत्कारिक प्रसंग येतील. मृत्यू, मूर्च्छा येऊन अगर अपस्मारें येईल. विषारी पदार्थ व विषारी वायु यांपासून नेहमीं सावध असावें.

(९) नवमस्थानीं नेपच्यून असेल तर धर्मश्रद्धा उत्तम राहील, अंतःस्फूर्तिज्ञान, अध्यात्मज्ञान, मंत्रतंत्र वगैरे विद्येची आवड असेल, अशुभदृष्ट व अशुभ ग्रहयुक्त नेपच्यून येथें असल्यास कुप्रसिद्ध होतो. त्याच्या हातून अराजक संस्था, गुन्हेगारी संस्था वगैरेचें नेतृत्व स्वीकारलें जातें, बुद्धीचा

उपयोग गुन्हेगारींत होतो. चरराशीचा नेपच्यून परदेश गमन व जगातील दूरदूरचे प्रवास करवील. आत्मसाक्षात्कार, ध्यानधारणा, योगाभ्यास या बाबतीत नेपच्यून जल किंवा पृथ्वीराशीचा असेल तर यश मिळेल. अशा लोकांच्या बोलण्यांत ओजस्विता असते व त्यांची वाणी भविष्यसूचक असते. फलज्योतिषशास्त्राचा अभ्यास करणारास हा योग उत्तम असतो. जलराशींत नेपच्यून असून रवि, चंद्र, शुक्र, गुरु नेपच्यूनशीं नवपंचम योग करतील तर दिगंत कीर्ति मिळेल.

(१०) दशमस्थानांतील नेपच्यून उद्योगधंद्यास उत्तम असतो. मात्र कायमच्या चाकोरींतील धंदे न करतां नवीन धंदे शोधून काढावे म्हणजे दशम स्थानांतील नेपच्यूनचा उपयोग होईल. सरकारी नोकरी, शास्त्रीय, औद्योगिक शोध, विद्युत् रेडियमचे कारखाने, रेडिओ टेलिव्हिजन, सिनेमा-धंदे वगैरे ठिकाणीं उद्योगधंदा मिळेल व त्यांतच उन्नति होईल. अशा लोकांनीं फारकुनी व्यवसाय मुळींच करू नयेत. या ठिकाणीं नेपच्यून असणाऱ्या लोकांना मुख्य धंद्याशिवाय दुसरा एखादा जोड धंदा असतो व त्यांना कमाई होते.

(११) या ठिकाणीं नेपच्यून शुभ फलें निर्माण करीत नाहीं. अशा लोकांच्या महत्त्वाकांक्षा त्यांच्या परिस्थितीस अनुसरून नसतात, त्या कधींच पुऱ्या होत नाहींत. मित्र फार परंतु ते व्यसनी असतात. संतति सुखाला या ठिकाणचा नेपच्यून अपायकारकच असतो.

(१२) द्वादशस्थानीं नेपच्यून गुप्तशत्रूपासून आकस्मिक संकटें दर्शवितो. कित्येक महिने रुग्णालयांत पडून रहाण्याचे आजार होतात. येथें नेपच्यून, शनि, मंगळ, राहु, केतु व हर्शल यांचे अशुभ दृष्टि-संबंधांत असेल तर कैद व राजदंड होण्याची भीति असते. शुभग्रहाऱ्या अशुभदृष्टींत नेपच्यून असेल तर काळाबाजार, सरकारी कंट्रोलमध्यें फसव-

णुकीनें केलेले धंदे, दुसऱ्यांना लबाडीनें फसविणें वगैरे अनेक लबाडीच्या कृत्यांनीं पैसा मिळविलेला असतो व तो पैसा पचविता येतो. नेपच्यून गुरु, रवि, शुक्र, बुध यांनीं युक्त अगर यांचे शुभदृष्टींत असेल तर असे लोक विरक्त होऊन आपलें आयुष्य परमार्थ ज्ञानांत घालवितात.

राहुकेतु स्थानगत फलें

राहुकेतु हे ग्रह नाहींत. चंद्राची कक्षा व क्रांतिवृत्त यांचे छेदनबिंदू आहेत. हे दोन छेदनबिंदू एकमेकांपासून १८० अंशावर आहेत. म्हणूनच राहू व केतु यांतील अंतर नेहमीं ६ राशी म्हणजे १८० अंश असतें. अर्थात् केतु म्हणजे राहुची १८० अंशांची दृष्टीच समजावी. राहुकेतु यांची गति वक्री म्हणजे उलट असते. सर्व ग्रह मेष, वृषभ, मिथुन या क्रमानें भ्रमण करतात. राहुकेतु मेष, मीन, कुंभ या क्रमानें भ्रमण करतात. राहुकेतुचा राशिचक्रांतील पूर्ण फेरा सरासरी १८॥ वर्षांनीं पूर्ण होतो. एका वर्षात राहुची गति १९ अंश २० कला असते म्हणजे १ दिवसाची गति ३ कला व ११ विकला येते. राहुच्या शुभ राशि—वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या. राहूला वृश्चिक, मकर व मीन ह्या साधारण शुभ समजाव्या. मेष, तूळ, धनु, कुंभ या राशीमध्यें राहू अनिष्ट फलें उत्पन्न करतो.

(१) प्रथमस्थानीं राहु असेल तर स्त्रीपुरुष दिसण्यांत ऐटबाज व नीटनेटके असतात. कर्तबगारी चांगली असते. शरीरबांधा सडपातळ असणें हा लक्षी राहुचा मुख्य धर्म आहे. कर्तबगारी, व्यवहारचातुर्य हे राहुचे गुण आहेत. शुभ राशीला राहु असणाऱ्या स्त्रिया वर्णानें काळ्यासावळ्या परंतु कर्तबगार, व्यवहारदक्ष असतात. शुभ व साधारण राशीला राहू असतां नाटकी ऐट, हातवारे व हावभाव करण्याची संवय असते. मेष, तूळ,

धनु, कुंभ राशीला राहु शारीरिक सौंदर्य देणार नाहीं. चेहऱ्यावर तेज व आकर्षकपणा असणार नाहीं. सिंह राशीचा राहु लग्नीं असणें हा राजयोग समजावा. केतु लग्नीं असणें राहुच्या वरील गुणांचा ऱ्हास करतो. शरीर बेढब, बोजड असते. चेहऱ्यावर कांहींतरी व्यंग असते. जन्म गरीब स्थितींत झालेला असतो.

(२) द्वितीयस्थानीं शुभराशीचा राहु वडिलार्जित इस्टेट देईल. अशुभ राशीचा राहु असणें हा दारिद्र्ययोग असतो. २, ३, ४, ६ या राशीचा राहु द्वितीयस्थानीं असेल तर आवाज मधूर असतो. गायनाची आवड असते. १, ४, ८ या राशीचा राहु पापग्रहानें दूषित असेल तर वाणीमध्यें दोष असतो. याच राशींत शनि अगर हर्षलनें युक्त असेल तर बोलण्यांत अडखळण्याचा दोष असतो. राहु या स्थानीं असणारे लोक व्यवहारचतुर असतात. द्वितीयस्थानीं केतु असणें हा दारिद्र्ययोग आहे. स्वतःचे जन्मापासूनच कुटुंबाची स्थिति मोडकळीस आलेली असते. कर्ज असतें. कुटुंबांत पोष्यवर्ग मोठा असतो. या ठिकाणीं केतु मुखरोग उत्पन्न करतो. तोंडास मधूनमधून कांहींतरी आजार होतो.

(३) तिसरे स्थानीं समराशीचा राहु उत्तम फळें देतो. पुरुष राशीचा राहु (सिंह खेरीज) आतेष्ट, भाऊबंद यांचेशीं कलह निर्माण करतो. या ठिकाणीं शुभराशीचा राहु कलाकौशल्य, छायाचित्रें यांची आवड निर्माण करतो. शास्त्रीय शिक्षण यंत्रकला वगैरेमध्यें प्राविण्य मिळवें. मात्र बंधुभगिनींकरितां पैसा खर्च करावा लागतो. केतु तृतीयस्थानीं असल्यानें मनुष्य पराक्रमी असतो. समाजांत मानमान्यता मिळते. स्वभाव दुष्ट व कारस्थानी असतो. असे लोक गुप्तपापी व मनांत दुःखी असतात. नैतिक आचरण चांगलें नसतें. कर्णरोग, किंचित् बहिरेपणा उतारवयांत येतो.

(४) चतुर्थस्थानीं राहु घरदार, स्थावर इस्टेट वगैरे देतो. बहुतकरून लहान गांवीं रहावें लागतें. २, ३, ५, ६ या राशीखेरीज राहु असेल

तर अशा माणसानें जुन्या घरांत राहूं नये. त्यानें स्वतः घर बांधून त्यांत रहाणें सुखावह होईल. चतुर्थस्थानीं राहु किंवा केतु असणें मातृसुखास विघातक असते. केतु चतुर्थस्थानीं असल्यास मातृसुख चांगलें मिळणार नाहीं व कष्टमय आयुष्य कंठावें लागतें.

(५) पांचवें स्थानीं शुभराशीचा राहु विद्येच्या कामीं उत्तम असतो. इतर राशीचा राहु असल्यास बुद्धि तीव्र असली तरी विद्या अपुरी राहते. फोटोग्राफी,ड्राईंग,पेंटिंग,चित्रकला, शिल्पकला,इतरव्यवसाय वगैरे विद्यांचा कारक राहु असतो. संततीचा विचार करतां शुभ राशीचा राहु संतति मर्यादित देतो,अशुभ राशीचा राहु व कोणत्याही राशीचा केतु संततिसुखास विघातक आहे. गर्भपात, बालमृत्यु, संततीस व्यंग असणें अशा तऱ्हेचे दोष पापग्रह केतुमध्यें असतात. स्त्रियांच्या कुंडलींत पंचमस्थानीं केतु असल्यास त्यांना संसारसुख चांगलें मिळत नाहीं. काबाडकष्टच करावे लागतात."

(६) या ठिकाणीं राहु किंवा केतु बलिष्ठ असतात. अशी माणसे पराक्रमी असतात,त्यांच्यापुढें शत्रूचें कांहीं चालत नाहीं.नोकरी अधिकारयुक्त असते. उद्योगधंदा असल्यास हाताखालीं नोकर असतात. राहुकेतु षष्ठस्थानीं अशुभ राशीचे असतील तर नेत्रपीडा असण्याचा संभव असतो.

(७) सप्तमस्थानीं राहु असल्यास मनुष्य विषयी व कामासक्त असतो. पापग्रहदृष्ट असेल तर गुप्तपापी असतो. शुभ राशीचा राहु वैवाहिक सुख उत्तम देईल. १, ४, ८, ९, १० या राशीचा योग असल्यास द्विभार्यायोग समजावा. केतु सप्तमस्थानीं असल्यास वैवाहिकसुख चांगलें मिळणार नाहीं. नेहमी तंटेबखेडे होतील. ३, ५, ६ राशीचा राहु असल्यास विवाह अतिविलंबानें होईल. कदाचित् विवाह होणारही नाहीं. केतु सप्तमस्थानीं असल्यास भागीदारीनें कोणतेही व्यापार करूं नयेत.

: ५ :

साडेसाती

साडेसाती हा शब्द ऐकल्याबरोबर प्रत्येकाचें मनांत मोठी भीति उत्पन्न होते व आपल्यावर संकटपरंपरा येणार या भीतीनें कच्च्या मनाचे लोक घाबरून जातात. जर शनिमहाराजांनीं आपला पराक्रम विक्रम राजाला दाखवून एका दिवसांत विक्रमासारख्या सार्वभौम राजाला भाही भगवत् करून सोडले तर आपली स्थिति काय होईल याची साडेसातीमध्यें सांपडलेल्या मानवांना मोठी चिंता वाटते. परंतु खरें पाहिलें असतां इतकें घाबरून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. ग्रहाच्या भ्रमणपद्धतीमुळें प्रत्येक मनुष्याला साडेसाती येणारच, आपलें जीवन हे कमीजास्त प्रमाणांत सुख-दुःखाचें मिश्रणच आहे. म्हणून सुख भोगल्यानंतर अडचणी व आपत्ति भोगण्यास आपण खंबीर झाले पाहिजे. आपत्ति व अडचणींतूनच शनि-महाराज आपल्याला भाग्योदयाचा प्रकाश दाखवितील अशी आशा प्रत्येक मनुष्यानें बाळगावी.


शनिचें भ्रमण एका राशींत होण्यास २॥ वर्षे लागतात म्हणजे १२ राशी फिरण्यास सरासरी ३० वर्षे लागतील, त्यांतून साडेसातीचीं ७॥ वर्षे गेलीं म्हणजे २२॥ वर्षे राहतात. म्हणजे साडेसाती संपल्यानतर पुन्हा साडेसाती येण्यास २२॥ वर्षे लागतात.

हिंदुस्थानाखेरीज दुसऱ्या कोणत्याही देशांत साडेसाती मानीत नाहींत. इतर ग्रहाप्रमाणें शनि, चंद्रापासून १२।१।२ येतो व जातो. त्याकडे कोणाचेंही, आपण ज्याप्रमाणें साडेसाती मानतो त्याप्रमाणें लक्ष नसतें. शनिची जन्मचंद्रापासून १२।१।२ स्थानांतील भ्रमणें कांहीं बाबतींत संस्मरणीय होतात यांत शंका नाहीं. भारताचें लग्न मकर आहे. त्यामुळेंच कीं काय शनिमहाराजाची भारतीय लोकांना जास्त भीति वाटते.

. आतां साडेसाती म्हणजे काय? ती केव्हां लागते व केव्हां संपते, कोणत्या राशीची व कोणत्या स्थानाची साडेसाती कष्टवर होते व कोणती होत नाहीं याचा आपण विचार करू. जन्मचंद्रापासून शनि १२ वा, १ ला, व २ रा असेपर्यंत साडेसाती समजावी. मात्र साडेसाती मोजतांना ठोकळ अंशविरहित राशीचा विचार न करतां जन्मचंद्राचे राशीचे अंशापासून मोजावी तरच ती शास्त्रोक्त होईल. कल्पना करा कीं चंद्र कर्कराशींत २०° त आहे तर साडेसाती मिथुनराशीमध्यें शनि २०° त येईल तेव्हांपासून सुरू होईल. मिथुन राशीमध्यें शनिप्रवेश झाल्यापासून कर्क राशींत चंद्र २०° त असलेल्या लोकांत साडेसाती सुरू झाली हें म्हणणें चुकीचें आहे. अंशाचा विचार न करतां निव्वळ आंकडेकुंडलीवरून साडेसाती ठरविणें वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यासारखें होईल. जन्मचंद्र कर्क राशींत २०° त असेल तर मिथुन राशींत शनि २०° त येईल तेव्हांच चंद्रापासून शनि बारावा झाला असें समजावें व तेव्हांपासूनच साडेसातीस सुरुवात झाली असें मानावें. शनिचा राशि बदल झाल्याबरोबर जन्मराशी-पासून शनि १२।१।२ (आंकडे कुंडलीप्रमाणें) आल्याबरोबर सर्व लोकांना एका दिवशीं साडेसातीस सुरवात होत नाहीं. कर्कमध्यें २०° चंद्र असतां मिथुन राशींत शनिचा प्रवेश झाल्याबरोबर तो खरोखर ११ वा असतो व सरासरी २० महिनेपर्यंत तो ११ वाच रहाणार व त्याची शुभ फळें मिळणार! म्हणून कुंडली निरयन असो वा सायन असो, चंद्राचे अंशापासून मोजण्यास सुरवात केली म्हणजे अशी घोटचूक होणार नाहीं. चंद्र कर्कराशींत २०° असतां मिथुन २०° ते कर्क २०° पर्यंत शनि १२ वा, कर्क २०° ते सिंह २०° पर्यंत १ ला व सिंह २०° ते कन्या २०° पर्यंत २ रा म्हणजे एकंदर ९०° अंश तीन पूर्ण राशि म्हणजे सरासरी ७॥ वर्षे होतात. थोडक्यात बोलावयाचे म्हणजे चंद्र कर्क राशींत २०° असलेल्या लोकांना मिथुन २०°त शनि आल्यापासून साडेसाती

सुरू होईल व कन्या २०° त गेल्यावर साडेसाती संपेल. याप्रमाणेच इतर राशींचे समजावें.

अशा मोजल्यानें सायन, निरयन या दोन्ही गणनेंत साडेसातीचा आरंभकाल व शेवट एकाच वेळीं आला पाहिजे.



वरील कुंडलींत ३ रे स्थानीं मिथुन राशीच्या २०° अंशांत शनि आल्यापासून कर्केत २०° येईपर्यंत पहिली २॥ वर्षे साडेसाती; कर्क २० ते सिंह २०° दुसरी साडेसाती व सिंह २० ते कन्या २०° पर्यंत तिसरी साडेसाती समजावी.

अनुकूल साडेसाती

अनुकूल साडेसाती कशी असणार अशी शंका येईल. साडेसाती म्हणजे सगळीच वर्षे आपत्तिकारक असतात ही समजूत खोटी आहे. साडेसातींत भाग्योदय झाल्यांची पुष्कळ उदाहरणें डोळ्यासमोर आहेत. साडेसातींत कित्येक स्त्रीपुरुषांचे विवाह होतात, शिक्षण पुरें होतें, उद्योग-धंद्यास सुरुवात होते, संसारांतील अनेक सुखदायक घटना व अनुकूल स्थित्यंतरें साडेसातींमध्यें होतात. अशा घटना साडेसातींत झाल्यामुळे त्या भाग्यदायक नाहींत काय?

साधारणपणें १२ वा. शनि म्हणजे साडेसातीची पहिली २॥ वर्षे अशुभराशींतून अगर शनीचें भ्रमण रवि, मंगळ, हर्षल यावरून होईल तर पहिली २॥ वर्षे अत्यंत कष्टदायक होतील असें समजावें. परंतु अशावेळीं शनीचें भ्रमण शुभराशींतून बुध, गुरु, शुक्र यांचेवरून असेल तर शनि १२ वा असूनसुद्धां साडेसातीपासून अनिष्ट फलें निर्माण होणार नाहींत. शनीचीं भ्रमणें शत्रू राशींतून अगर शनीचे विरुद्ध गुणधर्माचे राशींतून म्हणजे अग्निराशींतून होतील तर ती विशेष कष्टदायक समजावीत. अग्निराशीचे खालोखाल जलराशीमध्यें शनि हानिकारक असतो. पृथ्वीराशींतील (२, ६, १०,) शनीचें भ्रमण अशुभ फलें देत नाहीं. तसेंच वायुराशीमध्यें (३, ७, ११) शनीचें भ्रमण साडेसातीमध्यें असलें तरीसुद्धां भाग्योदय होईल. विशेषतः हें भ्रमण साडेसातीच्या शेवटच्या अडीच वर्षांत आलें तर पहिल्या २॥ वर्षांत भोगलेल्या आपत्तींतून सुटका होऊन साडेसातीच्या शेवटच्या वर्षांत भावी सुखाची किरणें दृग्गोचर होऊं लागतील.

जन्मराशी मेष असेल तर पहिली अडीच वर्षे फक्त मेष राशीतील (शनिचे अंश पहावे) दाहतर जातील. शेवटचीं २॥ वर्षे शुभ समजावीत. वृषभ राशीची साडेसाती मेषराशीला शनि असेपर्यंत अशुभ, मिथुन राशीला कर्क, सिंह घातक (सिंह जास्त), सिंह राशीला कर्क सिंह शनि, कन्या राशीला सिंह शनि, तूळ राशीला वृश्चिक, वृश्चिक राशीला वृश्चिक, धनु राशीला वृश्चिक शनि अशुभ समजावेत. मकर राशीला साडेसाती फारशी त्रासदायक होत नाहीं. (रवि मंगळावरून, शनि जात नसेल तर). कारण मकर व कुंभ राशी शनीचें स्वगृह असतें. धनु राशीमध्यें सुद्धां शनि शमगती असतो. म्हणून मकर राशीच्या लोकांना साडेसातीचा परिणाम भासत नाहीं. धनु, मकर, कुंभ या राशींत जन्मतः

चंद्राचे स्थानीं अथवा चंद्रापासून १२।२ स्थानीं रवि मंगळ असतील तर ज्या राशींत हे ग्रह असतील त्या राशीतील साडेसातीच्या शनीचें भ्रमण दुःखदायक होईल. कोणत्या तऱ्हेनीं दुःखें व आपत्ती येतील हें त्या त्या स्थानांतील शनिच्या भ्रमणावरून ठरवावें. कुंभ राशीमध्यें जन्मचंद्र असेल तर साडेसातीचे परिणाम मकर राशीप्रमाणें होतील. मीन राशींत चंद्र असेल तर मेष राशीतील शनिचें भ्रमण त्रासदायक समजावें.

प्रतिकूल साडेसाती

साडेसातीमध्यें शनिचें गोचर भ्रमण जेव्हां रवि, मंगळ अगर राहुवरून होतें तेव्हां साडेसातीची तीव्रता फार भासते. ज्या स्थानीं हें भ्रमण होत असेल त्या स्थानासंबंधीं अनेक दुःख निर्माण होतात.

स्त्रियांचे कुंडलींत पतिसुखाला साडेसाती म्हणजे ६।७।८ स्थानांत समजावी. या स्थानीं साडेसाती असतां मुलींचा विवाह जमण्यांत हरकती येतात विवाहित स्त्रियांच्या कुंडलींतील ही साडेसाती रवि, मंगळ अगर राहुवरून जाईल तर पतिपत्नीमध्यें कोणत्या ना कोणत्या कारणामुळें वेगळें रहाण्याचे प्रसंग येतात. अशावेळीं रविवरून शनिचें भ्रमण होत असेल तर तें जास्त क्लेशकारक समजावें. पतीचें आरोग्य चांगलें रहाणार नाहीं सप्तमस्थानीं रवि, मंगळ, राहु अगर शनि हे ग्रह असतील तर साडेसातीमधील या स्थानांतील भ्रमण पतिच्या जीविताला धोका देईल.

साडेसातीमध्यें षष्ठस्थानांतून शनिचें भ्रमणानें स्वतःचें आरोग्य चांगलें रहाणार नाहीं. नोकर अप्रामाणिक मिळतील चोरीवगैरेपासून पैशाची हानि होईल. सप्तमांतील भ्रमण वैवाहिक सुखाला घातक

समजावें. स्त्रियांचे कुंडलींत अशा भ्रमणानें वैधव्य येण्याचा संभव असतो. अष्टमस्थानातील शनिचें भ्रमण स्वतःच्या उद्योगधंदा, अकल्पित द्रव्यलाभ, सट्टे, शर्यती, जुगार, भागीदारीचे धंदे यासंबंधी नुकसान देणारें असतें. कुटुंबामध्यें एखादा मृत्यु किंवा अपघातासारखे दुःखद प्रसंग येतात, असे प्रसंग अष्टमस्थानात एखादा क्रूर ग्रह असेल तरच येतो. इतर वेळीं फक्त शनिचा परिणाम उद्योगधंद्यावर व स्वतःच्या प्रकृतीवर होईल.नवम,दशम स्थानांतील साडेसाती उद्योगधंदा व नोकरीवर अनिष्ट परिणाम करील. साडेसातीमध्यें द्वादशस्थानातील शनि कांहीं चमत्कारिक व अघटित संकटें निर्माण करतो. आकस्मिक आधिभौतिक संकटें येतात. कर्ज करण्याचे प्रसंग येतात. गुप्तशत्रु उत्पन्न होतात. जन्मतः द्वादशस्थानीं शनि, मंगळ, हर्शल, राहु, केतु सारखे पापग्रह असतील तर राजकीय संकटें निर्माण होतात किंवा आपल्या कुकर्मांचें व प्राक्तनाचें परिणाम भोगावें लागतात. द्वादशस्थानीं साडेसातींतील चंद्राचें भ्रमण असून जन्मतः द्वादशस्थानीं कोणताही पापग्रह असला तर अशा वेळीं राजकीय संकटें आलीं तर त्यांत बंधनयोग व राजदंड होणार हें निश्चित समजावें. द्वादशस्थानात शनिचें भ्रमण केव्हांही अशुभच असतें. एकादशांतील शनि सांपत्तिक नुकसान व उद्योगधंद्यामध्यें हानी दर्शवितो.

इतर स्थानांतील शनिचीं भ्रमणें, त्या त्या स्थानानुरोधानें अशुभ फलें निर्माण करूं शकतील. तीं कोणतीं फलें असतील तीं ज्योतिषानें आपल्या बुद्धिप्रमाणें स्थानपरत्वें व जातकतत्त्वाला अनुसरून ठरवावी. कित्येक ज्योतिषी ज्याप्रमाणें चंद्राला शनिची साडेसाती मानतात त्याप्रमाणें जन्म रविला व जन्म लग्नाला मानावीत असें प्रतिपादन करतात. परंतु हा निव्वळ मूळखटपणा आहे. साडेसाती मानावयाची आवड असेल तर जन्म मंगळाला व शुक्राला कां मानूं नये ? म्हणजे मानवी प्राण्याचा सर्व जन्म साडेसातीमध्येंच जाईल. त्याला चांगले दिवस कधींही दिसणार नाहींत. त्या

ईश्वरानें आपले योग्यते समान असा सुंदर मानव देह उत्पन्न केला त्या मानवानें सर्व आयुष्य दुःखातच साडेसातींतूनच घालवावें अशी त्याची केव्हांही इच्छा नसेल. असें असतें तर ईश्वरानें जें सुंदर वनसौंदर्य, सृष्टि शोभा, खनिजसंपत्ति, पर्जन्य, धनधान्यसंपन्न वसुंधरा कशाकरितां निर्माण केली असती। मानवानें आपल्या निर्मात्यास ओळखून त्यानें निर्माण केलेल्या दैवी संपत्तीचा यथेच्छ उपभोग घ्यावा अशीच त्याची इच्छा असणार। तात्पर्य साडेसाती जन्म चंद्रावरच असते चंद्र मनकारक आहे मुळातू त्यास कारण आपलें मन म्हणजे चंद्रच असतो, म्हणून साडेसाती चंद्रालाच असतें

: ६ :

धन सहम्

धनसहम् हा कांहीं ग्रह नव्हे. एक चिन्ह आहे. रविपासून चंद्र जितका दूर तितकेच अंश दूर लग्नबिंदुपासून धनसहम् असते. ज्या स्थानीं व राशींत ते असेल त्या स्थानाचें व राशीचें अनुरोधानें त्या स्थानासंबंधी यश धनसहम्वरून समजते. युति व मोठाले शुभ अशुभदृष्टी योगाचा (गोचर अथवा वार्षिक) धनसहम्वर परिणाम होतो असें आतां सिद्ध झाले आहे. प्रत्येक स्थानांत जन्मवेळीं असलेल्या धनसहम्चें काय परिणाम होतात ते आतां पुढें दिले आहेत.

पहिल्या स्थानांत असेल तर अशा मनुष्यास स्वतःचें श्रमानें सुख व यश मिळतें. या स्थानांतील धनसहम् वर गुरुशुक्राचें शुभयोग होत असतील तर असा मनुष्य नेहमीं यशस्वी होतो. मंगळाचा शुभयोग असला तर शुभ परिणाम कमी होतात.

धनस्थानीं धनसहम् असेल तर स्थावर इस्टेटीपासून फायदा होतो. वडिलार्जित इस्टेट असते. उद्योगधंदा, नोकरी मिळते व अनेक सांपत्तिक लाभ होतात.

तृतीयस्थानीं धनसहम् असल्यास सुखकर प्रवास होतील. लेखन-प्रकाशन, कलाकौशल्याचीं कामें, ललितकला, गायनवादन यामध्यें पैसा मिळेल.

चतुर्थस्थानीं असेल तर शेती स्थावर इस्टेट यामध्यें पैसा मिळेल. यावर गुरु, चंद्र, शुक्र यांपैकीं कोणाचा त्रिकोण योग झाला असला तर भूमीगत द्रव्य मिळेल जमीनींतून निघालेल्या खनीजद्रव्यें व धातु यांपासून फायदा होईल. वडिलार्जित इस्टेट निर्वेध उपभोगतां येते.

पंचमस्थानीं धनसहम् असून त्यावर अशुभ ग्रहांचे अशुभ योग झाले असतील तर अशा मनुष्यानें रेसकोर्सवर पाऊल टाकू नये. सट्टे, शर्यती, वायदे ह्यामध्यें नेहमीं नुकसान येईल. मुलें इस्टेटीची वाताहत करतील. शुभदृष्ट असेल तर ऐहिक सुख उत्तम मिळेल. शर्यती, सट्टे यामध्यें पैसा मिळेल. मुलांना पैसा ठेवता येईल.

षष्ठस्थानीं मामा, आत्या, मावशी यांचेकडून फायदा होईल. नोकरींत पैसा मिळेल. दुभत्या जनावरापासून डेअरीचे धंद्यामध्यें फायदा होईल.

सप्तमस्थानीं असेल तर असे लोक स्त्रियांचेबरोबर व्यवहार करण्यांत यशस्वी असतात. श्रीमंत राण्या, इस्टेटवाल्या विधवा यांचे सल्लागार होऊन खूप पैसा मिळवितात. व्यापारधंद्यामध्यें भागीदार श्रीमंत मिळतात धंद्यामध्यें त्यांची मदत होते. मक्ते घेणें, सहकार्यानें धंदे करण्यास हा योग यशस्वी असतो. शत्रूवर जय मिळतो. यावर अशुभ ग्रहांचे अशुभ योग होतील तर अर्थात् विरुद्ध फलें मिळतील.

अष्टमस्थानीं धनसहम् शुभ ग्रहांचे शुभ दृष्टींत असेल तर वारसा मिळेल लोकांच्या ठेवीपासून फायदा होईल.

नवमस्थानांत असेल तर शिक्षण संस्था, धार्मिक संस्था यांचेपासून फायदा होईल. नवीन शोध, लेखन व्यवसायामध्यें प्राप्ती होईल.

दशमस्थानीं उद्योगधंद्यामध्यें यश, नोकरीत विशेष बढती मिळेल.

एकादशस्थानीं सांपत्तिक लाभ व आकांक्षा तृप्त होते.

द्वादशस्थानीं पापग्रहांचें अशुभ दृष्टीमध्यें धनसहम् असेल तर दिवाळें निघून जाईल. गुप्त शत्रु संकटें आणतील. पापदृष्टीरहीत किंवा शुभ इस्टेट संबंधीत असेल तर गुप्तमार्गानें पैसा मिळेल वयाचे साठीवरोबर खर्चाची वाढ आपोआप होते.

धनसहम्चें परिणाम

घनसहम् कसें काढावें हें मार्ग दिलेंच आहे. खरें पहातां घनसहम्चा परिणाम व्यक्तित्व व आरोग्य ह्यावर कांहींच होत नाहीं.

ज्या स्थानांत घनसहम् असेल व त्यावर ज्या ग्रहांचे शुभयोग झाले असतील त्या स्थानाच्या अनुरोघानें सांपत्तिक लाभ होण्याचे योग असतात.

शुभग्रह जेव्हां घनसहम्वरून जातात किंवा त्याबरोबर शुभयोग करतात तो काल पैशाचे बाबतींत चांगला समजावा. वार्षिक कुंडलीमध्यें जन्म-कुंडलीप्रमाणेंच घनसहम् काढावें. परंतु चंद्राची गति वार्षिक कुंडलीमध्यें सरासरी १२ ते १५ अंश असल्यानें प्रत्येक महिन्यांत घनसहम् बदलेल. सूक्ष्म रीतिनें याचा विचार केला व सूक्ष्म रीतिनें दृष्टियोग काढले तर त्यामधून फलश्रुति निर्माण होईल. तसें न केल्यास वार्षिक कुंडलीमध्यें घनसहम्चा विचार न केलेला बरा !

जन्मकुंडलीतील रविवरून प्रत्येक वर्षातील शुभाशुभ काल

जन्मदिवसापासून पुन्हा पुढील वर्षाचे जन्मतारखेपर्यंत रविचें गोचर भ्रमण १२ राशींतून पुरें होतें. प्रत्येक महिन्यात १ राशिभ्रमण रवि पुरें करतो

जेव्हां रवि गोचरगतीनें जन्मरविबरोबर प्रतियोग करतो. (१८० + १८२ दिवसांनीं) तो काळ थोडातरी अडचणींचा, त्रासदायक व मनावर ताण पडणारा असा जातो. त्यावेळीं महत्त्वाचीं कामें, दूरचे प्रवास, कुटुंबातील मंगल कार्ये, विवाह वगैरे शक्यतर करूं नयेत. यावेळीं आजारीपण आल्यास तो थोडातरी लांबणीवर पडतो. स्वतःवर ऑपरेशन वगैरे करून घेण्यास हा काल अपयशकारक समजावा. चवथा व दहावा महिना म्हणजे जन्मरविबरोबर गोचर रविचे केंद्रयोग हे सुद्धां वरीलप्रमाणेंच समजावेत.

परागातील स्पष्टग्रह आपले जन्मकुंडलीतील व ग्रहांशी व कुंडलीतील लग्न दशम बिंदुबरोबर होणारे दृष्टीयोग युति वगैरे पाहणें. हे योग प्रतियोग शुभ अशुभ दृष्टीयोग सायन स्पष्ट कुंडलीतून पहावें. निरयन स्पष्ट ग्रहावें कुंडलीतून पाहिले तरी तेच योग येतील. मात्र निरयन आकडे कुंडलीचा कांहीं उपयोग नाहीं. ग्रहानें स्पष्ट अंश अगत्याशिवाय दृष्टीयोग पाहतां येणार नाहींत. सायन जन्मकुंडली अगर वार्षिक कुंडली या दोन्हींमध्यें हे योग पहावे. जन्मकुंडलीतील वार्षिक दृष्टीयोग जास्त महत्वाचें असतात.

गोचर भ्रमणाचें दृष्टीयोग पहातांना फक्त मोठ्या शुभ अगर अशुभ दृष्टीयोगाचा विचार करावा. लहान दृष्टीयोग एक राशनंतर, ३६° ७०° १४४°।१३५° वगैरे किरकोळ दृष्टीयोगाचें हृदय दिवून या नाहींत फक्त युति, द्विर्द्वादश केंद्र, नवपंचम, प्रतियोग हेंच विचारांत घ्यावें. दृष्टीयोग करणारे दोन्ही ग्रह मंद गति असतील तर १५० अंशाचा षडाष्टक योग ही विचारात घ्यावा. बाकीचें किरकोळ दृष्टीयोग अजिरात वगळावें.

वार्षिक कुंडलीतील मोठे दृष्टियोग व ग्रहगोचर पद्धतीनें जन्म कुंडलीतील होणारे दृष्टी योगाचीं फलें महत्वाची असतात. मात्र वार्षिक दृष्टी योगाचीं फलें जास्त मुदत टिकणारीं व गोचरग्रहांची शुभाशुभ दृष्टीयोग फलें थोडा काल टिकणारी असतात वार्षिक कुंडलीमध्यें चंद्राचें दृष्टीयोगाचीं फलें सुद्धां २।३ महिने टिकतात. व मोठे ग्रहाचें परस्परामध्यें होणारे दृष्टीयोग कित्येक वर्षे फलदायक होतात. असें गोचर भ्रमणाचें नाहीं चंद्राचें शुभ दृष्टीयोग २।३ दिवस टिकतील. गुरु राहु शनीचें दृष्टीयोग १ महिना टिकतील, हर्शल नेपच्यूनचें दृष्टीयोग कित्येक महिने टिकतील इतकेच समजावें.

जन्मकुंडलीतील तनुस्थानाचें आरंभीचे अंशाबरोबर चालित शनि (P) याची युति असेल तर आरोग्यावर वाईट परिणाम निदान १ वर्ष तरी होईल. जन्मलग्नाचें बिंदुबरोबर गोचर शनीची युति झाली तर

आरोग्यावर परिणाम कांहीं दिवस होतील. फार तर १ महिना आरोग्याला थोडा वाईट, किरकोळ आजार होतील. थंडी पडसें १।२ दिवस किरकोळ त्रास होईल. परंतु पहिल्या उदाहरणांत चलीत शनीची जन्मलग्ना-वरोवर युति निर्दयी आजार उत्पन्न करील. व त्यानें परिणाम मधून मधून एक वर्ष भोगावे लागतील. चलीत शनीचें (P) परिणाम औदासिन्य, कामांत हरकती, अडथळे वगैरे होतील. तसे परिणाम गोचर भ्रमणाचा शनि करणार नाहीं. तात्पुरते आरोग्यावर थोडे परिणाम होतील, व त्यांत पापग्रह असेल तर आरोग्य चांगलें राहणार नाहीं. व पापग्रह पुन्हा पापग्रहाचें अशुभ दृष्टीयोगांत असेल तर आरोग्य अधिकच वाईट असेल, व शुभ ग्रह असेल तर आरोग्य उत्तम व शुभ ग्रह शुभ दृष्ट असेल तर " अधिकस्य अधिकं फलम् " समजावें.

द्वितीय स्थानांत शनि असेल तर दारिद्य देतो अशी समजूत आहे. परंतु ती समजूत सर्वथा खोटी आहे. शनि येथें शत्रुग्रही शनीचें धर्मानें विरुद्ध राशींत विरुद्ध धर्माचें ग्रहांचें अशुभ दृष्टीत असेल अशा घटकेवर जन्मलेला मनुष्य जन्मदारिद्री समजावा परंतु शनि द्वितीय, स्वक्षेत्री, उच्च गृहीं, बलवान मित्रगृहीं म्हणजे स्वतःचे तत्वाचें अगर समान तत्वाचें राशींत असेल तर असा मनुष्य दरिद्री असणार नाहीं. उलट असा मनुष्य धोरणी, मेहनती, व्यवहारचतुर असेल. आपले कर्तबगारीनें पैसा मिळवील. शनि धनस्थानीं ३।७।९।१०।११ या राशींत असता असे लोक मोठे उद्योगपति असतात. हजारों लोकांना उद्योगधंद्यास लावतात. जे लोक हजारों लोकांचें दारिद्य दूर करतात ते स्वतः दरिद्री कसे असतील ? ते द्वितीयस्थानीं शनि असणारे लोक बहुतकरून Self made "स्वयंसिद्ध" म्हणजे स्वयंप्रकाशित असतात. वाडवडिलांचें इस्टेटीवर, जहागिरीवर ते मोठे झालेले नसतात. त्यांच्या आयुष्यांत त्यांना त्यांचें दैवयोगानें सोन्या हिऱ्याच्या खाणी सांपडणार नाहींत. हातामध्यें माती घेऊन सोनें करूं

शकणार नाहीत किंवा हजारों लोकांचें शेअर रूपानें पैसे घेऊन कंपन्यांचें दिवाळें काढणार नाहींत. तर दीर्घोद्योगानें मातींतुन सोनें काढतील. धनस्थानी बलीष्ठ शनि शुभ ग्रहाचें दृष्टीयोगांत असला तर माणसें फार कर्तृत्ववान असतात. रवि, मंगळ, गुरु, शुक्र, हर्षल यांचे शुभ दृष्टींत शनि असेल तर असे लोक सामाजिक भांडवलाचें कारखान्यांचें चालकत्व करण्यास लायक असतात. ते लोक भांडवल बुडविणार नाहींत.

एखाद्या ग्रहावर एका ग्रहाचा शुभ दृष्टीयोग होत आहे व त्याच वेळीं दुसऱ्या एका ग्रहाचा अशुभ दृष्टीयोग आहे. तर एक शुभ फल व दुसरें अशुभ फल मिळेल. दोन्ही दृष्टीयोगाचीं फलें भोगावीं लागतील.

कल्पना करा कीं, द्वितीयस्थानातील शनीवर गुरूचा शुभ दृष्टीयोग आहे व शुक्राचा अशुभ आहे. गुरुचें शुभ दृष्टीयोगानें उद्योगधंदे भरभराटीचें चालतील. जमीन,शेती, इस्टेट यांचेमध्यें फायदा होईल.कारखाने असल्यास त्यांची वाढ होईल. लौकिक दर्जा मोठा होईल. परंतु शुक्रशनीचें अशुभ योगानें नीतिमत्ता बिघडेल. सुखासक्तपणा वाढेल. असे लोक कारखान्याचें मालक असल्यास ते कर्तबगार असतात. परंतु कामकरी तरुण स्त्रियांवर पापी नजर ठेवतात. स्वत चें चैनीकरतां कारखान्याचा पैसा खर्च करतात. इतर व्यवसायांतील अशा योगावर जन्मलेले लोक कर्तबगार असतील, पण व्यसनी, पापी असतात.

गोचर भ्रमणें (ग्रहगोचर)

चंद्र बारा राशीमधून २७ दिवस ७ तास व ४३ मिनिटानें एक फेरा करतो.

बुध, शुक्र व रवि १२ राशींचा फेरा सुमारें १ वर्षानें पुरा करितात.

गुरु बारा राशी १२ वर्षानें पुरा करितो. शनि बारा राशींचा फेरा ३० वर्षानें पुरा करितो. हर्षल १२ राशी पुऱ्या करण्यास ८४ वर्षे लागतात



नेपच्यून १६५ वर्षांत बारा राशीचा फेरा फरितो. प्लूटो २४८ वर्षांत बारा राशींचा प्रवास पुरा करितो.

शुक्र रविपासून ४८ अंशापेक्षां केव्हांही दूर नसतो. बुध रविपासूनच २८ अंशापेक्षा जास्त दूर केव्हांही नसतो. परंतु शुक्र बुधाचें अनियमित गतीमुळें कित्येक वेळां हे स्तंभित असतात. कित्येक वेळां वक्री असतात. म्हणून पत्रिकेमध्यें त्यांची स्थानें सूक्ष्मपणें पंचांग पाहूनच पाहिली पाहिजेत.

सर्व साधारणपणें शुक्र, बुध व चंद्र यांचीं गोचरभ्रमणें जन्मकुंडलींत महत्त्वाच्या व क्रांतिकारक घटना निर्माण करणार नाहींत परंतु गुरु, शनि राहू, हर्षल, नेपच्यून, प्लूटो वगैरे मंदगतीग्रहानें दर्शीत केलेल्या महत्त्वाच्या घटना कोणत्याही दिवशीं घडून येतील याचें दिग्दर्शन शुक्र, बुध, चंद्र यांचें युति व शुभ अशुभ दृष्टीयोगानें (जन्म ग्रहावर) दर्शविलें जाईल. वार्षिक कुंडलीतील शुभाशुभ वार्षिक दृष्टी योगाचीं फलें कोणत्या महिन्यांत मिळतील हें वरील तीन ग्रहांचें गोचर भ्रमणावरून वार्षिक दृष्टी योगाचें मुदतींत ठरवावें. कोणत्याही वर्षाचें पंचांग स्पष्ट ग्रहाचें अगर एफेमरी घेऊन आपले जन्मकुंडली गोचरग्रह युति प्रतियोग व इतर मोठे शुभाशुभ कोणत्या दिवशीं करितात हें टिपून ठेवावें. त्यांत फक्त मोठया दृष्टी योगाचाच विचार करावा. किरकोळ दृष्टीयोग विचारांत घेऊं नयेत. कारण त्यांचा परिणाम दृश्य होणार नाहीं.

उदाहरणार्थ—कल्पना करा कीं, गुरु मेष राशींत १५ अंशात आहे तर द्विरद्वादशांतर योग मिथुन १५ अंशांत होईल. त्रिकोण योग सिंह १५ अंशात, केंद्रयोग कर्क १५ अंशांत व प्रतियोग तुल १५ अंशात होईल. ते योग १ वर्षाचें टिपून ठेवावें.

चंद्र प्रत्येक २७ दिवसांत बारा राशी फिरत असल्यानें मोठ्या ग्रहानें केलेले दृष्टीयोग चंद्राचें गोचर भ्रमणानें उत्तेजित होतील व चंद्राचें शुभ

अशुभ परिणाम गोचर भ्रमणाचें दिवशीं होतील, रवीनें जन्मस्थ शनीवरून गोचरभ्रमण केंद्र योग किंवा प्रतियोग, मानसिक उद्विग्नता, अपयश अडचणी निर्माण करील हा काळ आपत्तीकारक असतो. रवीची दृष्टीयोगाची कक्षा १° अंशाची असते म्हणून शनी मेषमध्यें १५ अंश असला तर रवि मेषमध्यें ३° अंश गेल्यापासून १५ अंशांत जाईपर्यंतच्या दिवसांत अनिष्ट फळें मिळू लागतील व रवि शनीची युति झाल्यापासून तीं अनिष्ट फळें कमी होऊं लागतात.

चंद्राचीं गोचर भ्रमणें

गोचर चंद्राचें जन्म रवीबरोबर भ्रमण. रवि जन्मकुंडलींत बलवान असेल तर लाभदायक असते. गोचर चंद्राची जन्मस्थ रविबरोबर युति उद्योग-धंद्यास लाभदायक असते. परंतु आरोग्यास थोडी खराब असते उत्साह वाटत नाहीं. जेव्हां गोचर चंद्र जन्म रविबरोबर अशुभ योग करतो तेव्हां नवीन कामें हातीं घेण्यास अपयशी असतो अशा दिवशीं कामानिमित्त कोणत्याही मोठ्या मनुष्याची भेट झाल्यास ती अपयशी ठरते. स्वतः चें काम करून घेण्यास हा योग घातक समजावा.

रवीचें खालोखाल चंद्राचें जन्म गुरुबरोबर होणारे शुभयोग (द्विद्वादशांतर, युति, त्रिकोण) महत्त्वाचें समजावेत. उद्योगधंद्यांत यश व गृहसौख्य दर्शवितात.

जन्मस्थ गुरु बरोबर गोचर चंद्राचे अशुभयोग शुभ नसतात. त्याचे योगानें या दिवशीं केलेले अंदाज चुकतात. आरंभ घेतलेला निर्णय बरोबर नसतो. शौक मौजा यावरील अतिरेक व पैसा ही उधळपट्टी होते

त्यानंतर चंद्राचें जन्मस्थ शुक्राबरोबर होणारे शुभयोग समजावे. हे शुभयोग मनुष्याच्या आनंदादी वाढीने गर्व जास्त होतो. करमणूक

नाटक, सिनेमा, गायन वगैरेमध्यें पैशाचा व्यय होतो, सामाजिक कार्यामध्यें भाग घेतला जातो. स्त्रियांचें बरोबर व्यवहार करण्यांत हे दिवस यशस्वी असतात. शुक्राबरोबर अशुभ योग होत असतील तर विशेष अशुभ कांहींच होत नाहीं. परंतु वर दिलेल्या बाबतींत यश कमीच येणार असें समजावें.

गोचर चंद्राची शनि, नेपच्यून, राहु, मंगळ, यांचेबरोबर युति अगर अशुभ योग अशुभ परिणामी समजावे. त्यांत शनीबरोबर दृष्टीयोग सर्वांत वाईट असतात. अशावेळीं नवीन कामास आरंभ करूं नये. कामांत निराशा होते. नुकसान, अडथळे, विलंब, कटकटी व काळजी निर्माण होते. शुभयोग साधारण समजावेत.

चंद्राचे जन्मस्थ बुधाबरोबर होणारे शुभ योग विशेष महत्वाचे नसतात. परिक्षेचे रिझल्टमध्यें यश, अभ्यासूपणा व बुद्धीचें कामांत यश येईल. चर राशींत चंद्र असेल तर किरकोळ प्रवास होतील. निदान थोडा फेरफटका करावा लागेल.

कुंडलींतील राजग्रह (मुख्य ग्रह) वरून होणारें चंद्राचें गोचर भ्रमण फार महत्वाचें असतें व हा ग्रह चर राशीला किंवा केंद्रामध्यें असून चर राशीला असेल तर त्याची शुभाशुभ फलें परिणामकारक होतात. (शुभाशुभदृष्टीयोगाप्रमाणें)

राजग्रह शुभ असून केंद्रांत असेल व तो चर राशींत असेल तर चंद्राची युति व द्विरद्वयंतर नवपंचम योग हे फार लाभदायक असतात. व्यापारी लोकांनीं या दिवशीं केलेले व्यवहार खात्रीपूर्वक यश व पैसा निर्माण करतील. (अनुभव पहावा.)

वरील नियम स्पष्ट करण्याकरता एक उदाहरण देतों. कल्पना करा कीं, वार्षिक कुंडलीमध्यें चलित शनि जन्म-युरेनसबरोबर युतियोग करीत आहे. या दोन मंदगति ग्रहांचा हा दृष्टीयोग २ वर्षें पर्यंत केव्हां तरी फलद्रुप

होणार हें निश्चित. आतां हा योग केव्हां फल देईल हें आपणास गोचर भ्रमणानें पाहावें लागेल. कल्पना करा कीं हा दृष्टीयोग सुरु झाल्यावर गोचर मगळ चलित शनीचें राशी अंश ओलांडून जात आहे तर वरील चलित शनि व जन्मस्थ हर्षल यांचे युतिचें अनिष्ट फल गोचर मगळ चलीत शनि युतिचें वेळींच मिळतील. परस्पर ग्रहामधील जे वार्षिक दृष्टीयोग फार मुदत टिकणारे असतात. त्यांचीं फलें बरोबर कोणते महिन्यांत मिळतील हे दृष्टीयोग करणारे ग्रहांवर व नेपच्यून, हर्षल, शनि, गुरु मगळ यांचे पैकीं ग्रहयुति अगर शुभाशुभ दृष्टीयोग केव्हां करितात हें पाहून ठरवावें.

जन्मकुंडलींत रवीचें भ्रमण फार महत्वाचें असतें. रवि जन्मकुंडलींत केव्हां जेव्हां जन्मस्थ रवि, चंद्र, गुरु, शुक्र, शनि यांचें बरोबर शुभ दृष्टीयोग करितो तो काल प्रत्येक वर्षी महत्वाचा असतो. ते दिवस प्रत्येक वर्षी जवळ जवळ तेच येतील. पण दृष्टीयोग युति केंद्र, त्रिकोण व प्रतियोग इतकेंच परिणामकारक होतात. किरकोळ दृष्टीयोगाचे परिणाम होणार नाहींत. या दिवसांत दुसरे शुभ वार्षिक दृष्टीयोग आले किंवा महत्वाचें गोचर ग्रह या वेळीं कांहीं शुभयोग करतील तर तो काल उन्नतीकारक व यशकारक समजावा. धंदेवाले लोकांना हा काल अत्यंत लाभदायक जाईल. अशुभ दृष्टीयोग होत असतील तर तो काल दुःख व हानीकारक होईल हें सांगण्यास नको.

चंद्राचें गोचर भ्रमण कांहीं तास फार तर २ दिवस टिकतें, म्हणून चंद्राचा उपयोग शुभ अशुभ दिवस पाहण्याकडे करावा कोणत्याही महत्वाचें कृत्यास आरंभ, महत्वाचें कामाकरतां कोणाची भेट घेणें वगैरे गोष्टी चंद्राचें गोचर भ्रमण शुभ असेल तेव्हांच कराव्यात. वार्षिक कुंडलींत दृष्टीयोग कितीही चांगले असले, गुरु, शनि अनुकूल असले तरी कोणत्याहि कार्यांचें यशास चंद्रबल असावेंच लागतें. नाहीं तर इतर शुभ दृष्टीयोगानें यश आले तरी त्याच्यांत अडचणी, विलंब होणें. काम पुढें ढकललें जाणें

वगैरे व्यत्यय चंद्राचें विरोधानें होऊं शकतात. विद्यार्थी कितीही हुषार असला तरी सुद्धा परीक्षेचे दिवसांत जन्म चंद्राची युति केंद्र,प्रतियोग व्या दिवशीं जन्मस्थ शनि मंगळ-हर्षलवरोवर होते त्या दिवशीचे पेपर त्या विद्यार्थ्यास कठीण जातात व मार्क कमी पडतात असा आम्ही अनुभव पाहिला आहे. इतर ग्रहांशीं चंद्राचे अशुभ योग अनिष्ट परिणाम थोडे फार करतीलच.

बुध व शुक्राचीं गोचर भ्रमणें ते Ruling planet राजग्रहा-बरोबर नसतील तर विशेष महत्वाचीं नसतात. विशेषतः नोकर लोकांचे कुंडलींत व ज्यांचें वार्षिक उत्पन्न ठरीव आहे त्यांना या भ्रमणाचा परिणाम होत नाहीं. परंतु ज्यांचें उत्पन्न उद्योग धंद्यावर अवलंबून आहे असे धंदे, वकील डॉक्टर, व्यापारी यांचेवर मात्र थोडा तरी परिणाम या ग्रहांचा होतो. तरी सुद्धा या दोन ग्रहांचें भ्रमणाचा परिणाम थोड्या प्रमाणांत संसारांतील दैनंदिन व्यवहारावर होतो. गृहसौख्य उत्तम मिळतें. गृहकृत्यांत आनंद होणें, प्रेम वाढणें, घरांत शांतता, समाधान, करमणूक वगैरे किरकोळ गोष्टींत त्यांचा परिणाम होतो.परंतु जन्मस्थ शुक्र,गुरु,चंद्र बरोबर असल्यास शुक्र-बुधाची युति शुभयोग झाले तर त्यादिवशीं कुटुंबास बरोबर घेऊन सिनेमा पाहिला किंवा गायन ऐकलें म्हणजे कृतार्थ झालों असें कोणासही वाटत नाहीं. तात्पर्य या दोन ग्रहांची शुभ भ्रमणें संसारांतील दैनंदिन सुखासुख (दुःख नव्हे) दर्शवितें. व त्याची स्मृतीही राहत नाहीं. मात्र व्यापारी वगैरे लोकांस या भ्रमणानें अधिक प्राप्ती होते.

आपल्या जन्म कुंडलींत राजग्रहाचें गोचर भ्रमण (तो कोणताही ग्रह असो) नेहमीं परिणामकारक असतें व राजग्रह जन्मतः ज्या ग्रहांशीं शुभ-योग:करीत असेल तसेंच शुभयोग गोचर भ्रमणांनीं झाले तर तो काल महत्वाचा असतो. जन्मतः ग्रह अशुभ असून गोचर भ्रमणांनीं अशुभ दृष्टियोग होत असेल तर वाईटच समजावा.

गोचरी भ्रमणाचे परिणाम जन्म कुंडलीतील ग्रहांचे अनुरोधानेंच वर्तवावे लागतील.

वार्षिक योग शुभ असून त्याच वेळीं गोचर भ्रमण अशुभ असलें तर वार्षिक दृष्टीयोगानें दर्शविलेले शुभ फल मिळण्यास विलंब लागेल. त्यांची व्याप्ती कमी होईल. परंतु अशुभ गोचरग्रहानें वार्षिक शुभ दृष्टीयोगाचे परिणाम अजिबात नाहींसे होणार नाहींत.

जन्म कुंडलींत एखादा दृष्टीयोग अगदीं अशुभ आहे पण वार्षिक कुंडलीमध्यें शुभ दृष्टीयोग होत असला तर अशा दृष्टीयोगापासून फायदा होत नाहीं. कारण जन्म कुंडलींत जे योग झाले नाहींत ते निव्वळ गोचरी भ्रमणानें मिळणार नाहींत. जन्मतः शनि धनस्थानीं असून एकादशस्थानांतून मंगळ केंद्रयोग करीत असेल तर अशा मनुष्याची सांपत्तिक स्थिती दरिद्रीच असणार. मग गोचर भ्रमणानें दशमांतून मंगळानें शनीबरोबर त्रिकोण केला तर त्याचा किती उपयोग होणार! नोकरीमध्यें वार्षिक वेतनश्रेणीप्रमाणें थोडी वाढ होईल किंवा उद्योग धंद्यात जास्त प्राप्ती होईल. वडील हयात असल्यास वडिलांकडून प्राप्ति होईल परंतु जन्मतः शनि–मंगळानें निर्माण केलेला दारिद्रयोग नाहींसा होणार नाहीं. अशा वेळीं स्वतःचा फायदा झाला नाहीं तरी त्या स्थानांतून भ्रमण करणारा ग्रह शुभयोग करीत असेल तर त्या त्या स्थानांतून आपल्या बरोबर व आपल्या धंद्यात संबंध येणाऱ्या मनुष्याचा फायदा होतो.स्वतःचा फायदा होणार नाहीं तरी संबंधी लोकांचा फायदा होईल.

कल्पना करा कीं, एखादा भ्रमण करणारा ग्रह सप्तमांतून वृश्चिक राशीमधून जन्मतः तृतीय स्थानांतील चंद्राशीं त्रिकोण योग करीत आहे परंतु सप्तमस्थानांतील भ्रमण करणारा ग्रह जन्मतः तृतीयस्थानांतील चंद्राबरोबर अशुभ योग करीत असेल तर अशा वेळीं स्वतःचा फायदा न होतां पत्नीचा

फायदा होईल. भागीदार पद्धतीनें व्यापार असल्यास भागीदाराचा फायदा होईल. तंटे, दावे वगैरे असल्यास आपले प्रतिपक्षाचा म्हणजे शत्रुचा फायदा होईल. चंद्र जन्मतः तृतीयेश असून एकादशस्थानीं असेल तर अशा गोचर ग्रह भ्रमणानें मावाचा फायदा होईल.

रविचे प्रत्येक वर्षातील शुभयोग

जन्म दिवसापासून पुन्हा पुढील वर्षीचें जन्मतारखेपर्यंत रवीचीं गोचर भ्रमणें १२ राशी:चक्रांतून पुरी होतात.प्रत्येक महिन्यांत १ राशी भ्रमण रवि पुरें करितो.

जेव्हां रवि गोचर गतीनें जन्म रविवरोबर प्रतियोग करितो (म्हणजे १८०–१८२ दिवसांनीं) तो काल थोडा तरी अडचणींचा, त्रासदायक व मनावर ताण पडणारा असा जातो. त्यावेळीं महत्त्वाचीं कामें, दूरचें प्रवास, कुटुंबांतील मंगलकार्ये, विवाह वगैरे शक्यतर, करूं नये. यावेळीं आजारीपणा आल्यास तो थोडा तरी लांवणीवर पडतो. स्वतःवर ऑपरेशन वगैरे करून घेण्यास हा काल अपयशकारक समजावा. चवथा महिना व दहावा महिना म्हणजे जन्म रविवरोबर गोचर रविचे केंद्रयोग हे सुद्धां वरील प्रमाणेंच समजावें.

प्रत्येक वर्षातील रवीचे अशुभ दिवस.

७८ ते ९५ दिवस जन्म-तारखेपासून
१६८ ते १८५ ,, ,, ,,
२२८ ते २४५ ,, ,, ,,

प्रत्येक १७ दिवसाचा वरील भाग प्रत्येक वर्षी तीन वेळा येईल व या भागात गोचर चंद्र रवि,शनि,हर्षलवरोबर जेव्हां अशुभ दृष्टीयोग करील व हे गोचर दृष्टयोग ३।५।८।१२ स्थानांतून होतील ते दिवस आपणास

अशुभ आहेत असें समजून त्यांचें टिपण डायरींत करून ठेवावें. व्यापारी लोकांनीं त्यांना जरूर अनुभव पहावा. या १७ दिवसांत जेव्हां गोचर चंद्र जन्म ग्रहांशीं गुरु, जन्म चंद्र, लग्न, दशम यांचेशीं शुभ दृष्टी करील तरी त्यानें शुभ परिणाम विशेष दृश्य असे होणार नाहींत.

रवींचें प्रत्येक वर्षांतील शुभ दिवस.

४८ ते ६५ दिवस जन्म दिवसापासून
१०८ ते १२५ ,, ,, ,,
२५८ ते २७५ ,, ,, ,,
३१८ ते ३३५ ,, ,, ,,

१७ दिवसांचे हे चार टप्पे तुमचे उत्कर्षास व उद्योगधंदा नोकरी यांस मदत करतील. या मुदतींतील गोचर चंद्राचें, जन्म रवि, गुरु, लग्न, दशमाशीं शुभयोग, युति अधिक परिणामकारक होतील हें लिहून ठेवावें. व त्यानें परिणाम पाहिल्यास प्रत्येकास साधारणपणें आपणांस अनुकूल तारखा कोणत्या हें समजून येईल. या मुदतींत होणारे गोचर चंद्राचें अशुभ योग सुद्धां विशेष होणार नाहींत.

घनसहम्चे परिणाम, घनसहम् कसें काढावें हें मागें दिलेच आहे. खरें पाहतां घनसहम्चा परिणाम व्यक्तित्व व आरोग्य यांवर कांहींच होत नाहींत.

ज्या स्थानांत घनसहम् असेल व त्यावर ज्या ग्रहांचें शुभ योग झाले असतील त्या स्थानाचें अनुरोधानें सांपत्तिक लाभ होतील.

शुभ ग्रह जेव्हां घनसहम्वरून जातात किंवा त्यावरोवर शुभयोग करितात तो काल पैशाचें बाबतींत अनुकूल समजावा. वार्षिक कुंडलीमध्यें जन्मकुंडलीप्रमाणेंच घनसहम् काढावें. परंतु चंद्राची गति वार्षिक कुंडलीमध्यें सरासरी १२।१५ अंश असल्यानें प्रत्येक महिन्यांत घनसहम् बदलेल. सूक्ष्मरीतिनें याचा विचार केला व सूक्ष्मरीतिनें दृष्टीयोग काढलेत तर त्यामधून फलश्रुति निर्माण होईल. तसें न केल्यास वार्षिक कुंडलीमध्यें घनसहम्चा विचार न केलेला बरा.

ग्रहणें जन्मकुंडलींत पाहावीं किंवा वार्षिक कुंडलींत पाहावीत.

ग्रहणें जन्मकुंडलींत पाहावी किंवा वार्षिक कुंडलींतही पाहावीत.

जन्म कुंडलींत ग्रहणाचा परिणाम जास्त दिसून येतो हें सिद्ध झालें आहे. वार्षिक कुंडलीतील स्थानाबरोबर किंवा चलीत (Progressed) ग्रहावरोबर ग्रहणाचा विचार करूं नये.

एखादें ग्रहण जन्म कुंडलींत ज्या स्थानांत पडलें असेल त्या स्थानाचें अनुरोधानें फलें मिळतील. ग्रहणाचें अंश जन्मकुंडलींतील पापग्रहांश अशुभ योग करतील तर त्याचें परिणाम त्या स्थानासंबंधीं अनिष्ट मिळतील. शुभ योग करीत असल्यास ग्रहणाचें अनिष्ट परिणाम होणार नाहींत. ग्रहण बिंदुवरोबर जन्मकुंडलीतील ग्रहाचें शुभयोग अनुकूल स्थिती निर्माण करूं शकणार नाहीं. ग्रहणाचें अनिष्ट परिणाम नाम मात्रसे होतील.

ग्रहण आमावास्या पौर्णिमा व ग्रहांचीं गोचर भ्रमणें जन्मकुंडलींतूनच पाहावी.

: ८ : तनुस्थान–अनुभविक नियम

(१) लग्नीं रवि असेल तर केंस भिगट रंगाचे असतात. निदान केंस काळेभोर असणार नाहींत आणि आप्तइष्ट लोकांशीं पटणार नाहीं.

(२) लग्नीं मंगळ असेल तर डोक्यावर चिन्ह असते. धनु राशीचा मंगळ अपघात व अग्निपासून भय दर्शवितो. लग्नीं मंगळ असतां बहुत-करून कपाळ पुढें आलेलें असतें. तो अग्नि राशींत असेल तर लहानपणीं खरूज आणि गजकर्ण वगैरे त्वचेचे रोग झाले असतील. स्वभाव तापट असतो.

(३) लग्नीं शुक्र असेल तर आवाज मधुर असतो व भाषण मिठें असतें.

(४) मीन राशीचा बुध लग्नीं अगर द्वितीयस्थानीं असतां मनुष्य फार बोलका व वाचाळ असतो. त्याचे बोलण्यावर जराशुद्धा मदार ठेवू नये. " मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् " अशी स्थिति असते.

(५) लग्नीं बुध व सप्तमस्थानीं मंगळ असेल तर हांवट हांवट बोलण्याची सवय असते.

(६) कर्क राशीचा शनि लग्नीं असेल तर द्विभार्यायोग होतो. लग्नीं शनी असलेला मनुष्य वृथाभिमानी, कपटी व धूर्त असतो.

(७) मकर लग्नाचीं माणसें ओबडधोबड शरीराचीं परंतु फार हिंमेती व व्यवस्थेशीर आणि स्वार्थसाधु असतात.

(८) लग्नस्थानीं असलेल्या मंगळास किंवा चंद्रास गुरु अगर शुक्र अशुभ दृष्टिनें पाहतील तर मनुष्य काणा होईल.

(९) लग्नीं मेष अगर सिंहराशी असून त्यांत शनि-चंद्र असतील तर तोंडास घाण येईल. नुसता मेषराशीचा क्षीण चंद्र लग्नांत असेल तरीही तोंडास दुर्गंधी येते.

(१०) लग्नीं मंगळ अगर चंद्र असून याची बुधावर पूर्ण दृष्टि असेल तर मनुष्य बुद्धिहीन होतो किंवा बुध लग्नांत असून त्याच्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तरीही मनुष्य बुद्धिहीन होईल.

(११) द्वितीयस्थानांत अगर लग्नामध्यें शुक्र असता नेत्र पाणीदार होतील.

(१२) लग्नांत कोणत्याही राशीचा चंद्र असेल तर चेहऱ्यावर आर्द्रता विशेष असते. चेहरा जरा वाटोळा व गौर असतो.

(१३) जन्मलग्नीं मिथुन अगर कन्याराशि उदीत असेल अगर चंद्र त्या स्थानीं असेल तर असा मनुष्य पुराणिक किंवा शास्त्री होतो. निदान त्या मनुष्यास पुराण व शास्त्रें याचा व्यासंग असतो.

(१४) जन्मकुंडलींत राहु, सूर्य व शनि हे केंद्रांत शत्रुगृही असतील तर जन्मणारास नेहमीं दारिद्य भोगावें लागेल.

(१५) ज्याच्या जन्मकुंडलींत गुरु शुक्राचा अस्त असून लग्नस्वामी ६-८-१२ स्थानीं असेल तर त्याचा जन्म दारिद्यांतच जाईल.

(१६) अग्निराशींत रवि असेल तर स्वभाव अतिशय शीघ्रकोपी असतो. अर्धशिशीची संवय असते. केंस विरळ असतात.

(१७) लग्नीं अगर सुखस्थानीं पांच ग्रह एके ठिकाणीं असतील तर प्रथम आयुष्य सुखावह होईल. आयुष्यांत घडामोडी व स्थित्यंतरें पुष्कळ होतील, परंतु शेवटीं दारिद्यावस्था प्राप्त होईल. एकाच राशींत बरेच ग्रह असणें एकंदरींत वाईटच समजावें.

(१८) कपाळ पुढें असलेल्या माणसाचे लग्नीं मंगळ असतो. मंगळ लग्नीं असेल तर डोक्यावर व्रण किंवा चिन्ह असतें.

(१९) नेहमीं पडसें अगर शैत्य होणाऱ्या माणसाचे कुंडलीत शनि-चंद्र जलराशींत लग्नीं असतो.

(२०) राहु लग्नीं असेल तर दांत बारीक व भुवया धनुष्याकार असतील.

(२१) लग्नीं व समस्थानीं पापग्रह व चंद्र पापग्रह युक्त अगर पापग्रह दृष्ट असेल तर बालारिष्ट योग १ वर्षाचे आंत जाणावा.

(२२) क्षीणचंद्र लग्नीं अगर अष्टमस्थानीं व केंद्रीं पापग्रह असतील तर किंवा पापग्रहामध्यें असा चंद्र अष्टम, चतुर्थ व सप्तमस्थानीं असेल तर बालमृत्यु योग जाणावा. चंद्र लग्नीं व पापग्रह सप्तम, अष्टमस्थानीं असून त्यावर शुभ ग्रहांची बलिष्ठ दृष्टि नसेल तर मातेसह बालमृत्यु होईल.

(२३) लग्न व चंद्र यांचे सप्तमस्थानीं कोणताही ग्रह नसेल किंवा सप्तमस्थानीं निर्बल ग्रह असून त्यावर शुभ ग्रहाची दृष्टि नसेल तर पति चांगला मिळणार नाहीं.

(२४) नेहमीं पडसें अगर शैत्य होणाऱ्या माणसाचे कुंडलींत शनि जलराशींत लग्नीं असतो.

(२५) तनुस्थानीं पापग्रहयुक्त वृषभ लग्न किंवा पापग्रहयुक्त वृश्चिक लग्न असेल तर असे लोक अत्यंत खुनशी स्वभावाचे असतात. सूडाची बुद्धि नेहमीं जागृत असते. पहिल्या ग्रहयोगावर जन्मलेले लोक गोड बोलून विश्वासघात करतील. दुसऱ्या प्रकारचे लोक उघड उघड वैर ठेवून सूड घेतील.

(२६) ज्यांच्या जन्मलग्नीं वायुराशि (३, ७, ११) उदीत असून तेथें मंगळ, बुध, शनि, नेपच्यून व राहु यांपैकीं कोणतेही दोन ग्रह असतील तर असे लोक मानभावी वृत्तिचे असतात. वरून सभ्यपणाचे पांघरूण घेऊन शांतपणें आपले हेतू साध्य करतात. हे लोक अत्यंत मतलबी व स्वार्थी असतात. अंतःकरण कोरडें ठणठणीत, प्रेमहीन असतें.

मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् । आप्त, इष्ट, मित्र यांनाच काय परंतु आई, बाप, बंधु भगिनी यांना गोड बोलून फसवतील.

द्वितीयस्थानांविषयीं अनुभविक नियम

(१) धनस्थानीं मंगळ असणारी माणसें फार उधळी व खर्चाचे कामात अविचारी असतात. त्यांच्या हातात पैसा मुळींच टिकत नाहीं. डोळ्यांत लाली अगर खुपऱ्या येतात. डोळ्यांतून कधीं कधीं पाणी गळतें. धनस्थानीं मंगळ पापग्रह दृष्ट असेल तर डाव्या डोळ्याची दृष्टि कमी होण्याचा संभव असतो.

(२) धनस्थानाचा स्वामी लग्नीं आणि लग्नस्वामी-धनस्थानीं असेल तर हा योग संपत्ति मिळण्यास उत्तम असतो.

(३) धनस्थानीं जलराशि असून त्यांत एखादा शुभग्रह असेल तर जन्मणाऱ्या मनुष्याची वडिलार्जित इस्टेट चांगली असते. निदान जन्माचे वेळीं तरी त्याचे वडिलांची आर्थिक स्थिति समाधानकारक असते.

(४) या स्थानांत दुर्बल असता जन्मणाराचे लहानपणीं आप्तइष्टांचे मृत्यू होतात. कुटुंबामध्यें वैमनस्य फार असतो.

(५) चंद्र अथवा सूर्य केंद्रात असून मंगळाशीं युति करील अगर त्याचा केंद्रयोग अथवा प्रतियोग होईल तर आंधळेपणा येईल. पुरुषाचे कुंडलींत रवि उजवा डोळा आणि स्त्रियांचे कुंडलींत डाव्या डोळ्याचा दर्शक आहे. चंद्र पुरुषाचा डावा डोळा व स्त्रीचा उजवा डोळा दर्शवितो.

(६) ज्या कुंडलींत द्वितीयस्थानाचा स्वामी गुरुसह षष्ठ, अष्टम किंवा द्वादशस्थानीं असेल तर खडतर दारिद्र्ययोग समजावा.

(७) चंद्रानें युक्त शुक्र ६-१२ स्थानीं असेल तर मनुष्य रातांधळा होईल. सिंह राशीचा शुक्र लग्नीं असेल तर नेत्रास काहींतरी विकार करण्याचा संभव आहे.

(८) धनस्थानीं मंगळ असेल तर त्या माणसाचे कुटुंबांतील मंडळींशीं पटणार नाहीं. नित्य कलह होतील.

(९) द्वितीयस्थानीं कन्या राशीचा शुक्र दुर्बलानें युक्त असेल तर वयाचे ७ ते ९ वर्षांचे अवधींत नेत्रविकार होऊन अंधत्व येतें.

(१०) घारे डोळे असणारे लोकांचे कुंडलीमध्यें रवि दुर्बल नेत्रस्थानीं अगर त्याचे समोरील स्थानीं म्हणजे ६।८ ठिकाणीं असतात.

द्वितीयस्थानीं शनि व राहु असेल तर बोलतांना मनुष्य अडखळतो.

तृतीयस्थानाविषयीं अनुभविक नियम

(१) तृतीयस्थानांत कोणत्याही राशींत रवि असेल तर जन्मणारा भावंडामध्यें वडिल असतो किंवा वडिल नसल्यास वडिल भावंडें फार दिवस वाचत नाहींत अगर सर्व भावंडामध्यें श्रेष्ठ असतो.

(२) तृतीयस्थानीं गुरु अगर शुक्र असेल तर हस्ताक्षर चांगलें असेल. शुक्र या स्थानांत असतां पाठीवर बहिण होते.

(३) शनि तृतीयस्थानीं असतां पाठीवर बहिण होते. मात्र ती दीर्घायुषी होईल असें सांगवत नाहीं. वायुराशींत या स्थानीं शनि असेल तर पडसें वगैरे दैत्याचे विकार नेहमीं होतील.

(४) तृतीयस्थानीं वंध्याराशीत (३।५।६) शनि असेल तर भावंडें फार असणार नाहींत.

(५) तृतीयस्थानीं शनि वक्री असेल अगर इतर पापग्रहयुक्त असेल किंवा येथें दोन पापग्रह असतील तर नेहमीं मनांत कुविचार येतील. बुद्धिचा दुरुपयोग होईल. हस्ताक्षर वाईट असते. अशीं माणसें कलाहीन असतात.

(६) तृतीयस्थानीं शुभ ग्रह असेल तर हस्ताक्षर चांगलें असेल.

(७) वायुराशींत शनि, मंगळ अगर राहुपैकीं कोणताही ग्रह असेल तर कर्ण रोग होईल. बहिरेपणा असण्याचा हा योग आहे.

(८) या स्थानीं मंगळ असेल (१, २, ४, ५, ८, ९) राशीचा असेल तर असा मनुष्य हट्टी व दुराग्रही असतो. येथें शनि असल तर अशी माणसें बहु भित्र्या स्वभावाची असतात. परंतु बाहेरून शौर्याचा अविर्भाव दाखवितात.

(९) तृतीयस्थानीं राहु असणाऱ्या लोकांना कलाकौशल्याची व फोटोग्राफीची आवड असते.

चतुर्थस्थानाविषयीं अनुभविक नियम

(१) चतुर्थस्थानीं गुरु अगर शुक्र असेल तर वाहनाचें सुख मिळतें. चतुर्थस्थानात चंद्र असता अंतःकरण दयार्द्र असते.

(२) चतुर्थस्थानीं शनि असून दशमांत मंगळ असेल तर उंचावरून पडून अपघात होईल. या स्थानीं शनि, मंगळ असेल तर छातींत व्रण असेल.

(३) सुखस्थानीं धनुराशीचा मंगळ असेल तर वाहनापासून अपघात होईल, मोटारीचे अपघात होतील.

(४) चतुर्थस्थानीं शनि, मंगळ असेल तर अंतःकरण कठोर होतें. गृहसौख्य केव्हाही मिळणार नाहीं.

(५) चतुर्थस्थानीं चंद्र अगर गुरु पृथ्वीराशीस असतील (२।६।१०) तर पोटावर व छातीवर फार केंस असतील.

(६) या ठिकाणीं शनि, मंगळ, राहु, केतु, दुर्बल यापैकीं कोणतेही दोन ग्रह असले तर गृहसौख्य केव्हाही चांगलें मिळणार नाहीं. वयाचे ४० ते ४५ वर्षांपर्यंत कुटुंबामध्यें एकादा मृत्यू आकस्मिक होतो. उद्योग-धंद्यात संकटें येतात. परिस्थितीमध्यें चांगले वाईट फरक होतात. वरीलपैकीं कोणतेही दोन ग्रह चतुर्थस्थानीं असता आयुष्यातील उत्तरार्ध गृहचिंतेंत

जातो. मानसिक स्वास्थ्य लाभत नाहीं. परंतु अशीं माणसें अत्यंत उलाढाली असतात. स्वत:च्या कर्तबगारीनें घर, स्थावर इस्टेट संपादन करतात संपादन केलेल्या इस्टेटीचा स्वतःला फार वर्षे उपभोग घेतां येत नाहीं

(७) या ठिकाणीं राहू (१, २, ४, ५, ७, ८, १०, ११) या राशीस असेल किंवा कोणत्याही राशीचा नपत्यून वक्री असेल तर अशा मनुष्याचा उत्कर्ष वडिलार्जित घरांत किंवा जन्मभूमींत केव्हांही होणार नाहीं. स्वसंपादित घरांत रहाणें सुखकर होईल.

(८) या ठिकाणीं कोणतेही एक किंवा दोन शुभग्रह अशुभ दृष्टि रहीत असतील तर उत्तरार्ध शांततेंत जाईल.

पंचमस्थानाविषयीं अनुभविक नियम

(१) पंचमस्थानीं रवि असेल तर बहुतकरून पहिला मुलगा होईल. व त्याचा रावीही त्याच राशींत असेल अगर त्याचे पंचमस्थानची राशी त्या मुलाच्या लग्नीं अगर सप्तमस्थानीं येईल अथवा त्या राशींत त्याचा चंद्र असेल

(२) पंचमस्थानारंभी वक्या शनि असून गुरुही वक्या राशींत असेल अगर अष्टमस्थानीं असेल तर संतति होणार नाहीं. वक्यारादी (१।५।६)

(३) पंचमस्थानीं बुध गुरु अगर शुक्र असेल तर मुलें सुस्वरूप व आज्ञाधारक निघतात.पंचमांत मंगळ अगर शनि असेल तर मुलें स्वच्छंदी होतात.

(४) पंचमस्थानीं मंगळ अगर राहु असेल तर संतति वांचणार नाहीं. जन्मकुंडलींत कोठेही गुरु, मंगळ, एके ठिकाणीं असतील अगर त्यांना प्रतियोग असेल तर कांहीं संतती अल्पायु होते

(५) पंचमस्थानीं जलराशी असून गुरुही कर्क, वृश्चिक अथवा मीन राशींत असेल तर १०–१२ किंवा जास्त मुलें होतील. (संततिनियमन अवश्य करावें.)

(६) पंचमांत, लग्नांत किंवा एकादशस्थानांत गुरु शनियोग असतां निर्वंश होतो. संतति मुळींच होत नाहीं.

(७) पंचमस्थानीं वंध्या राशींत सूर्य किंवा मंगळ असेल तर संततिसुखाची आशा बाळगणें व्यर्थ आहे (वंध्या राशि ३।६।९).

(८) ज्या ज्या जन्मकुंडलींत गुरु व शनि गर्भोत्पादक राशींत येतील त्या त्या काळीं ते संतति देण्यास समर्थ होतात. कुंडलींत १–३–५–७ ९–११ हीं गर्भोत्पादक स्थानें समजावीत.

(९) परीक्षेचे वेळीं गुरु जन्मलग्नापासून १–३–५–९-११ या स्थानीं असावा म्हणजे परीक्षेंत यश येण्याचा संभव असतो. मात्र जन्मतः पंचमस्थान आणि विद्येचा कारक ग्रह कसा आहे. हें पहावें व कोणत्या विद्येंत यश येऊं शकेल याचा निर्णय करावा. जन्मतः विद्येस ग्रह अनुकूल नसतील तर शुभ ग्रह येऊन सुद्धां खडकावर पाऊस पडल्याप्रमाणें कांहीं उपयोग होणार नाहीं.

(१०) स्त्रियांचे कुंडलींत पंचमस्थानीं मंगळ अगर रवि असेल अगर ते ग्रह एकादशस्थानीं असतील तर संतति होणार नाहीं. अनेकवेळां गर्भपात होतील किंवा बाळंतपणाचे वेळीं शस्त्रक्रिया करण्याची पाळी येईल.

(११) पंचमारंभीं स्त्रीराशि असून त्या स्थानात स्त्रीग्रह असेल अथवा गुरु समराशीस असेल तर प्रथम मुलीच होतात.

(१२) पंचमस्थानीं सिंह राशीचा रवि असेल तर प्रथम पांच पुत्र होतील.

(१३) पंचमस्थानीं शनि असेल तर संतानाचा निरंतर नाश, रवि असेल तर एक पुत्राचा नाश, मंगळ असेल तर दोन पुत्रांचा नाश होईल. बुध असेल तर मुलें बुद्धिवान होतील. गुरु असतां मुलें पराक्रमी होतील. पंचमस्थानीं राहु कुप्रजा निर्माण करील. केतु कन्या संतति देईल.

षष्ठस्थानाविषयीं अनुभविक नियम

(१) षष्ठस्थानीं वृश्चिक राशीचा शनि मंगळ असेल तर वगैरेसारखे विकार होतील व त्या भागावर ऑपरेशन करावें लागेल

(२) षष्ठस्थानांत चंद्र असून त्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर पांथरी (Spleen) बिघडेल. षष्ठस्थानीं "मंगळ शनि" असतील अथवा मंगळ, शनि व सूर्य त्या स्थानीं असतील तर जन्मतः काहींतरी व्यंग असतें.

(३) जन्मकुंडलींत षष्ठस्थानीं राहु, मंगळ व शनि हे ग्रह पुरुषास आप्तइष्टांचें सुख लाभत नाहीं. मात्र शत्रूकडून त्याचें नुकसान होणार नाहीं. उलट फायदाच होईल

(४) षष्ठस्थानीं वृश्चिक राशींत शनि अगर मंगळ असतील तर मूळव्याध अगर भगंदर होईल.

(५) जन्मकुंडलींत बुध षष्ठ अगर द्वादशस्थानीं असेल व बिघडलेला असेल तर वाणीत दोष येईल, कदाचित् जन्मतः मनुष्य- असेल. जन्मकुंडलींत षष्ठ बुध, कर्क, वृश्चिक किंवा मीन राशींत शनीनें बिघडलेला असेल तरच समजावा.

(६) या स्थानीं शनि अगर रवि ज्या राशीत असतील त्या दर्शविलेल्या भागाला काहीतरी आजार आहे असें समजावें.

(७) या स्थानीं क्षीणचंद्र शनि, मंगळ, हर्शल, राहु अगर केतु यांपैकीं कोणतेही दोन ग्रह असतील तर त्या मनुष्याला कोर्टातून अनेकवेळ नुकसान सोसावें लागेल.

(८) या ठिकाणीं रवि अग्नि अगर जलराशीचा असेल तर तो अधिकार योग होतो. नोकरी मोठ्या दर्जाची मिळते परंतु हा योग मध्यमा असतो. नोकरीतच मृत्यु होतो.

अनुभविक नियम

(१) ह्या स्थानीं २, ६, १२ ह्या राशीस शनि, मंगळ, हर्शल, क्षीण
पैकीं कोणतेही दोन ग्रह असले तर अशा माणसास फुफ्फुसाचे
र, क्षय, दमा यांपैकी एखादा विकार असतो.

(१०) या ठिकाणी मंगळ असणारे लोक अत्यंत धीट स्वभावाचे शूर
तात. स्वतः काम न करतां दुसऱ्याजवळून काम करवून घेण्याची
गोटी त्यांना उत्तम साधते म्हणून एखादे संस्थेचे व्यवस्थापक
फिसचें मुख्य हीं कामें ते लोक उत्तम बजावू शकतात.

सप्तमस्थानांविषयीं कांहीं अनुभविक नियम

(१) सप्तमस्थानीं मकर कुंभ व तुला राशीखेरीज शनि असतां
जन्मणारा बाहेरख्याली व व्यभिचारी असतो.

(२) सप्तमाचा स्वामी शुक्र असून तो षष्ठस्थानांत असेल तर मनुष्य
अतिशय कामी होतो. व्यभिचार प्रवृत्ति असते.

(३) सप्तमांत राहु असेल तर पहिली स्त्री लग्न झाल्यापासून तीन
वर्षांच्या आंतच मृत्यू पावेल. निदान वयाचे २७ वें वर्षी दुसरा विवाह
करण्याची पाळी येईल.

(४) सप्तमस्थानीं कोणत्याही राशीचा हर्शल असेल तर स्त्रीशीं
बेबनाव होईल. दोघांचें पटणार नाहीं. कुटुंब नेहमीं आजारी असेल.
त्यामुळें पैसा फार खर्च होईल.

(५) सप्तमांत शनि असतां स्त्री उदास वृत्तिची व मलीन मिळ .
ती आपले नवऱ्यावर कर्तव्य म्हणून प्रीति करते. बाकी नवऱ्याबद्दल
तिचे मनांत आदर नसतो.

(६) जायास्थानीं मंगळ असेल तर स्त्री फार कजाग मिळेल, पतीला
तेचे वर्चस्व खुषीने मगर नाखुषीने पत्करावें लागेल.

(७) सप्तमांत चंद्र शुक्र असतील तर स्त्री सुस्वरुप मिळेल, मात्र दोघेही फार कामी असतील. स्त्रियांचे कुंडलींत चंद्र शुक्र सप्तमांत असतील तर पति चैनी शोका व प्रत्येक आवड पुरविणारा मिळेल.

(८) सप्तमस्थानांत शनि बुध एकत्र असतील तर बहुतकरून लग्न होणार नाहीं. स्त्रियांचे कुंडलींत हा योग होईल तर त्यांना पति नपुंसक मिळेल. (मित्रा अजागळ शरीरानें दुर्बल)

(९) सप्तमांत रवि असतां स्त्री फार मानी मिळते. सप्तमांत रवि असून द्वितियस्थानांत मंगळ असेल तर नवरा बायको दोघेही उष्णतेच्या विकारानें पीडित होतील.

(१०) सप्तमांत मंगळ असून सिंह राशीचा चंद्र त्यास पहात असेल अगर कर्क राशीस सूर्य :असून तो सप्तमस्थानांतील मंगळाला पहात असेल तर माणूस काणा होईल.

(११) जन्म कुंडलींत सप्तम स्थानीं रवि आणि द्वितीयस्थानीं राहु असेल तर त्याच्यावर स्त्रियांचा पगडा फार असतो. दोघांचे कुंडलींत हा योग झाला असेल तर ते दोघे एका दिलानें रहातील. परंतु अशी स्थिति फार दिवस टिकणार नाहीं. कारण त्यापैकीं एका जणास लवकरच मृत्यु येईल असें समजावें.

(१२) ज्याच्या धनस्थानीं किंवा आयस्थानीं शुक्र असतो, तो मनुष्य फार विषयी असतो. सप्तमस्थानीं वृषभ अगर तुला राशीस शुक्र चंद्राची युति असेल तर वडिलोपार्जित इस्टेट चांगली मिळेल.

(१३) स्त्रियांचे कुंडलींत लग्नीं अगर सप्तमस्थानीं राहु, चंद्र व शुक्र एके ठिकाणीं असणें चांगले नाहीं. अशी स्त्री पतीस प्रिय नसते. तिचे बद्दल पति संशयपरत असतो.

(१४) ज्याच्या कुंडलींत सप्तमस्थानीं चंद्र गुरु आढळेल ते लोक स्त्रियांचे स्वाधीन राहतील परंतु त्यांचेकडून पापाचरण होणार नाहीं

(१५) सप्तमस्थानीं मकर कुंभ व तुला ह्या राशीलेरीज इतर राशीचा शनि असेल तर मनुष्य परस्त्रीरत असतो व आपलेपेक्षा जास्त वयाचे स्त्रीशीं संबंध घडतो.

(१६) सप्तमस्थानीं मंगळ दुर्बल शुक्रानें दूषित असेल तर प्रमेहा-सारखे आजार उत्पन्न होऊन त्याचा संसर्ग दोष स्वतःचे स्त्रीसही भोगावा लागेल.

(१७) स्त्रियांच्या कुंडलामध्यें रवि-शनिचा अशुभयोग कोठेही झाला असेल तर तिचा विवाह जास्त वयाचे पुरुषाशी होतो. कित्येक वेळां बिज-वर तिजवर मिळतो. शनि मिथुन तूळ मकर अगर कुंभ राशींत असेल तर पति धनवान मिळेल.

(१८) स्त्रियांचे कुंडलीमध्यें रवि-शनिचा केंद्रयोग युति अगर प्रति योग कोठेही झाला असतां तिला पतिसुख चांगलें मिळणार नाहीं. संसा रांत दारिद्य व आपत्ति येतील.

(१९) स्त्रियांचे कुंडलीमध्यें रवि शुक्र दुर्बल व दुर्बल शुक्र याचें योग नैतिक आचरणास चांगले नसतात. वरील योग होऊन रविवर अगर शुक्रा-वर मंगळाची अशुभदृष्टि असेल तर अशा स्त्रिया कौमार्य अवस्थेमध्येंच बिघडलेल्या असतात.

(२०) सप्तमांत शुक्र, चंद्र अगर गुरु असेल तर स्त्री रूपानें चांगली मिळेल. पतिपत्नीमध्यें दांपत्यप्रेम चांगलें असेल.

(२१) दोन पापग्रह सप्तमस्थानीं असतील तर ती स्त्री बालविधवा होईल.

(२२) शुक्र,चंद्र ह्यांची शनि मंगळाचे गृहीं असतील व त्यावर पाप-ग्रहाची दृष्टि असेल तर स्त्री व्यभिचारिणी होईल व तिची माताही कुलवान नाहीं असें समजावे.

(२३) सप्तमेश गुरुयुक्त किंवा सप्तमेश पंचमेश युक्त असे असतील तर द्विभार्या योग होईल. पहिलीस संतान होणार नाहीं व दुसरीस संतान-वृद्धि होईल. सप्तमेश अगर पंचमेश-शनियुक्त असेल तर दोन,तीन बायका होतील परंतु मुलें-जगणार नाहींत.

(२४) हर्शल सप्तमस्थानीं असून प्रथम गुरु अगर चंद्र यांचेशीं युति करण्यास जाईल तर असा योग पुरुषाचे जन्म कुंडलींत असतां त्याचे पत्नीस आकस्मिक मृत्यू येईल. सप्तमस्थानीं नुसता हर्शल असतां वैवाहिक सुख चांगलें मिळणार नाहीं. हर्शल सप्तमस्थानीं असून शुक्र, गुरु अगर चंद्रास युति करण्यास जात असतां स्त्री रूपानें उत्तम मिळेल. स्त्रीसुख चांगलें परंतु स्त्रीचा मृत्यू आकस्मिक होईल.

(२५) स्त्रियांचे कुंडलींत रवि प्रथम गुरुशीं युति करील तर त्या स्त्रीला विवाहानंतर चांगलें सौख्य लाभेल. परंतु त्याच कुंडलीमध्यें हर्शल रविचा पुन्हां अशुभयोग होईल तर पतीचा मृत्यू आकस्मिक होईल. पतिचा मृत्यू अपघात अगर आत्महत्येनें होईल. अशा स्त्रियांचें आयुष्य पतिनिधनानंतर कष्टमय जात असतें.

(२६) स्त्रियांचे कुंडलींत रवि हर्शलाचा अशुभ दृष्टियोग असेल तर विवाह लवकर होत नाहीं व पतिपत्नींचें चांगलें पटत नाहीं. रवि हर्शलाचा काटकोन अगर प्रतियोग असलेल्या मुलीचा विवाह जुळविण्यास तिचे वडिलांचे कित्येक जोडे फाटले तरी एकहि जोडा जुळत नाहीं. वर दृष्टियोग झालेल्या स्त्रियांचे वर्ष कुंडलीमध्यें ज्या वर्षी रवि पुन्हां हर्शलाशीं अशुभ दृष्टियोग करील अगर एकादे वर्षी हानि चंद्राचा अशुभयोग होईल या वर्षी कुमारिका असल्यास तिचेवर जबरदस्तीःहोण्याचा प्रसंग येईल. विवाहित स्त्रियांस त्यावेळीं अनेक संकटें येतील पतीचें आरोग्य चांगलें रहाणार नाहीं. कदाचित् या योगावर वैधव्य येईल.

(२७) शुक्र हर्शल अशुभयोग पुरुषांचे कुंडलींत असतां मनुष्य अतिशय विषय-लंपट असतो.

(२८) पुरुषाचे कुंडलींत चंद्र हर्शलानें बिघडला असेल तर त्यास वैवाहिकसुख केव्हांहि चांगलें मिळणार नाहीं. चंद्र द्विस्वभाव राशींत असेल तर पहिल्या स्त्रीस आकस्मिक मृत्यू येईल. दुसरा विवाह होईल परंतु दुसरें कुटुंब पहिलीपेक्षा अधिक वाईट निघेल.

(२९) स्त्रियांचे कुंडलींत चंद्र-हर्शलाचे परिणाम रवि-हर्शलाइतके वाईट दिसून येत नाहींत.

(३०) स्त्रियांचे कुंडलींत रवि प्रथम शनिशीं युति करील तर तिला पति कमी दर्जाचा, बुद्धिहीन, व्यसनी मिळेल. पतिसुख मिळणार नाहीं. असा योग असून रवि जलराशीमध्यें असेल (कर्क, मीन,मकर) तर पति व्यसनी, दारुबाज मिळेल. रवि तूल राशींत असेल तर पति एककल्ली, दुष्ट, मतलबी व दरिद्री मिळेल, त्यांचेकडून कुटुंबपोषण होणार नाहीं.

(३१) शनि-रविचा अशुभ दृष्टियोग स्त्रियांचे कुंडलींत होईल तर विजयराशी विवाह होईल.

(३२) पुरुषांची कुंडली चंद्र शनीने बिघडली असेल तर विवाह सुखावह होणार नाहीं. परंतु चंद्र प्रथम गुरुशीं युति करील व नंतर शनिचे अशुभ दृष्टिमध्यें असेल तर पत्नी चांगली मिळेल परंतु तिचें आरोग्य चांगलें रहाणार नाहीं. तिचे दुखण्यामुळें पतीचा पैसा खर्च होऊन संसारसुख मिळणार नाहीं. शनि द्विस्वभाव राशींत असतां प्रथम पत्नीचा मृत्यू होऊन दुसरा विवाह होईल.

(३३) स्त्रियांचे कुंडलींत शनि चंद्राचा अशुभयोग फार वाईट असतो. असा योग असून मंगळ शुक्राचा कोणताही दृष्टियोग होत असेल अगर रवि शुक्राचा अशुभयोग होईल तर अशा योगावर जन्मलेल्या स्त्रिया कुमारी होतील.

(३४) सप्तमांत गुरु असतो परंतु नेहमींच तो चांगलीं फळें देतो असें नाहीं. मात्र सप्तमस्थानीं गुरु दिवाणी दावे व भागीदार पद्धतीचे कामीं फार चांगला असतो सार्वजनिक कामास हा योग फार उत्तम असतो.

(३५) सप्तमस्थानीं गुरु असून त्यावर मंगळाची षटकोन दृष्टि अगर प्रतियोग दृष्टि असेल तर विवाह सुखावह होणार नाहीं. स्त्री उधळी, निष्काळजी, मूर्ख व घमेंडखोर मिळेल. संसारामध्यें लक्ष देणार नाहीं. तिचा सर्व वेळ नट्टापट्टा करण्यांत जाईल. गुरुचे शुभ फल फक्त मंगळानें नाहींसें होतें.

(३६) स्त्रियांचे कुंडलींत रवि प्रथम ज्या ग्रहांशीं युति करील त्या ग्रहांचे गुणधर्मावरून तिला वैवाहिक सुख मिळेल.

(३७) मुलींचे कुंडलींत पंचमस्थानीं मंगळ असतां विवाह लवकर होत नाहीं.

(३८) स्त्रियांचे दशमस्थानीं मंगळ वाईट असतो,त्यामुळें त्यांचेसंबंधीं उन्याखोऱ्या बातम्या पसरून अब्रूस कलंक लागतो.

(३९) सप्तमस्थानीं दुर्बल शुक्र असेल व त्यावर (मकर, कुंभ, मीन खेरीज) मंगळ शनिची शुभ दृष्टि असेल तर " मालिनी खानासारखा " धर्मबाह्य विवाह होईल. (अतरधर्मीय)

अष्टमस्थानाविषयीं कांहीं अनुभविक नियम

(१) अष्टमस्थानीं गुरु अगर शुक्र स्वगृहीं अगर उच्चराशीस असतील तर अकल्पित लाभ होईल.मृत्यूपत्रापासून द्रव्य मिळेल. साडेसातींत नशीब उघडेल.

(२) अष्टमस्थानाचा स्वामी सप्तमस्थानीं असेल तर स्त्रीधन मिळेल.

(३) दुर्बल अष्टमस्थानीं असून त्यावर मंगळाची अशुभदृष्टि असेल तर आकस्मिकपणें अपघातानें मरण येईल.

(४) अष्टमस्थानीं शनि असेल तर आयुष्यवर्धक समजावा. ह्या स्थानीं शनि असता मरण लवकर व एकदम येत नाहीं. वर्षानुवर्षे खितपत पडावें लागतें.

(५) मंगळ-शुक्र अष्टमांत असतील तर वृषणवृद्धि होईल; अथवा तेथें अगर वृश्चिक राशीस मंगळ-शुक्र असतील तर वृषणवृद्धि होईल.

(६) अष्टमस्थानीं मंगळ क्रूर नक्षत्रीं असेल तर मूळव्याध होईल.

(७) अष्टमस्थानीं राहू अगर हर्शल असेल तर अनेकवेळां लग्न फिसकटेल. स्त्रीधन मिळणार नाहीं.

(८) अष्टमस्थानीं मंगळ असेल तर मृत्यु थोडे दिवस टिकणारे आजारानें होईल. अग्निराशीचा मंगळ सांथीजन्य रोगापासून मृत्यू करील.

(९) जन्मतः अष्टमस्थानीं गुरु असेल तर ज्या ज्या वर्षी गोचर पद्धतीनें अष्टमस्थानीं गुरु येईल तेव्हां कुटुंबामध्यें जवळचे नातेवाईकाचा मृत्यु होईल.

(१०) अष्टमस्थानीं अग्नी राशिखेरीज इतर राशींत रवि पापग्रहदृष्ट असेल तर आयुष्य ३०।३२ पेक्षां जास्त असणार नाहीं. असा मनुष्य अल्पायु समजावा.

(११) लग्नापासून आठवेस्थानीं नीचीचा कोणताही ग्रह असेल आणि लग्न बलहीन किंवा लग्नस्वामी नीचीचा झाला असेल तर अल्पायुषी; तेच ग्रह म्हणजे लग्न पति-अगर अष्टम-पति समभावी असतील तर आयुष्य; ६४ वर्षे; नवमेश अगर दशमेश लग्नांत असेल तर दीर्घायुषी होऊन भाग्यवान होईल. पंचमेश गुरु–युक्त असेल तरीहि दीर्घायुषी समजावा.

(१२) अष्टमस्थानीं चंद्र बुधाची युति असेल अगर अष्टमस्थानीं चंद्र असून बुध मंगळानें दृष्ट असेल तर मुलास (Convulsion) आंकडी होते. रवि अगर लग्नेश बलिष्ट असेल तर त्यांतून मुलाचा निभाव लागेल. नाहींतर १॥ वर्षाचे आंत मुलास मृत्यु येईल.

नवमस्थानासंबंधीं अनुभविक नियम

(१) मकर राशीचा गुरु अगर चंद्र तृतीय अथवा नवमस्थानांत असेल तर मनुष्य फार कर्मठ होतो.

(२) नवमस्थानांत राहू अगर गुरु असेल तर पुष्कळ यात्रा होतील.

(३) नवमस्थानीं तृतीय अगर सप्तमाचा स्वामी जलराशींत असेल तर जलपर्यटणें होतील.

(४) नवमस्थानीं गुरु–चंद्र असतां दिगंत कीर्ति मिळेल. जगांत अतिशय प्रसिद्ध लोकांचे कुंडलींत हा योग अगर ह्या स्थानांत झालेला गुरु चंद्राचा नवपंचम योग असतो.

(५) नवमस्थानांत कोणत्याहि राशीचा शनि असेल तर पितृसुख फार मिळत नाहीं. निदान बापाशीं मुळींच पटणार नाहीं, त्याचेपासून वेगळें रहाण्याचा प्रसंग येईल.

(६) या ठिकाणीं रवि असेल तर अशीं माणसें सरकारी नोकरींत असल्यास त्यांचा अभ्युदय लवकर होतो.

(७) कोणत्याही राजकारण-धुरंधर पुरुषाचे कुंडलींत या स्थानीं रवि, चंद्र, गुरु, शुक्र, हर्शल, नेपच्यून यांपैकीं एकापेक्षां अधिक ग्रह असावे लागतात.

(८) नवमस्थानीं मंगळ असणारे लोकांकडून नोकरी अगर सेव्यवृत्ति केव्हांही होणार नाहीं. त्यांनीं स्वतंत्र धंदा करावा हेंच बरें.

(९) राहु, चंद्र अगर गुरु यांपैकीं कोणताहि ग्रह येथें असेल तर असा मनुष्य सनातन धर्माभिमानी असतो. तीर्थयात्रेनिमित्त पुष्कळ प्रवास होतात.

(१०) येथें केतु असणारे लोक दांभिक असतात. या स्थानीं चंद्र, मंगळ, शनि, हर्शल यांपैकीं कोणताही ग्रह असून तो ग्रह द्वादशस्थानांतील

पापग्रहाशी केंद्रयोग करील तर अशा मनुष्याची कीर्ति चांगली रहाणार नाहीं. बदनामी होईल. नांवलौकिकास बट्टा लावील. बंधनयोगाचे सुद्धा प्रसंग येऊं शकतील.

दशमस्थानासंबंधीं अनुभविक नियम

(१) दशमस्थानीं मंगळ असेल तर ज्या नोकरीमध्यें सत्ता आहे अशी नोकरी मिळते. कुंडलींत इतर योग बलिष्ठ असून दशमांत मंगळ असेल तर मॅजिस्ट्रेटच्या पॉवर्स मिळतात. दशमस्थानीं गुरु असतां मनुष्य फार यशस्वी असतो. या स्थानीं गुरु असणारे लोक चांगले न्यायाधीश होतात.

(२) दशमामधील रवि, गुरु, मंगळ अधिकार, मान्यता व वैभव देतात. सरकारी व सार्वजनिक कामामध्यें चांगला दर्जा प्राप्त होतो. दुर्बल दशमस्थानीं असतां आकस्मिक उद्योगधंदा, नोकरी जाते. दशमस्थानीं दुर्बल असलेला मनुष्य आपले बुद्धिबलानें विलक्षण धंदे निर्माण करून त्यावर आपली उपजीविका चालवितो. दशमांतील शनि अपयश, ऱ्हास, अधःपतन व उद्योगधंद्यामध्यें नाश उत्पन्न करतो. दशमांत शनि असतां लोक निंदा करतात.

(३) दशमेश राहुयुक्त ५।९।१ किंवा ६।१२ या ठिकाणीं असेल तर चोरी करून धन मिळवील. अष्टमपति व लाभपति नीचीचा किंवा शत्रुयुक्त झाला तर चोरी करून उपजीविका करील.

(४) दशमस्थानीं चंद्र सार्वजनिक खातीं, व्यापारी संस्था, बँका, लोकोपयोगी खातीं यामध्यें नोकरी देतो. येथें एकटा बुध असेल तर पोस्ट ऑफिसें, रेल्वे, दळणवळण मार्ग, विदेशी खातीं यामध्यें नोकरी मिळते. याठिकाणीं मिथुन, कन्या राशी असणाऱ्या लोकांनीं नोकरीच करावी हें चांगलें. स्वतंत्र व्यापार धंदे त्यांचेकडून होणार नाहींत.

(५) दशमस्थानीं शुक्र वायु अगर पृथ्वी राशीचा असेल तर अशी माणसें मोठ्या लोकांचे आश्रयास असतात.

(६) याठिकाणीं राहू १।३।५।६।८ या राशीस असेल तर अशा मनुष्यास नोकरीमध्यें मोठा दर्जा मिळतो. कोणत्याही राशीचा राहू असेल तरीहि वयाचे ३८।३९ वर्षांपासून परिस्थितीमध्यें मोठा फरक पडतो. व नोकरीमध्यें त्याच्या दर्जानुसार योग्यता प्राप्त होते.

(७) या स्थानीं राहू कोणत्याही राशीला असेल.तर त्याला सार्वजनिक मानाच्या व विश्वासाच्या जागा मिळतात. २४।३०।३६।४२।४५ ४८।६० हीं वर्षे अत्यंत भाग्यशालीपणाची जातात.

एकादशस्थानासंबंधीं अनुभविक नियम

(१) एकादशस्थानांत कोणताही ग्रह असणें लाभदायक असतें.

(२) लाभस्थानाचा स्वामी व्ययस्थानीं असेल तर अशा मनुष्य फार खर्चाळ्या असतो. त्याच्याजवळ द्रव्यसंचय होत नाहीं. तसेंच व्ययस्थानाचा स्वामी लग्नीं असेल तर त्या मनुष्यास पैसा खर्च करण्याची इच्छा होणार नाहीं. असा मनुष्य पोटाचे हाल करूनही द्रव्यसंचय करण्याचे मार्गी असतो.

(३) या स्थानीं शनि १।४।५।८ ह्या राशीचा असेल तरी स्थावर इस्टेट घरें वगैरे कितीही असली तरी आयुष्याचे उत्तर भागांत दारिद्र्य भोगण्याचे प्रसंग येतात.

(४) लाभस्थानीं कोणतेही दोन पापग्रह असतील तर पैसा कितीही मिळाला तरी पैशाचा संग्रह केव्हांही होणार नाहीं व सांपत्तिक स्थिति नेहमीं अडचणीची असेल.

(५) लाभस्थानीं गुरु, चंद्र, रवि, शुक्र, शनि यांपैकीं कोणताही ग्रह स्वगृहीं किंवा मित्रगृहीं असेल तर दारिद्र्य केव्हांही येणार नाहीं.

(६) लाभस्थानीं मंगळ, शनि, हर्षल, राहू, केतु यापैकीं कोणताही ग्रह अशुभदृष्ट असेल अगर शत्रुगृहीं असेल तर वृद्धापकाळीं मुलांचेकडून सुख होईल ही आशा बाळगणें व्यर्थ. मुलें पराक्रमी व भाग्यशाली असली तरी त्यांचेपासून आईबापांस सुख मिळत नसतें.

(७) लाभस्थानीं जलराशीला (४, ८, १२) कोणताही पापग्रह असेल तर असा मनुष्य व्यसनाधीन असतो. मित्र व्यसनी मिळतात व व्यसनांत पैशाचा व्यय होतो.

(८) हर्षल, मंगळ, राहू, केतु, नेपच्यून, शनि ह्यांपैकीं कोणतेही दोन ग्रह बलहीन राशीला असून गुरुचंद्राच्या अशुभ दृष्टित असतील तर अशा मनुष्यानें व्यापारधंदे फार काळजीपूर्वक करावे. एकाच धंद्यांत बरीच रक्कम अडकवूं नये. व्यापारधंद्यांत एकदम बूड येऊन उद्योगधंदे सोडावे लागतात.

(९) लाभस्थानीं रवि, चंद्र, बुध, गुरु, शुक्र, नेपच्यून यांपैकीं कोणताही ग्रह बलवान राशीला असेल तर अशा मनुष्याच्या महत्वाकांक्षा ३० ते ४२ वर्षापर्यंतच पुऱ्या होतात.

द्वादशस्थानासंबंधी अनुभविक नियम

(१) द्वादशस्थानीं अशुभ राशींत शनि पापग्रहदृष्ट असतां राजकीय संकटें येतात. हा बंधनयोग आहे.

(२) व्ययस्थानीं शनि, नवमस्थानीं रवि, हर्षल, चंद्र व आठवा मंगळ असून चंद्रावर गुरु अशुभ दृष्टीनें पहात नसेल तर अल्पायु योग समजावा.

(३) द्वादशस्थानांत दोन किंवा तीन पापग्रह असतां मनुष्य कर्जबाजारी असतो. व्यापारी लोकांचे कुंडलींत हा योग दिवाळखोरीचा समजावा. मालमत्ता कितीहि असो या स्थानीं दोन पापग्रह असणारे लोकांस इस्टेटीवर कर्ज करण्याचे प्रसंग येतात.

(४) रवि अगर चंद्र एकएकटे शत्रु राशीला असतील अगर मंगळ शुक्रानें युक्त असतील तर अशा मनुष्याच्या उजव्या नेत्रास दृष्टि कमी असते. चष्मा लव र वापरावा लागतो.

(५) या स्थानीं गुरु,नेपच्यून अगर राहु असेल तर अशा मनुष्यास आध्यात्मिक ज्ञान व वेदांताची आवड असते.

(६) द्वादशस्थानांत गुरु असणारे विद्यार्थी अत्यंत बुद्धिमान असतात परंतु त्यांच्या बुद्धीचे मानानें,परीक्षेत त्यांना श्रेष्ठवर्ग मिळत नाहीं.

(७) द्वादशस्थानीं रवि असणारे लोकांना अभ्युदय पूर्ववयांत होत नाहीं. त्यांना जगांत प्रसिद्धी मिळत नाहीं. परंतु वयाचे ३३ वर्षांनंतर भरभराट होते व जगांत प्रसिद्धी मिळते.

(८) या ठिकाणीं शनि, बुध, केतु, मंगळ यांपैकीं दोन ग्रह असून त्यांचेवर कोणत्याहि ग्रहाचा केंद्र अगर प्रतियोग होईल तर हा बंधनयोग असतो. अशा लोकांचा आयुष्यांतील बराच भाग आपापसमध्यें जातो.

(९) या ठिकाणीं कोणतेहि दोन शुभग्रह असतील तर पैशाचा व्यय प्राप्तीपेक्षा जास्त होतो परंतु तो व्यय शुभकामीं धार्मिक कार्यांत किंवा नातेवाईकांचे शिक्षणाकरितां होतो. हा योगसुद्धां कर्जबाजारीपणाचा आहे परंतु असें कर्ज सत्कार्यांत झालेलें असतें.

सर्वसाधारण अनुभविक नियम

(१) जन्मकुंडलींत चंद्र अग्निराशींत पापग्रहयुक्त अथवा मंगळाजवळ असेल अगर क्रूर ग्रह युक्त असेल तर पत्नी अतिशय रागीट स्वभावाची मिळेल. तिच्यापुढें अशा माणसाचें कांहीं चालणार नाहीं. तिच्या तंत्रानेंच चाललें पाहिजे.

(२) स्त्रियांचे कुंडलींत रवि क्रूर नक्षत्रीं असेल तर त्यांना नवरा अतिशय तामसवृत्तिचा मिळेल.

(३) सप्तमस्थानीं कर्क राशीचा चंद्र असेल तर नेहमीं प्रवास करावे लागतील.

(४) जन्मकुंडलींत लग्न, सप्तम, पंचम अगर नवमस्थानीं मकर राशीचा शुक्र असेल तर मनुष्य अगदीं स्त्रैण बनतो. पत्नीचे आधीन असतो.

(५) शुक्र शनिचे राशीस असून षष्ठेश मिथुन,कन्या अगर मकर राशीस असेल तर अंगास घाण येईल, अथवा शुक्र, बुध, मिथुन अथवा कन्या राशींत असून केंद्रांत असतील तर तसेंच समजावें.

(६) जन्मकुंडलींत कोठेंही शुक्र मंगळाची युति होत असेल तर अशा मनुष्यास अत्तरें व पोशाखाचा शौक असतो. त्याची रहाणी फार टापटिपीची व दिखाऊ असते. स्त्रीं शुक्र असणारीं माणसेंहि फार चैनी व उधळी निपजतात.

(७) ३।६।९ राशींत कोठेंही शुक्र असेल तर लग्न विलंबानें होईल.

(८) फॉरेस्ट खात्यांत नोकरी करणारे लोक मेष चंद्रावर अगर लग्नावर जन्मास येतात. निदान चरराशींत बरेच ग्रह असतात.

(९) एखादा मनुष्य दत्तक दिला असेल तर त्याचे जन्मकुंडलींत खालीं दिलेले योग आढळून येतात.

(१) चतुर्थस्थानीं पापग्रह अगर शनि.

(२) चंद्रापासून चतुर्थ, दशमस्थानीं पापग्रह.

(३) चंद्र किंवा रवि पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट.

(४) रविपासून दशमस्थानीं अगर नवमस्थानीं पापग्रह.

(५) चतुर्थ अथवा दशमस्थानीं मेष, सिंह, धनु किंवा ह्यांपैकीं एखादी राशी व त्यांत पापग्रह.

(१०) कुंडलींत बहुतेक ग्रह उदीत मार्गांत म्हणजे सप्तमापासून द्वादशस्थानापर्यंत असता संपत्तीस फार चांगलें असते.

(११) वकील लोकांचे जन्मारंभीं बहुतकरून मिथुन, कर्क, तूल, सिंह, धनु व कुंभराशी असते व बुध ह्या राशींत असतो.

(१२) उत्तम सर्जन अथवा डॉक्टर वृश्चिक अगर धनु लग्नावर अथवा त्या राशींत चंद्र, मंगळ अगर गुरु असतां जन्मास येतात. निदान दशमस्थानीं वृश्चिक राशी येते.

(१३) लिहितांना जर तोंड वेडेवाकडे करीत असेल तर लग्नांत अगर द्वितीयस्थानीं राहू असतो.

(१४) खुजे, कुबडे व कुरूप लोक बहुतकरून वृषभ, वृश्चिक आणि मकर ह्या लग्नीं जन्म पावतात व त्यांचे कुंडलींत मंगळ, हर्षल व शनि मंगळ यांचे अशुभ दृष्टियोग झालेले असतात. हा योग द्विस्वभावराशींत असेल तर पाय व हात यांच्यांत व्यंग असते. स्थिरराशींत हा योग असतां शरीराच्यामध्यें व्यंग असते. चरराशींतील हा योग डोक्यास व्यंग दर्शवितो.

(१५) एकाद्या कुंडलींत लग्नीं रवि व सप्तमस्थानीं मंगळ असेल तर मकरादायकेपैकीं एक लग्न झाल्यावर लवकरच मृत व्हावयाचेच. पुरुषाचे कुंडलींत असा योग असतां त्यास स्त्रीसुख मिळत नाहीं. स्त्रियांना असा योग असतां पतिसुख मिळणार नाहीं.

(१६) जन्मकुंडलींत सूर्य कोणत्याही स्थानीं असून बुध, गुरु, शुक्र आणि चंद्र, द्वितीय किंवा नवपंचमस्थानीं असतील तर अशा मनुष्यास शरीरसुख व संपत्ति चांगली मिळेल.

(१७) गुरु, चंद्र एखाद्या कुंडलींत नवपंचम योग करतील तर मनुष्यास दारिद्र्य येण्याचा कधींही संभव नाहीं.

(१८) मिथुन राशीचा राहु ५-९-११ स्थानांत असतां वारंवार द्रव्यप्राप्ति होते.

(१९) ज्यांच्या कुंडलींत लग्नीं अगर सप्तमस्थानीं शुक्र, चंद्र असतात त्यांच्या शरीरावर पुष्कळ खुणा असतात.

(२०) स्त्रियांचे कुंडलींत अष्टम अगर द्वादशस्थानीं मंगळ असेल तर स्त्रियांना रजोदोष उत्पन्न होतो.

(२१) स्त्रिया जेव्हां प्रसूत होतात, त्यासमयीं मर्त्यांचे कुंडलींत चंद्र, लग्न, तृतीय, पंचम, सप्तम, नवम अगर एकादशस्थानींच असला पाहिजे व गर्भसंभव स्त्रियांचे कुंडलींत चंद्र अनुपचयस्थानीं व पुरुषांचे कुंडलींत उपचय असतांनाच होतो. उपचयस्थानें ३, ६, १०, ११. बाकी सर्व अनुपचय.

(२२) ज्या मुलाचे जन्मकाळीं , ज्येष्ठा व आश्लेषा यांपैकीं, एखादे नक्षत्र असेल तर अशा नक्षत्रावर जन्मलेलीं मुलें आई अथवा बाप यांस घातक असतात. मात्र ह्या नक्षत्रीं चंद्र असतां तो ६-८-१२ ह्या स्थानांत नसेल व चतुर्थ व दशम हीं स्थानें पापग्रहयुक्त अथवा दृष्ट नसतील तर त्या नक्षत्राचा परिणाम होणार नाहीं.

(२३) स्त्रियांचे कुंडलींत गर्भोत्पादक ठिकाणावर सूर्य, मंगळ येतील व त्यावर शुक्राची शुभदृष्टि असेल तर त्यावेळीं गर्भसंभव व्हावा असा नियम आहे. गर्भसंभवकालीं स्त्रियांचे कुंडलींत सूर्य, शुक्र योग झाला असेल तर त्यांचे बाळंतपण सुखानें जाईल. गुरु व शुक्रयोग अगर त्यांचा शुभ दृष्टिसंबंध झाला असेल तरीहि बाळंतपण सुखानें जाईल. मात्र शुक्र, मंगळ योग अगर त्यांचा अशुभ दृष्टिसंबंध असेल तर धोका आहे असें समजावें.

(२४) जेव्हां जेव्हां जन्मकुंडलींत चंद्रापासून बुध व शुक्र चतुर्थ अष्टम आणि द्वादशस्थानीं आढळतील तेव्हां त्या पुरुषाची पापाचरणाकडे प्रवृत्ति होईल. इतर शुभग्रहांची दृष्टि ह्या योगावर असेल तर पापाचरण होणार नाहीं.

(२५) जेव्हां जेव्हां चलितचंद्र जन्मचंद्रापासून ३-५-९-११ येईल तेव्हां तेव्हां ते दिवस तात्पुरते तरी लाभदायक व सुखदायक जातील.

(२६) जेव्हां जेव्हां जन्मकुंडलींत लग्नीं शनि व सप्तमस्थानीं गुरु येईल तेव्हां तो काल अनिष्टच जाईल.

(२७) जन्मकुंडलींत तृतीय, नवम अगर एकादशस्थानीं " शनि मंगळ " व चंद्र, मंगळ असतील तर तो मनुष्य आपले कुलांत श्रे होईल.

(२८) केंद्रामध्यें बरेंच ग्रह असतील तर मनुष्य कर्तृत्ववान समजावा परंतु त्याचे कार्यांत नेहमीं विघ्नें येतील. त्याला जगांत सर्वांशीं टक्कर देऊन मार्ग क्रमावा लागेल व नेहमीं विरोध होईल आणि अशा विरोधी परिस्थितीमधून त्याला मार्ग क्रमावा लागेल.

(२९) केंद्रामध्यें चर राशी असलेले लोक जगांत पुढें येतात.

(३०) शनि,बुधाची युति व शुभयोग चिंतन, एकाग्रता व आध्यात्मिक ज्ञान ह्या बाबतींत फार उत्तम असतात.

(३१) पुरुषाचे कुंडलींत शुक्र, जल राशींत असून त्यावर शनि अगर हर्षलाची अशुभ दृष्टि असेल तर तो मनुष्य दारूबाज, व्यसनी, अमली पदार्थांचें सेवन करणारा समजावा. तसेंच हे लोक वेश्यागमन करणारे व परस्त्रीरत होतात. अश्लील भाषा वापरण्यांत हे लोक पटाईत असतात. स्त्रियांस हे योग फार वाईट असतात.

(३२) स्त्रियांचे कुंडलीमध्यें चंद्र, शुक्र जलराशींत ३-५ ७ ११ ह्या स्थानीं असतील तर त्या स्त्रियांना विषयवासना जास्त व सुखासक्तपणाकडे त्यांचें जास्त लक्ष असते. चंद्र, शुक्र असे असून त्यावर शनि हर्षलाची अशुभ दृष्टि असेल तर अशा स्त्रिया व्यभिचारी, व्यसनी निघतात.

[३३] क्षीणचंद्र बारावें स्थानीं व क्रमेण पापग्रह असून अष्टमस्थानीं असेल तर क्षीण बालारिष्ट योग समजावा. केंद्रीं असलेल्या शुभ ग्रहांचा कांहीं उपयोग होणार नाहीं.

[३४] केंद्राधिपति ५।९ ह्या स्थानाच्या स्वामीशीं युक्त असणें हें भाग्याचें लक्षण आहे.

[३५] पुरुषाचे कुंडलीमध्यें रवि हर्षलाचे अशुभ योग अतिशय वाईट असतात. हे लोक मोठे कर्तबगारीचे व धाडसीवृत्तीचे असतात. मोठमोठीं कामें करतात. नवीन कंपन्या, कारखाने, समाईक भांडवलावर काढतात. परंतु शेवटीं त्यांत त्यांना अपयश येते व हे लोक सपशेल बुडतात. हा अनुभव विशेषतः रवि, हर्षल युति, समक्रांति अगर काटकोन योग असता येतो. अशा योगावर जन्मलेल्या लोकांनीं कोणतीही धोक्याचीं कामें हातीं घेऊं नयेत; अगर सट्टे शर्यतीमध्यें पडूं नये. सार्वजनिक कामें, मक्ते, रेल्वेचीं कामें अंगावर घेऊं नयेत. नोकरीमध्यें असलेल्या लोकांस वरिष्ठांकडून अगर मालकांकडून नेहमीं त्रास होतो. बेअब्रू होण्याचे प्रसंग येतात.

[३६] वर्षकुंडलींत असा योग येईल तर कोणतेही धोक्याचे धंदे हातीं घेऊं नयेत अगर नवीन काढूं नयेत.

[३७] ज्यांचे कुंडलींत रवि, हर्षलानें बिघडला आहे त्यांचे प्रगतींत नेहमीं अडथळे येतात. कोणतेंही काम त्यांनीं हातीं घेतलें कीं त्यामध्यें प्रथम विघ्न तयार असतात.

[३८] जन्मकुंडलींत व्यभिचारयोग झाला असेल तर वार्षिक कुंडलीमध्यें हर्षल, रवि व शनि चंद्राचे योगावर स्त्रिया बिघडण्याचा संभव असतो.

[३९] बुधशनीचे कोणतेही दृष्टियोगावर जन्मलेले लोक मोठे धूर्त, धोरणबाज, कल्पक असतात परंतु बुधावर गुरु चंद्राचा शुभयोग नसेल तर त्यांचे बुद्धिचा उपयोग द्रव्यप्राप्तिला होणार नाहीं.

भ्रमण सुरू असेल तर वार्षिक शुभदृष्टी योगाचे परीणाम पुष्कळ कमी होतील.

वार्षिक कुंडलींतील दृष्टीयोग अंशतुल्य होतो तेव्हांच त्याचे शुभाशुभ परिणाम होतात. परंतु गोचर भ्रमणांचे परिणाम तो ग्रह ६ अंश मागें असल्यापासून होऊं लागतात व अंशतुल्य युति अगर दृष्टीयोग झाल्यानंतर परिणाम लगेच कमी होऊं लागतात.

पुढील भविष्य साधारणपणें कुंडलीकडे नजर टाकतांच दिसून येते. प्रत्येक महिन्यांत आपले जन्म कुंडलींत नेपच्यून,हर्शल,शनि, गुरु, मंगळ, राहू आपले जन्मग्रहांबरोबर केव्हां युति करीतात व महत्वाचे दृष्टीयोग केव्हां करितात तें टिपून ठेवावे. कुंडलींतील जन्म ग्रहाशीं होणारी गोचर भ्रमणें कुंडलींतील दृष्टीयोगांना उत्तेजित करतील व जन्मकुंडलींतील गोचर भ्रमणें जन्मकुंडलींतील ग्रहांस वार्षिक कुंडलींतील ग्रहांकडून होणारे योगास उत्तेजित करतील तरीही दोहोंमध्यें जन्मकुंडलींतील गोचरभ्रमणें जास्त परिणामी समजावी.

प्रत्येक ग्रहाचे बारा राशीमधून परिभ्रमण

चंद्र १२ राशी २८ दिवस ७ तास ४३ मि. भ्रमण पुरें करितो. रवि १२ महिने (३६५ दिवस), मंगळ २२ महिनें,बुध १ वर्ष, गुरु सुमारें १२ वर्षे, शुक्र १ वर्ष, शनि सरासरी २९॥ वर्षे.

हर्शल ८४ वर्षे, नेपच्यून १६५ वर्षे, प्लुटो २४८ वर्षे.

शुक्र रविपासून जास्तींत जास्त ४८ अंशापेक्षां दूर नसतो. बुध २८ अंशापेक्षां दूर नसतो. म्हणून त्यांचा भ्रमण काल सुमारें १२ राशी पुरे करण्यास सरासरी १ वर्ष असतो.

गोचर भ्रमणें कशी पाहावी व त्याचा उपयोग

• आपले जन्मकुंडलींवरून ग्रह कोणते अंशांत गेल्यावर जन्मकुंडलींतील ग्रहांबरोबर युति दिल्यानंतर काटकोन—त्रिकोण व प्रतियोग करितात.

ाचा कायमचा तक्ता करावा व प्रत्येक वर्षाची नवीन एफेमरी चाळून ापले जन्मग्रहांबरोबर वरील योग कोणत्या तारखेस होतात त्या तारखा टिपून ाव्या. कल्पना करा की गुरु कर्केचे २५ अंशात आहे तर कन्या व ृश्चिक व वृषभ २५ अंशात कोणताही ग्रह येईल तेव्हा जन्मगुरुबरोबर द्विरद्वादशानंतर व नवपंचमयोग करील. तूळ राशीत २५ अंशात केंद्रयोग, ाकर २५ अंशात प्रतियोग व मेष २५ अंशात पुन्हा केंद्रयोग होईल. एफेमरीतून प्रत्येक ग्रहाचे दृष्टीयोगाच्या तारखा काढाव्या. चंद्र, बुध ाुक्र हे ग्रह विचारात घेऊं नयेत. त्याप्रमाणेच कुंडलीतील किरकोळ भ्रमणाचा चंद्र, बुध, शुक्र, केतू यांचा विचार करू नये.

गोचर रविचे जन्मशनिवरून भ्रमण मानसिक अस्वास्थ्य, काळजी, अपयश, औदासिन्य उत्पन्न करते व हा भाग नवीन कामें हातीं घेण्यास व महत्वाची कामें करण्यास अभागीपणाचा असतो. शनीचे अंशामध्ये १२ अंश रवि असल्यापासून या युतीचे परिणामास सुरुवात होते. युति होऊन गेल्यावर दृष्टीयोगाचे परिणाम भराभर कमी होऊं लागतात. रविखेरीज इतर ग्रहांचा परिणाम युति अगर दृष्टीकोन होण्यापूर्वी ६ अंशापासूनच समजावा.

रवि–शनिचा शुभयोग होत असून त्याच महिन्यांत वार्षिक कुंडलीमध्ये त्यावेळीं शुभ चांद्रयोग झाला असेल तर तो महिना फार भाग्यदायक समजावा.

ग्रहगोचर परिभ्रमणाचीं सविस्तर फलें

स्थानपरत्वें, ग्रहपरत्वें आमचें जातक–रहस्यामध्यें दिलीं आहेत म्हणून त्याची पुनरावृत्ती येथें करीत नाहीं. फक्त ग्रहगोचर पद्धतीचीं तत्वें व वार्षिक दृष्टीयोगाचा गोचर भ्रमणाबरोबर संबंध इतकेच विवेचन प्रस्तुत ग्रंथात केलें आहे.

अशुभ दृष्टीयोग नेहमीच अनिष्ट नसतात

पुष्कळ ज्योतिषांची अशी समजूत आहे की युतिकेंद्रयोग, प्रतियोग व अशुभ ग्रहांचें क्रांतियोग नेहमीच अशुभ फलें देतात व ज्यांचें कुंडलींत असें केंद्रयोग प्रतियोग वगैरे झाले आहेत असे लोक नेहमीच अभागी असतील व ते कधींच पुढें येणार नाहींत ही समजूत खोटी आहे.

या योगामुळें जन्मणारास असमाधान, अडचण, दुःख, विपरीत परिस्थिती निर्मित झालेली असते ही गोष्ट खरी आहे. परंतु दुसरे कांहीं शुभ योग रवि, चंद्र गुरु, दृढ़ील शनि यांचेमध्यें झाले असल्यास आपल्या श्रेष्ठ व्यक्तीत्वानें, चिकाटी, दृढनिश्चय व श्रेष्ठ आत्मबलानें असा मनुष्य आपले नशीब बदलू शकतो. निराशा व अडचणी यांनीं तो निरुत्साही होत नाहीं जी माणसें आपल्या कर्तृत्वानें गरीबींतून आपल्या गुणानें वर आलेली असतात त्यांचें कुंडलींत ग्रहांचें केंद्रयोग झालेले असतात. अली-कडील जगांतील सर्वाधिकारी स्टॅलीन, हिटलर, फ्रँको, मावत्सेतुंग मुसोलोनी, प. नेहरू यांच्या जन्म कुंडल्या पाहिल्या तर याची सत्यता दिसून येईल. प्रतिकूल परिस्थितिमधून अभ्युदय पावलेल्या पुढाऱ्यांनीं अत्यंत विकट परिस्थितीमधून आपलें नशीब स्वतःच बनविलेलें असतें म्हणूनच ते यशस्वी लोकनेते होऊ शकतात.

एखाद्या व्यक्तिचें कुंडलींत सर्वच शुभ योग असतील तर अशी माणसें कर्तबगार असणार नाहींत. सुखी, श्रीमंत असू शकतील. वाडवडिलांनें श्रीमंतीवर मजा करावी व आयुष्यक्रम ठरीव चाकोरींतून घालवावा. यांचें हातून लोकहिताची कोणतीही गोष्ट होणार नाहीं. राज्यकारभार चालविण्यास तर हे लोक नालायक समजावे. हे लोक नशीबवान असतील, हे लोक उदार, सभ्य, प्रेमळ असू शकतील परंतु विकट परिस्थितीबरोबर झगडून आपला भाग्यरवि आत्मतेजानें उदयास आणणाऱ्या व्यक्तींना आनंद व रोमांचकारी अनुभव देईल भाग्यवान लोकांचें जन्मांत त्यांना

दिसणार नाही. ग्रीष्मऋतुतील प्रखर उन्हाच्या चटक्याचा अनुभव घेतलेल्या लोकांस वसंतऋतूंतील आम्रवृक्षाखालील शीतल छायेचें महत्व समजतें. आमचें मतें कर्तबगार व्यक्तिचें कुंडलींत १-२ तरी केंद्रयोग अगर १ प्रतियोग असावा. सर्व अशुभ दृष्टीयोगमध्यें केंद्रयोग हा फार महत्वाचा, शुभ व कांहीं अंशी अशुभ परिणाम दर्शविणारा दृष्टीयोग आहे. हा दृष्टीयोग (□) खळबळ, वादविवाद, शत्रुत्व, कलह, एकदम कांहीं विघातक कार्य व विघ्न निर्माण होणें, कांहीं निश्चित स्वरूपाचा प्रतिकार, असमाधान व तळमळ निर्माण करितो. वरील अडचणी घातक होतील परंतु पूर्णपणें कार्यनाश करणार नाहींत. ह्या अडचणींतून पुन्हां प्रकाशाचीं किरणें दृग्गोचर होतील व ह्या विरुद्ध परिस्थितीचा उपयोग करून कांहीं विधायक कार्य होईल. ह्यादृष्टी कोणत्या ग्रहांमध्यें आहेत, कोणत्या राशी व स्थानामधून होत आहेत यावर ठरेल. केंद्रयोग होणारे ग्रह दोन्ही पापग्रह असतील व प्रत्येकाचा धर्म एकमेकांशीं विरुद्ध असेल तर अशा ग्रहांमधील होणारा केंद्रयोग मात्र विघातकच कार्य करील. व्यक्तीचें कर्तृत्वगारीला वावच मिळणार नाहीं. उदाहरणार्थ, मंगळ शनि हर्षल यांचेमधील केंद्रयोग हे नेहमीं अशुभ परिणामच होतील. हे केंद्र-योग केंद्रांतून होत असतील किंवा शत्रु राशीतून बलहीन नीच राशीतून होत असतील तर फारच वाईट समजावे. उदाहरणार्थ शनी, कर्क, मंगळ तुळ शनि नीच स्थानीं व मंगळ बलहीनस्थानीं असल्यास हा योग मात्र विघातक फलें निर्माण करील. परंतु शनि मकर राशीला व मंगळ मेष-राशीला असेल तर पहिल्या केंद्रयोगाइतकीं अनिष्ट फलें निर्माण होणार नाहींत. शेवटी कार्यसिद्धीच होईल. हाच नियम अशुभ दृष्टीयोगासही लागू करावा लागेल. शुभ दृष्टीयोग होणारे ग्रहामध्यें समान धर्म व मित्र, स्वक्षेत्र, उच्च राशीमध्यें हे योग असतील व केंद्र त्रिकोणामधून योग असतील तर त्यांचें महत्त्व जास्त आहे. एखादा नवपंचम योग मित्र

ग्रहगोचर पद्धतीवर अवलंबून चालणार नाहीं. आयुष्यातील महत्त्वाचे क्रांतीकर परिणाम निव्वळ गोचरग्रहानें दाखविले जाणार नाहींत. पुष्कळ वेळा लोक म्हणतात की पांचवा गुरु आला, नववा आला तरीसुद्धा माझे स्थितीमध्यें फरक झाला नाहीं असें का ? तर गोचरग्रह टिकाऊ फल निर्माण करूं शकत नाहीं. तात्पुरती थोडे दिवसापुरती फलें निर्माण करितात व चांगले वाईट दिवस दाखवण्याचें कामीं गोचर भ्रमणाचा फार उत्तम उपयोग होतो. परंतु जेव्हां वार्षिक कुंडलीमध्यें शुभयोग असतील व त्याचवेळीं गोचरभ्रमण शुभ महत्त्वाचे असेल तेव्हां ह्या गोचर भ्रमणानें वार्षिक कुंडलीतील दृष्टीयोगाचें परिणाम उत्तेजित होतात. म्हणून ज्योतिष विद्यार्थ्यांनें किंवा धंदेवाले ज्योतिषानें जी गोष्ट वार्षिक कुंडलीतील दृष्टीयोगानें दर्शविलेली नसेल ती निव्वळ गोचर भ्रमणानें सांगू नये; फसगत होईल. त्यालेरीज ज्या गोष्टी जन्म कुंडलीवरून घडणें शक्य नाहीं त्या गोष्टी सर्वग्रह जरी पांचवे, नववे आले तरी होणार नाहींत. तुमचें बँकबुकांत पैसे शिल्लक नसतील तर पोस्टमास्तर तुमचा मोठा दोस्त असला तरी पैसे कुठून देणार !

कल्पना करा एखाद्या मनुष्याचें जन्म कुंडलीमध्यें आरोग्य, पैसा व विवाह या बाबतींत जन्मग्रह उत्तम आहेत. तर गोचर भ्रमणानें एखादा पापग्रह मंगळ, शनि, राहु वगैरे १।२।७ स्थानातून भ्रमण करित असला म्हणून त्याला दारिद्य कसें येणार ? तसें येण्यास वार्षिक योग अत्यंत वाईट पाहिजेत. निव्वळ अशुभ ग्रहाचें भ्रमणानें, किरकोळ आजारानें प्रकृति बिघडेल. हातीं पैसा कमी येईल. व्यत्यय जास्त होईल व कांहीं घरगुती अडचणींमुळें स्त्रीसौख्य मिळणार नाहीं. जन्मतः या बाबतींत ग्रह अनिष्ट असतील तरच पापग्रहाचीं भ्रमणें सुद्धां जास्त त्रासदायक त्या त्या बाबतींत होतील.

पारिभाषिक शब्द आणि त्याच्या व्याख्या

केंद्रस्थानें:—कुंडलींत १-४-७-१० ह्या स्थानांस केंद्रस्थानें म्हणतात. ह्या स्थानीं असलेले ग्रह जास्त बलिष्ठ असून त्यांचा परिणाम सर्व आयुष्यभर दिसून येतो.

त्रिकोणस्थानें:—५-९ यास त्रिकोणस्थानें म्हणतात. ह्यांत असलेले ग्रह, विद्या व भाग्यदायक असतात.

पणफरस्थानें:—२-५-८-११. केंद्रापेक्षा हीं स्थानें कमी महत्वाची असतात.

अपोक्लीम:—३-६-९-१२ ह्या स्थानांस अपोक्लीम म्हणतात. ह्यांत असलेले ग्रह, चांगला परिणाम करूं शकत नाहींत. विशेषतः–६-१२ स्थानांतील ग्रह अनिष्ट फल उत्पन्न करितात.

निर्बली:—जेव्हां एखादा ग्रह आपले स्वगृहापासून सातवें स्थानांत असेल तेव्हां तो Detriment (डेट्रीमेण्ट) किंवा निर्बली समजावा. अपोक्लीम स्थानांत अथवा पापग्रहयुक्त असेल तर तो निर्बल असतो.

वायुराशि:—मिथुन, तूल आणि कुंभ. वायु राशींचा परिणाम मनावर होतो.

दृष्टि: ३० अंश [Semisquare] सेमिसेक्स्टाईल अथवा एकरान्यंतर. V̲
४५ अंश म्हणजे अर्ध काटकोन दृष्टि [Semisquare] सेमिस्क्वेअर. ∠
६० अंश अगर द्विरान्यंतर दृष्टि (Sextile) सेक्स्टाईल. ✱
७२ अंश दृष्टि [Quintile] क्वींटाईल. Q
९० अंश म्हणजे काटकोन दृष्टि [Square] स्क्वेअर. □
१२० अंश म्हणजे नवपंचमयोग [Trine] ट्राईन. △
१३५ अंश सार्धकेंद्रयोग [Sesquiquadrate] सेस्क्वीक्वाड्रेट. ⊑
१४४ अंश [Biquintile] बिक्विन्टाईल. ±

१५० अंश पञ्चाष्टक [Quincunx] क्विन्कंक्स. ∇

१८० अंश (Opposition) ऑपोझिशन, प्रतियोग 6°

P:—समक्रांति पॅरलल डिक्लिनेशन.

कंजंक्शन [Conjunction] म्हणजे युति, दोन्ही ग्रह एका राशीत एका अंशीं असणें. 6

शुभग्रहः—गुरु व शुक्र लग्नीं अथवा द्वितीय स्थानीं असेल तर पहिला यश देतो व दुसरा स्वभाव चांगला ठेवतो.

जुळयाराशिः—मिथुन, धनु व मीन.

चरराशिः—मेष, कर्क, तुला व मकर.

अस्तंगतः—कोणताहि ग्रह सूर्यापासून ८ अंशाचे आंत असेल तर तो सूर्याच्या तेजांत गुप्त किंवा अस्तंगत झाला असें समजावें. अस्तंगत ग्रह शुभ फल देऊं शकत नाहीं. परंतु अस्तंगत असलेल्या गुरुचा परिणाम कमी होत नाहीं.

द्विस्वभाव राशिः—मिथुन, कन्या, धनु व मीन.

भावारंभः—प्रत्येक स्थानीं ज्या राशीचा अंश उदित असेल तो त्या स्थानाचा भावारंभ असतो. भावारंभीं असलेले ग्रह त्या त्या स्थानावर फार परिणाम करितात

अन्योन्यक्षेत्रः—ग्रह एकमेकांचे स्वगृहीं असतील तर ते अन्योन्यक्षेत्रीं आहेत असें म्हणतात. उदाहरणार्थः—रवि मकर राशींत असून शनि सिंहराशीस असेल तर ते अन्योन्यक्षेत्रीं आहेत असें समजावें.

पृथ्वीराशिः—वृषभ, कन्या, मकर. जलराशिः—कर्क, वृश्चिक, मीन. वायुराशीः—मिथुन, तुल, कुंभ.

विषुवराशिः—मेष व तुला.

उच्चस्थानेंः--प्रत्येक ग्रहांची स्वगृहाप्रमाणें कांहीं उच्चस्थानें आहेत. " सूर्य-मेष ", " चंद्र-वृषभ "," हर्शल-मीन "," शनि-तुला " " गुरु-कर्क " " मंगळ-मकर ", " शुक्र-मीन " " बुध-कन्या ".

नीचस्थानेंः--जेव्हां एखादा ग्रह आपले उच्च स्थानापासून ७ वें स्थानीं असतो तेव्हां तो नीच स्थानीं आहे असें समजावें.

स्त्रीराशिः--वृषभ, कन्या, कर्क, वृश्चिक, मकर व मीन.

अग्निराशिः--मेष, सिंह व धनु

स्थिरराशिः--वृषभ, सिंह, कन्या व कुंभ.

प्रसवराशिः--कर्क, कन्या आणि मीन.

आयुष्यकारक ग्रहः--प्रत्येक कुंडलीमध्यें चंद्र अथवा रवि आयुष्य-दायक समजावें.

शुभग्रहः--रवि, चंद्र, बुध, गुरु, नपच्यून, क्षीणचंद्र.

पाप ग्रहः--हर्शल, शनि, मंगळ, क्षीणचंद्र.

स्वामीः--एखादी राशि ज्या ग्रहाचे स्वगृह असेल तो ग्रह त्या राशीचा स्वामी समजावा.

स्त्री व पुरुष ग्रहः--नपच्यून, हर्शल, शनि, गुरु, मंगळ व रवि आणि बुध हे पुरुष ग्रह, चंद्र, शुक्र हे स्त्रीग्रह, कित्येक ज्योतिषी शनि व बुध नपुंसक मानितात.

उत्तर दिशेच्या राशिः--मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह व कन्या. ह्या राशींत शुभ ग्रह असतील तर जन्मभूमीपासून उत्तरेकडे भाग्योदय होईल म्हणून समजावें. मेष, वृषभ व मिथुन ह्या राशी पूर्वेपासून उत्तरेची दिशा दर्शवितात, आणि कर्क, सिंह, कन्या ह्या उत्तरेपासून पश्चिमेकडील दिशा दर्शवितात.

समक्रांति.—विषुववृत्तापासून ग्रहाचें उत्तर दक्षिण अंतर सारखें असणें.

वक्री:—राशिचक्रांत एखादा ग्रह मागें जातो तेव्हां त्यास वक्री असें म्हणतात. रवि व चंद्र कधींहि वक्री नसतात. नेपच्यून, हर्षल, शनि आणि गुरु हे प्रत्येक वर्षांत कांहीं महिनेपर्यंत वक्री असतात. मंगळ व शुक्र दोन वर्षांत एकदां वक्री होतात आणि बुध एक वर्षांत तीन वेळां वक्री होतो. वक्री असलेला ग्रह मार्गी असतांना जसा चांगला परिणाम, करितो तसा करूं शकत नाहीं.

वियोग—जेव्हां दोन किंवा अधिक ग्रह युतींत असतील अगर एखाद्या दृष्टिसंबंधांत असतांना ते जेव्हां एकमेकांपासून दूर जाऊं शकतील तेव्हां त्यास (Seperation) सेपरेशन म्हणावें. ग्रहाचे परिणाम दृष्टिसंबंध होण्यापूर्वी ज्या मानानें असतात त्यापेक्षां दृष्टिसंबंध झाल्यावर परिणामाचें मान अधिक असतें. उदाहरणार्थः—चंद्र शनीचा केंद्रयोग दृष्टिसंबंध होतांना चंद्र शनीपासीं सहा अंशाचे अंतरावर आल्यावर जसा परिणाम होईल त्यापेक्षां जास्त परिणाम चंद्र, शनि यांची युति झाल्यावर होईल. युति अगर दृष्टिसंबंध होण्यापूर्वी ६ अंशापासून आणि युति अगर दृष्टिसंबंध झाल्यानंतर ८ अंशापर्यंत परिणाम असतो.

गृहिणी–जातक

स्त्रीजीवनावर विस्तृत व परिपूर्ण माहिती देणारा अप्रतिम जातक ग्रंथ. स्त्रियांचा स्वभाव, सौंदर्य, शरीर सौष्ठव, विवाह, वैवाहिक जीवन, दांपत्यसुख, संतति, वैधव्य, भाग्य, विद्या, स्वतंत्र उद्योग, नोकरी, आर्थिक स्वातंत्र्य, मनोवासना, विकार वगैरे स्त्री–जीवनांतील आधुनिक विचारांचा जातकशास्त्रानुसार ऊहापोह केला आहे.

विवाहाची व संततीची काल मर्यादा, जन्मग्रहाचे स्थितीवरून संतति-प्रतिबंधक उपाय कोणी करावे वगैरे आधुनिक प्रश्नांचा फलज्योतिष शास्त्रानुसार विचार केला आहे. केसरी, नवाकाळ, सकाळ, लोकशक्ति, वगैरे अनेक वृत्तपत्रकारांनी ह्या ग्रंथाची प्रशंसा करून, "फलज्योतिष शास्त्रांत मराठी भाषेत "गृहिणी जातक" ग्रंथानें एक अमोल ग्रंथाची भर पडली" अशी प्रशंसा केली आहे. प्रत्येक सुशिक्षित स्त्रीनें हा ग्रंथ अवश्य वाचावा व जवळ ठेवावा. पृष्ठसंख्या ४००. किंमत ५–८–०.

जातक–दीप

हा येथीचा दिवा । जरी नेलिया शेजिया गांवा ॥
तरी तेथें तो पाडवा । दीपच की ॥ (ज्ञानेश्वर)

जातकदीप हा अलौकिक अनुभवजन्य आत्मप्रचीतीनें, आत्मविश्वासानें लिहिलेला जातक-ग्रंथ आहे.

हा ग्रंथ खेडयांत व शहरांत अभ्यासू ज्योतिषास, नवशिक्यास किंवा तज्ज्ञास, धंदेवाईक ज्योतिषास दीपासारखा प्रकाश देईल. यांतील प्रमेयें स विधानें अचुक, अटळ फलें सांगणारी आहेत. प्रती फारच थोडया शिल्लक आहेत. पृष्ठें १७५, किंमत रु. ५–०–०

जातक रहस्य

सायन कुंडली कशी मांडावी, भावसाधन कोष्टकें, रविवरून स्वभाव वर्णन, भाग्योदय केव्हां होईल ? टॉलमी वेध्यामचे सिद्धांत, उद्योग धंदा, नोकरी, विवाह, प्रश्न ज्योतिष, ज्योतिर्वैद्यक, दिनवर्षपद्धति, फल ज्योतिषांतील अनुभविक नियम, कांहीं गुप्त कानगोष्टी वगैरे उत्कृष्ट माहिती दिली आहे.

प्रती थोड्या आहेत. पृष्ठसंख्या ३८५, किंमत रु. ५-०-०.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण : मुंबई. पुणें, कोल्हापूर, सोलापूर, बडोदें व नागपूर येथील बुकसेलर्सकडे अथवा खालील पत्त्यावर मिळूं शकतील.

ज्योतिषाचार्य : डी. एन्. राजे
६५४, शुक्रवार पेठ, पुणें नं. २.